डॉ. नितीन मोरे



# भांड सौख्य भरे

# भांडा सौख्य भरे!

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# भांडा सौख्य भरे!

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- २० जानेवारी २०२५

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे चौपन्नावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# भांडा सौख्य भरे!

डॉ.नितीन मोरे

# अनुक्रमणिका

१. भांडा सौख्य भरे

२. पोटेबाईंची पोटदुखी

३. अगा हे घडलेचि आहे

४. आरक्त गालांची गोष्ट

५. एका आमंत्रणाची गोष्ट

६. आमच्या घरातील वास्तुशास्त्र

७. एका लग्नाच्या मागणीची गोष्ट

८. मिताक्षरी डे ची गोष्ट

९. माझ्या पहिल्या विनोदी कथेची कथा


१०. रायटर्स ब्लॉकची गोष्ट

११. बावळट कासवाची गोष्ट

१२. ऑपरेशन चाळीतून सुटका



# भांडा सौख्य भरे!



मधुमालती..

हल्ली सैफिना वगैरे नाम संयोग होत असेल पण त्याचे ओरिजिन म्हणजे आद्य युगुल म्हणजे मधुमालती!

मधुसूदन आणि मालती..

हल्ली एकतर अशा नावांना बंदी आहे.. मधुसूदन सारखे पुरातनकालीन नाव धारण करणारा देह आजकालच्या युवकाचा कसा असेल? आणि मालती? फक्त बाई किंवा काकू..

तरीही आजच्या जमान्यात अशी काही जोडी जमलीच तर त्यांचे नाव मधुलती नाहीतर मालसदन असे काही झाले असते.

पण ही जोडी पुरातन कालीन..

म्हणजे लग्ने पंचवीस पंचवीस वर्षे टिकून असायची तेव्हाची. आजकाल व्यक्तीस्वातंत्र्याला किंमत आल्यावर पंचवीस महिने प्रोबेशन पिरियडच असतो म्हणे लग्नाचा. असेल. पण मधुमालती एकत्र टिकून आहेत. म्हणजे त्यांच्यात भांडणे नाहीत असे काही नाही. भांडणे आहेत.. तंडणे आहेत.. आदळ आहे.. आपट आहे.. म्हणजे मालतीबाई तशा रागीट. मधुसूदनराव आपले चंद्राहूनी शीतळु.. त्यामुळे पहिली काही वर्षे शांततेत गेली नि मग मालतीबाईंच्या ओरिजिनिल व्यक्तिमत्वाने फणा काढलाच. रूसव्या फुगव्यापासून ते जेन्युईन भांडणापर्यंत सारी रेंज आहे मालतीबाईंकडे. रेंज म्हणजे व्हरायटी म्हणता येईल अशी. पंचवीस वर्षांचा हा दांडगा अनुभव कसा काय वाया घालवावा?

झाले असे..

मधुमालतींच्या दोन्ही मुली लग्न होऊन सासरी गेल्या. मधुसूदनराव रिटायर झाले आणि रिटायरीज असोसिएशनचे अगदी ॲक्टिव्ह मेंबर झाले. नवा मुसलमान जास्त बिर्याणी चापतो म्हणतात.. तसा नवा पेन्शनर रिटायर झाला की जास्त ॲक्टिव्ह असतो.. तसे मधुसूदनरावांबद्दलही रिटायरमेंट सुलभ उत्साहामुळे झाले असावे. मालतीबाई आता रिकाम्या. म्हणजे दिवसभर करावे तर काय? आधी मुलींच्या धबडग्यात दिवस पुरत नसे.. आता दोन जणांचे काम उरत नाही. बिचाऱ्या मालतीबाई ..

अगदी आधीपासून टीव्हीवरच्या सास बहूच्या सिरियल पाहण्यात मन घातले असते तर आज त्यांच्यावर ही वेळ नसती आली. म्हणजे मालतीबाईंनी तसा प्रयत्न एकदोनदा केला ही होता. सासू सुना एकमेकांशी कशा भांडतात याची उद्बोधक अशी कहाणी पाहिलेली एक दोन वेळा.. पण त्यांना स्वतःची भांडणे आठवायची.. आपल्या रणरागिणी भांडणांपुढे ही म्हणजे झणझणीत रश्श्यापुढे बुळबुळीत भेंडीची भाजी जणू. त्यात एखादी शूर सासू सुनेला टोमणे मारणे सोडून खरोखरीच मारते वगैरे पाहिले की भांडणाचा आत्मा न समजल्याने त्या सीरियलवाल्यांवर डाफरत. घरातील भांडणे हा मसाला नाही, तर मीठ आहे हे न कळणाऱ्या त्या मालिकांवर त्यांनी स्वतःपुरता अघोषित बंदी घालून टाकलेली. त्या सीरियल्समध्ये इंटरेस्ट असता तर आज त्यांच्यावर ही वेळ आली नसती.. स्वतःची भांडणे ही बंद आणि इतरांच्या भांडणांत ही नसलेला रस.. करणार तरी काय त्या?

विचार करकरून मालतीबाई थकल्या.

आधीच पांढऱ्या होऊ घातलेल्या केसात अजून चंदेरी छटा चढली. तशा त्या आताही मधुसूदनरावांशी भांडायच्या, ते घरी सापडले की. पण त्यात 'ती' गोष्ट नसायची. उगाच आपले 'आदत से मजबूर' म्हणून भांडणांचा रतीब घालायचा. भांडणातली मजाच हरवल्यासारखी झाली.. एकूणच काय करावे त्यांना कळेना. आपल्या बऱ्यावाईट अवस्थेचे खापर एकदा मधुसूदनरावांवर फोडले की बरे वाटायचे त्यांना आधी.. पण हल्ली तसे वाटणेच बंद झालेले. आधी आतून भांडायचा उमाळा यायचा किंवा ती ऊर्मी यायची त्यामुळे भांडणात एक उत्साह असायचा. म्हणजे उदाहरणच द्यायचे तर भांडी आपटायच्या त्या, तीही एका तालात. रागारागाने त्या ओरडायच्या तर एखादा

राग आळवल्यासारख्या. थोडक्यात पूर्वी भांडणाला अर्थ होता. त्यातून त्यांच्या तुंबलेल्या किंवा साचलेल्या भावनांचे विरेचन व्हायचे.. पण हल्ली तशा भावनाच राहिल्या नाहीत की काय? त्यांना संशय यायचा.

मग तो दिवस उगवला.

एखादी गोष्ट व्हायची असेल तर त्याची तशी वेळ यावी लागते. म्हणजे अगदी कालपरवापर्यंत हे कसे ध्यानात आले नाही असे आश्चर्य वाटायला लागते. पण खरेतर हा वेळेचाच महिमा. काळ आला पण वेळ आली नव्हती असे काहीतरी म्हणतात दुसऱ्या संदर्भात तसेच काही. म्हणजे न्यूटनने ते सफरचंदच काय पण नारळही  झाडावरून पडताना पाहिले असणार आधीही.. जेम्स वॅट चहा काय पहिल्यांदा पीत असणार? किटलीचे झाकण वाफेने उडताना पाहिले असणार आधीही. पण एखादी गोष्ट सुचण्याचा क्षण असतो, तो यावा लागतो. तसा तो मालतीबाईंच्या आयुष्यात आला. आयुष्याला काही अर्थ येईल आता. त्यांना वाटले नि पटले. म्हणजे झाले काय..

मधुसूदनराव रिटायर्ड ऑफिसर होते. स्वत:ची अशी ओळख होती त्यांना. बाईंना वाटले आपली स्वत:ची अशी ओळख कोणती? आपला म्हणावा असा गुण कोणता? बाई विचारात पडल्या. नि तो करायला वेळ ही भरपूर होता हाताशी..

आजवर आयुष्यात सर्वात जास्त काय केले आपण? कोणती गोष्ट आपल्याला अतीव समाधान देऊन जाते? सर्वांचे उत्तर एकच..  नवऱ्याशी भांडण!

एका रात्री त्यांच्या मनात हा विचार आला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या निश्चित विचाराने उठल्या. त्यांना आपली वाट सापडली होती. मार्ग सापडला होता. त्यावर आता मार्गक्रमण करणार होत्या त्या.

तो मार्ग म्हणजे ह्या भांडणाबद्दल काहीतरी केले पाहिजे. करावे तर काय करावे? आता हा उपविचार! टीव्हीवरची भांडणे एखाद्या युद्धासारखी केली जातात. ती ही सासू सुनेत. खरी भांडणे नवरा बायकोची. त्याबद्दल जनशिक्षण केले पाहिजे. जनजागृती म्हणा ना. जनजागृती वगैरे म्हटले की मोठी समाजसेवा केल्यासारखे वाटते. पण कसे करावे हे सारे?

या बाबतीत मधुसूदनरावांचा सल्ला घेणे अशक्य. कोणता वीर आपल्या शत्रूच्या तलवारीला धार काढून देईल?

त्यांना आपली मैत्रीण आठवली. कदाचित ती काही आयडिया देईल तर. मालतीबाईंची मैत्रीण सोनिया. तिच्याशी चर्चा केली की काहीतरी मार्ग निघेल. जो काही निघेल तो मात्र या भांडणाबद्दलचाच असला पाहिजे. आजवरच्या पंचवीस वर्षात जे इतक्या वेळा केले आणि त्यात प्रावीण्य मिळवले त्याचा उपयोग इतरांना व्हायलाच हवा.

सोनियाशी चर्चा झाली.

सोनिया म्हणाली,"तुझा इरादा नेक आहे. तुझ्या मनात एक आस आहे आणि पक्की लगन आहे. तर होणारच. जिथे मृत्यूपत्र तिथे रस्ता म्हणतात ना! तुझ्या पॅशनचा कंप्याशनने विचार व्हायलाच हवा.."

सोनिया ही अशीच आहे. सर्व भाषांची सरमिसळ आणि नको तसे भाषांतर करत बोलणारी.

शेवटी भवति न भवति झाली. चर्चांच्या फेऱ्या झडल्या. चहाचे कित्येक कप रिचवले गेले,  कित्येक बिस्किटांचा त्या चहात अकाली बुडून लगदा झाला. अगदी घराघरात जाऊन प्रचार करण्यापासून ते नवविवाहित मुलींसाठी भांडणशिक्षण स्क्वेअर म्हणजे वर्ग चालवण्यापर्यंत. पण मार्ग काही दिसेना. पण सोनियाच्याच शब्दात जिथे मृत्युपत्र म्हणजे विल तिथे रस्ता दिसलाच.

- मालतीबाईंनी आपली 'सुखी आयुष्यात भांडणाचे मीठ.. अर्थात चवदार आयुष्याची गुरूकिल्ली' ही पुस्तिका लिहायला घेतली.

"त्यात तुला एकतर लेखिका म्हणून पहचान मिळेल.. वर तुझ्या जिंदगीचा मक्सद साध्य केल्याचा आनंदही.. बघ घराघरात तू पॉप्युलर होशील मालती.." सोनिया म्हणाली.

मालतीबाईंना आपल्या आयुष्याची दिशा मिळाली. काही दिवस भांडणाचे प्रॅक्टिकल बंद करून थियरीवर लक्ष केंद्रित करण्याचे त्यांनी ठरवून टाकले.

पुढचे काही दिवस मालतीबाईंचे परत विचारात गेले. म्हणजे लिहायचे ठरलेले पण काय काय नि कसे लिहावे? एखाद्या गोष्टीप्रमाणे लिहावे? गंभीर साहित्य लिहिल्यासारखे लिहावे की काही हलकेफुलके लिहावे? त्यासाठी सुरूवात कशी करायची नि शेवट कसा करायचा?

एके दिवशी त्या पेन नि वही घेऊन लिहायला बसल्याच. दोन वाक्ये लिहिली.. खोडली.. परत लिहिली.. खोडली. कंटाळून तो नाद सोडून दिला. मग त्यांना आठवली ती लहानपणची मुंग्यांची गोष्ट. प्रयत्न करकरून साखरेचा दाणा चढवणाऱ्या मुंग्या. तशा मालतीबाई आपली सल्लागारी चढवणार म्हणजे अपलोड करणार होत्या. प्रयत्न करावेत, पण कसे ते कळेना.

- मग एकाएकी त्यांचे लक्ष एका मासिकातल्या चंपूवन्संचा सल्ला सदराकडे गेले आणि त्यांनी ठरवून टाकले.. काल्पनिक प्रश्नांना काल्पनिक चंपूवन्सं बनून काल्पनिक नसलेले उत्तर द्यावे! प्रश्न आपलेच, उत्तर ही आपलेच. एकदा कसे लिहावे ते सुचले नि मालतीबाई कामाला लागल्या नि 'प्रश्न तुमचे उत्तर मालतीबाईंचे' या फाॅर्मेंटमध्ये लिहायला बाई बसल्या. आता हे लिहायचे तर

प्रथम प्रश्न बनवायला हवेत. शाळा सोडून आता कित्येक वर्षे झालेली. म्हणजे काही वर्षे त्या शाळेत शिक्षिका होत्या, तेव्हा पेपर सेट करायच्या. आता त्यांनी स्वत:लाच उत्तरे येतील असे प्रश्न बनवायला घेतले. शेवटी सुखी आयुष्याचे कुलूप उघडायचे तर ही किल्ली हवीच. त्या आता गुरू बनून ती गुरूकिल्ली वाचकांहाती सोपवणार होत्या. मालतीबाई कामाला लागल्या.

***

सुखी आयुष्यात भांडणाचे मीठ.. अर्थात चवदार आयुष्याची गुरूकिल्ली

(एक प्रश्नोत्तर दशावली)

लेखिका: मालूवन्सं अर्थात सौ.मालती मधुसूदन दशसहस्त्रबुद्धे

१.

प्रश्न:

मी एक नवविवाहित आहे. मला भांडणास सुरूवात कधी अन कशी करावी याबद्दल मार्गदर्शन हवे आहे.

उत्तर:

काय आहे बघ, भांडण असे ठरवून करता येत नाही. म्हणजे नवीन लग्न झाल्या झाल्या तरी. म्हणजे तुझे लग्न जर ठरवून झाले असेल तर थोडे दिवस जाऊ द्यावे लागतील. प्रेमविवाहाला मात्र ही काल मर्यादा नाही. नव्याचे नऊ दिवस मात्र जाऊ द्यावेत. प्रेम म्हटले की राग आलाच. तेव्हा भांडण कसे आतून येऊ देत.. प्रेमासारखेच. काहीही झाले तरी आपली बाजू लावून धरलीस पहिली काही भांडणे, तर पुढील रस्ता सोपा होईल इतके ध्यानात ठेवून पुढची वाटचाल कर.. बाकी, नांदा सौख्य भरे! माझा आशीर्वाद आहेच.

*

२

प्रश्न:

भांडणाचे महत्त्व आणि भांडण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींबद्दल आपले मार्गदर्शन हवे आहे. कृपया त्याबद्दल सांगावे.

उत्तर:

सखी, खूप चांगला प्रश्न विचारलास तू. भांडण म्हणजे संघर्ष, हा सुखी जीवनाचा पाया आहे. संघर्ष म्हणजे घर्षण! घर्षण हे किती महत्वाचे हे आपण नववीतील भौतिकशास्त्रात शिकलो आहोतच. शालेय शिक्षण हे पुढेही उपयोगी पडू शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे. आपल्या आतील टेन्शनचे विरेचन करण्यासाठी या सारखा उपयुक्त असा मार्ग नाही. परंतु ते करतानाही कुठल्या पद्धतीचा वापर कुठे, किती आणि केव्हा करावा याचे तारतम्य ठेवणे आवश्यक आहे. शत्रूशी लढताना तो आपला शत्रू आहे हे पक्के ठाऊक असते. तसे इथे नाही. म्हणजे शत्रूपक्षात गणना आपण आपल्याच माणसाची करत नाही. तेव्हा

कितीही लढाई जंगी झाली तरी ती लुटुपुटीची असते हे ध्यानात ठेवून यातील मार्ग वापरावेत. आणि शेवटी आपले अजिंक्यपद हा सुखी घराचा पाया आहे. तेव्हा ते तसे टिकणे आणि टिकवणे आपल्या घरासाठीही गरजेचे आहे.

नवशिक्यांनी सुरूवात रूसवा आणि फुगव्याने करावी. रूसव्यासाठी कारण शोधणे कठीण जाऊ नये. अगदी येण्यास होणारा उशीर किंवा आपल्या नव्या साडीकडे झालेले दुर्लक्ष हे कारण पुरू शकते. रूसव्याची बहीण फुगवा पाठोपाठ येतेच. तेव्हा रूसव्या फुगव्यांनी आपल्या भांडणजीवनाची सुरूवात करावी. त्यामुळे आपल्या पुढील यशस्वी भांडणांची पायाभरणी होत असते. येथे छोट्या लढाया हरण्याची सवय आपल्या नवऱ्यास लावली तर पुढे मोठया लढाया हरण्याचे दु:ख त्यास पचवणे सोपे जाते. शेवटी तेच त्याच्या भल्यासाठी आहे, त्यामुळे आपल्या पत्नी धर्मास जागून हे करावेच. पुढे भांडणाची तीव्रता गरजेनुसार वाढवत न्यावी. परिस्थितीनुसार आपली व्यूहरचना ठरवावी व बदलावी. म्हणजे कधी धुसफूस करावी. तर कधी तिरकस बोलण्याचा आधार घेत भांडत रहावे. तोंड फिरवणे आणि मौनव्रत स्वीकारणे हे ही करू शकता. पण ते भांडणाच्या सुरूवातीला करू नये. सुरूवात करताना शत्रूस गाफील गाठणे कधीही योग्य. त्यामुळे आपल्या भांडणाचे कारण कळणार नाही अशा बेताने पुढे जावे. हळूहळू मुख्य विषय उलगडत नेला की शत्रू मूळ विषय काय आहे हे शोधण्यात अर्धा गारद होतो. असा गनिमी कावा सुरूवातीसच वापरला की पुढील काम सोपे होते. आपल्याकडे युद्धासाठी लागणारा शब्दसाठा तयार असतोच. तो वापरताना विशेष विचार करू नये. शब्दास्त्रे कधी कधी अण्वस्त्रांहून घातक असू शकतात, पण विरोधी पक्ष आपलाच असल्याने त्याचा जास्त परिणाम होत नाही. तेव्हा उचलली जीभ लावली टाळूला असे करून

समाधान मिळत असेल तर तसे करण्यास हरकत नाही. शब्दास्त्रांचा दारूगोळा नि मसाला जवळ असताना बाकी कशाची गरज लागणार नाही. तरीही पुढे गरज पडल्यास आदळ आपट करावी. त्यासाठी न फुटणाऱ्या गोष्टी आधी जवळपास जमवून ठेवाव्यात. अनुभवी व्यक्तींना नुसतीच वादावादी करणे आणि ती करत असताना आदळ आपट करणे या दोघांत परिणामात फरक असल्याचे आढळून येईल. त्यामुळे गरज असल्यासच आदळआपटास्त्र वापरावे. या व्यतिरिक्त अजूनही काही भांडणपद्धती आहेत. म्हणजे सामानाची बॅग तयार ठेऊन माहेरी निघून येणे.. अर्थात दरवेळी बॅग घेऊन बाहेर पडण्याची गरज नसते, पण हाताशी बॅग तयार ठेवावी. म्हणजे 'मैं मैके चली जाऊंगी' हे सांगावयास सोपे पडते. एरवी आपली कपड्यांची गरज कितीही असो, बॅगेत जास्त कपडे भरू नयेत कारण एकट्याने जाताना नवरा सोबत नसल्याने ती आपल्यालाच उचलावी लागणार आहे हे ध्यानात ठेवावे. माहेरास्त्र सुरूवातीच्या काळात जास्त उपयुक्त ठरते. काही वर्षांत याची धार बोथट होत जाते. फक्त याचा उपयोग नीट विचार करून करावा. म्हणजे कारण तितकेसे सबळ असल्यासच करावा. काहीजणी न भांडता चूल बंद आंदोलन चालवतात. तर काही संपूर्ण मौन धारण करून विरोधी पक्षास कशासाठी हे सारे याचा थांगपत्ता लागू देत नाहीत.

पद्धती अनेक असल्या तरी आपले उद्दिष्ट एकच असावयास हवे, ते म्हणजे आपला विजय. या आधीही विजयच मिळत आला असेल तर दरवेळी त्याच्या प्रभावाखाली विजयाची शक्यता अजून वाढत जाते. एकवेळ अशी येते की तुम्ही अजिंक्य बनता आणि संसारातील हा सर्वोच्च क्षण समजावयास हरकत नाही. जेवढ्या लवकर हा क्षण येईल तितक्या लवकर तुम्हाला मन:शांती मिळेल हे समजून आपली व्यूहरचना आखत जावी.

*

३.

प्रश्न:

तुमचे सदर मी नियमित वाचते. भांडणाबद्दलचे मौलिक विचार इतर कुणीही आजवर मांडलेले माझ्या वाचनात नाहीत. तुम्ही 'भांडा सौख्य भरे' असा आशीर्वाद देता का कुणाच्या लग्नात?

उत्तर:

छानच प्रश्न विचारलास तू. भांडा सौख्य भरे .. या मध्ये संसाराचे सार आहे. भांड्याला भांडे लागते म्हणतात. म्हणून त्याला भांडण म्हटले जात असावे का? मी तर सांगते, भांड्याला भांडे लागते घरात. तेव्हा भांडी काचेची न वापरता स्टीलची वापरलीत तर भांड्यास भांडी लागूनही ती तशीच शाबूत राहतील. भांडण हे जीवनातील मीठ आहे. मीठाशिवाय जेवणाला नि भांडणाशिवाय जीवनाला चव येत नाही. पण लक्षात घे, मीठ म्हटले की चवीप्रमाणे नि चवीपुरते हे मात्र ध्यानात ठेव. मीठासारखेच भांडण ही प्रमाणाबाहेर वापरल्यास त्याचा त्रासच होईल. तेव्हा चवीपुरते भांडण असायलाच हवे. नाहीतर सगळी वैवाहिक आयुष्यातील मजा निघून जाईल. नवऱ्यास त्याचीच चूक दाखवून देण्यासारखे आनंददायी काम दुसरे नाही. भांडताना तर त्याने न केलेली चूकही दाखवून देता येते किंवा आपण स्वतः केलेली चूक ही त्यानेच केलेली आहे हे पटवून देता येते. त्यामुळे नवविवाहित मुलींनाही मी हा सल्ला देते.. रूसवेफुगवे लग्नानंतर लवकरच सुरू करा. घनघोर भांडणासाठी जन्म जरी पडला असला तरी आपले भांडणरूपी तलवारीचे पाते गंजू देऊ नका. त्यास तळपते ठेवण्यासाठी रूसव्याफुगव्यांचा वापर करा. तसेच सदैव जिंकण्याची सवय, खरेतर नवऱ्यास हरण्याची सवय लावा. म्हणजे भावी

आयुष्याचा पाया मजबूत होईल. भांडणे ही मात्र प्रेमाची असावीत. भांडणे ही प्रेमाची अभिव्यक्ती आहे. असावी. वैऱ्यांची भांडणे ही वेगळी. आपण प्रेमाने भांडत आहोत हे विसरू नये. आपल्या दैनंदिन आयुष्यातील एक बदल किंवा विरंगुळा म्हणून त्याकडे पहावे. पण तरीही प्रत्यक्ष मैदानात मात्र जीव लावूनच लढावे. झाले गेले विसरून जावे.. पण ते पुढील भांडणापर्यंत. पुनः आपले नवीन भांडण होईल तेव्हा जुन्याच गोष्टी काढत नव्याने कामाला लागावे.

*

४.

प्रश्न:

सर्व काळजी घेऊनही कधी भांडणात हार होत असेल तर काय करावे?

उत्तर:

काळजी घेऊन हार होत असेल तर काळजीची बाब आहे. पण आपली बाजू ती योग्य हे सदैव ध्यानात ठेवले तर भांडणात हार हा शब्दप्रयोग कुणीही सखी कधीही करणार नाही. परंतु प्रत्येकीस कधी ना कधी आपली हार झाल्यासारखे जाणवत असते. हे सारे मनाचे खेळ आहेत हे खरेच. पण तरीही काही उपाय योजता येतील. एकतर हरण्यास हरणे न मानणे श्रेयस्कर. त्यात परत आपला मुद्दा चुकीचा वाटत असेल तर गनिमी कावा वापरून भांडण डायव्हर्ट करणे गरजेचे असते. ते जेवढ्या लवकर शिकशील तितकी तू सुखी होशील. गनिमी कावा म्हणजे काय ते पुढे विस्ताराने लिहित आहे. या प्रश्नाशी थेट संबंध नसला तरी इतर सखींच्या फायद्यासाठी हे सांगणे योग्य होईल.

नव्याचे नऊ दिवस असतील पण जुन्याची नऊशे वर्षे असतात हे ध्यानी ठेवावे. तेव्हा अशा वेळी जुने काही उकरून काढून कात्रजचा घाट दाखवता येतो. लग्नास काहीच वर्षे झाली असतील तरी लग्न समारंभात माहेरच्यांचा अपमान कसा झाला यावरूनही आपला गड सर करता येतो हे ध्यानात ठेवावे. ज्यांची अनेक वर्षे झाली असतील त्यांच्यासाठी इंग्रजीत म्हणतात तसे, स्काय इज द लिमीट. कित्येक वर्षांपूर्वीचा संदर्भ इथे दिला जाऊ शकतो. एकूणच नवरेवर्गास या सर्वांची आठवण असण्याची शक्यता शून्य असते. त्यामुळे आपण सांगू तसेच मान्य करण्यावाचून पर्याय त्यांना नसतो. तेव्हा बिनधास्त बोलत जावे. त्याचे बोलणे बारकाईने ऐकावे म्हणजे नवऱ्याची बोलताना एखाद्या शब्दाचीही चूक पकडता येईल. तिला ठिणगी समजून हवा दिली की मूळ मुद्द्यापासून सुटका करून घेता येते हे ध्यानात ठेवावे. याच संदर्भात कोड्यात टाकणारे संदर्भ सोडून बोलणेही तितकेच परिणामकारक होते हे ही ध्यानात ठेवावे. त्याच्या बोलण्यात चूक झालीच नसेल तर बोलण्याचा वेगळा अर्थ चटकन काढता यावयास हवा. हा अर्थ आपल्या सोयीनुसार, न असलेला किंवा त्याला नको असलेला असायला हवा. त्यासाठी वेगळ्या अर्थाने शिक्षण म्हणून राजकारणी लोकांची भाषणे ऐकावयाचा व्यासंग करावा. म्हणजे वडाची साल पिंपळास लावणे शक्य होते. अगदीच आपली बाजू पडती वाटत असेल तर अश्रुपाताचा प्रयोग हमखास यशस्वी होतो हे ध्यानात ठेवावे. आगीच्या ठिकाणी पाण्याचा बंब येतो तशी इथे अश्रुपाताची योजना करावी. अश्रुपाताने मूळ मुद्द्यास बगल देणे अत्यंत सोपे जाते हे लक्षात घ्यावे. परंतु वारंवार हे अस्त्र वापरू नये. कारण मग त्याचा हवा तसा हमखास परिणाम नेहमीच साधणे कठीण जाते. ह्या गनिमी काव्याच्या काही पद्धती असल्या तरी आपण स्वतःच्या अजून

काही पद्धतींचा विकास करू शकतो. आपापल्या गरजेनुसार आणि कल्पनेनुसार यात बदल करता येईल.

*

५.

प्रश्न:

अ) मालतीवहिनी, आमच्या घरात भांडण करण्यासाठी पोषक वातावरण नाही. नवरा मनमिळाऊ असला नि विशेष तक्रारीस वाव नसला तर भांडणाच्या बाबतीत पुढे कसे जावे?

ब) माझा नवरा काही केल्या भांडत नाही. काय करू?

उत्तर:

भांडणे हा आपला स्थायीभाव आणि हक्क आहे हे आधी ध्यानात घेतले पाहिजे. त्यामुळे भांडण होतच नाही हेच भांडणाचे कारण होऊ शकते.. नवऱ्यास निक्षून सांग, ही असली आडून आडून हुकूमशाही चालणार नाही. कारण त्यामुळे तू वैवाहिक जीवनातील मोठया विजयास मुकत आहेस.. या सर्वाचे कारण फक्त तुझा नवरा असल्याने तुला त्याच्यावर रागावण्याचे कारण मिळाले आहेच. त्याचा वापर कर. बाकी भांडणपद्धतींचा वापर कसा करावा ह्याच्या पद्धती स्वतः विकसित केल्यास तर उत्तम, नाहीतर रेडिमेड पद्धती माझ्याच ह्या पुस्तिकेत आहेत त्यांचा वापर कर. बाकी तुझ्याबद्दल मला पूर्ण सहानुभूती मात्र आहे. तुझ्या सारख्या अल्पसंख्यांकांसाठी महिला आयोगाने काहीतरी केले पाहिजे असे मला वाटते.

*

६.

प्रश्न:

माझा नवरा भांडकुदळ आहे. म्हणजे माझ्या वरताण आवाजात तो ओरडू शकतो. अशा वेळी मी भांडणात कसे जिंकावे?

उत्तर:

हे कच्च्या पायाभरणीचे लक्षण आहे. लग्नानंतर काही वर्षातच आपली बाजू सबळ आणि वरचढ करून घेणे आवश्यक आहे. आता जे झाले त्यात सुधारणा प्रयत्नपूर्वक करावीच लागेल. तुझ्या नवऱ्याचा आवाज वरताण असेल तर तू त्याच्या अगदी विरूद्ध उपाय योजना कर. मौनं सर्वार्थ साधनं हे ऐकले आहेस ना? मूकपणाचे व्रत घे. मौनाइतके सामर्थ्यवान ओरडणे नाही. उगाच नाही अगदी राजकारणातही गांधीजींनी मौनव्रताचा वापर केला. तुझा लढा यशस्वी होईलच. काय होते ते कळवण्यास विसरू नकोस.

*

७.

प्रश्न:

वहिनी, मी भांडणाचे सारे प्रकार करून पाहिले, पण मला त्यातून आनंद मिळत नाही. मी काय करू?

उत्तर:

भांडणासाठी भांडण की आनंदासाठी भांडण हा संसारशास्त्रातील एक गहन प्रश्न आहे. माझे मत असे की कधी हे तर कधी ते. तुम्हाला हवे ते निवडा. म्हणजे आपण एकाच कारणासाठी न भांडता, जो हेतू साध्य होत असेल त्यातून आनंद मानला तर आनंदासाठी भांडण हे भांडणासाठी भांडण करूनही साध्य करता येईल. पण भांडण करावेच हे मात्र नक्की. तू भांडणाचे प्रकार सगळे ट्राय

केलेस म्हणालीस. कमी अधिक अनुभव असतील ते ही कळव म्हणजे इतर सखींना ते सांगता येतील.

*

८

प्रश्न:

मी गेली वीस वर्षे सुखाने भांडत आहे. पण त्यामुळे मला कोणी भांडकुदळ म्हणणार नाही ना? की मी भांडणाची फ्रिक्वेन्सी कमी करावी?

उत्तर:

भांडकुदळ! हा शब्द ज्या सुपीक डोक्यातून आला त्यास साष्टांग नमस्कार. मला वाटते की भांडकुदळ या शब्दाचा उगम कुदळीतून झाला असावा. कुदळीने खणण्यासारखे भांडण उकरून काढावे लागते कधीकधी. त्यासाठी कुदळीचा शब्द प्रयोग करण्यात आला आहे. असो. तर तुमचा प्रश्न चांगला आहे. आपली भांडणाची मर्यादा आपल्या पतीपर्यंतच मर्यादित ठेवली तर हा धोका संभवत नाही. तरीही महिन्यात एक मोठा व तीन वेळा छोटे संघर्ष ही फ्रिक्वेन्सी माझ्यामते योग्य असेल. बाकी निर्णय त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार घ्यावा. तुम्ही 'भांडा सौख्यभरे' प्रत्यक्षात आणत आहात हे वाचून खरेच आनंद झाला. त्यामुळे मला आपल्या सखींना मार्गदर्शन करण्यास अजून हुरूप आला आहे.

*

९

प्रश्न:

संसारातील भांडणाचे महत्व वादातीत आहे. परंतु मी मनमिळाऊ व भिडस्त आहे तर मी सुखी संसारासाठी काय करावयास हवे?

उत्तर:

म्हणजे सखी तू कुठल्याही चुका झाल्या तर त्यासाठी नवऱ्यास जबाबदार ठरवत नाहीस? हे स्वपादधोंडा धोरण का? विवाह नामक बंधनात हे अभिप्रेत नाही. या ही पुढे जाऊन मी म्हणेन असे असेल तर विवाहाचा फायदा तो काय? तरीही इट इज नेव्हर टू लेट. सखी, तुला स्वत:सच ही जाणीव झाली हा आनंदाचा भाग आहे. आजाराचे निदान झाले की उपचार करणे सोपे जाते. आणि तो आजार ॲक्सेप्ट केला की काम अजून सोपे होते. मनमिळाऊपणा नि भिडस्तपणा हे जगासाठी दाखवण्याचे सद्गुण असतीलही पण स्वत:च्या घरात स्व-पतीशी वागता बोलताना हे मोठेच अवगुण आहेत. त्यामुळे अशा सखींची बिकट अवस्था मी समजू शकते. ह्यासाठी तरी विवाहपूर्व समुपदेशन आवश्यक असून हे अनावश्यक अवगुण झाडून टाकून विवाहापूर्वीच व्यक्तिमत्वास भांडकुदळत्वाची झळाळी कशी आणावी ह्याचे जीवनशिक्षण देण्याचा माझा मानस आहे. अशा जणी अल्पसंख्य असल्या तरी हा वैवाहिक आयुष्यातील अति गंभीर विषय आहे हे नाकारून चालणार नाही. तोवर ज्या कोणी मैत्रिणी ह्या अवगुण आजाराने बाधित आहेत त्यांनी टीव्हीवरील सास बहू सीरियल्समधून काही प्रात्यक्षिक शिक्षण घेऊन त्यातून बोध घ्यावा. दररोज आरशापुढे उभे राहून वसकन ओरडण्याचा मौखिक व्यायाम, वडाची साल पिंपळाला लावण्याचे प्रात्यक्षिक काम, एकाच बोललेल्या वाक्यातून विविध

अर्थ एकाचवेळी काढण्याचा भाषिक व्यायाम इत्यादीतून थोडी थोडी प्रगती साधता येईल. शेवटी सुखी संसारात सखींचे निर्विवाद जिंकणे महत्वाचे. नवऱ्याशी भांडणच नसेल तर जिंकणार कसे नि न जिंकणारी असमाधानी सखी स्वत:च आनंदात नसेल तर इतरांना कसा आनंद देऊ शकेल? हे समजून अशा सखींनी लवकरात लवकर सुधारणा घडवून आणण्यामागे लागावे. शेवटी 'अवघाचि संसार' सुखाचा करण्यासाठी जे जे जरूरी आहे ते ते करणे गृहस्वामिनी म्हणून आपले कर्तव्यच आहे की नाही सखींनो?

*

१०.

प्रश्न:

मी पन्नाशीत आहे. पूर्वीसारखी भांडणात मजा येत नाही. काय करू?

उत्तर:

कुणाच्याही आयुष्यात असे होऊ शकते. रोज रोज करण्याच्या गोष्टींतील रस संपू शकतो. पण आजवरच्या जिंकलेल्या लढायांच्या आठवणी नेहमी ताज्या ठेवाव्यात. त्यानंतर तह करताना झालेल्या गोष्टी आठवल्या की मन प्रसन्न होईल. तेव्हा भांडण आयुष्यभर केलेच पाहिजे अशा गैरसमजात न राहता नवीन कशात मन गुंतवावे. आपल्यातील कोणी सासू म्हणून मिरवत वा मिरवणार असेल तर मात्र हे भांडणास्त्र सुनेवर चालवू नये. नवऱ्याशी भांडण हा आपला हक्क आहे. पण तो सुनेवर चालवून भांडणाच्या हक्काची गल्लत करू नये. सर्व भांडणे ही एकसारखी नसतात हे ध्यानात ठेवावे. त्याही पुढे जाऊन.. जी सून घरात येईल तिला आपल्या मुलाशी भांडण्याची मोकळीक मिळेलसे

पहावे. आपले जुने दिवस विसरू नयेत. नव्या पिढीच्या हाती रिले रेस सारखे बॅटन सोपवून आपण सिनियर सिटीझन्सच्या क्लबात नाव नोंदवून सुखी व्हावे.

*****

मालतीबाईंची ही जीवन शिक्षण पुस्तिका प्रकाशित झाली. इंग्रजीत म्हणतात तसे गरमागरम केक सारखी हातोहात खपली ही. लग्नात अहेर म्हणून लोक पाकशास्त्राच्या पुस्तकाबरोबर हे ही देऊ लागलेत हल्ली. पण हे पुस्तक सर्वांसाठी आहे. बाईंनी भांडणाचे महत्त्व सांगितलेले आपण वाचलेच आहे. सुखी संसारासाठी पत्नीचे आनंदात असणे महत्त्वाचे. त्यासाठी तिचे घरघरच्या लढाया राहणे नि जिंकत राहणे महत्त्वाचे. त्यासाठी मार्गदर्शन करणारे हे पुस्तक.

.. घ्या वाचा आणि भांडा!

- आणि नांदा सौख्य भरे!!

मोहिनी दिवाळी २०२३

# पोटेबाईंची पोटदुखी!

१

मीनलताई पोटे ऊर्फ मीनूताई म्हणजे एक अस्सल देशी नमुना आहेत. बाई आता मुंबईकर... पण गावचे पाणी प्यायलेल्या. बारागावचे म्हणत नाही.. कारण त्यांच्या किरवली खुर्दचा त्यांना अभिमान फार.. त्यामुळे त्या एका गावचे पाणी बारा गावांबरोबर.. आणि इतरांना पाणी पाजायला पुरेसे आहे असा त्यांचा ठाम समज.

तर बाई आता राहतात शहरात .. तेही बडी बाका मुंबई नगरीत! मुंबईच्या नळांतले पाणी जीवनावश्यक म्हणून पितात त्या.. पण हे पाणी काय पाणी आहे लल्लू.. असा त्यांचा अंतर्मनातला विचार! तो बाहेर बोलून दाखवायच्या नाहीत त्या .. कारण पक्क्या आतल्या गाठीच्या आहेत त्या. त्यामुळे ती गाठ सोडून कधी त्या बसायच्या नाहीत! पण या मुंबईतल्या तमाम जनतेच्या वाकडेपणास पुरून उरेल इतका इरसालपणा आपल्यात आहे असा ठाम विश्वास आहे त्यांना त्यांच्या अंतर्मनात!

त्यांचे मन नि त्याच्या आत सेफ्टी लॉकर सारखे असलेले अंतर्मन म्हणजेही एक भारी चीज. येता जाता त्या दुसऱ्याच्या घरात डोकावून पहावे तशा आपल्याच अंतर्मनात डोकावत असतात. इथे आपले ठेवावे झाकून आणि इतरांचे पहावे वाकून ही म्हण वापरायचा मोह होईल ही पण ती इथे संयुक्तिक नाही हे खरे त्यामुळे हा साहित्यिक प्रमाद न करता पुढे जाऊ!

तर कौलाकडे वळू..

गावाकडे कौल मागायची एक पद्धत असते ..गावाकडची घरे कौलारू असण्याचा या कौलाशी काही संबंध असावा का? नसणार.. पण तेवढाच समाज आणि भाषाशास्त्र्यांसाठी एक किडा सोडून देऊ! तर तो कौल.. देवाच्या दोन्ही अंगास ठेवा एक एक पान बेलाचे.. अधिकच भाविक असाल तर बिल्वदल म्हणून ठेवा.. आता त्यात डावे उजवे करून मिळवा कौल! ही गोष्ट गावाकडची पण त्यासाठी तसा पॉवरफुल देव इथे मुंबईत कुठून असणार? मग त्यांनी त्यासाठी स्वतःच स्वतःशी कौल मागायची पद्दती शोधून काढली.. देवाकडे मागावा तसा कौल त्या स्वतःच्याच मनाकडे मागतात. कौल कुठल्याही गोष्टीसाठी असू शकतो आणि त्यासाठी त्या कोणत्या गोष्टीचा वापर करीत याचाही नेम नाही.. उदाहरणच द्यावे तर.. समजा बाई आज घाईत आहेत.. मुंबैकर म्हटल्या की त्या सदैव घाईतच असणार हा भाग वेगळा.. तर त्यांना पकडायचीय नऊ सत्तावीसची लोकल.. घरून निघाल्यात तंगडतोड करत.. गाडी मिळेल का? सोपे उत्तर.. बाई समोरच्या इलेक्ट्रिकच्या तारांकडे पाहतात.. त्यावर दोन कावळे आहेत.. गावाकडे कसे रावे नाहीतर पारवे.. मुंबईत फक्त हे काळे कावळे.. ( हा अंतर्मनातला विचार! ) तर यातला एक उडाला तर मिळेल नऊ सत्तावीस.. कावळा उडतो.. बाई दमाने पुढे निघतात.. मग पुढचा कौल.. सत्तावीसवाली मिळाली.. तर त्यांच्या सोनूला.. सोनू म्हणजे त्यांचा षोडशवर्षी पुत्र.. कॉलेजात मिळेल ॲडमिशन! आणि बसायला मिळाले तर पहिल्याच फेरीत! आता सदुसष्ठ टक्क्यांवर पहिल्या फेरीत ॲडमिशन नाही आणि नऊ सत्तावीसच्या गाडीला पाय ठेवता आले तरी खूप.. त्यात बसायला मिळणे हे सोनूला पहिल्या फटक्यात कॉलेजात ॲडमिशन मिळण्याइतकेच सोपे! आता

या सर्वांचा अर्थाअर्थी संबंध नसेल ही.. नाहीच.. पण ही बाईंची शुअरशॉट पध्दत.. फक्त या पध्दतीत तो कौल यायला हवा आतून.. म्हणजे अंतर्मनाच्या कोपऱ्यातून! बरं कौल मागून झाल्यावर तो तपासून पाहतील तर .. नाव नाही त्याचे.. एका कौलापाठोपाठ पुढचे पाठ मागचे सपाट अशी गत बाईंची .. तो जुना कौल विसरून बाई नव्या कौलासाठी अंतर्मन धुंडाळत बसायच्या! कौला मागून कौल लावती.. असे चालते त्यांचे आणि उगाच देवासमोर बसून 'रवळनाथा दे रे कौल' वगैरे करायला नको म्हणून आपल्याच ह्या पध्दतीवर खूश त्या. अर्थात बाई तशा देवभक्त. म्हणजे स्वतःस तसे म्हणवून घेतात. खऱ्यातर देवभोळ्या त्या. उगीच कशाला विषाची परीक्षा असा त्यांच्या देवभक्तीतला ॲटीट्यूड! सालाबाद लोक देवापुढे पाया पडतात.. नाक रगडतात.. म्हणजे काही असणार यात असा समज करून देवादिकांच्या देवळाच्या करा वाऱ्या. विशिष्ट वेळात काम संपवणे आणि त्यासाठी कौल मागणे.. स्वतःकडेच .. ही त्यांची पद्धत. इकडे त्यांचे अंतर्मन ओव्हरटाईम काम करायचे. आपल्या ह्या कामसू वृत्तीचेही त्यांना कोण कौतुक! 'मी आहे' किंवा 'होते' म्हणून.. ही त्यांची कोणत्याही संवादाआधी नांदी .. प्रकट असो वा नसो..अंतर्मनात तरी असणारच!

त्यात त्यांचे मिष्टर.. मिष्टर हा त्यांचा आवडता शब्द.. लग्नाआधीही त्यांनी कौल मागूनच होकार दिलेला.. त्या वेळी गावच्या चार डुकरांना हाताशी धरत.. म्हणजे चारपैकी एक चिखलात लोळले तर होकार.. असला कौल लावलेला त्यांनी. तेव्हा गावी रवळनाथाची सोय आणि सर्व्हिस असूनही! डुक्कर लोळले नि मीनल वाघ ची मीनल रमेश पोटे झाली. त्या डुकराच्या लोळण्याचा अजूनतरी पश्चात्ताप झाला नाही त्यांना.. कदाचित म्हणूनच त्यांचा आपल्या कौल पद्धतीवर अजून विश्वास बसला असावा!

तशा बाकी तमाम बायकांच्या प्रमाणे त्या आपल्या नवऱ्याचे कौतुक उघड नाही करत.. पण त्यांचे ते अंतर्मन जाणून होते ती खरी गोष्ट! आणि हे सांगायचे राहिले.. नवऱ्याला मिष्टर म्हणण्यामागे ही त्याचा व्यवसाय होता.. तो चक्क 'पोटे पोटभर मिष्टान्न' नावाचे हलवायाचे दुकान चालवी.. मिष्टान्न वाला म्हणून मिष्टर!

पण एखाद्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणावे तसे मीनलबाईंचे म्हणता येईल असे लक्षण.. म्हणजे व्यवहारी पणा! काहीजण त्याला कंजूषपणा ही म्हणू शकले असते पण गावच्या पाण्याने त्यांना शिकवला तो व्यवहार.. असा त्यांचा याबाबतीत आग्रह होता. कंजूसपणा शिकवते ती मुंबई.. किरवलीने शिकवले ते व्यवहार असा साधा हिशेब त्यांचा.. कित्येकदा अंतर्मानात मांडलेला!

अशा मीनाताई बाजारात गेल्या की धमाल करत. सर्व जग आपल्याला लुबाडण्यास टपलेले असा समज त्यांनी करून घेतलेला.. काही दुकानदारांकडे छापलेल्या किंमतीत सामान घ्यावेच लागते.. घासाघीस करता येत नाही याचेच दु:ख खूप त्यांना. तरी त्यांचा नवरा.. मिष्टर .. चालवतोय ते दुकानच.. व्यापारीवर्गातल्या असूनही इतर व्यापाऱ्यांच्या नफेखोरीबद्दल संताप नि संशय त्यांना मनात कायम ठाण मांडून बसलेला. भाजीवाल्याकडे कोथिंबिरीच्या जुडीची पाने मोजणे.. कढीपत्याची पाने मोजणे असले काही जमत नसल्याने त्यांना खेद होई. व्यवहार कोळून प्यायलेल्या त्या.. अशा तशाने हिरमुसल्या होणे स्वाभाविकच होते.

तसे असले तरी बाईंचे मुख्य टारगेट डॉक्टरलोक. एक तर बाईंना आजारी पडायचा तिटकारा.. त्यात ती कडू औषधे घ्यायची.. वर तो डॉक्टर आढ्यतेने पथ्यपाण्याचे उपदेश करणार.. हे नको खाऊ.. ते नको करूस.. त्यावर परत त्याला फी म्हणून पैसेही द्यायचे.. असला व्यवहार त्यांना पटायचा नाही.. पण आजारपण कुठले चुकलेय कोणाला.. त्यामुळे डॉक्टरकडे जावेच लागे नि फी भरून तो गेलेल्या पैशांबद्दल त्रागा करावाच लागे.

अशा या बाई एकदा पडल्या आजारी.. आजवर आजार म्हणजे सर्दी खोकला. ताप.. वगैरे.. त्यावर कित्येकदा घरगुती उपचारांनी किंवा मागच्यावेळी डॉक्टरकडून आणलेल्या औषधांनी स्वतःच उपचार करून बचत करायच्या त्या. वर अंतर्मनात त्या डॉक्टरला ठेंगा दाखवायला विसरायच्या नाहीत. पण यावेळी बाईंच्या दुर्दैवाने त्या चांगल्याच पडल्या आजारी. पोटदुखी! आजवर दुसऱ्याकोणाचे भले झाले की दुखणारे पोट आज खरोखरच लागले दुखायला. बाईंनी खूप प्रयत्न केले.. ओव्याचे पाणी झाले.. शेक घेणे झाले.. मग मैत्रिणीकडून विचारलेली घरगुती औषधे झाली.. पोटदुखी दाद देईना आणि कोणा सर्जनकडे फी द्यायला मन तयार होईना! त्यांनी मनातल्या मनात कौल लावला.. दूध तापवत ठेवलेले समोर.. ते काही केले तरी उतू नाही गेले तर पोटदुखी थांबेल.. गॅस कितीही मोठा असला तरी.. बाई मग तिथेच रेंगाळल्या थोडावेळ.. कंटाळून बाहेर आल्या नि तोच दूध गॅस वर उतू जायचा आवाज आला. पोटदुखी सांभाळत त्या धावल्या तर थोडेसेच दूध उतू गेलेले.. नक्की सांगता नाही येणार कौल.. आपल्या मनाचे समाधान करून घेत त्या स्वतःशीच म्हणाल्या.. पण एकूण चिन्हे डॉक्टरला पैसे द्यावे लागतील अशीच दिसत होती..

२.

बाईंचे एक होते .. आधीपासूनचे धोरण.. डॉक्टरकडे जाताना जुने कपडे घालत त्या. दागिने वगैरे अजिबात नाही. रहायच्या त्या एका पंचवीस मजल्याच्या इमारतीत.. पण पत्ता द्यायच्या बाजूच्या चाळीतला.. डॉक्टरला आपल्या श्रीमंतीचा संशयही येऊ न देत त्या जायच्या. त्यांचा नवरा.. याच्या उलट.. देवदयेने आहेत पैसे.. ज्याचे त्याला देऊ म्हणून वागणारा. बाई त्याला कधीच डॉक्टरकडे आपल्या बरोबर नेत नसत.

तर यावेळीही बाईंनी तयारी केली.. म्हणजे ठेवणीतली.. जुनी पुराणी थोडी विटलेली साडी घालून तयार झाल्या. नवऱ्याचे हात दाखवून अवलक्षण नको म्हणून एका मैत्रिणीस बरोबर घेतले..

डॉक्टर सिन्हा .. सर्जन म्हणून प्रसिद्ध.. बाई गेल्या तर वेटींग मध्ये वीस एक पेशंट्स बसलेले. हे एक त्यांना खटकायचे.. अर्थात ती ही एक गंमतच असायची. ज्या डॉक्टरकडे गर्दी नाही तो त्यांना बिनकामाचा वाटे आणि ज्याच्याकडे गर्दी त्याने उगाच वाट पाहायला लावू नये असेही वाटे! थोडक्यात आरोग्यसेवेबद्दल त्यांच्या मनात असा कडवट पणा होता.. बहुतांशी भराव्या लागणाऱ्या फी बद्दल आणि आपला नंबर यायला लागणाऱ्या वेळेमुळे असायचा. त्यात परत त्या वैद्यबुवाला व्हिलन समजून त्यांचे ते अंतर्मन बंड करून उठायचे. आताही वेटिंग रूम मधल्या पेशंट्स कडे एक नजर टाकली त्यांनी .. आणि स्थानापन्न होता होता सिन्हाच्या आजच्या उत्पनाचा हिशेब अंतर्मनात लावत बसल्या. पोट दुखी अशा वेळी त्यांना बरी उसंत देई! तिलाही त्यांनी शिकवला असावा व्यवहार!

आता नंबर येई पर्यंत चरफडत बसण्याखेरीज पर्याय नव्हता. डॉक्टर वेळेवर येत नाही म्हणायची सोय नव्हती कारण नेहमीच्या वेळेपेक्षा सिन्हा आपली ओपीडी अर्धा तास आधी सुरू करत..परत निदान आणि उपचार चोख.. मग दोष कशाला द्यावा? त्यापेक्षा तो कसा पैसे लुबाडतोय याकडे लक्ष द्यावे हे बरे.. हे सारे बाईंच्या अंतर्मनातील.. स्वतःशीच संवाद साधताना हाती आलेले नवनीत! बाजूला मैत्रीण बसलेली.. बाईनी सुरू केले हळू आवाजात..

"काय बाई एक एक.. हा एवढ्या पैशाचे काय करणार आहे कोणास ठाऊक.."

पोटदुखी वरून अचानक हे काय .. तशी मैत्रिणीस सवय होती तिच्या या असंबद्ध बोलण्याची.. तिने "हुं" म्हणून बोळवण केली..

"अगं एकाचे पकड सातशे.. आहेत वीस.. आपल्या समोर .. आधी किती नंतर किती .. परत ऑपरेशन.. किती घेत असेल.."

"हुं.."

ऑपरेशन म्हणता म्हणता बाईंना घाम फुटला. पोटाचे ऑपरेशन तर नाही ना लागणार करायला..ऑपरेशनपेक्षाही किती पैसे घेईल हा कुणास ठाऊक.. त्या पैशांच्या आदिम चिंतेने तरी त्यांनी पोटदुखी कमी होते का हे स्वतःच तपासून पाहिले.. नाही.. अजूनही दुखून आहे.. मग बसल्या बसल्या कौल.. समोर दोन चष्मेवाले बसलेले.. एक साधा नि एक काळा चष्मा. या पैकी काळावाला आधी आत गेला तर ऑपरेशनची गरज नाही.. बघे बघे पर्यंत त्यांचा नंबर आला आणि दोघेही एकदमच डॉक्टरच्या केबिनमध्ये शिरले.. कसला हा कौल.. बाई चडफडल्या मनात.. त्यापेक्षा ते आधीचे बरे असा विचार करत आपल्या मैत्रिणीस म्हणाल्या बाई..

"किती धंदेवाईक नाही.. आपल्याकडे पैसे आहेत म्हणून ठीक.. नाहीतर गरीबाने जावे कुठे.."

त्यांच्या मैत्रिणीस त्या आपल्याकडे पैसे आहेत या कन्फेशननेच बरे वाटले!

"हुं.."

"बाई बाई अगदी धंदा मांडला गं या डॉक्टरने.."

डॉक्टरशी एक शब्द न बोलता हिला हा धंदा कसा कळला.. मैत्रीण गप्प राहून विचारात पडली.

असेल काही म्हणून ती गप्प झाली नि हिच्या कडून काहीच प्रतिसाद नाही म्हणून बाई अजूनच स्वतःवर चिडल्या.. त्यांना वाटले मी एक शिवी दिली.. तर मैत्रिणीचे कर्तव्य नाही त्यात थोडे तिखटमीठ टाकायचे? जाऊ देत.. नाही हिला काही माझ्या जिवाचे पडले आणि काय.. बाई चरफडल्या.. अशावेळी सगळा दोष आपल्या मिष्टरांवर टाकायला बरे वाटते त्यांना.. हलके हलके एकदम.. त्यांनी अंतर्मनात तोच केला विचार.. हे त्यांच्या दुकानातल्या मिठाईसारखे गोड.. सगळ्यांशीच.. त्यांना पाहून डॉक्टर फी वाढवणार .. नाहीतर हक्काच्या नवऱ्याला नसता आणला बरोबर.. मग या काळुंद्र्या मैनेबरोबर नसते यायला लागले.. हे सारे अंतर्मनात! आणि त्यांच्या त्या मैत्रिणीचे नाव मैना होते! क्कायच्या काय नावे ठेवतात.. त्यांनी मनातल्या मनात त्या मैना नावाला नावे ठेवली!

आता तासभर उलटला होता. डॉक्टरकडे गर्दी वाढतेय.. बाईंचा बसल्या बसल्या डोळा लागला. संवाद साधायला कोणी नाहीतर दुसरे काय करणार

त्या? पेंगल्या.. त्यातही स्वप्न.. मोठा महाल.. त्यात मोठ्या बेडवर सगळीकडे नोटाच नोटा.. पाचशेच्या असाव्यात.. त्यांवर लोळलाय कोणी.. तो वळतो.. अरे हा तर डॉक्टर सिन्हा.. न पाहिलेल्या डॉक्टरला बाईंनी स्वप्नात पाहून घेतले.. तो सिन्हा पैशांवर गडबडा लोळत होता.. कुठे फेडशील हे पाप.. बाई बोलल्या स्वप्नात.. आणि जाग्या झाल्या.. नि त्यांचा नंबर यायला एकच वेळ झाली..

स्वप्न पाहिल्या पाहिल्या काही सेकंदात जाग आली तर स्वप्न आठवणीत राहाते म्हणतात.. बाई मैनेबरोबर आत शिरल्या.. स्वप्नातला डॉक्टर वेगळाच दिसत होता.. सगळे डॉक्टर इथूनतिथून सारखेच म्हणत बाई समोरच्या खुर्चीत बसल्या.

३.

सिन्हा तसा बराय दिसायला.. सोनेरी काड्यांचा चष्मा.. परवडणार नाही तर काय.. एक एक अपेंडिक्सचे पन्नासहजार.. माणसाला एक असते की दोन अपेंडिक्स कोणास ठाऊक.. मागच्या महिन्यातच घेतला ना मी ..साडे बारा हजारांची फ्रेम नुसती.. लेन्सचे अलग.. प्लस त्या डोळेवाल्या डॉक्टरचे हजार..

"बोला.."

सिन्हा मराठी चांगला बोलतोय..पेशंटला पटवायला बरे.. आणि काय ..

मग डिटेल हिस्ट्री झाली .. बेडवर झोपवून तपासणी झाली..

"अपेंडिक्स चा त्रास दिसतोय .. ऑपरेशन लागेल.."

बाई त्या वाक्याने उडाल्या.. काही बोलण्याआधी सिन्हांचाच आवाज आला..

"ऐकून घ्या मी काय सांगतो ते.."

हा काय आता कापल्यावाचून सोडत नाही.. ते अपेंडिक्स नि त्याबरोबर खिसा.. दोन्हीही..

"बहुधा ऑपरेशन सहा आठवड्यांनी लागेल.. त्या आधी सोनोग्राफी करून दाखवून जा.."

म्हणजे अजून एक खर्च.. अजून एक डॉक्टर..

"माझ्या अंदाजाप्रमाणेच सारे असेल तर सहा आठवड्यात ऑपरेशन करावे लागेल.. अंडर जीए.. म्हणजे पूर्ण बेहोष करून.. पण बघून ठरवू.."

याला असे तर नाही ना वाटत पैसे नाहीत माझ्याकडे  ते गोळा करायला सहा आठवडे..

"किती खर्च होईल डॉक्टर..?"

"पन्नास ते साठ हजार.. पण आता वेळ आहे.."

"मी ते आज भरले तर आज होईल ऑपरेशन.. म्हणजे तसे असेल तर सांगा स्पष्ट.. परवडत नाही पण पैशांची कशीबशी करू सोय.."

"हे पहा सारेच काही नुसत्या पैशांनी होत नाही.. पैसे असोत की नसोत.. सहा आठवडे थांबणे भाग आहे.. इंटरव्हल अपेंडिसेक्टॉमी म्हणतात त्याला."

उद्धट कुठला.. पैशांचा प्रश्न नाही म्हणे..

"पण मला लगेच हवे तर.. म्हणजे पैसे भरीन मी.."

"हे पहा .. मीनल  पोटेबाई.. मी काही ते करणार नाही.. तुम्ही सोनोग्राफी करून उद्या या.."

हा सिन्हा खरेच उद्धट बाई.. बोलायची पद्धत नाही.. जाऊदेत सगळेच असे..

सोनोग्राफी करणे आले..

मैनाबाईला वाटेस लावून बाई घरी आल्या आपली पर्स हलकी  करून.

काय ते डॉक्टर..पाच मिनिटांत एवढी फी..

आपल्या मिष्टरांना त्यांनी फोन लावला. अशावेळी त्याचा एकच शिरस्ता होता.. बाकी कोणाला नाही तर नवऱ्याला दोष द्यायचा!

"काय म्हणाले डॉक्टर?"

"तुम्हाला काय त्याचे.. बायको जिवंत की मेली.. तेही फोनवर विचारा.. आहे अजून.. जिवंत"

"अगंपण.. तूच मला डॉक्टरकडे नाही येऊ देत.."

"मी लाख नाही म्हणाली.. माणसाला चिंता असेल तर.. तुम्ही येऊच नका घरी.. पोटे स्वीट्स पोटभर खा.. आणि मी मेली की तेरा दिवस थांबा दुसऱ्या लग्नासाठी म्हणजे झाले.. आणि आज आता घरी नाही आलात तर मी परत दिसणार नाही.."

रमेश काही बोलण्याआधी बाईंनी फोन आदळला खाली.. मेनोपॉज.. या दिवसांत असे काही विचित्र वागतात बायका.. त्याने वाचलेले कुठे.. हे मात्र तिला सांगायची सोय नाही कारण असे काही आहे किंवा असते याच्यावर ती

अजून रागावली असती. शेवटी गल्ला कोणाकडे तरी सोपवून रमेश घरी पोहोचला.. पोट धरून बाई झोपलेल्या. तोंड बंद.. मौन. रमेशला थोडे कानकोंडे झाले.. डॉक्टरकडे जायला हवे होते आणि हिला आजार काय.. ही सांगेल तर. टेबलावर पेपर पडलेला.. त्यात काही लिहिलेले ते कसले कळते..

थोडावेळ गेला आणि बाईंना कंठ फुटला.

"थोडे ते पाणी देता का?"

रमेशने तत्परतेने ग्लास दिला.

"गोळ्या घेतल्यास?"

कुठूनतरी संवाद सुरू करावा म्हणून त्याने विचारले.

"हुं"

हा आवाज बरा आहे.. रमेशने अंदाज लावला. एवढ्या वर्षांत आवाजाच्या टोन वर त्याला मूड कळू लागलेला तिचा..

"काय म्हणाले डॉक्टर?"

"साठहजार.."

"काय साठहजार? आजार कसलाय?"

"अपेंडिक्स.. काढावे लागेल.. सोनोग्राफीकरून.. तो खड्डा वेगळा.."

"करू ना.. आपल्याला काही कमी आहे काय?"

"काय तरी तुमचे.. म्हणून तुम्हाला नेत नाही कुठे मी.. मला ते हिऱ्यांचे कानातले घ्यायचे.."

"अगं तब्येत महत्वाची की..

तुम्हाला काही कळत नाही.. उगाच डॉक्टरच्या बोडक्यावर घाला पैसे .. कुड्या घ्यायच्या त्या .."

अशाही स्थितीत अर्जुनाला पोपटाचा डोळा दिसावा तशा हिला हिऱ्याच्या कुड्या दिसाव्यात? रमेशला कौतुक वाटले.. तिची याबाबतीत कंजूषी माहिती असल्याने आश्चर्य मात्र नाही वाटले.. पण आता हा खर्च वाचवायला ही काय करेल.. याचीच उत्सुकता लागली त्याला!

४.

सिन्हांच्या औषधांनी बाईंना थोडे बरे वाटू लागले. सोनोग्राफी करावी की न करावी या विचारात बाई पडल्या. उगाच भुर्दंड कशाला.. आणि आजकाल या डॉक्टर लोकांचे साटेलोटे असते.. नसलेले अपेंडिक्स दाखवले तर..

पोटदुखी थोडी कमी झाल्यावर बाईंच्या विचारांना फाटे फुटू लागले. कौल घ्यावा म्हणून त्यांनी मैनेला फोन लावायचे ठरवले.. जर तिच्या नवऱ्याने नाहीतर मुलाने उचलला तर नो सोनोग्राफी.. अशा विचारात फोन लावला तो नेमका मैनेने उचलला.. काहीतरी बोलायचे म्हणून त्या मैनेला म्हणाल्या, "आता जरा बरेय हां.. नाही तू काळजी करशील म्हणून फोन केला."

नंतर बोलते म्हणून त्यांनी फोन ठेऊन दिला. सोनोग्राफी करावीच लागेल की काय.. बाई पडल्या विचारात. एक दिवस थांबू.. नाहीतरी सिन्हा सहा आठवडे थांबणार म्हणालाय.. ब्लड टेस्ट नको.. एक्सरे नको.. अपेंडिक्स काय असेच समजेल? दुसरीकडे दाखवायला पाहिजे की काय .. पण परत पैसे देणे आले.. नकोच ते.. सकाळचा डोस घेता घेता बाईंची विचारचक्रे सुरू होती.

रमेश दुकानावर गेलेला. आदल्या दिवशीच्या गोष्टीचा ताण.. मूळ ऑपरेशनपेक्षा मीनूला समजावणे कठीण.. त्यात हिऱ्याच्या कुडीचे पैसे अपेंडिक्ससाठी म्हणजे मीनूचा जाणारा जीव जाताजाताही वरखाली होईल. या पोटे हलवायाच्या घरावर जणू तुळशीपत्र ठेवावे लागेल असे मीनूचे वागणे पाहून रमेश अगदीच हवालदिल झालेला.. ती ऐकण्यातली नाही नि या ऑपरेशनचे पैसे वाचवायला काय काय करेल .. याची चिंता करण्यापेक्षा जे जे होईल ते ते पहावे म्हणून तो गल्ल्यावर स्वस्थ बसून राहिला.. या 'ऑपरेशन सेव्ह मनी इन ऑपरेशन' या नाटकात त्याला स्वतःला भूमिका मिळणार.. मिळणार पेक्षा करावी लागणार होती हे त्याला तेव्हा कुठे ठाऊक होते!

मीनलबाई दुपारपर्यंत बऱ्यापैकी बऱ्या झाल्या.. ज्या डॉक्टरच्या औषधाने बरे वाटतेय त्याचेच ते अपेंडिक्सचे निदान चुकतेय असा संशय त्यांना येऊ लागला. की नुसत्या पैशांसाठी.. तरीपण कौल सोनोग्राफीसाठी मिळालेला तेव्हा बरे असतानाच चौकशी केलेली बरी म्हणून संध्याकाळी त्या बाहेर पडल्या. दोन तीन सोनोग्राफीवाले पाट्या पाहून माहिती होते त्यांना. सर्वप्रथम मोर्चा सिन्हांनी सुचवलेल्या डॉक्टरकडे वळवला.

डॉक्टर देशपांडे.. एमडी.. सोनॉलॉजिस्ट..

रिसेप्शनला बसलेली एक मुलगी ..

"पोटाची सोनोग्राफी करायचीय..

कधीची अपॉइंटमेंट देऊ? दोन दिवस फुल्ल आहे.."

"मग आज नाही होणार?"

"आज शक्यच नाही.. परवा सकाळी हवी असेल तर.."

"अपेंडिक्स समजेल ना त्यात.."

"अहो मी काय डॉक्टर आहे.."

"किती पैसे घेतात हे डॉक्टर?"

"काय आहे? नुसते ॲबडॉमेन.. साडेआठशे.. पेलविस.. बाराशे.."

"नुसते ते साडेआठशे वाले बास झाले.. उगाच साडेतीनशे कशाला जास्तीचे.. पण कोणाला इमर्जन्सी असेल तर?"

"तुम्हाला आहे का?"

"हो.. आहेच ना.."

"मग बसा. इमर्जन्सी चार्ज दुप्पट असेल.."

"नाही तशी इमर्जन्सी नाही.. मी उद्या येते..अपॉइंटमेंटसाठी."

मग बाई बाहेर पडल्या.. दुसरे क्लिनिक.. इथे अपॉइंटमेंट नाही.. पण ही गर्दी.. तिथे चार्जेर्स कमी सहाशे रूपयात.. देशपांडे लुटतो.. असा निष्कर्ष काढत तिसरीकडे मोर्चा वळवला बाईंनी.. तिथे सरसकट हजार रूपयात सोनोग्राफी.. म्हणजे ह्या पेक्षा तो दुसरा परवडला. फक्त तिथे गर्दी.. काय करावे..

बाई वैतागून आल्या घरी.

संध्याकाळपर्यंत थकून गेलेल्या त्या. पण पोटदुखी अजूनतरी जाणवत नव्हती हे खरे. म्हणजे ते सहाशे रूपये सोनोग्राफीचे वाचणार.. आणि कदाचित पूर्ण साठहजारही.. कानातल्या कुड्यांसाठी..

रमेश घरी असता तर त्यांनी हे सारे त्याला सांगितलेही असते किंवा नसतेही.. आपल्याला काय कमी आहेचे पालुपद लावतो नि हिऱ्याच्या कुड्या

घ्यायला सवड नाही म्हणतो.. अशी पै पै वाचवल्याहून गत्यंतर नाही अशा बावळट नवऱ्याबरोबर.

दुसरा दिवस त्यांनी असाच वाट बघत घालवला. पण रात्री अकराच्या सुमारास बाईंच्या पोटात अचानक दुखायला लागले. काय करावे.. शेवटी रात्री बारा वाजता त्यांनी सिन्हांना फोन लावला..

"पोटात खूप दुखतेय .. ती परवा मी आलेली.. मिसेस पोटे.."

"हां.. तुम्हाला लगेच ऑपरेशन हवे होते त्या.. अपेंडिक्स.. मी तुम्हांला सोनोग्राफी काढून काल बोलावले.. तुम्ही आला नाहीत.."

"नाही बरे वाटले ना मला.. उगीच कशाला पैसे घालवा .. म्हणून नाही केली.."

"मग आता मी काय करू.. इमर्जन्सी ॲडमिट व्हा.."

"ॲडमिट नको डॉक्टर.."

"बघतो काय करावे लागेल.. ताप उलटी.."

"ते काही नाही.."

मग ती गोळी घ्या मी दिलेली अजून एक.. नाही बरे वाटले तर लगेच या..आणि कमी झाले तर सकाळी सोनोग्राफी करून लगेच दाखवून जा.

"ओके डॉक्टर"

बाईंनी फोन खाली ठेवला.. रमेश ऐकत होता..

"तू सोनोग्राफी का नाही करून आलीस?"

"हुं.."

आपले पैसे बचाव अभियान ऐकवायची ही वेळ नाही एवढे त्यांना कळले की पोटदुखीने त्या गप्प झाल्या कुणास ठाऊक.. पण त्या गोळीने बरे वाटले खरे..

सकाळी उठल्या तेव्हा त्या दुखण्याचा मागमूसही नव्हता. सिन्हा उगाच अपेडिक्स सांगत तर नाही.. अजून एकदा त्यांच्या मनाने उचल खाल्ली. पण न जाणो असेलही म्हणून त्या सोनोग्राफीसाठी तयार झाल्या. आज मैना मोकळी नव्हती आणि तशी तब्येत बरी म्हणून स्वतःच निघाल्या त्या सहाशे रूपये वाल्याकडे. त्या अडीचशे रूपये वाचवण्याच्या नादात त्यांनी क्लिनिकचे नावही नव्हते पाहिले. ना तिथली माहिती विचारलेली. हनुमानाच्या शेपटीसारख्या लायनीत त्या विराजमान झाल्या. मनातल्या मनात देशपांडे नि हजार रूपयेवाले दोघांचा कसा पचका केला असा विचार करत बसल्या आणि आपला आवडता कौल लावण्याचा खेळ चालू केला. समोरच्या बाकड्यावरील दोन माणसांपैकी कोण पहिला उभा राहील.. लाल शर्टवाला पहिला तर सोनोग्राफी नॉर्मल.. नाहीतर.. अशा विचारात असताना अचानक त्यांच्या मनात काय आले की जाऊन रिसेप्शनवर त्यांनी परत चार्ज विचारला..

मेंबर साठी सहाशे नि नॉन मेंबर साठी साडेनऊशे.. मेंबरशिप हजार रूपये वर्षाला.. बाई रडकुंडीस यायच्या बेतात.. त्या अडीचशे रुपये वाचवण्याच्या नादात चक्क शंभर रूपये जास्त.. आता देशपांडेच्या पाया पडावे लागेल.. असा विचार करत त्या बाहेर पडल्या.

देशपांडे क्लिनिक वर अपॉइंटमेंट नव्हतीच.. काय केले की आज सोनोग्राफी होईल.. तेही जादा चार्ज न देता.. बाई विचारात पडल्या.. एकाएकी त्यांना सिन्हांची आठवण झाली.. त्यांनी फोन लावला..

"डॉक्टर काल बरे वाटले औषधांनी.. आज सोनोग्राफी साठी आले तर देशपांडेसरांकडे अपॉइंटमेंट फुल्ल.. प्लीज तुम्ही बोलता त्यांना.."

सिन्हा काय बोलणार.. बाई सांगितले तेव्हा ऐकत नाही आणि आता धावतेय.. म्हणाले.. "तिकडे जाऊन मी सांगितलेय म्हणून सांगा.."

सिन्हांनी सांगितल्या प्रमाणे बाई पोहोचल्या .. रिसेप्शनवर सांगत..

"डॉक्टर सिन्हांनी मला लगेच आत घ्यायला सांगितलेय! इमर्जंसी.."

रिसेप्शनवालीने  तिला ओळखले,

"तुम्ही परवा का नाही घेऊन गेलात अपॉइंटमेंट?"

"तेव्हाचे जाऊ देत.. सिन्हासर म्हणतात इमर्जन्सी आहे.."

"अपॉइंटमेंट फुल्ल आहेत.. पण मी सरांना विचारते.."

देशपांडे डॉक्टर पण काय बोलणार.. "थांबू देत.. बघू."

ही बाईंची स्ट्रॅटेजी.. लगेच घ्या म्हटले तर कमीत कमी नंतर तरी घेतील.. बाई स्थिरावल्या.. रिसेप्शनवाली बऱ्यापैकी मुरलेली होती..म्हणाली, "बाई इमर्जन्सी आहे तर  कोणाला आणले नाही बरोबर..?"

बाई साळसूदपणे डोळे मिटून गप्प राहिल्या..

हळूहळू नंबर आलाच..

देशपांडे तसे मध्यमवयीन पण एकदम साधे गृहस्थ दिसत होते. बाईंनी सोनोग्राफी होऊ दिली.. मग म्हणाल्या,

"आहे का अपेंडिक्स.."

"अर्थात..डॉक्टर सिन्हांचे निदान चुकायचे नाही.. रिपोर्ट दाखवा त्यांना.."

"पण ऑपरेशन करावेच लागेल.."

"सर बोलतील तसे करा.."

"पण खर्च किती यायला पाहिजे.."

"ते सांगतीलच.."

"तरी एक अंदाज.."

"मला नाही कसला अंदाज.. भेटा त्यांना.."

बाई बाहेर आल्या.. देशपांडे ताकास तूर लागू देत नाही.. निदान मार्केट रेट तरी माहिती असेल ना.. सगळे डॉक्टर असलेच..बाहेर बिलाची पावती फाडण्याआधी सहाशे रूपये देत बोलल्या.. घ्या..

"मॅडम.. इमरजंसी .. डबल चार्ज.. माहिती नाही म्हणू नका.."

"सध्या ठेवा.. मग देते.."

रिसेप्शनीस्टने डॉक्टर देशपांडेंना फोन लावला..

"सर, बाई पेमेंट करायला तयार नाहीत.."

पोटेबाईंचा राग मस्तकात गेला. तरातरा आत गेल्या.. "डॉक्टरसाहेब.. इमर्जन्सी मला नव्हती.. डॉक्टर सिन्हांना होती.. म्हणून आले मी.. मला का भुर्दंड.."

देशपांडे डॉक्टर मनातल्या मनात हात जोडत म्हणाले.. "मी सांगतो बाहेर..

डॉक्टरनी बाहेर फोन केला.. देतात तेवढे घे नि जाऊ देत.. फक्त बिल तेवढ्याच रकमेचे बनव.."

रिपोर्ट घेऊन बाई विजयी चेहऱ्याने बाहेर पडल्या! एकतर बिना अपॉइंटमेंट.. वर त्या देशपांडेची जिरवत अडीचशे रुपयांची बचत! तीही त्याच्याच कडून सोनोग्राफी करून.. स्वतःवर खूश होत त्या सिन्हांकडे निघाल्या.. अर्थात तोवर त्यांचे क्लिनिक बंद झालेले..

डॉक्टरला कसला टाईम नि सुट्टी.. एवढे पैसे घेतात आणि बंद..?

५.

संध्याकाळी आता परत जाणे आले. जाता येईल पण.. सिन्हाला फोन करू.. थोडे डिस्टर्ब करू.. फी भरली परवा.. फुकटात थोडीच पाहिले..

बाईंनी फोन लावला.. सिस्टरनी उचलला फोन..

"बोला.."

"मी पेशंट बोलतेय.. अर्जंट आहे.. इमर्जन्सी.."

"द्या निरोप.. सर ओटीत ऑपरेशन करताहेत.."

"पण अर्जंट आहे.."

"बोला.. मी सांगते सरांना"

"काही नाही.. सोनोग्राफी रिपोर्ट दाखवायचाय .."

"संध्याकाळी सर असतील.. आता ओटी मध्ये आहेत.."

"ठीक..  मग बोलते.."

बाईंनी फोन ठेवून दिला. खरेतर इमर्जन्सी सिन्हांनी दोन दिवसांपूर्वीच सांगितली.. बाईंना आता समजली की काय.. पण नाही.. फी भरलीय या एका मुद्द्यावर बाई चेकाळल्या..

घरी आल्या त्या दमून. संध्याकाळी रिपोर्ट घेऊन त्या पोहोचल्या तेव्हा आधीच पंधरावीस लोक बसलेले. रिसेप्शनवालीला रिपोर्ट दाखवून म्हणाल्या..

"अर्जंट आहे असे देशपांडे डॉक्टर म्हणालेत.."

"ठीक.. द्या रिपोर्ट.. सरांना दाखवते.."

रिसेप्शनिस्ट म्हणाली पण बाईंना आता हिशेब किती होणार ते विचारायचे आहे.. जमेल तितके बारगेनिंग करायचे आहे.. आताच..

"नाही.. मीच जाणार.."

"मग बसा.."

"नाही.. मी आताच जाणार.. इमर्जन्सी आहे.. सरच म्हणाले काल.."

"मी सरांना दाखवून सांगते.."

बाई हटून बसल्या.

रिसेप्शनिस्ट कंटाळून सरांना सांगायला गेली.

"डॉक्टर म्हणतात रिपोर्ट द्या.. मग सांगतात पुढे.."

बाईंचा नाईलाज झाला. रिपोर्ट हाती देता देता त्या रिसेप्शनिस्ट मागोमाग त्या आत शिरल्यादेखील.

आता ही आलीच आहे म्हणून सिन्हांनी बाईंना बसवून घेतले आणि आपल्या नैतिक विजयाबद्दल बाईंनी मनातल्या मनात स्वतःची पाठ थोपटून घेतली. सकाळी देशपांडे आता सिन्हा.. दोघांना कसे आणले ताळ्यावर.. वा!

"रिपोर्ट मध्ये तेच आहे.. अपेंडिक्स.. ऑपरेशन लागेल.. दोन आठवड्यांनी या.. मग पाहू.. " सिन्हा म्हणाले.

"पण डॉक्टर.. खर्चाचे काय.."

"मला वाटते मी सांगितलेय.. साठ पर्यंत होतील.. थोडेफार कमीजास्त.."

"कमीच डॉक्टर.. जास्त नको.. परवडायला हवे ना.."

"मग तुम्ही केईएम मध्ये का नाही जात.. तिथे अगदी स्वस्तात होईल.."

"नको नको.. अजून कुठे.."

"आमचा सर्जिकल कॅम्प आहे.. त्यात या.. वीस हजारात होईल.."

"ते ठीक पण जे काय करायचे ते तुमच्या इथेच करायचे..तुमच्यावरच विश्वास माझा.. वीस हजारात इथेच करून टाका .."

"इथे एवढे कन्सेशन नाही होणार.. बघू जास्तीत जास्त किती कमी होईल.. जनरल वॉर्ड घ्या.. पन्नास मध्ये होऊन जाईल.. पण एकदा तुमच्या मिस्टरांना घेऊन या.. मी नीट समजावून सांगतो."

बाई शीघ्र विचारी म्हणायच्या.. त्यांनी या संधीचे सोने करायचे ठरवले.. मिस्टर.. म्हणजे मिष्टर.. पोटे मिष्टान्नचे मालक.. त्यांना वापरून भाव कमी करता येईल..

इतक्यात सिन्हाच म्हणाले..

"काय करतात ते?"

आपली अभिनय शक्ती पणाला लावत बाईंनी पदर डोळ्याला लावला.. नि म्हणाल्या

"पोटे हलवायाच्या दुकानात असतात.."

हे त्यांना आवडले.. पोटेंबद्दल खोटेही आणि खरेही.. ऐकणाऱ्याला वाटावे की कुणी तिथला मदतनीस असेल..

सिन्हा सहानुभूतीच्या स्वरात म्हणाले, "ठीक.. आपण पाहू काय करता येईल.. मीन व्हाईल पोटात जास्त दुखले किंवा ताप आला तर लगेच या.."

बाईंचा हिशेब पक्का.. लोखंड गरम असतानाच त्यावर ठोकले पाहिजे.. सिन्हा जोवर सहानुभूतीच्या मोड मध्ये आहेत तोवरच त्यांच्याकडून भाव कमी करून घ्यावा..

"सर काय सांगू.. माझा नवरा माझ्यावर चाळीसहजाराहून जास्त खर्च नाही करणार.. त्यापेक्षा सोडून देईल तो मला.. जेव्हापासून तो साठहजाराचा आकडा ऐकलाय ना.. पोटदुखी एकीकडे.. नि पैशाची व्यवस्था दुसरीकडे.."

"माझे ऐका.. असा ताण घेऊ नका.. केईएम मध्ये माझा मित्र आहे.. उद्या बुधवार आहे ना.. जाऊन भेटा त्याला.. मी चिठ्ठी देतो.."

सिन्हा चिठ्ठी लिहायला लागले नि बाईंचा धीर खचला.. बारगेनिंग नंतर करू.. आपल्या नवऱ्याचे जरा जास्तच दुष्ट चित्र उभे केल्याबद्दल त्यांना पश्चात्ताप झाला.. आज सारे हवे तसे घडत असताना ही पहिली चूक झाली.. घाईघाईत बाई बोलल्या..

"नको डॉक्टर.. माझा फक्त तुमच्यावर विश्वास आहे.. मी ह्यांना घेऊन येईन.."

"ठीक.. तोवर विश्रांती घ्या.. औषधे चालू ठेवा.. पंधरा दिवसांनी येऊन भेटा परत.."

"चालेल सर.. थ्यांक्यू सर.. ते जमेल तेवढे पैसे कमी करा हां सर.."

बाई बाहेर पडल्या. शेवटचा भाग थोडा वगळला तर आज मनासारखे होत आले दिवसभर.. डॉक्टरला काय वाटते मी अशी तशी निघून जाईन.. ऑपरेशन करून घेईन तर इथेच आणि तेही चाळीसमध्ये.. साधे अपेंडिक्स ते काय.. चाळीस ही जास्तच होतात.. पण अडला हरी या डॉक्टरचे पाय धरी आणि काय..

तरी अजून वेळ आहे.. चार ठिकाणी चौकशी करू.. कुणी तीस पस्तीसात करत असेल तर ठीकच नाहीतर सिन्हांवरच विश्वास आहे हे सांगितलेच आहे.. आपल्या हुशारीवर खूश होत बाई घरी आल्या. येता येता एक गोष्ट मनात आली त्यांच्या.. ऑपरेशन म्हटले म्हणजे नवऱ्याला घेऊन जावेच लागणार. त्याची तयारी करून घेतली पाहिजे.. एकवेळ डॉक्टर मानेल पण रमेशला पटवणे.. कठीण.. पण वीस हजार वाचवायचे तर हे केलेच पाहिजे! आणि त्यात चाळीस घातले की हिऱ्याच्या कुड्याही येतील.. नुकसान चाळीस हजाराचे .. पण ठीक आहे.. आता अपेंडिक्सचा त्रास दिलाय या सिन्हा आणि देशपांडेनी मिळून तर काय करणार..

दोन तीन आघाड्या सांभाळायला हव्यात आता.. आता अपेंडिक्स आहे एवढे नक्की.. तर एक तर सर्व्हे.. दुसरीकडे भाव किती अपेंडिक्सचा हे शोधणे..आणि नवऱ्याला तयार करणे..हे कठीण..  आणि महत्वाचे.. मध्ये

अपेंडिक्सला काही इमर्जन्सी येऊ न देणे.. नाहीतर सिन्हाच्या पाया पडावेच लागेल.. घरात येता येता बाईंनी कौल लावला.. बाईंचे घर दुसऱ्या मजल्यावर.. तर जशा त्या येतील लिफ्ट तयार असेल तर रमेश तयार होईल तिच्या प्लॅन साठी..एरवी लिफ्ट

पंधरा-विसाव्या माळयावर असली की खूप वेळ लागतो.. पण आजचा दिवस बाईंचा.. लिफ्ट होतीच तयार.. म्हणजे रमेश काही न काही करून तयार होणारच! बाईंना गंमत वाटली.. अजून त्यांनी कुठलाही प्लॅन नाही बनवला आणि आधीच कौल.. आपल्या नवऱ्याला काही तरी करून लायनीवर आणावेच लागेल हे त्यांनी जाणले अगदी अंतर्मनातून हे लक्षात आल्यावर बाई स्वतःशीच खुदकन हसल्या. आता काय करावे लागेल याचा विचार करण्यात गढून गेल्या.. एक बरे की पोटात जास्त दुखत नाही..

रात्री रमेश घरी आला तोवर बाई झोपून गेलेल्या. दिवसभरात हिने काय केले असावे.. उत्सुकता लपवत रमेश एकटाच बसला जेवायला. बिचारा रमेश.. हलवायाचे दुकान चालवतोय नि त्याला स्वतःला आहे डायबिटीस.. अर्थात तो स्वतः नीट उपचार सुरू ठेवतो.. आणि त्याचे काही त्याच्या डॉक्टरशी वैर नाही.. जेवून येई पर्यंत बाई जाग्या होऊन उठून बसलेल्या..

६.

"झाली सोनोग्राफी? डॉक्टर काय म्हणाले?"

"झाली.. पन्नासहजार.."

"म्हणजे? ऑपरेशन नक्की लागणार.."

"हो आणि पन्नासपण.."

"पैशांचं सोड.. कधी लागेल करायला.."

"सोड काय.. आपले मेहनतीचे पैसे आहेत.. झाडावर नाही लागले.. डॉक्टरला काय.. दिसले अपेंडिक्स.. काप खिसा.."

"काहीतरीच.. ते काय तुझ्या घरी आले अपेंडिक्स उडवायला.."

"तुम्ही काही बोलू नका.. मला एवढे समजते.. एवढा खर्च झेपणार नाही.. मी शेवटचा भाव बोलून आलीय.. चाळीसमध्ये करा.. नाहीतर मी चालले दुसरीकडे."

सिन्हांनी ते केईएमला पाठवायचे वगैरे बोललेले सोयिस्करपणे गाळत बाई बोलल्या.

"तू काय फुटपाथवर भाव केलास की काय.. बरं ते साठाचे पन्नासवर म्हणून आले का?"

"नाही.. तुमच्या मुळे.."

"मी? मी काय असे केले.."

"तेच जे साधारण नवरे लोक करतात.."

"काय?"

"छळ.."

"छळ? आणि मी .. कोणाचा?"

"आणि कोणाचा.. माझा.."

"तुझा?"

"मी सांगितले त्या सिन्हाला तुम्ही मला चाळीसावर एक छदाम देणार नाहीत.. वेळ आली तर मला सोडून द्याल एक वेळ.."

"काय? तू माझ्याबद्दल असे बोलून आलीयस.."

"हो.. आणि तुम्हाला यावे लागेल भेटायला तिकडे.."

"बापरे! मी तुला ब्लॅंक चेक देतो.. पण असले काही नको.. देवदयेने सगळे आहे.. काय कमी आहे आपल्याला.."

इथे त्या हिऱ्याच्या कुड्या असे उत्तर देणार होत्या.. पण तेवढ्यात होणार नाही काम .. काय बरे करावे.. एकाएकी त्यांना आयडिया सुचली.. डोळ्यांत पाणी आणून म्हणाल्या..

"सोनूच्या ॲडमिशनसाठी पूजा करू त्या वीस हजारात.. मला मेलीला काय काही नको.. जगले वाचले त्या ऑपरेशनमधून तर.."

डोळे पुसत त्या म्हणाल्या.

ही वेळ वाद घालायची नाही एवढे रमेशच्या लक्षात आले.. अजून अश्रुपात होण्याआधी म्हणाला,

"ठीक बघू.. पुढच्यावेळी जाऊया भेटायला तुझ्या सिन्हा डॉक्टरांना."

अर्धी लढाई तर जिंकली.. आता पंधरा दिवसांत नवऱ्याला तयार करू.. बाई मनात खूश झाल्या नि हिऱ्याच्या कुड्यांचे स्वप्न पाहात झोपी गेल्या. पोटदुखी काय होते बरी!

दुसऱ्या दिवशीपासून बाईंचे काम सुरू झाले.. एकतर पोट फारसे दुखत नव्हते.. दुसरे आराम करणे भाग होते.. उगाच इमर्जन्सी ऑपरेशन नको करावे

लागू.. बाई आणि त्यांचा फोन.. सर्वप्रथम लाइफलाईन हॉस्पिटलात काम करणारी त्यांची मैत्रीण.. लता साळुंखे.. साळुंखे म्हणताच त्यांना गंमत वाटली.. त्या दिवशी मैना नि आज साळुंखे..

ती साळुंखीण हॉस्पिटलात अकाउंट्स मध्येच कामाला होती. तिला आपली कहाणी रंगवून सांगितली आणि शेवटी तो अपेंडिक्सचा भाव विचारला..

"म्हणजे काय आहे ना गं.. तुझ्या हॉस्पिटलात किती होईल बिल या ऑपरेशनचे..?"

तिकडून ऐंशी हजार ते एक लाख ऐकून बाईंचा पुढचा इंटरेस्टच संपला..

बाई बाई एवढे.. काय लुबाडणूक नुसती.. असे मनाशी म्हणत त्यांनी फोन ठेवला..

आणि त्यांची दुसरी मैत्रीण जयाकडे मोर्चा वळवला.. तिचे मागच्या वर्षीच झालेले ते ऑपरेशन.. तिला फोन केला त्यांनी..

'कशी आहेस गं जया.. किती दिवस झाले.. मी कशी.. काय सांगू .. अपेंडिक्सचे दुखणे उद्भवले मध्येच.. तुझे झालेले ना मागच्या वर्षी.. कुठे गं.. विरार मध्ये.. का गं.. हो.. तुझ्या ओळखीचे आहेत.. किती गं साधारण खर्च.. किती? चाळीस.. औषधे पकडून.. बरं बरं.. हो ना दुखतंय म्हटले तुला विचारू.. हो..'

चाळीस हजारात सौदा झाला तर ठीकच एवढा निष्कर्ष बाईंनी काढला त्यातून.. पन्नासमध्ये तर नाहीच.. फार झाले तर ऑपरेशन झाल्यावर दहा कमीच द्यायचे.. नंतर देऊ म्हणून.. सोनोग्राफीत नाही का वापरली ती ट्रिक..

दुपारी त्यांना त्यांच्या मैत्रिणीचा फोन आला.. आश्विनी बर्डे.. बोलता बोलता अपेंडिक्सचा विषय निघणे स्वाभाविक वाटावे अशा रीतीने बाईंनी संवादाची गाडी वळवली.. आश्विनी ॲलोपॅथीच्या विरूध्द.. आणि घरगुती उपचारांची तज्ञ..नि नॅचरोपॅथीवाली.

पलिकडून म्हणाली ..

"हुंss अपेंडिक्स.. नॅचरोपॅथीने आम्ही कितीतरी बरे केलेत माहितीय.. आणि नुसतेच नाहीत .. अपेंडिक्स निघून जाते आमच्या नॅचरोपॅथीने.. निघून म्हणजे अगदी मोठमोठे सर्जन लोक तोंडात बोटे घालतात.. शंभर टक्के रिझल्ट्स.."

"कुठे गं.. मी येऊ.."

"ये की.. खोपोलीपासून आत एक गाव आहे.. चार दिवस रहा.. हां मिस्टरांना आण पण त्यांची राहायची सोय वेगळी..

मी तुला डिटेल्स पाठवते.. हो आज दुपारी मेल वर.."

बाई खूश झाल्या. चुकून आश्विनीचा फोन येतो काय नि चक्क अपेंडिक्सवर उपचार मिळतो काय.. वा! ईश्वरी संकेतच जणू. आता त्या लुटारू सिन्हाचे तोंड नको बघायला परत.. कधी एकदा नवऱ्याला सांगू असे वाटले त्यांना पण ते टाळले त्यांनी.. तो मेल मेला कसा उघडतात कोणास ठाऊक.. सोनूकडून उघडून घेऊ.. एवढ्या दिवसांनी पहिल्यांदा त्यांना एकदम मनावरचा ताण हलका झाल्यासारखे वाटले.

मनातल्या मनात तीन चार दिवसांत झाले ते सारे डोळ्यांपुढे आले आणि थकवा आल्यासारख्या त्या झोपून गेल्या.

दुपारच्च्या झोपेत त्यांना स्वप्न पडले.. त्या उभ्या आहेत पोट धरून.. सिन्हा हातात कात्री घेऊन कापायला येतोय .. बाजूने देशपांडे धावत येतोय.. बाई धावत सुटल्यात.. त्यांना जीभ दाखवत! बाई दचकून जाग्या झाल्या.. क्षणात त्यांना ते नॅचरोपॅथीवाले आठवले आणि खुदकन हसत झोपी गेल्या.

संध्याकाळी सोनू आला नि बाईंनी तो मेल चेक करायला सांगितले त्याला.. चांगले आठ पानी माहितीपत्रक.. सगळी माहिती होती त्यात. सगळे कसे मस्त..चकचकीत.. छानच.. नको ते डॉक्टर दर्शन नि परत नको ते हॉस्पिटल आणि तिथे ते पैसे फेकणे .. नसती लुबाडणूक..नाही देणार चाळीस पण जा .. म्हणून त्या मनोमन खूश झाल्या.. मग शेवटचे पान आले त्यात एकूण पॅकेजचा खर्च दिलेला.. उपचाराआधी ऑनलाईन जमा करायचे पैसे.. पॅकेजचे नव्वद हजार त्यात राहाणे खाणे उपचार सारे समाविष्ट.. नातेवाईकास रहायला जागा नि दोन वेळ जेवण हवे असल्यास दिवशी तीन हजार..नॅचरोपॅथी ती.. थोडीफार महाग असायचीच.. शेवटी ते नैसर्गिक पद्धतीने बरा करतात ना.. या काटकूट वाल्यांसारखे नाही. पण तरीही त्या लाखाच्या आकड्याने आतापर्यंतचा बाईंचा मूड एकाएकी बदलला.. हे प्रकरण लाखावरचे.. ओळखीने कमी होईल पण लाखाचा खर्च चाळीसहजारांवर थोडीच येईल.. त्यापेक्षा ते ऑपरेशन परवडले .. डॉक्टरांनो लुटा आणि काय .. ऑपरेशन साठी परत सिन्हाच्याच पाया पडणे आले.. बाई वैतागल्या. आता बाईंनी ठरवून टाकले.. अजून शोध नको.. कुठून काही मिळाली माहिती तर ठीक नाहीतर त्या वाटेस जायचे नाही आणि लक्ष फक्त नवऱ्याच्या तयारी कडे.. क्लासच घ्यायला हवा त्याचा.. ! आणि काही करून सिन्हाला चाळीसमध्ये पटवायचेच.. आहे काय अन नाही काय!

आता बाईंच्या जिवास थोडी शातंता लाभली. बाईंना आपल्या सिद्धेश्वर महाराजांची शिकवण आठवली.. त्यांनी सांगितलेले.. जीवनाचे एक ध्येय निश्चित करा.. आता तेच झाले.. ध्येय निश्चित झाले .. त्यामुळे की काय पण कसे बरे वाटले. मनावरचे ओझे कमी झाले.. बाईंच्या 'सेव्ह मनी इन ऑपरेशन' च्या ऑपरेशनचा हा महत्वाचा टप्पा आला. आता ध्येय फक्त नवऱ्यास तयार करणे.. पैसे न देण्यासाठी.. त्यासाठी त्याने तसे वागायला हवे. वाटायला नको का की तो किती छळ करतो माझा. सिन्हा तसा नाजूक दिलवाला दिसतोय. दोन आसू काय आले लगेच विरघळला. थोडे अजून काही केले की काम फत्ते आणि काय! समोर टीव्ही सुरू होता. बाईंनी कौल लावला.. पुढची ॲड ती कोलगेटची असेल तर रमेश मानणार.. नाहीतर नाही.. आणि पुढची जाहिरात आली ती कोलगेटचीच! बाई खूश झाल्या.. होणार.. काम होणार! कोणी नव्हते समोर तरी बाईंनी आपली बत्तीशी ..त्या कोलगेटनेच घासलेली .. दाखवली.. मनातून.. आणि अंतर्मनातूनही .. त्या खूश झाल्या..

आज खूप दिवसांनी त्यांना त्यांच्या गावच्या सिद्धेश्वर महाराजांची आठवण झालेली.. यात काही संकेत असावा? आता गावी जाणे तर शक्य नाही.. महाराजांचे शिष्य.. साध्या भाषेत.. फ्रॅंचाईजी.. श्री सहजानंद मुंबईत असतात.. त्यांच्या पायावर डोके ठेवून एकदा मार्गदर्शन घेतले की सारे प्रॉब्लेम दूर.. थोडक्यात आता श्री सहजानंदांकडे जाणे आणि मग सर्व काही ठीक.. बाई अजून खूश झाल्या.. नवीन मार्ग मिळण्याचा दिवस दिसतोय आज..

उद्याच जाऊ सहजानंद स्वामींच्या चरणी!

७.

एवढे पाच दिवस झाले पण स्वामींची आठवण नाही झाली आणि आज अचानक व्हावी यात बाईंना संकेत दिसला. बाई देवभोळया खऱ्या पण प्रत्यक्ष देवाहूनही त्या देवाच्या अशा फ्रॅंचायजींवर .. म्हणजे सिद्धेश्वर स्वामी.. आणि इथले लोकल फ्रॅंचायजी श्री सहजानंदस्वामी .. यांच्यावर त्यांचा जास्त भरवसा होता. साहजिकच होते ते. निर्गुण निराकार.. नि तो आहे की नाही याच कॉंट्रोव्हर्सीत अडकलेल्या.. देवापेक्षा प्रत्यक्ष दिसणाऱ्या नि ज्यांच्याशी थेट संपर्क करता येईल अशा त्या एजंट कम स्वामीजींबद्दल त्यांना जास्त ओढ असावी.. स्वाभाविकच ते.

स्वामीने बुलाया है.. चलो बुलावा आया है म्हणत बाई दुसऱ्या दिवशी आश्रमात निघाल्या.

बाईंची स्वामींकडे मोठीच वट होती. एक तर त्या निस्सीम भक्त. परत दक्षिणेबाबत हात सढळ.. स्वामींच्या वार्षिक उत्सवात तन मन धनाने सहभाग.. नवऱ्याची इच्छा आणि विश्वास असो नसो प्रसाद त्या पोटे मिष्टान्न मधूनच स्पॉन्सर होणार. अशा बाई सहजानंद स्वामींच्या चरणी आज लीन झाल्या आणि स्वामींनी पहिलाच प्रश्न विचारला..

"मुली त्रस्त दिसतेस.."

चाळीस पंचेचाळीशीतील ह्या 'मुली'स त्यामुळे भरून आल्यासारखे झाले. दुरूनही आपली काळजी वाहणाऱ्या स्वामींबद्दल त्यांना भक्ती अपार दाटून आली.

बाईंनी आजवरचा वृत्तांत सांगितला त्यातील आर्थिक भाग वगळून. म्हणाल्या, "पोटदुखीने हैराण गुरुजी.. सिन्हा डॉक्टरला दाखवले.. म्हणतो ऑपरेशन लागेल.."

स्वामींनी डोळे बंद करून आपल्या तृतीय की चतुर्थ नेत्रानी पाहून सांगितले. "सिन्हा? पोटदुखी? त्रास आहे मुली तुला.."

"खरंय गुरुजी."

सहजानंदांचे अपेंडिक्सचे ऑपरेशन काही वर्षांपूर्वी याच डॉक्टरांनी केलेले.. ते आठवत स्वामीजी म्हणाले,

"साडेसाती सुरू तुझी.. ॐ श्रीं.. क्लीं.. आंत्रपुच्छ.."

"ठीक गुरुजी.. मी हा मंत्र म्हणेन..लिहून घेते.. काय.. आंत्रपुच्छ.."

"नाही मुली हा मंत्र नाही.. आंत्रपुच्छ म्हणजे अपेंडिक्स.. अपेंडिक्सचा त्रास तुला मुली.."

ज्या निदानासाठी सिन्हाला सोनोग्राफी लागावी ते स्वामींनी एका झटक्यात सांगावे.. धन्य गुरूजी.. धन्य..

बाईंनी पायावर डोके ठेवले..

गुरूजी पुढे म्हणाले..

"कापून काढण्यास गत्यंतर नाही.. सिन्हाच्या हातात मी जादू संक्रमित करतो.. जा तिकडे जाऊन ऑपरेशन करून ये परत.."

"पण त्यांनी थोडे दिवस थांबायला सांगितले स्वामी..तीन आठवडे.."

गुरूजी परत सूक्ष्मात गेले असावेत.. काही वेळ आवाज नाही.. डोळे मिटत मग एकाएकी म्हणाले.. "एकवीस दिवस.. वाट बघ.. सिन्हाच तुझा उद्धार

करेल.. ऑपरेशन सकाळी नऊ ते अकरा मध्येच व्हायला हवे .. नाहीतर दोन ते पाच दुपारी.. जा .. निश्चिंत मनाने.."

बाईंनी लोळण घालणे बाकी ठेवत नमस्कार केला.. स्वामींच्या चरणी दोन हजारांची दक्षिणा ठेवली आणि परत आल्या..

सिन्हाला काही येत असो किंवा नसो.. स्वामींच्या कृपेने त्या हातात आता जादू आहे.. आणि आता फक्त सोळा दिवस वाट पहाणे आणि नवऱ्याची तयारी करून घेणे.. एवढे आश्वस्त त्यांना वाटू लागले.. सारी स्वामीची कृपा म्हणत बाई घरी आल्या.. आता कसला कौल नको नि काही नको.. अजून दहा एक दिवस बाकी आहेत. मिष्टरांना तयार करून घेऊ.. तसे चांगलेत ते.. इतके की माझ्यासाठी वाईटही बनतील! रोज थोडे थोडे.. मानसिक तयारी करून घेऊ.. आणि सिन्हाच्या हातात स्वामींनी घातलीय जादू .. आता कसली चिंता नाही...

८.

डॉक्टर सिन्हांकडे आज जास्त गर्दी नव्हती. कशी कुणास ठाऊक पण नव्हती. बाईंचा नंबर आज लवकरच लागला. ही स्वामींचीच कृपा.. बाईंची खात्री होती. स्वामीजी इतक्या डिटेलमध्ये लक्ष घालतात याचेही त्यांना कौतुक वाटले. खऱ्या भक्तांची स्वामींना पण गरज आहे या निष्कर्षावर त्यांचे अंतर्मन पोहोचेपर्यंत त्यांना डॉक्टरांनी  बोलावलेही. त्यामुळे आपला नवरा आज नीटपणे.. म्हणजे.. वाईट वागेल की नाही याचा कौल ही मागता नाही आला.

बाईंनी आज खास साडी नेसलेली.. डॉक्टरकडे जाताना ची वेशभूषा.. विटलेली.. कॉटनची साडी. आणि रमेशला चट्टेरी पट्टेरी पायजम्याची वेशभूषा. एखाद्या नाटकात काम करावे..तसे त्याचे डायरेक्शन त्यांचे.. संवाद.. वेशभूषा..

झालेच तर नेपथ्य.. बॅकग्राउंड ही त्यांचेच! फक्त संवाद ऐनवेळी ठरणार त्याचे टेन्शन. पण हे सारे त्यांनी पोटदुखी सांभाळत केलेले.. आज डॉक्टर काय म्हणतात यापेक्षा रमेश कितपत यशस्वी होतो यावर दहा हजारांची बचत होणार होती.. थोडक्यात मनी सेव्हड इज मनी अर्नड्!

डॉक्टरांच्या केबिनीत रमेश अवघडून शिरला. पोटे मिष्टान्न चा मालक.. स्वतःची गाडी चालवत आलेला.. अंगात साधा शर्ट .. शर्ट कसला चुरगळलेला सदरा नि पट्ट्यापट्ट्यांचा पायजमा.. एवढा जामनिमाच त्याला गप्प बसवायला पुरेसा होता. एरवी दिलखुलास असणाऱ्या त्याला दुर्मुख बनवायला ही रंगभूषाच पुरेशी होती.. अगदी नैसर्गिक अभिनय म्हणा! एकूण बाईंनी विचार केलेला दिसत होता नीट. आता फक्त बोलण्यात 'देवाच्या दयेने काही कमी नाही' एवढे वाक्य न येणे महत्त्वाचे. तसे त्यांनी निक्षून बजावलेले. एवढ्यावर भागते तर त्या बाई कसल्या त्यांना वर शपथ ही घातलेली.. ती सोनूची नव्हती.. स्वतःचीच! रमेशला त्यांनी लिमिटेड रोल दिलेला. तोंड फुगवून बसायचे.. आणि डॉक्टर काही बोलले तर उडवाउडवीची बेफिकिर उत्तरे द्यायची.. आणि हाच सर्वांत कठीण भाग होता.. रमेश नीट वाईट वागेल ना? आपला नवरा आपल्याशी वाईट वागावा अशी बायकोने प्रार्थना करण्याचा स्त्री जातीच्या इतिहासात पहिलाच प्रसंग असावा का?

सिन्हांच्या केबिनमध्ये रमेश अवघडून बसलेला. सिन्हांनी सारे नीट तपासून पाहिले.. म्हणाले..

"गुड.. दहा दिवसांत करून टाकू.."

त्यांनी रमेश कडे पाहिले तर तो तोंड फुगवून बसलेला. तोंडावर हे काय चाललेयचे बेफिकीरीचे भाव. काय माणूस आहे.. बायको इथे आजारी आणि याला काही नाही.. हा  हलवाई फक्त गोड पदार्थ बनवतो.. वागला गोड तर.. सिन्हांना बाईंची दया आली.. आणि रमेशला पूर्णपणे इग्नोअर करत ते बोलू लागले..

ऑपरेशनचे डिटेल झाले..तारीख झाली.. सर्व अजूनतरी ठीक.. फक्त तो मूळ खर्चाचा मुद्दा बाकी..

आणि बाईंनी खर्चाचा मुद्दा काढला..

सिन्हा पन्नासखाली होणार नाही असे परत म्हणाले तसे बाईंनी रमेशकडे नजर टाकली.. रमेश कडून काही उत्तर नाही..डॉक्टरांच्या नकळत बाईंनी हळूच रमेशला चिमटा काढला.. काही तडकफडक बोलण्यासाठी.. पण रमेश एकाएकी उठून ताडकन बाहेर गेला. मौनरसातले हे नाट्य एकूण चांगलेच वठले.. बाईंनी डोळ्यांना पदर लावला..

आणि त्या कनवाळू डॉक्टरकडून चाळीसचा सौदा आणि ऑपरेशनची तारीख दोन्ही नक्की करून बाई बाहेर पडल्या.. विजयी मुद्रेने. आज मोठी लढाई जिंकलेली त्यांनी.. दहा हजारांची कमाई काही मिनिटांत.. स्वामींची कृपा.. आणि काय! आता बिलातून ऑन रेकॉर्ड दहा हजार कन्सेशन मात्र दिसेल म्हणाले डॉक्टर.. त्याचे काय एवढे.. भरायचे चाळीसच ना! नवऱ्याचे मनोमन आभार मानत बाई घरी आल्या. आता कसलीच चिंता नाही.. आणि ऑपरेशनची तर नाहीच नाही.. स्वामींनी सारी ताकद उतरवलीय सिन्हाच्या बोटात.. बरा आहे माणूस..

डॉक्टर असला म्हणून काय झाले!

९.

रात्री नवाची वेळ म्हणजे सिन्हांची क्लिनिक बंद करण्याची वेळ. आज क्लिनिक बंद करता करता एक जण आत शिरला..

रिसेप्शनिस्ट म्हणाली..

"सर मि. पोटे आलेत भेटायला.."

काही दिवसांपूर्वीची पोटेंची मुद्रा आठवून सिन्हांच्या कपाळावर आठ्या आल्या. ऑपरेशन तर झाले.. बाई घरी गेल्या.. हा आपल्या बायकोला एवढा इग्नोअर करतोय.. ऑपरेशनच्या दिवशी बाईंची बहीण बरोबर.. याचा पत्ता नाही.. माणसाने किती पैसे पैसे करावे.. याचे बरोबर असेल नाहीतर.. हलवायाच्या दुकानात मिळून मिळून किती पगार मिळणार.. कदाचित वाईट माणूस नसेल तो.. परिस्थिती माणसास बनवते असे.. तरी बायकोला असा वागवणारा.. त्याला थोडे सुनवायला हवे.. एवढा सगळा विचार ते 'रिस्पशनिस्टला पाठव त्यांना आत' म्हणायच्या आत त्यांनी केला.. आणि आपल्या मनोवेगाचे आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही त्यांना.

रमेश आत शिरला तर डॉक्टर सिन्हांनी ओळखलेच नाही त्याला. त्यादिवशी फाटका दिसणारा इसम आज चांगल्या शर्ट पॅंट नि बुटात जंटलमन बनून उभा .. हातात मिठाईचा असावा असा डबा..तो साधा पोटे..हे मिस्टर पोटे.. तो खरा की हा?

रमेश डॉक्टरांसमोर बसत म्हणाला, "डॉक्टरसाहेब सर्व प्रथम सॉरी.. मी हिशेब चुकता करतोय असे नका समजू प्लीज.. सर्वात प्रथम.. हे पेढे.. मीना बरी झाल्याबद्दलचे.. तुमच्यामुळे.. थ्यांक्स.. हे माझ्याच दुकानातले .. मी पार्ल्याच्या पोटे स्वीटस चा मालक.. आणि हा तुमच्या कन्सेशन म्हणून कमी भरलेल्या बिलाचा चेक.. बारा हजार.. मीनूने चाळीस ठरवून त्यातही दोन कमी दिले.. सॉरी.. आणि  तिने माझ्याबद्दल जे काही सांगितले ते खरे नाही..त्यादिवशी तुमच्या समोर मी आलो ते सारे नाटक होते.. ते उगाच बिल कमी करण्यासाठी.. एकदा वाटले की जे होते ते होऊ द्यावे.. तुम्हाला सत्य माहिती झाले तर पुढच्या खऱ्याखुऱ्या गरजूकडेही तुम्ही संशयाने पहाल.. पण नंतर वाटले.. नाही.. हे बरोबर नाही.. एखाद्याच्या चांगुलपणाचा गैरफायदा.. मुळीच नको.. देवदयेने आम्हाला कमी नाही काही.. हा चेक ठेवून घ्या आणि कोणा खऱ्या गरजूस कन्सेशन द्या.. सॉरी.. आणि एकच वाटते.. का कोणास ठाऊक.. ही पोटदुखी तुम्ही केलीत बरी पण डॉक्टरच्या फी बाबतची तिची पोटदुखी.. ती नाही कधी बरी व्हायची.. आय नो हर वेल सर.. एनी वे सर .. थ्यांक्यू व्हेरी मच.. आणि एक विनंती.. ती फॉलोअपला येईल तेव्हा तिला यातले काही बोलू नका प्लीज.. बाय सर!"

रमेश निघून गेला


सिन्हा आ वासून बघत राहिले.. समोर पोटे स्वीट्सचा डबा आणि तो बारा हजारांचा चेक..

असे होऊ शकते? किंवा खरेतर असेही होऊ शकते..? अर्थात झालेय म्हणजे होऊच शकते! पंचवीसेक वर्षे झाली प्रॅक्टिसमध्ये..  कित्येक कॉम्प्लिकेटेड केसेस गेल्या हाताखालून पण आजवरच्या करियरमधली ही अशी पहिलीच केस!

पोटे स्वीट्स आणि पोटदुखी..!

सिन्हासर स्वतःशीच हसले.

लीलाई दिवाळी २०१८



# अगा जे घडलेचि आहे!



१.

आमच्या घरच्या हॉलमधला टीव्ही.. त्याच्यावर एक हिंदी सिनेमा सुरू. माझी छोटी माझ्या मांडीवर बसून पाहतेय.. एकाएकी म्हणाली, "बाबा, हे हिंदी सिनेमावाले काय पण दाखवतात. असे कधी होते काय? मी मोठी झालीय आता.. मला म्हायती सगळे खोटेखोटे आहे ते!"

मुलीचे वय वर्ष पाच! घरातलेच कुणी मागे म्हणालेले ती परत पोपटपंची केल्यासारखे बोलतेय!

पण खरे सांगतो हिंदी सिनेमा नाहक बदनाम झालाय! असे कधी होते का? असे म्हणजे कसे? कसे ही असो.. होते! म्हणजे होऊ शकते! नाही विश्वास बसत? मग वाचा हे.. खरेतर 'खरीखुरी' सत्यकथा!

कोण म्हणतो सिनेमातल्या गोष्टी सत्यात येत नाहीत म्हणून? खरेतर प्रत्यक्ष आयुष्यात सिनेमाहूनही गंमतीदार गोष्टी घडतात.. घडू शकतात. सत्य कल्पनेहूनही जास्त रोचक असू शकते. एका तामिळ का कुठल्याश्या दाक्षिणात्य सिनेमात कुणाचे हृदय एकाएकी उडत दुसऱ्या कुणा पेशंटच्या छातीत जाऊन बसते असे काही पाहिलेले आठवते. आपल्या देदीप्यमान कर्तृत्वाच्या ऐतिहासिक पूर्वजांच्या काळी हे घडलेच नसेल असे छातीठोक कुणी सांगू शकेल? म्हणजे पुराणातली वांगी पुराणात ठेवून त्यांचे निरूत्साहाच्या भरात भरीत करणारे भारतीय आम्ही! त्या वारशाचा अभिमान बाळगत हे असले काही घडू शकते एवढेच काही सांगायचे इकडे. त्यामुळे आता मूळ मुद्द्यावर यावयास हरकत नाही!

म्हणजे झाले असे.. काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही..

***

त्यादिवशी माझी पार्ल्याच्या 'शालिनी निवासा'तल्या तिसऱ्या मजल्यावरच्या तीनशे नऊ नंबरच्या सहानींकडे अपॉइंटमेंट होती. अपॉइंटमेंट म्हणजे नेहमीचेच. एक इन्शुरन्स एजंट दुसरे काय करणार? माणसाला 'मरणात खरोखर जग जगते' समजावून आणि पटवून देणारी जमात आमची. 'जिंदगी के साथ' आणि त्यानंतर 'जिंदगी के बाद भी' भुताटकी सारखी पाठ न सोडणारी.

खरेतर जिंदगीके बाद आम्हाला मिळवायचे काही नसते. त्यातून काही फायदा मिळणार नसतो. पण मोठ्या उसूलवाला माणूस मी. त्यामुळे मोठे सहानी गेल्यावर त्यांच्या पॉलिसीचे पैसे छोट्या सहानींना मिळवून द्यायसाठी मदत करायला आलेलो मी. मिसेस सहानी कधीच वर जाऊन नवऱ्याची वाट पाहात बसलेल्या. त्यांच्यावेळीही मी अशीच मदत केलेली. आणि आता ही परत तेच. काही असो. निरपेक्ष काम कसे फळ देते हे माझ्या उदाहरणातून पटेल कुणासही. त्यासाठीच हा कथा प्रपंच.

कसा कोण जाणे.. पण तीनशे नऊ नंबर चुकला माझा. म्हणजे चुकण्यासाठी खरेतर काहीच कारण नव्हते. त्या सहानींकडे मी कमीतकमी सहा वेळा तरी येऊन गेलेलो यापूर्वी. पण व्हायचे ते होऊन जाते. तेच काही विपरीत घडले तर त्यास विधीलिखित म्हणतात. इथे घडले ते विपरीत नव्हते. आणि मुद्दाम घडवून आणल्यासारखेही नव्हते. तरी ते घडले. तेव्हा देव आणि दैवाची लीला अगाध आहे एवढे खरे!

एवढ्या प्रास्ताविकानंतर काय घडले ते ऐकायला आतुर असणार तुमचे कान. खरेतर वाचावयास डोळे आतुर म्हणायला हवे पण तशी पद्धत नाही. नयन दर्शनासाठी आतुरतात! वाचण्यासाठी नाहीत! त्यामुळे कर्णेंद्रिये आतुर झाली म्हणावयास हरकत नसावी. आता तुम्ही म्हणाल एवढे सारे सांगण्याऐवजी मुद्द्याला का घालत नाही मी हात? तर त्याला कारण माझा व्यवसाय. कुणी प्रॉस्पेक्टीव क्लायंट दिसला समजा.. तर मी त्याला काय सांगणार.. उदाहरणार्थ.. डायरेक्ट मुद्द्याला हात घालून..

"श्रीयुत अमुकअमुक.. नमस्कार. तुमच्या मृत्यूचा नि त्यानंतर तुमच्या पश्चात बायकापोरांचा काय विचार केलाय? तुम्ही नाही करणार.. पण मी केलाय.. समजा उद्या तुम्ही मेलात! उद्या काय.. आजही मरू शकता तुम्ही.. म्हणजे या आयुष्यात काहीही घडू शकते.. तर मेलात तुम्ही.. तर तुमच्या बायको आणि मुलीची काळजी वाटून आलोय.. इन्शुरन्स पॉलिसी विकायला.. घेऊन टाका.. आयुष्य क्षणभंगुर आहे.. आयुष्य म्हणजे बुडबुडा.. आयुष्य म्हणजे हवा भरलेला फुगा.. आयुष्य म्हणजे पणतीची वात.. आयुष्य म्हणजे घड्याळात वाजले सात.. आयुष्य म्हणजे तव्यावर तट्ट फुगलेली पोळी.. किंवा गॅसवर उतू जाणारे दूध.. कधीही त्यातली वाफ बाहेर पडेल.. तेव्हा घ्या ही पॉलिसी आणि जिंदगीके बादभी.. नो टेन्शन! कितीची देऊ.. साहेब.. तुमची पोझिशन पाहता.. पन्नास लाखांची देऊन टाकतो.. नाही.. इथे नाही एकावर एक फ्री!"

अशी रोखठोक विकली तर चालेल का पॉलिसी? तेथे पाहिजे जातीचे! हळूहळू उलगडून क्लायंटच्या मनात शिरावे लागते. तेव्हा तो तयार होतो पॉलिसी घ्यायला. तर असे नमनाला घडाभर तेल घालावेच लागते. त्यामुळे मूळ गोष्ट कशाबद्दल आहे हे सांगण्यापूर्वी एवढे प्रास्ताविक करणे आलेच!

२.

तर श्री. सहानींच्या घरावरची बेल वाजवली मी. कुणी दार उघडले. ती घरातली नोकर असावी. "बसा हां.." म्हणून आत बघत म्हणाली , "दीदी, कोणीतरी आलेय."

"बसायला सांग.. येतेच.."

आतून आवाज आला. सहानींच्या घरी शुद्ध मराठी? मला कौतुक वाटले. कुठल्याशा राजकीय पक्षाच्या अॅजेंड्याने इतका फरक पडावा की सहानींच्या घरून माझी मराठी कवतुके बोलली जावी? मी बसलो खाली तोवर तो आवाज ज्या गळ्यातून आला त्या गळ्याची मालकीण.. त्या गळ्यासकट बाहेर आली.. तशीच, जशी बॉबीत डिंपल येते बाहेर. हातात बेसनाचे पीठ..

"कोण? तुम्ही..?"

हे बोलता बोलता केसांना लागलेच ते पीठ!

प्रसंग इतकाच. कोण म्हणेल सिनेमावाले काल्पनिक काही दाखवतात?

आता पुढची गोष्ट. ती.. म्हणजे बेसनात बुडालेल्या हाताची मालकीण.. वयाने कॉलेजकन्यका होती.. सुंदर आणि गोड गोल चेहऱ्याची. कामात होती किचन मध्ये. भजी करत असेल की बटाटेवडा? की ब्रेडपकोडा? काही असो. सुंदर होती. माझी बेल चुकून वाजलेली. त्याबद्दल खेद न वाटता आनंदच व्हावा अशी होती ती! अर्थात माझी चूक झाल्याचे मला खूप नंतर कळले! तोवर मी तिला सहानी आणि सहानी परिवारातलीच समजत होतो!

"आलेच हां एक मिनिटात.."

ती परत कपाळावरच्या केसात तोच हात फिरवत आणि गोड हसत म्हणाली. मी त्या दोन्ही गोष्टीकडे पाहात म्हणालो.. "थांबतो की मी!"

ती आत गेली. आता ती केसांची भजी करेल की भजीत पडतील तिचे केस?

माझ्या आठवणीत ते सहानींचे घर वेगळेच होते. अर्थात मी आलेलो ते पाच वर्षांपूर्वी. त्यात कितीतरी बदल होऊ शकतात. सहानींच्या घरी एक एक जण भव्य दिव्य अवाढव्य. त्यात ही? खुद्द गेलेले सहानी शंभर किलो वजनी

गटातील. त्यांना चार काय आठ जण लागले असणार द्यायला खांदे. नाहीतर उचलणाऱ्याचेच रामनाम सत्य व्हायचे! घर ही बदलल्यासारखे वाटत होते. आणि मी बसलो तो झोपाळा.. तो तर नक्कीच नव्हता आधी. बाकी काही असो.. सहानी परिवारातली ती.. हा बदल सुंदरच होता. मी हळूच पेपर्स काढून पाहिले. पॉलिसीत कुठल्याच मुलीचे नाव नव्हते. नसू ही शकते. आणि ही शुद्ध मराठी बोलणारी सहानीकन्यका कुठून आली? असेल कुणी म्हणत मी त्या सुकांत चंद्राननेची वाट पाहू लागलो.

थोड्याच वेळात हात पुसत ती बाहेर आली. आरशातही पाहिले असावे तिने कारण केसांवरचे बेसनाचे आवरणही निघून गेलेले.

"बोला.. शंभर वर्षे आयुष्य तुम्हाला.."

ती हसत म्हणाली. तिचे पांढरे शुभ्र दात सुंदर होते.. मोत्यांसारखे. ते पाहून घेतले मी तितक्यात. माझ्यासारख्याला एलआयसीवाल्याला शंभर वर्षे आयुष्य म्हणणे म्हणजे.. इथे मी "मौत के फायदे' समजावून सांगत असतो आणि ही बाला मला शतायुषी बनवू इच्छिते! चालेल.. पॉलिसी माझी थोडीच आहे!

"हे पेपर्स आणलेले."

"तुम्ही स्वतः कशाला तसदी घेतलीत.. फोन केला असतात तर मीच आले असते.."

"खरेय.. पण मी म्हटले मदत करावी कुणाला तर हातचे राखून कशाला. मी तुम्हाला गाइड करतो. सह्या कुठे कुठे करून घ्यायच्या त्या."

"तशी कल्पना आहे मला. अहो हेच तर करते मी काम. कॉलेज सांभाळून."

"काय सांगता काय? काका गेले त्यांचे पेपर्स माझ्याकडे आहेत.."

"काका गेले.. हां.. ते तर कधीच गेले. पण तुम्हाला पेपर दिले त्यांनी?"

"नाही हो.. ते कसे देतील?"

मेलेला माणूस तो. संत सांगून गेले.. खाली हाथ आया है.. वैसाहिच जाएगा.. मग काका काय पॉलिसी घेऊन जाणार? तरी काकांनी नव्वदी गाठलेली. सहानी काका म्हणजे वजनदार पण मजबूत हड्डी. पण तरी पॉलिसी वर जाता जाता वाट वाकडी करून आपल्या एजंटकडे ड्रॉप करण्याइतका काही कर्तव्यनिष्ठ नसणार नव्वदीतला तो म्हातारा.

"त्यांनी नाही दिले.. मग तुम्हाला कुठून मिळाले पेपर्स?"

"कुठून मिळणार? माझ्याकडे असतो सारा रेकॉर्ड!"

मी म्हणालो तर ती सुबक कन्या थोडी विचारात पडली.

असतील कुठले तरी पेपर्स असा चेहरा झाला तिचा. मी पेपर काढणार आतून इतक्यात "येतेच हां" म्हणत ती रम्य बाला आत गेली.

सहानींकडे आधी होते सहा जण. त्यातले मोठे दोन म्हणजे मि.अँड मिसेस सीनियर सहानी गेले. बाकी चार भाऊ. त्यातले तिघे लग्न झालेले. चौथा तसा तरूण. त्याची तर ही नाही ना घरवाली.. असा विचार करता करता वाटले.. नाही, ही तर कॉलेजात जाणारी कन्या. तीच तिच्या मृदू आवाजात सांगून गेलीय तसे. कितीही संतूर चोपडला दररोज तरी त्वचा से उम्र का पता तो लगता ही है! मी बसलो होतो तोवर त्या दरवाजा उघडणाऱ्या बाईने कोकम सरबत आणून दिले.

कुण्या विमा एजंटच्या स्वागताची ही पहिलीच वेळ असावी. बाकी कुठलीतरी पॉलिसी मारेल हा गळ्यात म्हणून लोक टाळतात आम्हाला. आणि अशा रीतीने म्हणजे सहानी काकांच्या देवाघरी जाण्यासारखे काही कारण मिळाले की मगच स्वागत होते आमचे! कोकम सरबत छानच होते. आजकालच्या तरूण पोरी जेवण कसल्या बनवतायत .. स्वयंपाक खोलीत शिरत देखील नाहीत. त्यात ही तरूण कन्यका स्वहस्ते भज्या तळते काय नि सरबत पाजते काय!

ही वेळ तिच्याबद्दल विचार करण्याची नव्हती खरेतर. पण होतीच ती तशी. आणि कुठल्या क्लाएंटच्या घरी जाऊन तिथल्याच कुणाशी सूत जमवणे.. तसे अगदीच विमा एजंटच्या एथिक्स बाहेर नव्हते. तरी पाच सात मिनिटांच्या संपर्कात असला विचार माझ्या अविचारी आणि अचपळ मनाने करावा? तसा मी उपवर झालेलो. एलिजिबल बॅचलर म्हणून आमच्या जवळील कुटुंबात प्रसिद्ध होतो मी. घरी तशा हालचाली सुरू होत्या. मीच 'यंदा कर्तव्य नाही'चा बोर्ड लावून बसलेलो. कारण एकच.. अशा  जमवून केलेल्या विवाहांवर माझा विश्वास नाही. मुलगी बघण्याच्या त्या पाच दहा मिनिटांत काय कळणार मला.. किंवा तिला ही? हे माझेच मत आणि आता पाच मिनिटे काय झाली या कन्यकेस पाहून, तर माझे अचपळ मन नावरे आवरीता? सहानींच्या तरूणीमुळे मी असा विचार करीत असतानाच माझ्यापुढे बटाटेवडे आणि चटणी ठेवली गेली. गरमागरम वडे आणि खास दह्यातली चटणी! म्हणजे हा सारा सरंजाम म्हणा किंवा खटाटोप म्हणा माझ्या स्वागतासाठी होता तर. मागे सहानी आजी गेली तेव्हा एक ग्लास पाणी.. तेही मागितले मी तेव्हा मिळालेले मला. तिची पॉलिसी तशी दोन लाखांचीच होती आणि हे भक्कम सहानी काका मरणोत्तर

पन्नास लाखांचे धनी. स्वागतात फरक तर असायचाच. वडे मस्त होते. कन्येच्या हातात खरेच जादू होती.

"अजून घ्या बरं का.."

आतून तोच मंजूळ आवाज आला. मी कशाला नाही म्हणतोय. 'माझ्या मना हाण रगड.. हा वडा फुकट आहे' .. मी मागे वाचलेली एक विडंबन कविता आठवली आणि अजून एक वडा उचलला! पाठोपाठ चहा आला. तो ही वेलची-आले घातलेला. सहानी मंडळी खूश होती... माझ्यावर की काका सहानी गेल्यामुळे? काही असो खायला तर छान मिळाले पोटभर. सुगरण दिसतेय कन्यका! सुंदर.. सुशील.. सुगरण.. गृहकृत्यदक्ष.. मला विशेषणे सुचली तिच्यासाठी आणि कुठल्याही वधू पाहिजेच्या ॲड मध्ये याहून वेगळे काय असते? सहानी काका गेल्याबद्दल मलाही आनंद व्हायला हवा का? फक्त ही कन्यका आणि माझी भाषा जुळत नसल्यास घरून परवानगी मिळेल काय? जणू बाकी सारे जुळत असावे अशा रीतीने मी विचार करत होतो वड्याच्या घासाबरोबर आणि चहाच्या घोटाबरोबर! तृप्त होऊन मी ढेकर देणार होतो.

तेवढ्यात तीच आली बाहेर..

"तुम्ही काही घेतलेच नाहीत."

तिच्या मंजूळ आवाजात ती म्हणाली. मी अजून वडा उचललाही असता पण पोटात अजिबात जागा नव्हती.

"तुम्ही असे करा.. बाबा आता नाहीत.. तर उद्या येऊ शकाल?"

"उद्या.. दुपारी? की संध्याकाळी येऊ?"

येताना पोट रिकामे ठेवून यायला हवे.. मी तितक्यात हा विचारही केला!

"संध्याकाळी जमेल ना तुम्हाला?"

"हो.. येतो. पेपर देऊन जाऊ?"

"चालेल.. नाहीतर उद्या घेऊन याल?"

"नाही.. वाचून ठेवा. मग उद्या डिस्कस करू.."

"चालेल."

तिच्या हाती फाईल सोपवली मी. तिने ती बाजूला ठेऊन दिली. आणि मी परत निघालो. उद्याचा मेनू काय असेल याचा विचार करत!

बटाटेवड्यांची रेंगाळणारी जिभेवरची चव घेऊन मी जिना उतरलो. खरेतर त्या कन्यकेस मनात साठवूनही निघालो. उद्या परत मिलने का वादा है.. फाईल सोडलीय तर सहानींकडे उद्या जावेच लागेल. आणि काय वाढून ठेवतील पुढ्यात ते खावेच लागेल! धुनकीत मी निघालो. वडे पचतील अशा स्पीडने चालत!

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी परतलो. दरवाजा उघडाच होता. आतून कुणी बाहेर यायचे चिन्ह दिसेना. झोपाळा रिकामाच होता. मी बेल वाजवली तशी ती बाहेर आली. छानच दिसत होती. मी आत शिरणार तोच म्हणाली, "सॉरी. बाबांना अर्जंट जावे लागले गावी. त्यांच्या काकाचा मुलगा एकाएकी वारला. कालच गेले ते. एवढ्या तडकाफडकी जावे लागले ना की त्यांच्याशी पेपर्स बद्दल काही बोलूही नाही शकली ताई. तुम्ही ही फाईल तुमच्याकडेच ठेवा. सॉरी हां.. काल घाईत तुमचा नंबरही नाही घेतला तिने. उगाच खेप पडली तुम्हाला."

उगाच खेपेचे काही नाही. तिला बघायला मी दररोज यायला तयार होतो. पण ही अशी का ती आणि तिने म्हणतेय?

"चांगला तरणाताठा हो.. अचानक गेला. ताई आणि बाबा गेलेत.. सांगितलेय मला ही फाईल द्यायला."

तो गेलेला 'तो' असाच की पॉलिसी घेऊन गेला? मी विचारणार होतो. जातिवंत विमा एजंटाला असे प्रश्न पडतातच! आणि ते पडल्याशिवाय कंपनी कामावर घेत नसावी!

"तुमचा नंबर देता का?"

मी माझे कार्ड दिले तिला. न बघता बाजूला ठेवत म्हणाली, "आले परत की फोन करते. सॉरी परत एकदा."

"इट्स ओके.."

मी पुढे मॅडम बोलणार होतो चुकून.

मी तीन माळे उतरून निघालो. आजचा मेनू.. हवा! ती खात निघालो. तिच्या त्या बोलण्याचे आश्चर्य करीत. हिचे नाव काय असावे? सुहानी सहानी? की सावनी सहानी? हिची ताई कोण? असे बोलतेय जणू तिच्या ताईला मी ओळखतो.. आणि काल ही नव्हतीच? मग वो कौन थी? काल प्रेमाने वडे खाऊ घालणारी.. सहानींच्या घरात शुद्ध मराठी एखादी कन्या बोलत असेल.. म्हणजे ती कालची. पण आजपण ती छानच बोलत होती. म्हणजे ही कालची आणि आजची एकच.. अचानक तो त्या घरातला झोपाळा आठवला. मी गेलो तेव्हा हलत नव्हता आपोआप एवढे नक्की. पण काही भुताटकी तर नाही? चालता चालता माझ्या लक्षात आले, ही सारी किमया माझ्या रिकाम्या पोटाची आहे. खायला मिळेल अशा आशेने दुपारी नीट जेवलो ही नव्हतो. भूक सहन होत नाही मला. त्यामुळे तिच्या बोलण्याचे भलभलते निघताहेत अर्थ! काही

खायला हवे! नुसती हवा खाऊन चालायचे नाही! जवळपास हॉटेल नव्हते. पोटातले कावळे कालच्या बटाटावड्याची वाट पाहात कोकलत होते. तसाच निघालो पुढे तंद्रीत मी तर समोर अविनाश.

३.

अविनाश म्हणजे अवि.. माझा जुना दोस्त. कित्येक वर्षे आमची दोस्ती टिकून आहे ती आमच्या खाण्याच्या आवडीमुळे. उगाच मैत्री तुटेल म्हणून त्याला मी पॉलिसी काढण्याबद्दल अजूनही विचारलेले नाही. म्हणजे आमची मैत्री किती पक्की आहे ते समजेल. दर रविवारी आम्ही इडली डोसा नाहीतर मेदूवडा वगैरे दाक्षिणात्य पदार्थ खातो एकत्र. अवि त्याच्या सवयीनुसार त्यावर गाणे गातो.. उडप्यासाठी.. 'एक इडली तू मुझको उधार दे दे.. बदले में इसको काम पे ले ले!' इसको म्हणजे मला! उधार इडलीच्या बदल्यात मी त्याची इडलीपात्रे नि डोशाचे तवे घासावेत असा त्याच्या प्रतिभेचा कल्पनाविलास! अविची ती सवयच आहे. कुठलेही गाणे आपल्याला हवे तसे बदलून म्हणत असतो. कधीकधी वात आणतो तो.

तर आमच्या या साप्ताहिक बैठकीत खात खात आम्ही आठवड्याचा आढावा घेतो. आणि पुढच्या आठवड्याचे प्लॅन्स बनवतो.

गेल्या काही महिन्यांत अवि खूपच बिझी होता. नाही म्हणजे कामात नव्हे. त्याचे आणि त्याच्या मैत्रिणीचे जुळत आलेले.

'मी लाजून विचारले.. तिने बिनधास्त हो म्हटले..' ही स्टेज बाकी होती. हा मूळ काव्य बदल अर्थातच त्यानेच केलेला. पण कुणाचे कितीही जुळले तरी

आमची रविवारीय भेट चुकवायची नाही हा आमचा करार. त्या जुळण्याच्या क्षेत्रात मी मागेच पडलेलो. त्याने प्रगती साधलेली. आमच्या भेटींमुळे मला तसे अपडेट होतेच. त्यात हा असा रस्त्यात मध्येच भेटावा? त्याच्या मैत्रिणीला मी अजून पाहिले नव्हते पण अविची एकूण आवडनिवड पाहता ती कशी असावी याचा अंदाज बांधला होता मी. तो या रविवारी दाखवणार होता तिचा फोटो.

"अव्या.. साल्या इथे कुठे?"

"कुठे? तू इथे कुठे?"

"अरे क्लाएंट. कामाचा माणूस मी. तू इकडे?"

"असाच.."

"तू आणि असाच? दाल में कुछ काला है यार.. बोल. बोलून टाक.. आय विल गेस.. तू लपवतोयस म्हणजे नक्कीच तुझ्या जीएफ ची भानगड असणार!"

"हुशार रे तू.. चल खाऊ काहीतरी.."

"खाऊ. पण तू भाव खाऊ नकोस.."

जवळच्या उडप्याकडे बसलो आम्ही. पोटात कावळे कोकलताहेत. या उडप्याची ऑर्डर म्हणजे 'संथ वाहते कृष्णामाई.' तशी आम्हाला घाई नव्हतीच. फक्त पापी पोट थोडा निषेध करीत होते त्या विलंबाबद्दल. डोश्याची ऑर्डर येईपर्यंत आम्ही शांत होतो. मसाला डोश्याच्या पोटातली भाजी अविच्या पोटात गेली थोडी नि त्यानंतर त्याला कंठ फुटला..

"अरे.. ते गाणे आहे ना.. जाने क्यूं लोग मोहब्बत किया करते हैं.. तसे झाले"

"म्हणजे?"

"अरे ती आज भेटणार होती."

"इथे?"

"जवळच राहते ती. मी तिला म्हटले.. तुझ्या या बिल्डिंगच्या पाठी थांब तू गडे जराशी.. आम्ही नेहमी भेटतो तिथे.."

"मग.. आज माशी स्नीझ्ड?

"तिला जावे लागले बाहेर. काहीतरी झाले आणि अर्जंट. त्यामुळे मी असा देवदास बनून फिरतोय."

"शेवटचा कधी भेटलेलास तिला? देवदास? नाही म्हणजे दाढी तितकीशी वाढलेली दिसत नाही म्हणून विचारतोय.."

"वाढेल रे.. बढती का नाम दाढी.. कालच तर भेटलेली ती. आज फिर मिलनेकी तमन्ना थी.. आणि तीच नाही!"

"बापरे.. तब्बल बारा पंधरा तासांच्या विरहाने झाली तुझी ही अवस्था?"

"ये प्यार क्या होता है.. तुम क्या जानो.. सुधीर बाबू!"

माझे नाव सुधीर नाही. पण डायलॉगच्या सोयीसाठी ते नामकरण तसे करायला अविला काही वाटत नाही.

"चल तुला माझी कालची गंमत सांगतो. म्हणजे तुला जरा बरे वाटेल.." मी त्याला कालच्या बटाटेवड्याची आणि ते बनवणारीणीची गोष्ट सांगणार होतो.

"ये जुल्मी प्यार.. न चैन से जीने देगा.. न खाने देगा!" अवि दुसऱ्या डोश्याची ऑर्डर देता देता म्हणाला. "तरी पण ऐकतो तुझी कहाणी.. बोल."

"अरे.. काल एका क्लाएंटने भरपेट खाऊ घातले बटाटेवडे! सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते बनवणारी सुगरण फारच सुंदर होती रे."

"परत कधी भेटेल ती?"

"ठाऊक नाही! त्यामुळे तसा आज मीही थोडाफार देवदासच आहे!"

"देवदास.. थोडा? देव किंवा दास? नहीं.. या तो वो पूरा होता है या नहीं. देवदास कभी आधा होता है लल्लू? आधा देवदास.. कधी ऐकलेय कुणी? अर्धामुर्धा देवदास म्हणे!"

"अरे, मला आज तिलाच भेटायला जायचे होते.. आणि ती पण.. भेटली पण. नाही पण भेटली."

"तू ठीक आहेस ना? कोड्यात बोलू नकोस.. एक ऑनियन उत्तप्पा.. डबल चटणी.."

हे शेवटचे वेटरला उद्देशून. अन्न गोड न लागणारा हा देवदास इतके खातो.. गोड लागले तर.. मुळापासून खाईल?

"चटणी! किती छान होती ती.."

"काय चटणी?"

"यस्स.. चटणी पण आणि ती बनवणारी पण. अरे झाले एवढेच की मी गेलो होतो पण सहानी लोक गावी गेलेत. ती होती, पण म्हणाली नंतर या. सकाळपासून भुकेला आहे रे मी!"

बोलता बोलता माझ्या तिसऱ्या इडली प्लेटीतली पहिली इडली मी सांबाराच्या दुसऱ्या वाटीत बुडवली.

"मग.. ये प्यार की भूख है दोस्त.. नुसती भेटलेली ती.. पुढे काही नाही.. तर ही अवस्था. तर मेरा क्या होता होगा कालिया. विचार केलायस कधी?"

"हुं.. म्हणजे वुई आर सेलिंग इन सेम बोट?"

"सेम बोट माहिती नाही.. पण वुई आर इटिंग इन सेम प्लेट.." मी त्याच्या प्लेटीतल्या उत्तप्प्याचा तुकडा तोडत होतो त्याकडे बोट दाखवत अवि म्हणाला.

एरवी आम्ही इकडतिकडच्या गप्पा मारतो पण आज दोघेही दुसरे काही सुचण्याच्या मनस्थितीत नव्हतो. बारा तासांच्या विरहाने अवि व्याकूळ आणि कशाला कशाचा पत्ता नसताना मी!

"चल.. दे बिल.." त्याने ऑर्डर सोडली..

"मी का? रविवारी मीच भरलेले.."

"अरे.. माझी अवस्था बघ.. तोळामासा. पूर्ण देवदास. तू अजूनही अर्धामुर्धा देवदास! विरहवेदनेत व्याकूळ मी. माझी स्थिती तरी आहे का बिल भरण्यासारखी? तर मी दिल देतो.. तू बिल देके देखो.. बिल देके देखो जी!"

मी निमूटपणे बिल भरले. अवि आपल्या कामाला निघून गेला. मी पण रमतगमत निघालो. कालच्या बटाटेवड्यापुढे इडली न डोसा.. उगाच तुलना करत निघालो.

पुढे काय? कसले काय! वाट पाहाणे आणि काय! पुढे काही दिवस त्या बटाटेवड्यांची चव आठवण्यात गेले. चटणी किती चविष्ट होती. आणि ते बनवणाऱ्या हातांची मालकीण.. कधी ग येशील तू? खरेतर कधी गं बोलावशील तू?

४.

पंधरा एक दिवस गेले असावेत. मी आता ते सारे विसरून गेलो. म्हणजे तसे ठरवून टाकले मी की मी ते विसरलोय. खरेतर सहानींकडून फोन येणार होताच. मेंदूतही अडगळीचा कप्पा असावा त्यात सारे टाकून मी त्या अनामिक सुकन्येस विसरायचे ठरवून टाकले.

आणि एके दिवशी सकाळ सकाळी सहानींकडून फोन आला. तिला विसरण्याचा निश्चय आनंदाने मोडत मोठ्या उत्साहाने फोन उचलला मी. पण त्या मंजूळ ध्वनी ऐवजी पलिकडून एका सहानींचा भसाडा आवाज..

"क्या हुवा पुत्तर.. आए नहीं तुम. ओ पापाजीके पेपर थे.."

"अच्छा तो आप आ गए वापस जी?"

"वापीस? हम कहां जाएंगे? हम तो इधरही है.. आज तो आ जाओ.. कितने दिनोंसे राह देख रहे हैं.."

"जी हां.. आपकी लडकी बोली थी.. आनेके बाद फोन करेंगे. मैं आ जाता हूं आज.."

"ओए.. कौनसी लडकी.. कहां से आएंगे.. हमारा तो जीना यहां.. मरना यहां.."

मी मनात म्हटले.. और इन्शुरन्स पॉलिसीभी यहाँ!

"वो सब छड्ड.. चल्ल.. तू आ जा आज.. पूरा करना है पेपर्स.."

"आता हूं.. चारपांच बजेतक जी!"

मी फोन ठेवला.

पंजाबी लोक थोडे क्रॅक असतात का? उगाच त्यांना क्रॅक म्हणावे आणि ती आपलीवाली अनामिका त्याच घरातली असावी.. म्हणून मी तो विचार झटकून टाकला. पण हा सहानी कुठे गेलाच नाही का म्हणतो नि परत कौनसी लडकी विचारतोय? जाऊ दे. खाल्ल्या मिठास जागले पाहिजे. नुसता चहा प्यालो असतो तर ठीक होते. पण बटाटेवडे म्हणजे मीठ आलेच त्यात. त्याला जागलेच पाहिजे.

संध्याकाळी पाच वाजता मी परत पोहोचलो. अनामिकेबद्दलची अनामिक हुरहूर होती मनात. तर बिल्डींगखालीच मोठे सहानी भेटले..

"आजा पुत्तर.. बडी देर कर दी.. चल्ल.."

मी त्या सहानी बरोबर तिसरा माळा चढून गेलो. सहानींनी चावीने दार उघडले. म्हणजे ती घरात नसणार? इतक्यात ते घर पाहिले आणि माझ्या डोक्यात ट्यूब झटकन पेटली. मागील वेळेस सहानी समजून मी दुसऱ्याच कुण्या घरी जाऊन पाहुणाचार घेऊन आलेलो! सहानी आत गेले. त्यांच्या दरवाजावर नंबर होता इंग्रजी तीनशे नऊ! त्या अनामिकेच्या दरवाजावर? त्यावर ही तोच नंबर असावा?

इतक्यात सहानी ते पेपर घेऊन आले. माझी घामाघूम अवस्था पाहून परत आतून थंड पाणी घेऊन आले. त्यांच्या बडे पापांचे घबाड हाती यायला पेपरवर्कचीच कमी होती आता! मग ते लाखांचे धनी.

पुढे अर्धा एक तास त्या पेपराच्या लावण्यात नि भरण्यात गेले.

"आप चिंता मत करना.. मैं पूरा काम करवा देता हूं.. अपना पेपर क्लियर है तो कुछ चिंता नहीं.."

मी तोंड भरून आश्वासन दिले. आमच्या ट्रेनिंगचा हा भाग. जिंदगी के बाद भी आम्ही साथ असताना हे सहानी तर अजून जिंदा आहेत. त्यामुळे त्यांना साथ देणे आले. तेवढ्या एक तासात मी तो झालेला गोंधळ पार विसरलो. पण जालीम जमाना विसरू देईल तर ना.

निघता निघता सहानी म्हणाले, "पुत्तर शादी हुई है तुम्हारी?"

"नहीं जी.."

"तो कर लो.. किस लडकी की गल्ल कर रहे थे फोनपर पुत्तर? सपने में छोरी आ रही है तुम्हारी.. बना लो शादी.. नहीं तो तुम्हारे पितासे बात करूं.."

"नहीं.. नहीं.. सहानी अंकल मैं चलता हूँ."

मी तिथून पळ काढला.

आता मला आधी काय झाले असावे याचा विचार करण्याची उसंत मिळाली. मी हळूच 'त्या' घराजवळ गेलो. दरवाजा बंदच होता. ते अनामिकेचे घर.. नंबर तीनशे नऊ! बारकाईने पाहिले तर तो इंग्रजी सहाचा आकडा उलटून नऊ दिसत होता. मागे कुठल्याशा हिंदी सिनेमात हे घडलेले दाखवलेय ते आठवले. म्हटले ना.. सिनेमात दाखवतात ते सारेच अशक्य म्हणून सोडून देऊ नये. आता माझी ट्यूबलाइट पेटली. म्हणजे ती जी कोणी होती ती सहानी नव्हतीच! तिच्या दरवाजावर नेमप्लेट ही नव्हती. कुणी शुद्ध मराठी कुटुंब असावे ते. आणि ते बटाटेवडे? ते कुणासाठी बनवले असतील? एकूण दाने दाने पर लिखा है खाने वाले का नाम! त्या सुंदरीने मला कोण समजून खाऊ पिऊ घातले होते कुणास ठाऊक!

मी झटकन तिथून निघालो. खाली नावांची मोठी पाटी होती. त्यात तीनशे सहा वर होते 'अनंत राजाराम सुर्वे!' थोडक्यात मी सुर्वेंचे मीठ खाल्लेले त्यादिवशी. आणि ती सुर्वेकन्या होती तर! एखाद्या हिंदी सिनेमात दाखवतात तशी गडबड झाली होती खरी. ती सुर्वे असली तरी आता तिच्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग नाही माझ्याकडे. की काही तिकडमबाजी करून पोहोचेन मी तिच्यापर्यंत?

सकाळपासूनचे धक्के कमी होते म्हणून की काय.. मी निघालो.. विचार करता करता निघालो नि रस्ता चुकलो नि मागच्या बाजूला पोहोचलो.. आणि त्या बिल्डिंगच्या मागे कोण दिसावे मला? त्यांना पाहून धक्का बसला मला. बिल्डिंगच्या मागे प्रेमीजनांच्या सोयीसाठीच की काय कुणास ठाऊक एक बाकडे होते. हिरव्यागार झाडाखाली. आणि त्यावर ती दोघे बसलेली.. एक त्यापैकी होती ती तीच सुंदरी .. सुर्वेकन्या आणि दुसरा.. अवि!

थोडक्यात आता वहिनींच्या हातचे बटाटेवडे खायला लागतील असे दिसू लागले मला चित्र. बेट्या अविचे सूत साऱ्या जणी सोडून याच कन्येशी जुळावे? आणि केव्हा ना केव्हा तिला भेटेनच मी तेव्हा तिला काय वाटेल? कुणाच्याही घरात शिरून बटाटेवडे खातो मी? अवि आणि ती बसून गप्पा मारत होते. आणि ज्या रीतीने ते बसलेले ते पाहून अवि ने आजवर सांगितले त्याहून जास्त मजल मारलेली दिसत होती. मला परत ते दोस्त आणि दोस्तीवरचे सिनेमे आठवले. या अविसाठी मी माझे प्रेम कुर्बान करायचे ठरवले! नाहीतर तो उगाच गात फिरेल.. दोस्त दोस्त ना रहा.. आणि खरेतर तसेही मला विचारणार कोण होते? त्यातल्या त्यात हे कुर्बानीचे पुण्य पाडून घ्यावे पदरात म्हणून मोठ्या मनाने मी

मनातल्या मनात अविला पास दिला. म्हटले, बी हॅपी फ्रेंड. माझे काय.. वडे खायला येईन तेव्हा नाही म्हणू नकोस म्हणजे झाले!

खरे सांगू तर ते दोघे काय बोलताहेत ते ऐकायचा खूप मोह झाला मला. एकतर त्या सुर्वेकन्यकेचे नाव कळले असते आणि त्यांचे बोलणे पुढे मागे मला उपयोगी पडले असते.. माझी पाळी येईल तेव्हा. पण मी तो मोह टाळला. तिने पाहिले तर काय वाटेल तिला. चहापाण्यापर्यंत ठीक होते.. आणि बटाटेवडे खाणे पण एकवेळ क्षम्य.. पण हे असे चोरून ऐकणे.. तेही दोन प्रेमी जिवांचे.. पुढेमागे मिळणारे बटाटेवडे.. कमीत कमी त्यांचा तरी विचार कर.. मी स्वतःस समजावले आणि दबकत दबकत मागे फिरलो. मागे वळून पाहिले तेव्हा दोघे आपल्या धुंदीत होते.

मी तिकडून निघालो आणि मुख्य गेटमधून बाहेर आलो. थोडे अंतर गेलो असेन तर समोरून 'ती' येताना दिसली. मोठ्या साळसूदपणे ती त्या पाठच्या भागातून बाहेर पडून मुख्य गेटकडे येत होती. प्रेम असा चोरटेपणा शिकवते हे ऐकून होतो.. आता प्रत्यक्ष पाहिले. ती जाईतोवर मी झाडामागे लपून होतो. फक्त एकच.. ती इतक्या झटकन इथवर पोहोचलीच कशी? आणि अवि? तो कुठे नाहीसा झाला?

मी अविला फोन लावला. म्हटले, बघू हा किती चोरटेपणा शिकलाय. पण तो फोन उचलेल तर ना. परत एकदा लावला फोन. यावेळी उचलला.

"काय अवि.. कुठे आहेस?"

"का? कुठे खादडायला बोलावतोयस?"

"नाही.. सहज.. काय करतोयस?"

"बिझी आहे.. ऑफिसमध्ये.."

"ठीक.. मग नंतर भेटू."

तो बोलायचा बंद झाला.. म्हणजे माझ्याशी. त्याचा फोन ऑन होता. अगदी स्पष्ट नाही पण ऐकू येत होते..

"माझा फास्ट फ्रेंड.. अनिकेत खादाड. नाही.. ते आडनाव नाही.. विशेषण आहे. तुला भेटवेन एकदा.. चांगला आहे पण खादाड आहे.. हो ना.. खूप वेळ झाला नाही? जावेसे वाटत नाही.."

पुढे काही लक्षात येऊन फोन बंद केला असावा त्याने.

कुणाशी बोलतोय हा?

अनामिका सुर्वे तर आताच गेली माझ्या समोरून. आणि बोलतोय असा म्हणजे नक्कीच तिच्याशीच. म्हणजे? ती बाकड्यावरची ती.. ती नव्हतीच? ते शक्य नाही. म्हणजे समोरून येणारी ती.. ती नव्हतीच? शक्य आहे. ध्यानीमनी तिचा विचार केला की भास होणारच. होणाऱ्या वहिनीबद्दल विचार करणे आता टाळायला हवे. अवि.. खोटारड्या.. हे तुझे ऑफिस? बिल्डिंगच्या मागच्या बाकड्यावर.. एकांतात. किमान माझ्याशी तरी खोटे बोलू नकोस.. कुठे फेडशील हे पाप?

सगळे सोडून मी घरी जायला निघालो. एका दिवसात काय काय घडावे? अविच्या प्रेमपात्रास पाहिले आजच आणि माझ्या त्या न सुरू झालेल्या प्रेमकथेचा अंत.. तो ही याचि देही याचि डोळा पाहिला आजच. आणि गंमत म्हणजे त्यात सामायिक घटक असावी.. तीच.. अनामिका! अनामिका सुर्वे!

५.

अवि आणि त्याची ती जीएफ.. गर्लफ्रेंड. वर माझ्याशी बोलतोय खोटे! मला खरेतर त्याचा राग यायला पाहिजे होता. पण नाही. तो माझा खरा दोस्त होता. त्यामुळे मला आनंद झाला. पण मी त्याला असाच सोडणार नव्हतो. माझ्याशी खोटे? पण नंतर विचार केला मी, बाकड्यावर दोघेच ते. तिच्याबाजूला हा. त्यात माझा आगाऊपणे केलेला फोन. तिच्यासमोर तो मला काय सांगणार होता? नक्की काय करतोय तो.. किंवा कुणाबरोबर आहे तो.. किंवा कुठे आहे तो.. या प्रश्नांची उत्तरे तिच्यासमोर देणे टाळण्यास उपाय एकच.. ऑफिसात बिझी असल्याचे सांगणे! तसा बिझी तो होताच.. त्यामुळे त्याने सांगितले ते अर्धसत्य तरी होतेच.. त्यामुळे तो ऑफिसात बिझी आहे सांगण्याशिवाय दुसरे काय करू शकणार होता? आणि तेच तर त्याने केले होते. त्याच्या जागी मी असतो तर? मी ही तेच केले असते!

तेच!

म्हणजे तिला पटवण्यापासून त्या बाकड्यावर.. जाऊ देत डिटेल्स.. ते कुणी अशावेळी फोन केला तर बिझी असल्याचे सांगण्यापर्यंत.. सारे असेच घडले असते.

दोन दिवसांनी, म्हणजे रविवारी भेटला मला अवि. नेहमीच्या उडप्याकडे. मजेत होता.

"काय मग.. देवदासत्व नाहीसे झालेले दिसतेय? खूश दिसतेय स्वारी!"

"देवदासत्व! काय पण. पण आवडला शब्द मला. हाय..! होतो काही दिवस देवदास.. पण एक नजर क्या उसकी पडी.."

"की तू टुणकन मारली उडी?"

"तसेच समज! तसेच समजावयास हरकत नाही आणि त्यास माझा प्रत्यवाय नाही. हाय क्या जुल्म ढाए कातिल ने.."

"ओहो.. कातिल! म्हणजे तिच्या गालावर का तीळ आहे?"

"वा! काय ज्योक! धन्य झालो.. तू काही पण समज.. माझी नाही हरकत!"

"कशी असणार.. तुझ्या त्या बिल्डिंगच्या पाशी.. येतो मी गडे जरासा .." मी त्याच्या स्टायलीत बोलण्याचा प्रयत्न करीत म्हणालो.

"जमत नाही तर सोडून दे. तिकडे पाहिजे जातीचे. समजले ना?"

"खा. डोसा थंड होतोय.. पण यू आर राइट! जातीचे तिकडेच दिसतात हल्ली! पण मी ऐकले ते खरे आहे का?"

"काय? म्हणजे तू काय ऐकलेस.. मला काय ठाऊक?"

"तसे खूप काही ऐकून आहे. पण तुझे ऑफिस शिफ्ट झाल्याचे आधी कधी बोलला नव्हतास.." मी त्याची उलटतपासणी करण्यासाठी उलटून प्रश्न विचारायचे ठरवलेले.

"म्हणजे? कोणी सांगितले?"

"कोणी काय? दस्तुरखुद्द अवि महाराजच म्हणाले त्या दिवशी!"

"मी?"

"नाहीतर काय मी?"

"मी? कधी? तुला स्वप्न पडले असणार."

"हे खरेच! स्वप्नच ते! शालिनीनिवासाच्या मागील बाकड्यावर ऑफिस असते असे ऐकून आहे मी! आणि सांगितले ते खुद्द तूच मला! त्या दिवशी

फोनवर! आणि यास स्वप्न म्हणतात? मला बघायला काय दुसरी कुठली स्वप्ने नाहीत काय? स्वप्नात तुला आणि तुझे ऑफिस पाहिन मी?"

"नालायका.. असली हेरगिरी बरी नव्हे!"

"मग कसली बरी असते सांग.. ती करतो!"

"स्टुपिड.. पण एक गोष्ट. तुझ्यापुढे सपशेल शरणागती! फक्त कसे काय आणि काय काय झाले ते सांगितलेस तर बरे!"

"तू तर लढण्याआधीच तलवार टाकलीस खाली! मला वाटले होते.. आढेवेढे घेशील.."

"छट.. तुझ्यापुढे काय? तर आहे हे असे आहे!"

"कळले ते कसे आहे! अगदी चक्षुर्वैसत्यम का असे काय म्हणतात तसे. मी आलेलो त्याच बिल्डिंगीत.. आणि बघतो काय.. शिव शिव.. अब्रह्मण्यम.. शोभत नाही तुला."

"नाटक नको.. पुढे बोल!"

"अरे.. ती बटाटेवडेवाली होती ना.. त्याच बिल्डिंगीत आलेलो.."

"वा! म्हणजे उनसे मुलाकात हुई? बादमें जाने क्या हुआ?"

"मुलाकात हुई.. क्या बात हुई.. मत पूछ यार! वो बेवफा किसी और की हो गयी!"

"म्हणजे?"

"म्हणजे वाघाचे पंजे! अरे मी तिला पाहिले.. ती तिच्या बीएफ बरोबर होती!"

"अस्से.. मग?"

"आणि तो कोण असावा?"

"कोण?"

"ओळख! अरे तू ओळखतोस त्याला!"

"मी? नाही बुवा!"

"म्हणजे? यू डोन्ट नो युवरसेल्फ?"

"म्हणजे? डोन्ट टेल मी! मी?"

"येस्स.."

"आणि बटाटेवडेवाली ती?"

"यस्स.."

"दुनिया किती छोटी आहे रे. म्हणजे त्या दिवशी वडे.. पण त्यांच्याकडे कसली इन्शुरन्स पॉलिसी?"

"ते सोड.. ती माझी एक चूक.."

"म्हणजे?"

"म्हणजे एवढेच.. ना ती पॉलिसी त्यांची.. ना ते घर त्यांचे.. अरे.. रॉग नंबर! त्या घरी गेलो ती एक चूक.."

"आणि बटाटेवडे खाऊन आलास ती दुसरी!"

"नाही.. चूक नाही! नाहीतरी मेरा नाम है अनिकेत.. अनिकेत खादाड! खादाड हे आडनाव नाही विशेषण! असे कुणीतरी बोलताना ऐकल्यासारखे वाटतेय!"

"सॉरी! शरणागती! सपशेल!"

अवि पुढे बरेच काही बोलला. माझी कथा इथेच संपायला हवी. पुढे घडण्यासारखे काय होते या गोष्टीत? पण नाही. हिंदी सिनेमाचा उसूल आहे. त्यात हॅपी एंड व्हायलाच हवा! सारी गोष्ट त्यासाठी कितीही वळसे खात असली तरी चालते त्या गोष्टीत! हीरोला हीरॉईन मिळायलाच पाहिजे. शेवटच्या सीन मध्ये त्यांनी एकाच गाडीतून कुठे जायलाच पाहिजे आणि 'द न्यू बिगिनींग' वर 'द एंड' व्हायला पाहिजे. आणि या गोष्टीचा हीरो मी आहे! तेव्हा सुखांत व्हायलाच हवा!

मी म्हटले ना जे घडते तेच दिसते सिनेमात. अशा गोष्टीचा अंत सुखांत होत असेल तर तसाच तो सिनेमात दिसणार नाही का?

पुढे माझे जुळले ते बटाटेवडेवालीशीच! आणि ते ही खुद्द अविच्या प्रयत्नांतून! कुठल्यातरी सिनेमात म्हटलेय ना.. सारी कायनात एक हो जाती है मिलाने के लिए! तसेच काहीसे! अर्थात कायनात काय चीज आहे मला ठाऊक नव्हतेच आणि अजूनही नाही. पण अवि आणि इतर.. ज्यांनी हे घडवून आणले तीच असावी ती कायनात की कायतरी!

६.

मध्ये काही दिवस गेले. सहानींचे काम झाले पूर्ण. त्यांच्या घरी एक दोनदा जाऊनही आलो. उगाच बिल्डिंगीमागे जाण्याचा अगोचरपणा टाळला मी. तीनशे नऊ नंबरात जाताना किंवा तिथून निघताना तीनशे सहा कडे नजर मात्र हटकून जायचीच. पण ते तात्पुरते. एकदा सहानी प्रकरण संपले की परत तिकडे जायची गरज नव्हती मला. माझी ती अधूरी एक कहानी तिथेच संपायला हवी. पण नाही. काही सिनेमात कसे सुखान्त होण्यासाठी गोष्टीला हवे तसे वळणे दिले जाते ..

शालिनी निवासात परत जाण्याची गरज नव्हती असे वाटत होते मला. पण प्रत्यक्षात तसे झालेच नाही. एके दिवशी मला फोन आला.. त्याच मंजूळ आवाजात!

"हॅलो.. मिस्टर अनिकेत अकलूजकर?"

"यस्स.. स्पीकिंग!"

"हॅलो, तुम्ही काही दिवसांपूर्वी आलेलात.. शालिनी निवासात.. "

"हां.."

"आता आलेत माझे बाबा परत. प्लीज याल का परत?"

"तुमचा काहीतरी गैरसमज.."

"नो.. गैरसमज नाही. तुम्ही भेटून जा. बाबांना पण काम आहे काही पॉलिसीचे. त्यांनी खास रिक्वेस्ट केलीय!"

काहीही म्हणा.. त्या आवाजातली ती 'रिक्वेस्ट' टाळण्याची हिंमत नव्हतीच माझ्यात. त्यामुळे जास्त आढेवेढे न घेता गेलोच!

यापुढे काय काय घडले?

झाले असे की शनिवार दुपारी माझी अपॉइंटमेंट होती. शालिनी निवासाच्या पायऱ्या चढलो मी. तीनशे सहा नंबरची बेल वाजवली. तीनशे सहा म्हणजे तोच नंबर.. तीनशे नऊ दिसणारा! दरवाजा उघडला तो त्याच सुर्वे कन्येने. सुंदर दिसत होती ती निळ्या ड्रेस मध्ये. वहिनीकडे पाहिले मी पण वाकड्या नजरेने मात्र नाही.

"या ना प्लीज." ती म्हणाली.

त्याच झोपाळ्यावर बसलो मी. झोके घेत.

"कुणाची काढायची आहे पॉलिसी?"

"पॉलिसी? ॲज अ मॅटर ऑफ पॉलिसी.. कुणाचीच नाही.." ती हसत म्हणाली.

"पण तुम्ही बोलावलेत.."

"ते तुम्ही कार्ड दिलेले.."

"सॉरी.. तुमच्या दरवाजावरचा तो नंबर.. सहाचा आकडा उलटा झालाय.. त्यामुळे.." मी चाचरत बोललो.

"त्याचे काही नाही हो. मीच मुद्दाम बोलावले तुम्हाला.. नाही तुला.."

ती एकाएकी एकेरीवर आली.

"बाबा तुमचे.. दिसत नाहीत.."

"ते? गावी गेलेत.."

"तुम्ही तर म्हणालात.."

"अनिकेत.. ते सोड.. तुझा मित्र आहे ना.. अविनाश.. त्याने सांगितलेय सारे.."

"सारे.. म्हणजे? नाही सॉरी.. म्हणजे खाण्याच्या बाबतीत थोडा.. म्हणजे खाणे माझा वीक पॉइंट आहे.. पण.. त्यादिवशी मला खरेच माहिती नव्हते.. तो गोंधळ.. नंबरप्लेट.." मी गोंधळून चाचपडत शब्द शोधत बोलत होतो.

"जाऊ देत रे.. खाण्याबद्दल नाही.."

"नाही तो अवि मला अनिकेत खादाड म्हणतो.. तुम्हाला तर माहितीच आहे ते.."

"अनिकेत.. ते जाऊ देत रे.. मला सांग तुला मी आवडले ना? अवि हॅज टोल्ड मी एव्हरीथिंग.."

मी काय बोलणार यावर. अविची गर्लफ्रेंड.. माझ्याशी असे बोलतेय? मी शुंभासारखा गप्प बसून राहिलो.

"तू काहीच नाही म्हणालास तर मी नाही समजू?"

"नाही.. नाही म्हणजे हो.. म्हणजे नाही.."

"म्हणजे नक्की काय?"

मी सारे धैर्य एकवटून म्हणालो, "ते खरेय.. अविला माहिती आहे.. पण.."

"पण बिण काही नाही.. अवि म्हणाला मला.."

बाप रे! इथे कहानी में ट्विस्ट की काय?

माझ्यासाठी एकवेळ माझ्या जवळच्या मित्राने त्याग करणे ठीक होते.. पण या.. अजून मला जिचे नाव ही माहिती नाही.. त्या सुर्वेकन्येने.. अविचा त्याग करावा.. का?

"हे बघ अनिकेत.. तुला मी आवडले तर सांगून टाक. मी माझ्याकडून काय ते सांगून टाकते!"

"म्हणजे?"

"म्हणजे काय ते कळले नाही तुला? अरे बाबांच्या बहाण्याने तुला परत बोलावले.."

"ते पाहिले मी."

"त वरून ताकभात कळत नाही तुला? तू अकलेचा थोडा कमी आहेस का रे?"

थोडा? थोडा जास्तच! नाहीतर सीए सोडून इन्शुरन्स एजंटची करीयर करीत फिरलो असतो? काही असो.. तिच्या आक्रमक पवित्र्याने मी अजूनच गोंधळलो. अशा पोरी फक्त सिनेमात दिसतात. श्रीमंत बापाच्या बिगडी हुई औलाद! ही श्रीमंत बापाची पोर तर नव्हतीच, ना बिगडी हुई दिसत होती. तिला माझ्याबद्दल सांगितलेले अवि ने.. पण अवि तिच्याशी माझ्याबद्दल बोलेल? कितीही जिवलग असला तरी आपल्या प्रेयसीशी स्वतःच्या मित्राबद्दल

बोलण्यात कुणी वेळ का घालवेल? 'ये गो ये गो पाव्हन्या.. कुन्याच्या तरी मेव्हन्या.. हिच्याकडे बघून हसतोय गो.. काहीतरी घोटाळा दिसतोय गो..' अवि यावेळी हेच गाणे म्हणाला असता. मनाशी मी तेच गाणे गात बसलो. माझ्या त्या ब्लॅंक फेस म्हणावे अशा चेहऱ्याकडे पाहात ती म्हणाली, "बटाटेवडे खाणार..? मी छान बनवते.. आलेच हां!"

ती आत निघून गेली.

आणि हे काय प्रकरण आहे हे कळायच्या आत आतून परत बाहेर आली ती.

मी अगदी चकित झालो. आत गेली तेव्हा तिने निळा ड्रेस घातलेला. हो.. वहिनी झाली माझी तरी तिचा तो तिच्याइतका नसला तरी सुंदर ड्रेस माझ्या नजरेतून सुटला नव्हता. आणि आता ही इतक्या झटपट लाल कपड्यांत. त्यातही ती सुंदरच दिसत होती हे खरे पण इतक्या पटापट तर सिनेमात पण कपडे बदलत नाहीत हिरॉयनी.

बाहेर येता येताच म्हणाली,

"हाय अनिकेत, कधी आलास? मला नाही वाटत तू मला कधी भेटलायस!"

मला गोंधळात टाकायचा पण केलेला दिसत होता या सुर्वे कन्येने!

माझे आ वासलेले उघडे तोंड पाहून म्हणाली, "काय करतोस हल्ली.. म्हणजे बिझी दिसतोस.. तोंड मिटायची पण फुरसत दिसत नाही!"

मी काही बोलण्यासाठी तोंड मिटणार होतो. पण नाही.. माझे उघडे तोंड उघडेच राहिले.. कारण आतून अवि बाहेर आला! आणि त्याच्या पाठोपाठ सुर्वेकन्येची निळ्या ड्रेसातली कलर झेरॉक्स कॉपी!

"झापड मिटा अनिकेतराव.. माशी जाईल तोंडात.."

अवि म्हणाला..

.. आणि मी अजून मोठा आ वासला!

च्यायला! हे असे होते तर! सुर्वेकन्या जुळ्या बहिणी होत्या! एक अविची ती मीना आणि माझीवाली ती लीना! त्या एकमेकांना ताई माई म्हणून हाक मारत! कोण म्हणते हिंदी सिनेमातच असे काही होते म्हणून? राम आणि श्याम असतात.. तशा सीता आणि गीताही असताथ. सत्यच कित्येकदा कल्पनेहून जास्त विचित्र असू शकते! पुढे काय! हॅप्पी एंडिंग. आणि या साऱ्या शालिनी निवासातल्या नाटकाच्या शेवटच्या एपिसोडचे दिग्दर्शन होते ते अविनाशचे!

हिंदी सिनेमाला उगाच बोल लावत असतो आपण. जे घडते तेच तर त्यात दिसते.. मी चुकीच्या नंबरची बेल वाजवतो काय.. मुळात तो नंबरच चुकून चुकीचा निघतो काय.. त्यानंतर माझा पाहुणाचार.. आणि त्यात जुळ्या बहिणी.. त्यातली एक माझ्याच सख्ख्या मित्राची मैत्रीण.. त्यातून मग नंबर माझा! किती योगायोग म्हणा की अकल्पित घटना म्हणा. हे घडले ते असे. प्रूफ म्हणजे मी आणि माझी लीना! फक्त त्या पहिल्या दिवशी ती ते बटाटेवडे कुणासाठी बनवत होती हे मी अजूनही नाही विचारलेय तिला!

माझ्या छोटीला मात्र ही गोष्ट सांगितली नाही मी. लहान आहे ती अजून. तरीही सत्य हेच आहे.. अगा हे घडलेचि आहे..

आणि इतकेच नाही.. तर अगा हे ऐसेचि घडले आहे!

मातृभारती कथा स्पर्धा.. २०२२ (प्रथम क्रमांक)

# आरक्त गालांची गोष्ट!

१.

रस्त्यावर चालताना आपल्याच नादात चालायची सवय असते कित्येकांस. मी मात्र तसे करत नाही. सदैव असावे सावधान हा मंत्र मी जपतो. आणि आजूबाजूच्या सौंदर्यस्थळांस मुकणेही मला मंजूर नाही! असाच चाललो असताना तो दिसला.

तो म्हणजे मुक्या!

मुक्या हे त्याचे विरोधाभासी नाव! मुक्या रस्त्यात दिसला की बोल बोल बोलतो. एक कप चहाच्या बदल्यात त्याचे किती ऐकून घ्यावे? आज मुक्या घाईघाईत चालल्यासारखा वाटत होता. पण नाही! मला बघून थबकला आणि म्हणाला,

"काय सांगू तुला यार.. एकदम रक्तवर्णी लालिमा पसरली या गालावरी!"

या मुक्यास काहीतरी काव्यात्म बोलायची सवय आहे. बोलतो तेही नेहमी असा. अगदी 'काय कसा आहेस..' किंवा 'काय खबरबात' असे नमनास थेंबभरही तेल न घालता तो विषयाला हात घालतो. मी देखील त्याला रॅपिड ॲक्शन फोर्स मध्ये कामाला असल्यासारखा प्रतिसाद देतो!

"सांगतोस काय! एवढा लाजलास तू?"

मी हे म्हणालो त्यावर तो लागलीच म्हणाला,

"निर्लज्ज..!"

"त्यात मी कसला निर्लज्ज बाबा? आणि जी काय लाज वाटली तुला ती मी तुझ्या स्थितीत असतो तर मला देखील वाटली नसती कशावरून?"

"अरे तू नव्हे.. मीच निर्लज्ज!"

"असे कोण म्हणाले? आणि म्हणून उलट लाली आली गाली नकळत?" मी विचारले.

"तू मला काय समजतोस? मी सलज्ज म्हणून माझ्या गाली लाली? नाही बाबा.. ती लाली लीलया आणली गेली समज!"

"ते उघड आहे! तू कोणास पाहून असा लाजलास? पण खरेतर लाजाळूपणा हा काही तुझा गुणधर्म नव्हे!" माझ्या दहावीच्या रसायनशास्त्राच्या आठवणीने गुणधर्म शब्द वापरत मी म्हणालो.

"हे खरेच.. तुला ती राधिका ठाऊक आहे ना?"

हा राधिका कोण ते विचारतोय? त्याच्या प्रेमकथेच्या बीजास अंकुर फुटताना मीच तर खतपाणी घातले होते..

"हुं.. अर्थात. मी राधिका.. मी प्रेमिका..!"

"अर्थात. तर गाली लाली आली.."

"राधिका ना? मग येणारच! पण त्यात निर्लज्जपणा कसला.. आणि नकळत लाली आली? तूच इतका लाजाळू तर राधिका किती .."

"लाली नकळत आली नाही.. तर आणली गेली.. या गाली. आणि राधिकेचा संबंध त्याच्याशी डायरेक्ट नाही.. लाली वाॅज ब्राॅट टू मी बाय द्याट तुदुढकां!"

"तुडुढकां? हे कोण.. आय मीन पात्र?"

"डु नाही.. दु.. तु दु म्हणजे तुकाजी दुधाजी ढकांबेकराकडून!"

"हे कोण?"

"तोच! दुपारी निघाला की सूर्य कोणता आणि डोके कोणते ते लक्षात येऊ नये इतके तुळतुळीत टक्कल असलेला एक तापट क्षूद्र प्राणी!"

तो सात्विक संतापाने बोलत होता.

"असेल रे.. म्हणजे पडते एकेकास टक्कल.. तुला ही पडेल एक दिवस.."

"मुद्दा तो नाही रे!" तो हताश स्वरात म्हणाला.

"पण त्याचा काय संबंध येथे?"

"आहे! त्याची त्याला कुठल्याही कोनातून न साजेशी कन्या म्हणजे ढकांबेकरांची राधिका!"

मी तुदुंना कुठल्याच कोनातून पाहिले नव्हते. त्यामुळे तो म्हणेल ते मान्य करणे भागच होते. पण मुक्यानेही राधिकाला पाहिले असेल विविध कोनांतून पण तिच्या वडलांना कधी पाहिले असेल असे निरखून? मी काहीतरी लक्षात येत म्हणालो,

"हं.. आता आले लक्षात! म्हणजे सासरेबुवांनी केले हे सारे.. पण सासऱ्यांस पाहून लाजण्याची पद्धत नाही आपल्यात!"

"इथे कोण कशाला लाजतोय निर्लज्जा! बघ.. रस्त्यातून चाललेलो. समोर तुदुढकां .. मी हा असा उभा राहिलो .. तो तिथे.. आणि त्याने काय करावे?"

"काय?"

"अरे पाची बोटे उमटवलीत या गाली.. डाव्या!"

"मग उजवा बरा वाचला?"

"त्याला कारण त्या उजव्यासाठी ॲक्सेस नव्हता त्यास.. मी इथे.. माझा उजवा गाल असा.. आणि टकलेबुवांचा हात असा!"

फॉरेन्सिक एक्सपर्टने गुन्हा कसा घडला हे समजावून सांगावे तसा तो म्हणाला.

"मग तो लालिमा पसरला गाली.."

"तो नाही रे.. ती लालिमा!" मी व्याकरण शुद्ध करत म्हणालो.

"असो.. तो, ती, ते काही असो. पण पाहून घेईन. तरी बरे ती नव्हती तिकडे."

ती म्हणजे राधिका! मार खाल्ल्याचे काही नाही पण राधिकेने न पाहिल्याचाच आनंद! प्यार क्या क्या नहीं सिखाता! मला एका हिंदी सिनेमातला डायलॉग आठवला! कोड्यात बोलावे तसा मी म्हणालो,

"हुं.. श्रीमंत! तेवढेच सव्वा लाख कमावून झाले!"

"हे कसले सव्वा लाख?"

"झाकली मूठ रे! आणि राधिकेसमोर जावयास मारताना किती यातना झाल्या असत्या ना ढकांबेकर काकांना?"

"का? का? आणि काका?"

"माझ्यासाठी काकाच की नाही?"

"असू देत.. काका म्हणे! एक क्षूद्र चिंतातुर जंतू! अरे मी आता नाकावर टिच्चून नाही राधिकेशी लावली जोडी तर नावाचा.. हरी नाही!"

गंमत म्हणजे मुक्याचे नाव हरी नाही! मुकुंद म्हणजे हरी होत असेल पण असे नाव त्याच्या अर्थाशी एक्सचेंज थोडीच होते! म्हणजे पवनकुमार उद्या

आपले नाव वातकुमार सांगू शकतो? किंवा एखादा सलील स्वतःस जल नाहीतर अंबु म्हणवून घेऊ शकतो? म्हणजे मुक्या स्वतःस हरी कसा म्हणवून घेऊ शकेल? तर ही मुक्याची स्टाईल! बोलेल असा की कुणास वाटेल वा! काय तडफदार आहे. चक्क नावाचा हरी नाही म्हणे ..

"हा हा.. काय शपथ घेतलीस! मला आवडली ती!" मी म्हणालो.

"मलाही आवडली!"

"कोण राधिका?"

"अर्थात .. पण शपथ तुला कशाला आवडायला हवी?"

" काय ती शपथ! स्वतःचे नाव काय तर गंगाधर आणि नाव लावणार नाही लीलाधर! मुकुंदा नाव तुझे आणि म्हणे नाव लावणार नाही हरी! वा! मला वाटतेय तू कायदे खात्यात वरिष्ठ कारकून म्हणून नियुक्त व्हावास!"

"चोळलेस.. लवणलेपन! मीठ चोळलेस! अरे छोकरीच्या बापसाने तेच पुशिले.. कमावतोस काय?"

बोलता बोलता मुक्याच्या डोळ्यात दो बूंद आसुओंके आले. एकएक दर डोळ्यात!

"मग?"

"मी म्हणालो, कौन कमबख्त यहां कमाने के लिए जीता है!"

"वा! काय तेजस्वी उत्तर आहे! मग सासरा एकदम खूश झाला असणार नाही?"

"ते दिसतंच आहे तुला. मी म्हणालो, तुम्हाला नाही कळणार प्रेमी जिवांच्या हृदयातली धडधड! त्यास मीठभाकर नाही फक्त प्रेमाची आणाभाकर बस्स!"

"आणाभाकर? हा कुठला शब्द?"

माझा हा मित्र असाच आहे.. हवे ते शब्द बनवून वापरतो!

"मला सांग.. कुणी कोंडी फोडावयास नको?"

"कोंडी? आता ही कोंडी कुठून आली?"

"अरे भाषेची! कित्येक वर्षे तेच तेच शब्द वापरावेत वापरून मळलेले आणि चालावे मळलेल्या वाटांवर? आणाभाका शब्द आहे.. त्यास थोडा बदलून घेतला.. यमक जुळवण्यास."

"यमक तर जुळले पण जुळली का तुझी न सासरेबुवांची तार?"

"नाही यार! ढकांबे जरा बिथरला! म्हणे प्रेमाने पोट भरेल की काय? म्हणे उदरभरणासाठी काय विचार?"

"मग तू काय ओजस्वी भाषेत तेजस्वी उत्तर दिलेस?"

"मी म्हणालो.. चोच दिली त्याने.. तो चारा ही देईल!"

"वा!"

"वा काय? त्यावर ढकां अजून चिडला.. चोच काय.. म्हणून चोचले .. नाही टोचले त्याने"

"काय चोच त्याची?"

एकाएकी राधिका म्हणजे कुठल्या तरी परिकथेतील एखाद्या पक्ष्याची कन्या असावी का अशी शंका आली मला.

"नाय रे.. त्याच्या हातात ती छोटी काठी होती टोकदार.. तिच्याने! मी म्हणालो.. चोचू नका.. नाही टोचू नका.. त्यावर ढ अजूनच चिडला!"

मुक्या सासरेबुवाच्या आडनावातून एकेक अक्षर गाळत त्यांचे नाव घेत होता. ही त्याची आपला राग काढायची पद्धत की काय? आधी ढकांबे.. मग ढकां.. आता नुसतेच ढ! जणू तो आणि राधिका यांच्या आड सासरेबुवा नाही तर ते आडनाव येत असावे! आणि तो त्याच्या आडून आपला बदला घेत असावा!

"मग?"

"अरे ढ म्हणाला, हा नाद सोड सोड! राधिकेस विहीरीत ढकलून देईन.. डालडाचा डबा बांधून.. पण तुझ्या गळयात नाही बांधणार.."

"माझ्या? तुझी राधिका माझ्या गळयात कशाला? आणि डालडाचे ते डबे मिळतात अजून?"

"मूर्खा, इथे तुझ्या म्हणजे माझ्या! तर मी म्हणालो.. तिचीच इच्छा असेल तर?"

"मग?"

"मग? ढ चिडला. त्यास ठाऊकै राधिकेस नाही समजावून सांगू शकणार म्हणून तर मला पकडले. न रहेगा दूध .. न बनेगी बासुंदी!"

"वा! काय भाषा!"

"अरे कोंडी फोडतोय! भाषेची. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कुंठित झालेल्या मायभाषेस नवीन शब्दांची भरजरी वस्त्रे आपण नाही तर कोणी पांघरावीत? तोच बास आणि तीच बासुरी.. आता झाले जुने. आता नवनवोन्मेषशालिनी माझी माय मराठी.."

"फाऊल! नो बॉल!"

"काय.. फाऊल?"

"अरे ते न रहेगा दूध वगैरे हिंदी आहे रे.. मराठी नाही.. हंडी फोड नाहीतर कोंडी फोड! पण स्वभाषेची तरी फोड!"

काय बोलावे ते न समजून तो म्हणाला,"साऱ्या भाषा भगिनी एक आहेत आणि व्हाव्यात!"

"त्या होतील तेव्हा होतील. पण त्या रक्तवर्णी गालांचे काय?"

"काय?"

"मला काय विचारतोस? काय?"

"अरे काय होणार? वक्त.. वक्त हर गहरा जखम बुझा डालता है!" तो आपली जखम लपवण्यास हिंदीचा सहारा घेत बोलला.

"जखम और बुझाता है? अरे ती काय आग आहे? तुला मराठीतील बुजवणे म्हणायचे होते का? म्हणजे जखमरूपी खड्डे बुजवणे वगैरे?"

"तसे समज! माझ्या मानसिक रस्त्यावरच्या अपमानरूपी खड्ड्यास बुजवण्यास एकच उपाय आहे रे!"

"कोणता? सांग तरी! म्युनिसिपालटी किती खर्च करते खड्ड्यांमागे ठाऊकै?"

"ते वेगळे, हे वेगळे!"

जणू मी खरेच बृहन्मुंबईतील रस्त्यावरील खड्ड्यांची समस्या या विषयावर त्याचे तज्ञ मत विचारत होतो! इथे तज्ञ मत हे माझे एक्सपर्ट

ओपिनियनचे भाषांतर! भाषेची कोंडी फोडण्यास बिचारा एकटा मुक्या कसा पुरा पडेल?

"उपाय एकच. वक्त.. समय.. काळ .. वेळ!"

समानार्थी शब्द पाठ करावेत, सातवीच्या स्कॉलरशिप परीक्षेसाठी तसा मुक्या बोलला.

"मग बुजले का खड्डे?"

"हो.."

"किती वेळात? नाही म्हणजे ही रक्तवर्णी गोष्ट तर कालचीच होती ना?"

"होय.. ढ ची कुबडवाली वक्राकार पाठ वळली नि मी सरळ आणि मोठ्या मनाने ढ ला माफ केले!"

"तू?"

"अर्थात! मी माझ्या या मुखकमलातून तेजस्वी उद्गार काढले, देवा तू या ढ स माफ कर कारण तो काय करतो हे त्याचे त्यास ठाऊक नाही!"

"वा!"

"मग मी झाले गेले विसरून गेलो!"

"आणि आता कथाकथन कसलेय?"

"अरे ते असेच! काय आहे घडून गेलेल्या गोष्टी घडून जातात.. त्याचा शोक करण्यास इथे समय आहे कुणास? मरे एक त्याचा दुजा शोक वाहे.. विचारी मना तूच शोधून पाहे.."

याचा काय संबंध? पण नाही, मुक्या मोकाट सुटला होता!


"तिचे ते तात.. तुम्ही हात उगार..लात.. पण हा मुक्या.. फुक्या.. नाही .. फुका नाही ते ठेवणार  मनात! राधिकेच्या हृदयकमलाकरिता हा ढकांब्याचा कर्दम तुडवावाच लागेल! आणि या चिखलामुळेच तर माझी कमलनयना कमलिनी राधिका अधिकच उठून दिसते!"

मुक्याच्या तोंडी जणू सरस्वती नर्तन करू लागली!

"अरे आमची नावे बघ.. मी  मुक्या.. नाही मुकुंद नि ती राधा! राधिका! अरे चिखलीकरा.. चिखलीकरा..  कितीही केलीस चिखलफेक चिखलदऱ्यातून तरीही माझी दिलफेक राधिका.. माझीच! छोकरी ही माझी नि नोकरी ही माझी!"

मुक्या कोणत्या नोकरीबद्दल बोलत होता कुणास ठाऊक! बहुधा गालावरच्या पाच बोटांनी पसरवलेल्या लालिमेपेक्षा तो न मिळणाऱ्या नोकरीचा बाणच अधिक आत रूतला असावा!

२.



आपल्या देशात तशी छोकरी मिळू शकते.. म्हणजे इतिहास.. आणि वर्तमानही.. साक्षीस आहे. कित्येक नोकरदार नोकरी मिळण्याआधी आपापल्या मैत्रिणीच्याच सोबतीने नोकरीच्या शोधात फिरताना पाहिलेत मी. आणि हा वधूपितारूपी वॉचमन हातात छडी घेऊन नोकरीचे

आयकार्ड गेटवर नुसत्या त्याच्या कन्यकेच्या आयुष्यात प्रवेशासाठी मागतो म्हणजे काय? मुक्याचे तेच झाले. बिचारा होनहार मुलगा. अभ्यासू आणि तसा हुशार. पण नोकरी न मिळाली तर तो तरी काय करणार? त्यात नोकरी नसल्याने सुशिक्षित बेकारीची अदृश्य चिठ्ठी डोक्यावर लावून फिरतोय जणू.

पण काय काय अपेक्षा असू शकतात नाही वधूपित्याच्या! मुलगा उंच हवा.. हे ठीक.. ती उंची काही उद्या कमी नाही होत. पण मुलाचे केस दाट हवेत.. आता वयानुसार ते जंगल उजाड होणारच नाही का? सुविद्य हवा! म्हणजे काय? कोणा मुलाकडे घर नाही हा मुद्दा त्या मुलाच्या जिवास घरघर लावण्यास पुरतो. माझ्या ओळखीच्या एका मुलास त्याच्या नियोजित वधूच्या घरून शेवटच्या क्षणी नकार आला होता.. कारण काय तर म्हणे मुलाला दोन बहिणी आहेत! यावर नकार देणाऱ्यांकडे त्या मुलीस दोन भाऊ आणि एक अजून बहीण एवढा परिवार होता म्हणे! नशिब आजवर कुणी मुलाचे आईवडील दोघे हयात आहेत म्हणून नकार नसेल दिला. असो. मला सगळी माहिती सांगोवांगी माहिती. ऐकूनच!

तर बिचारा मुक्या! मुक्यानेच सारे ऐकून घेत होता. राधिका त्याची कॉलेजातली मैत्रीण! जोडी चांगली. पण त्या तुकाजी ढकांबेकरांनी माझ्या पोरीच्या वाटेला गेलास तर खबरदार अशी तंबी दिलेली त्याला. त्यात त्या नसलेल्या नोकरीचा मुद्दा सर्वात महत्वाचा! आपल्या सुजल्या गालाने बिचारा मुक्या आपल्या नोकरीची वाट पाहत बसलाय. आणि राधिका? तिच्या घरी ढकांबेकरांनी मुले पाहण्याचा धडाका लावलाय! हे मला कसे माहिती? अर्थातच मुक्याने सांगितले!

झाले काय की, नेहमी प्रमाणे 'वरती मुंडी आसपास धुंडी' असा मी चाललेलो. त्यात मुक्या येताना दिसला. एरवी मी त्याला टाळण्यासाठी रस्ता ओलांडून पलीकडे गेलो असतो पण त्याच्या त्या ह्रदयद्रावक आणि गाल लालक (अजून एक कोंडीफोड भाषेची!) थपडेने द्रवलेल्या माझ्या नाजूक मनास पाझर फुटलेला! त्यादिवशीच तो त्या थपडेच्या आफ्टर इफेक्ट्स मधून बाहेर आलेला. मध्ये काही दिवस गेलेत. त्यामुळे सारे विसरला असणार. तरीही भूतदया नामक काही असते की नाही.. म्हणून मीच त्याला हाक दिली.

हा आज हातात छानशी बॅग घेऊन चाललेला. अंगात चक्क इस्त्रीचे कपडे. पायात बूट.. तेही पॉलिश केलेले. स्वारी काही कामगिरीवर निघालीय की काय? की लागलाय नोकरीस?

"मुक्या! कुठे?"

"कुठे काय? तुझ्यासमोरच आहे की मी!"

"ते दिसतंय तुला नि मला! कुठे निघालीय स्वारी.. जातोयस की येतोयस.. की.."

"जाऊन येतोस की येऊन जातोयस असेच ना? तुला नाही कळणार."

"काय?"

"एका उपवराच्या मनच्या व्यथा. रात्र रात्र तडपतो.. झुरतोय मी."

"झुरतोय कसला? घोरतोय..?"

"झुरतोय मी! घोरतोय कसला? घोरण्यासाठी काय लागते?"

"अर्थातच नाक! आणि ढकांबेकरांनी त्यास तर नव्हता लावला ना धक्का? इफ आयॅम नाॅट मिस्टेकन.. त्यांनी फक्त गालास लावला हात! गाल

बांका किया था.. कदाचित बाल भी .. पर नाक नहीं! तर नाकाचे.." त्याच्या गोष्टीस स्मरून मी म्हणालो.

"तुला बिलकुलच ठाऊक नाही. घोरावयास लागते ती झोप. आणि तीच उडलीय माझी!"

"अरे आठवतेय तुला.. परीक्षेच्या आदल्या रात्री पण ढाराढूर झोपायचास. एकदा झोपलास की कुंभकर्णाचा लौकिक तुझा.. एकदा तर अठरा तासांनी उठलेलास तू.. तुला उठवावयास एका परीक्षेआधी अंगावर गरम पाणी शिंपडावे लागले होते! अशा या निद्रावीराची ही अवस्था! ये प्यार नहीं है तो और क्या है मेरे दोस्त?"

कुठल्याशा हिंदी सिनेमातला डायलॉग अस्थानी असला तरी बोलायला बरा वाटत होता म्हणून मी बोललो.

"चूप.. ते ठाऊक आहे. पण याचा संबंध छोकरी नव्हे नोकरीशी आणि गनिम गनिमी कावा पाहातोय साधू, पण मी ही लेचापेचा नाही बाबू!"

"मला ना आठवतो तो डायलॉग.. हमने भी कच्ची गोलियों नहीं खेली है असा काय तरी.." मी म्हणालो.

"तू काय रोज हिंदी सिनेमांची पारायणे करतोस? डायलॉग मागून डायलॉग मारतोयस. अरे इथे मी तडफडतोय.. तगमगतोय.. तळमळतोय ..नाही मिळत नोकरी आणि तो ढ.. राधिकेसाठी शोधतोय नवरे!"

"नवरे? मग सोपेय! बहुपतीय व्यवस्थेत पुढे मागे लागेल ना तुझाही नंबर? नवरा नंबर तीन.. श्री. मुकुंद गोविंद मारकुटे!"

यावर त्या मुक्याने मूकपणे एक असा कटाक्ष टाकला की मी क्षणात गांभीर्याचे बेअरिंग घ्यायचे ठरवले. कुणाच्या दुखती रगपर हाथ क्यूं रखें?

तर झाले ते असे आणि एवढेच होते! मुलाच्या शोधासाठी ढकांबेकरांकडे कांदेपोह्यांची फॅक्टरी उघडली होती. आणि इकडे मुक्या मुकाट नोकरीच्या शोधात मोकाट फिरत होता. ती मिळाली की पुढे पाहू म्हणून.

"अरे पण राधिका? ती काय करतेय?"

"काय करणार? कांदे चिरतेय पोह्यांसाठी आणि तिच्या ढ ढला म्हणजे बापाला  वाटतेय की तिच्या डोळ्यात येणारे पाणी त्या कांद्यांमुळे आहे म्हणून! वाटो! पण हातपाय हलवणे गरजेचे आहे लवकर."

"पण तुला भेटली का राधिका त्या थप्पड प्रकरणानंतर?"

"नाही रे.. कैद में है बुलबुल! तिला तो ढ बाहेर जाऊच देत नाही. कसाबसा मेसेज पाठवते ती.. कोड लॅंग्वेजमध्ये!"

"वा! बुलबुल बरीच हुशार आहे तुझी. पण ही कोड लॅंग्वेज?"

"आमची आहे. मोबाईलमध्ये कसे असतात इमोजी तसे. म्हणजे माझे नाव तिने ना सेव्ह केलेय ते सुप्रिया नावाने. म्हणजे संशयास जागा नको गनिमास! असे डावपेच खेळावेच लागतात. तू नहीं समझेगा.."

मैं नहीं समझूंगा? तरी बरे याची राधिकासाठी फिल्डिंग लावण्याचे डावपेच माझे होते. पण मुक्या ते सारे विसरला होता.

"परत आमची स्वतःची वेगळी भाषा! तितके सोपे नाही पण आम्ही बनवलीय आमची स्वतंत्र भाषा!"

"वा! डिटेक्टिव्ह होऊ शकतोस तू!"

"डिटेक्टिव्ह? वॉव! थॅंक्स.. मी येतो. घाईत आहे. निघतो.. मग मेसेज पाठवतो.."

"साध्या भाषेत पाठव रे.. तुझ्या सांकेतिक भाषेत नको!"

"चल.. विश मी बेस्ट लक!"

आतापर्यंत आरामात बोलणाऱ्या मुक्याला कसली घाई झाली कुणास ठाऊक! पण अगदी अर्धवट संभाषण सोडून तो एकाएकी धावत निघून गेला!

आणि मी? फ्री लान्स पत्रकारासारखा फ्री म्हणून इकडेतिकडे नजर टाकीत पुढे निघालो. कानाला खडा लावला.. कुणा पोरीस पटवावे ते नोकरी पक्की झाल्यावरच! जसे काही मी म्हणालो नि ती स्वप्नसुंदरी लगेच माझ्यापुढे येऊन उभीच राहणार होती!

३.

सुंदरी उभी राहणार जणू म्हणायला आणि ती तशी उभी ठाकायला एकच गाठ पडली. दहाएक मिनिटे चाललो असेन मी आणि मला ती दिसली. अर्थात माझी स्वप्नसुंदरी नव्हती ती.. कारण 'ती' तीच होती.. मुकुंदाची राधिका! हातात पिशवी घेऊन चाललेली. मला पाहताच थबकली.. अजाणता मी पहिलाच प्रश्न काय विचारावा? म्हणालो, "काय कांदे सगळे संपलेत की काय?"

नशीब राधिकाचे तेवढे लक्ष नव्हते. तिला वाटले मी माझ्याच भ्रमणध्वनीत भ्रमिष्टासारखा एकटाच बोलतोय. मी मुक्याचा खास त्यामुळे तिचा जणू तारणहार असे वाटून असेल तिचे कुठेच लक्ष नव्हते. एकच लक्ष्य मुकुंदा असे असावे! कारण लगेच म्हणाली,

"मुक्या कुठे आहे रे?"

हे तर आमचे नशीब! माझ्यासाठी कुणी सुंदरी नव्हती इथे. आणि असती तरी तिला मी 'आधी नोकरी नंतर छोकरी' या शासन निर्णयानुसार वेटिंगवरच ठेवले असते म्हणा! राधिका होती सुंदर. ढकांबेकर कसा दिसत असावा कुणास ठाऊक, पण नावाने नि मुक्याच्या गुणवर्णनातून तरी खडूस असणार. आणि वेडाबिंद्रा! हे मीच आपले त्याचे रूप कल्पिलेले. आणि ही त्यांची कन्यका अशी. म्हणजे मिसेस ढकांबेकर नक्कीच सौंदर्याचा पुतळा असल्या पाहिजेत.

"मुक्या? आताच तर गेला. चकाचक बूट घालून!"

या बुटाचा काय संबंध खरा पण माझ्यापुढे अशी कुणी मुलगी उभी राहिली नि त्यात ती अशी सौंदर्यवती असली की तोंडी परिक्षेत बावचळावे तसा मी बावचळतो! काय बोलावे मला सुधरत नाही. म्हणून तर मी असा सदाफटिंग राहलोय. हे मला ठाऊक आहे पण इतरांना सांगताना मात्र.. आधी नोकरी हे धोरण म्हणून सांगायचे.

"बूट? म्हणजे तो इंटरव्ह्यूला गेला असणार.. घेला आणि गांडाभाई फर्म मध्ये."

हिला बरीच माहिती होती म्हणजे.  सांकेतिक भाषा चांगलीच डेव्हलप झाली असावी त्यांची.

"हुं.."

मी हुंकार भरला.. जसे काही मला तो कुठे गेला हे ठाऊकच होते!

"घेला आणि गेंडा म्हणजे..?"

"गेंडा नाही.. गांडा! ती अकाऊंटटची फर्म आहे. मुक्या बरा आहे ना?"

मला ती कैद में है बुलबुल माहिती होते. ही काय पिंजरा तोडून उडाली की काय?

मी तिच्या हातातील पिशवीकडे पाहतोय हे लक्षात येऊन ती म्हणाली, "काही नाही थोडे सामान आणायचे होते.. पाहुण्यांची वर्दळ असते ना!"

कुठले पाहुणे हे ठाऊकच होते मला. म्हणून त्याबद्दल काही बोललो नाही.. म्हणालो,

"राधिका, तो चालला होता. मला भेटला आणि अचानक बोलता बोलता निघून गेला. कदाचित उशीर होत असेल"

"हुं. तो उशीर करण्यात एक्सपर्ट आहे." पुढे हळूच म्हणाली.. पण मला ऐकू आलेच.. "इकडे पण उशीर केला नाही म्हणजे मिळवली.."

तिचा संदर्भ त्या कांदेपोहेवाल्या मुलांबद्दल असावा.

"माहिती नाही. मी काहीतरी डिटेक्टिव्ह बद्दल बोललो तर हा धावत सुटला. तुला ठाऊक आहे काही?"

"नाही. पण नोकरीचे प्रयत्न जोरात सुरू आहेत."

"हुं.. वेळ पडली की करावेच लागतात!"

माझ्या अजागळ बोलण्याने ती तर दचकलीच पण खरेतर मी सुद्धा दचकलो. काळवेळ काय.. बोलतो काय! सावरून घेत मी म्हणालो, "म्हणजे वेळ आली की नोकरी मिळाल्यावाचून राहते थोडीच. फक्त वेळ यावी लागते.. त्यात मुक्या.. हुशार आणि कामसू."

मागची चूक सुधारायला मी मुक्याला एक दोन विशेषणे बहाल केली! जुन्या अकबरबिरबलाच्या गोष्टीत बूंद से गयी हौद से नहीं आती हे स्पष्ट करायला ही गोष्ट अगदी चपखल होती!

"तू काळजी करू नकोस. मुक्या काही ना काहीतरी केल्यावाचून राहणार नाही."

"होप सो.. पाणी डोक्यावरून चालले!" आपल्या स्थितीची डायरेक्ट हिंट देत ती म्हणाली नि तिच्या टपोऱ्या डोळ्यांत टचकन पाणी तरळले. अशा अश्रूंना कारणीभूत आणि त्यांनी न पाघळणारा ढकांब्या पत्थरदिल म्हणजे पाषाणहृदयीच असला पाहिजे! मी रागावून ढकांबेकर काकांचा एकेरी ढकांब्या केला मनातल्या मनात. फुकट नाही मुक्या ढकांब्याला 'ढ' म्हणत.

पुढे राधिका बोलली खूप काही. थोडक्यात काय घरातल्या कैदेतून कधी राजकुमार येऊन तिची सुटका करेल याची वाट पाहात होती ती. मधूनमधून नयनी पाणी आणित होती ती मुक्याची राणी. मी जमेल तेवढी सहानुभूती दाखवत होतो. या कैदेतल्या बुलबुलीस मोकळे कुणी सोडले मी विचारले नाही. उगाच तिला त्यांच्या लव्हस्टोरीतल्या बारीकसारीक गोष्टी माहिती आहेत असे वाटायचे. निघताना म्हणाली, "मुक्याला सांग निरोप.. सातशे सतरा!"

"कुणाला? सुप्रियाला?"

बोलता बोलता मी जीभ चावली. तिने ऐकले नसावे किंवा ऐकून न ऐकल्यासारखे केले असावे. गनिमी काव्याचा भाग असावा का?

"ठीक सांगतो.. पण काय सांगू?"

सातशे सतरा हा सांकेतिक संदेश असणार हे माहिती असूनही उगाच मी विचारले

"सात एक सात एवढेच सांग."

"सांगतो. सात एके सात!"

"नाही नाही.. सात एक सात."

"ओके बाई! एवढा पाढा म्हणायचा नाही."

हातातील पिशवी सांभाळत राधिका निघून गेली. चांगली आहे.. म्हणून तर मुक्या भाळला.. आता सांभाळतोय! मी तिथून कूच केले. एका मुकुंद राधिका प्रेमकथेचा मी चश्मदीद गवाह बनत होतो! जोवर आपली कोणी नाही तोवर यही सही. आणि पुढच्यास ठेच.. मागचा शहाणा!

४

शहाणपण हा काही माझा गुण नाही! म्हणजे काही जण कसे त्यांच्या हुशारीसाठी ओळखले जातात .. काही वक्तशीरपणासाठी.. तसा मी काही शहाणपणासाठी मशहूर नाही. तरी शहाणपणा दाखवायला मी रात्री राधिकाला फोन केला. तिच्या घरच्या ज्वालाग्राही वातावरणात कुण्या मुलाने फोन करावा यासारखा मूर्खपणा नसेल. म्हटले ना मी शहाणपणासाठी प्रसिद्ध नाहीच मुळी! माझा फोन तिकडे ढकांब्यानी घेतला असावा. मी फोन केलेला तो मला मुक्या भेटला सांगायला!

झाले असे की संध्याकाळी मी मुद्दाम वाट वाकडी करून मुक्याच्या घरी गेलो. एकतर तो धावत का निघाला आणि दुसरे.. डिटेक्टिव्हचे काय? याचा सस्पेन्स जणू! आणि राधिकाचा सातशेवाला संदेश पण द्यायचा होताच. मुक्या तसा रिलॅक्स्ड वाटला. म्हटले नोकरीबिकरी पक्की झाली की काय!

"काय मुक्या.. खुशीत दिसतेय गाडं."

"हुं.. खुशीत कसला? हम प्यार में जलनेवालोंको.. चैन कहां.. आराम कहां.."

"असो की नसो आराम! राधिका भेटलेली. तिचा संदेश आहे"

"काय.. सांग ना!"

"काही नाही रे मोठे प्रेमपत्र पाठवलेय.. योग्य मोबदला मिळाल्यास देईन.."

मी मुद्दाम मस्करीत बोललो. आणि मुक्याचा फ्यूज उडाला.

"सांग.. लवकर."

तो ओरडला. ते गाण्यात बेकरार वगैरे होतात ते असेच होत असावेत बहुतेक.

त्याला जास्त त्रास न द्यावा म्हणून मी तो 'सुपर सातसौ सतहत्तर' मेसेज सांगितला! त्यावर त्याने काय करावे? मटकन खाली बसून डोक्यावर हात मारला.

"खरेच सांग.. हा मेसेज देताना राधू कशी होती?"

"कशी काय? जशी असते तशीच होती?"

"काही तरी गफलत दिसतेय.. मला जायला लागेल.." म्हणत तो चप्पल चढवू लागला. तो घराबाहेर पडत होता.. मला एकाएकी आठवले नंबर चुकलाय माझा.

"अरे तो नंबर चुकलाय रे.. सातशे सतरा! हा संदेश आहे!"

त्या नंबरात काय असावे कोणास ठाऊक पण एकाएकी तो मागे फिरला. म्हणाला, "सगळे सारखेच तुला? सातशे सतरा आणि ट्रिपल सेव्हन मध्ये काहीच फरक नाही?"

"असेल.. किंवा नसेलही. मला कसे कळणार?"

चप्पल काढून ठेवत तो बसला. आणि चक्क गालातल्या गालात हसू लागला!

"ही राधू आहे ना.. एक नंबर बदमाश!" नंतर वर नजर करून बसून राहिला काय नि हसतो काय! वेडबिड लागलंय काय याला?

"तसा सात एक सात आणि सात सात सात.. एकाच तर आकड्याचा फरक आहेना?"

"एकाच? जमीन आस्मान.. पायाखालची जमीन सरकली.. आणि पोहोचलो असतो आसमानात! बरं.. तुला पाहून मला कबुतरं आठवली .. संदेशवाहक.. तर माझ्या कबुतरा.. या संदेशवहनाबद्दल तुला सात खून माफ.. ऐक.. आयॅम ऑन द व्हर्ज ऑफ गेटिंग नोकरी!"

"वॉव! ग्रेट न्यूज! राधिकाला माहितीय?"

"नाही. सध्या कर्फ्यू आहे."

"कर्फ्यू?"

"नाही कळणार वा आकळणार तुला.. तू नहीं समझेगा. सोड.."

"मला तर सांग. कसली.. कुठली.. कशी नोकरी.. ?"

"वक्त आनेपर.. सब पता चलेगा मेरे दोस्त!"

काही म्हणा मुक्या खुशीत दिसला. सात एक सात चा अर्थ काय असावा की तो एवढा खुशीत यावा?

मुक्या खूश होताच. कधी नव्हे तो चहा बनवला त्याने. त्याच्या घरी सध्या कोणी नाही. तेव्हा स्वतः मेहनत करून मला चहा पाजावा त्याने.. म्हणजे अत्यंत आनंदाच्या उकळया त्या चहाबरोबर त्याला ही फुटत असाव्यात! चहापानानंतर

मी निघालो. बहुधा फोनसाठी कर्फ्यू असेल.. पण तो तर त्यांच्यासाठी असा विचार करत तो फोन लावला राधिकाला आणि घोडचूक झाली!

असे म्हणतात की काळोख म्हणजे प्रकाशाचा अभाव! काळा रंग म्हणजे कुठल्याही रंगाचे नसणे.. तसा मूर्खपणा म्हणजे शहाणपणाचा अभाव! तो काहीतरी कर्फ्यू म्हणाला होता तर थोडे तरी समजून मी फोन करायला नको होता ना? पण नाही! उचलला फोन लावला कानाला! तो उचलला नेमका ढ ने. म्हणजे मला ते माहिती नव्हते. पण फोन उचलल्या उचलल्या कोण बोलतोय ते न पाहता मी सुरूवात केली,

"राधिका.. काम झाले! मोहिम फत्ते!"

अगदी तिच्या नावासकट बोललो हे पाच शब्द! कमीतकमी नाव तरी नाही घ्यायचे ना? नशीब मुक्याचे नाव नाही घेतले. पण नाही. मदत करायला गेलो आणि..

तिकडून आवाज आला,

"कोण आहेस रे तू? कसली मोहिम?"

मी पटकन फोन ठेवून दिला. तर परत मला त्याच नंबरावरून फोन आला. मी तो उचलला नाही हे खरे!

माझ्या या उटपटांग उपद्व्यापामुळे झालेला उत्पात मला दुसऱ्या दिवशी उमगला.

थोडा अंदाज आलेला मला माझ्या मूर्खपणाचा. पण तो असा घोटाळा करेल?

झाले काय की सकाळसकाळी मुक्या घरी आला. म्हणाला, "मूर्खा.. फोन केलास.. आता तिचा मोबाईल जप्त झाला. कसा तिला कॉन्टॅक्ट करू.."

"मग हे कसे कळले?"

"तुला काय करायचेय?"

"सॉरी यार. मला वाटले तिचे टेन्शन दूर होईल म्हणून केला फोन.. मला काय ठाऊक हे असे होईल?"

मुक्या शांतपणे बसून राहिला. आणि थोड्या वेळाने म्हणाला, "देअर इज लाईट ॲट एंड ऑफ द टनेल. काहीतरी होईल.. करावेच लागेल.. पण तुला नाही सांगणार.. काहीतरी घोटाळा करून ठेवशील! माझ्या नशिबाची दोरी धरून माझ्या प्राक्तनाचा पतंग.. माझा मलाच उडवायला हवा! परिस्थितीच्या वादळात गटांगळ्या खात तो भरकटू नये म्हणून मलाच करावे लागतील यत्न!"

नाटकात काम करावे तसे संवाद तो म्हणत होता.. तेही उत्स्फूर्त!

माझे म्हणजे 'करायला गेलो एक' झाले होते. काय बोलावे सुचेना मला. इतक्यात मुक्याच म्हणाला, "तो गुरूराज गायकवाड ओळखीचाय ना तुझ्या?"

च्यायला! म्हणजे हा त्यासाठी आलाय!

"हो.. काही काम?"

फक्त ओळख करून दे. बाकी मी पाहतो!

एरव्ही मी वाद घातला असता कशासाठी हवाय वगैरे म्हणून.. पण माझ्या चुकीचे प्रायश्चित्त म्हणून गप्प बसून म्हणालो, "हो.. देतो तुला त्याचा नंबर!"

५

त्यानंतर काही दिवसांची गोष्ट.

स्थळ: ढकांबेकर सदन.

सदन म्हणजे एका बिल्डींगीतला दोन रूमवाला फ्लॅट. ढकांबेकर सज्ज आहेत.. आज एक स्थळ येणार आहे.. सकाळची वेळ..

दरवाजावरची बेल वाजली.. दार उघडले तसे तीन जण आत शिरले.

एक आबासाहेब गरवारे.. दुसऱ्या सईबाई गरवारे.. हे दोघे वरपालक! आणि खुद्द वर म्हणजे क्षितिज गरवारे. ढकांबेकरांनी हसून स्वागत केले. आबासाहेब आणि सईबाई स्थानापन्न झाले. क्षितिज आतील काही दिसेल का अशा बेताने खुर्चीवर बसला.

"काय सापडला ना पत्ता?" ढकांबेकर

"हो ना! चांगलीच फेमस आहे बिल्डिंग तुमची.." अप्पासाहेब बोलले.

सईबाई उघड अवघडून बसलेल्या. डोक्यावर पदर घेऊन बसलेल्या सईबाई म्हणाल्या, "जरा आत जाऊ का.. म्हंजे पुर्षलोकांत जरा औघडल्यावानी होतंय.."

"हो.. हो.. कला ह्यांना घेऊन जा." ढकांबेकर त्यांच्या पत्नीस हाक मारत म्हणाले.

कला.. नुसतीच कला की कलावती.. चंद्रकला.. श्रीकला.. कलाश्री.. की अजून कोणी.. नावाची पुरंध्री बाहेर आली. तिच्याकडे पाहून यांची कन्या सुंदरच असणार.. आबासाहेब मनात म्हणाले.

सईबाई आत गेल्या..

"जुन्या वळणाची आहे जरा. आम्ही शहरात आलो पण गावचे संस्कार नाही विसरली ही."

"मला हे आवडले.. माणसाने आपली मुळे सोडू नयेत.." ढकांबेकर.

क्षितिज आत डोकावून पाहण्याचा प्रयत्न करत होता. त्याला आबासाहेबांनी हळूच चिमटा काढला. चमकून क्षितिज नीट सरसावून बसला.

इकडतिकडच्या गप्पा झाल्या. कुठल्या कुठल्या ओळखी उगाचच काढायचा प्रयत्न झाला. अप्पासाहेब आपले सारे आयुष्य दूर तिथे कारवारात गेल्याचे सांगून जणू विषय वाढू नये इतपत उत्तरे देत राहिले. सईबाई आत रमल्या असाव्यात राधिकाशी नि त्या कलाबाईंशी गप्पा मारत!

मग राधिका आली बाहेर. हातात पोह्यांच्या बश्या घेऊन. समोर येऊन बसली. तिच्याकडे पाहात क्षितिजने चुकून लिंबू प्लेटच्या बाहेर पिळला! मग चमकून परत ते पोह्यांत पिळून पोहे खायला सुरुवात केली. मंडळी खाण्यात दंगली. मग राधिका चहा घेऊन आली.

'पोरगी चांगली आहे..' अप्पासाहेब मनात म्हणाले. 'तर मुलगा बरा आहे. राधिका खूश दिसतेय.. चक्क लाजतेय! खाली मान घालून बसलीय आणि त्या क्षितिजच्या प्रश्नांना लाजत देतेय उत्तर! ही लक्षणे चांगली आहेत. त्या कुठल्याश्या मुकुंद मारकुट्यास विसरेल तर बरेच आहे. तर हे जुळले तर उत्तम. मुलाची दाढी जरा खुपतेय.. नाक थोडे मोठेय पण असते एकेकाचे! दाढी.. ती

काय कधीही उडवता येईल! एकूण लग्नाच्या क्षितिजावर हा क्षितिज नामक तारा उगवेल तर बरे!' ढकांबेकरांच्या मनात असले विचार सुरू होते.

इकडे क्षितिज बोल बोल बोलत होता. राधिका कधी उत्तर देत होती.. कधी टाळत होती. अप्पासाहेब त्याला म्हणालेही, "बाळ क्षितिज.. त्या बिचाऱ्या राधिकेस जरा श्वास घेऊ तर देशील?"

क्षितिज त्यावर म्हणाला, "हो ना! पाचशे एक!"

"काय पाचशे एक?"

"अहो, पाचशे एक टक्के खरंय! मुलीस बोलू दिलंच पाहिजे!" हे अप्पासाहेब बोलले!

आणि या पाचशे एकावर ती राधिका चक्क लाजली. मागे त्या रक्तवर्णी गालांचे वर्णन केले होते ना तसे झाले गाल तिचे.. दोन्ही!

मुलगी बघायचा कार्यक्रम झाला. मंडळी घरी निघाली. राधिका पडद्याआडून जणू क्षितिजला डोळे भरून पाहात होती.

निघताना सईबाई म्हणाल्या, "येतो बरंका कलाबाई.. आता सोयरीक जमली तर पुन्यांदा यावंच लागतंय ना. रादिके.. भेटू गं.. येतो आमी!"

थोडक्यात मुलगीदर्शन झाले. मंडळी परतली.. आपापल्या घरी!

आता हे सारे मला इतके डिटेल कसे ठाऊक? खरेतर अजून गंमतीजमती पडद्यामागे झाल्या.. त्याही ठाऊक आहेत! कशा? तर त्याचीही एक कथा आहे! सब कमाल गुरूराजकी! थोडक्यात गुरुजीकी जय हो!

६

गुरूराज गायकवाड!

कोणास वाटेल हे नवीन पात्र कुठून आले गोष्टीत! पण त्याला महत्वाचा रोल आहे! गुरू माझा खास दोस्त. म्हणजे मुक्याला पण ठाऊक आहे आमची दोस्ती. मुक्या म्हणजे गुरूचा फॅन. गुरू होताच असा. मेकप मध्ये त्याचा हात धरेल असा कोणी नाही.

त्यादिवशी, म्हणजे.. राधिकाला मी फोन केला होता त्याच दिवशी.. मुक्याने मला पकडून ठेवले. डिटेक्टिव्ह नौशेर नरीमान यांच्यापासून कहाणी सुरू झाली.. ती इथवर येऊन पोहोचली!

.. म्हणजे झाले असे ..

त्या माझ्या फोन करण्याच्या आगाऊपणापायी मुक्या डाफरला खरा पण नंतर त्याने एकाहून एक बॉब फोडले! तो वृत्तांत जरा सविस्तरच सांगायला हवा..

माझ्या त्या फोनमुळे जणू मुक्याची लाइफलाईन कापली गेली होती.. मुक्या वैतागत म्हणाला,

"अरे काय गोंधळ घातलायस तो फोन करून .."

"सॉरी.."

"पण तुला सात खून माफ!"

"म्हणजे? खून? मला कोणास का मारावेसे  वाटेल?"

"ऐक.. यू हॅव डन अ ग्रेट जॉब ..  अदरवाईज.."

"अदरवाईज? म्हणजे?"

"म्हणजे.. ती फोनची गडबड नसती केलीस ना.. जाऊ देत.. पण तू डिटेक्टिव्हची आठवण करून दिलीस.. आणि राधिका कडे जाण्याचा तोच एक पासपोर्ट आहे!"

"पासपोर्ट! मग? व्हिसाचे काय?"

"व्हिसा हवाच! अर्थात! त्यासाठीच ऐक.. सुरस आणि चमत्कारिक! माझी नोकरी पक्की होण्यास आता काहीच अवधी बाकी आहे! आणि त्यात गुरूची मदत हवी!"

"हुं.. गुरूबिन कौन बतावे वाट! खरंय ते! गुरूस शरण जा.. मुक्यास्वामीजी .."

"ते गुरू नाहीत.. तुझा गुरू.. गुरूराज!"

"त्याचे काय?"

मग त्याने सारी कहाणी कथन केली.

नौशेर नरीमान एक नामवंत डिटेक्टिव्ह. मागच्या वर्षीच त्यांच्या ऑफिसात आपला बायोडेटा सोडून आलेला मुक्या. वेळ आली की बघू म्हणून त्याची बोळवण केलेली त्या डिटेक्टिव्हनी. हे सारे मुक्याने सांगितलेले मला. पण बहुधा नंतर विसरला असावा.

आज त्या कोड लॅग्वेजच्या विषयातून आठवला की काय? अर्थात असावा!

"अरे मागच्या वेळी मी त्या नौशेरकडे गेलो तेव्हा ही वॉज बिझी.. आता गेलो तर यू नो ही वॉज वेटिंग फॉर मी!"

"काय सांगतोस काय?"

"अजून स्टोरी बाकी आहे मेरे दोस्त! बघ दुनिया किती छोटी आहे.. झाले काय ना.. तुझा विश्वास नाही बसणार.."

"सांग तर.. मी ऐकतोय.."

"अरे ढ.. "

"मी? मी का ढ?"

"तू नाहीस.. दॅट ढ फॉर ढकांब्या.. ही नोज नरीमान! हीज कॉलेज बडी!"

"हुं.. बडी बात.. मग?"

"अरे त्या ढ ने डिटेक्टिव्ह हायर केलेला माझी माहिती काढायला! ॲंड दॅट हॅपन्स टू बी.. कोण?"

"कोण? नरिमन?"

"यस्स.. नरीमान! नॉट नरीमन.. ही इज व्हेरी पर्टिक्युलर.."

"मग?"

"गंमत अभी बाकी है मेरे दोस्त! मला पाहताच नरीमान म्हणाला, मुकुंद मारकुटे..वेलकम.. वेटिंग फॉर यू! ते तुजी राधिका कशी आहे? मी चाट! याला काय ठाऊक? पण त्या ढ ने नौशेरला शेरभर न्यूज दिलीय.. अगदी त्या थपडेची गूंज सुद्धा!"

"मग?"

"अरे नरीमाननी तीन प्रश्न विचारले.. नौशेर असा आकड्यात बोलतो म्हणे! एक.. अजूनही राधिकाच हवी आहे ना? दोन.. नोकरीसाठी गाडं अडलंय ना? तीन.. नोकरी हवीय ना?"

"शुद्ध मराठी बोलतो हा बावा? मग?"

"शुद्ध नाय रे.. मी टुला म्हणून तसे बोलते.. टुला समजेल नाय तर.. तर मग काय.. एका शब्दाचे उत्तर यार.. हो .. सर्व प्रश्नाचे एकच उत्तर!"

"पुढे?"

"अरे, चलाख असतात डिटेक्टिव्हस. मला तेव्हा कळले नाही.. म्हणून सारे सांगत बसलो. म्हणजे ढ कसा माझ्या विरूद्ध आहे.. राधिकास कसे बांधून ठेवलेय.. आणि पुढे आमची कोड लॅंग्वेज पण!"

"मग पुढे?"

"पुढे काय.. ही वॉज थ्रिल्ड.. कोड लॅंग्वेजच्या गोष्टीने नरीमान जम्पड इन हीज चेयर. म्हणे दॅट्स इंटरेस्टिंग! तेवढ्यात माझ्या लक्षात आले.. ढ इज हिज क्लायंट.. ही माहिती हा ढ ला पोहोचणार! टेन्शन यार! मग मी नरीमानपुढे खुला प्रश्नच टाकला.. सर ही माहिती तुम्ही ढकांबेकरांना द्याल का? ही इज युवर क्लाएंट. पण रिक्वेस्ट.. प्लीज देऊ नका.. आधीच राधिका अडचणीत आहे.."

"मग.. ही ॲग्रीड?"

"अरे ही इज ए जॉली फेलो.. म्हणे.. हा हा हा.. जुन्या दिवसांची आठवण आली. मग त्यांची प्रेमकहाणी थोडक्यात ऐकवली. फरीन अने मी.. ती गुजराती अन मी पारसी.. तरी साला असाच विरोध.. हे पेरेन्ट लोगले काय कळते नाय .. त्यात डिटेक्टिव्हला कोण देणार मुलगी.. पण जमवले जुगाड..असेच काहीतरी .. आणि मग मि. नौशेरने प्रॉमिस दिले मला.. "

"कसले?"

"दोन गोष्टी.. एक .. कोड लॅंग्वेजची बाब सिक्रेटच राहिल.. आणि दोन.. जॉब पक्का! म्हणाले अशी कोड भाषा बनवणारा डिटेक्टिव्ह एजन्सीसाठी फिट आहे.."

"वॉव! तो नौकरी पक्की.."

"नाही अजून.. कहानी बाकी है अभी मेरे दोस्त.. ऐक.. एक अट आहे.."

"कसली?"

"की येत्या काही दिवसात मी रीतसर मुलगी पाहायला राधिकाकडे जाऊन यायचे! अगदी ऑफिशियली! ते डिटेल्स  मिळाले की नरीमान ढ कडून ते कन्फर्म करणार.. आणि मी त्यात यशस्वी झालो की माझी नोकरी पक्की. डिटेक्टिव्ह लोकांना अशा माणसांची गरज पडतेच म्हणे!"

"बाप रे! आता?"

"आता काय.. मी पूर्ण विचार केलाय.. गुरूचरणी लीन.. वेशांतर!"

"कुणाचे?"

"कुणाचे काय.. माझे.. तुझे आणि.. कोण बरे.."

"माझे.. मी कोण?"

"माझा बाप! ऐक.. मी बनवलाय मस्त प्लॅन.. तू माझा बाप.. आई कोण होईल.. विचार करू.. मी वेशांतर करणार.. तू ही थोडा वृद्धबिद्ध हो.. तुझ्यासाठी एक म्हातारी बाई पाहू.. ती माझी आई.. रीतसर पोहे खाऊन येऊ!"

"वा! स्वतःसाठी नवतरूणी काश्मिरी.. आणि माझ्यासाठी .."

"अरे नाटकापुरती. आणि असे पण कोण खरी जुन्या जमान्यातली बाई तयार होणारे? आपल्यासारखीच कुणी तरी हवी. राधूला कॉन्टॅक्ट झाले असते तर तिची कुणी मैत्रीण गाठली असती पण.."

"मी नाही बाबा असल्या भानगडीत पडत. पकडले गेलो तर.."

"मैदान सोडून पळतोस.. रणछोडदास.. अरे यात थ्रिल आहे.. इमॅजीन.. तू, मी आणि तुझी बायको .. म्हणजे माझी आई.. राधिका समोर बसलीये.. पायाच्या अंगठ्याने जमीन उकरत.."

"थ्रिल? पकडले गेलो तर ढकांब्या आंब्यासारखा पिळेल.."

"तर.. पकडले गेलो तर! आणि.. ऐक.. माझ्या डोक्यात एक आयडिया आलीय.."

"कसली?"

"हे बघ.. माझी आई म्हणून मी जाई जुवेकरला बोलावले तर?"

माझ्या मनात आनंदाच्या उकळया फुटल्या. खोटे कशाला बोलू.. जुई म्हणजे माझी अख्ख्या कॉलेज जीवनातली एकुलती एक आवडती होती. तिच्याशी कधी बोलण्याचा धीर झाला नव्हता. पण मुक्याला हे सारे ठाऊक होते. तो जुईला या कामासाठी कसे पटवणार? कसे ही असो.. त्या निमित्ताने जुईशी कॉन्टॅक्ट तर होईल. तालमीच्या निमित्ताने काही दिवस जुई दिसेल.. भेटेल.. बोलेल! आणि कुणी सांगावे माझ्या या मैत्रीसाठी मदत करण्याच्या स्वभावावर भाळेलही ती! आणि काहीच नाही तर निदान औटघटकेचे नवरा बायको तर होऊच ना! पुढे मागे आपल्या नातवंडांना सांगायला होतील गोष्टी! मी एका पायावर तयार होणार हे मुक्यास ठाऊकच होते. कारण तो पुढच्या तयारीस लागला. मला न विचारता!

"हे पहा.. तू म्हणतोस म्हणून करीन काम.. मित्रास मदत म्हणून.."

"वा! पवित्र भावना! अति उदात्त! म्हणजे कुणीही चालेल ना? जुई जाऊदेत.. त्या भक्तीला गळ घालतो.."

"मुक्या साल्या.. मला कात्रजचा घाट दाखवू नकोस.. कुणाच्या वीक पॉईंटचा फायदा उठवणे.. शोभत नाही.. आणि नो जुई.. नो गुरू.."

"ओ हो.. तो अबतक दिल की आग जल रही है! तू ते जुईबरोबर कामाचे मनात मांडे खात होतास ना.. तोवर माझे काम आटोपले आहे. मी मेसेज पाठवले देखील.. चट विचार.. पट अंमलबजावणी.. शी इज ॲन ॲक्ट्रेस.. आठवतात कॉलेजची नाटके!"

मुक्या काहीपण बोलतो.. कॉलेजच्या नाटकात मी जुईशिवाय दुसरे कुणास कधी पाहातच नसे.. आणि डोळ्यांत साठवलेली ती.. विसरणार कसा? मुक्या मास्टर स्ट्रॅटेजिस्ट खरा. बहुधा जुईकडचा होकार आधीच मिळवला असणार त्याने. कुणाकडून काय नि कसे काम करवून घ्यावे त्याला बरोबर समजते! जिंकणार बेटा! नोकरी आणि छोकरी ही.. ढ च्या नाकावर टिच्चून.. त्यात ह्या गाड्याबरोबर माझीही जत्रा.. राधिका त्याला नि जुई मला.. होपफुली.. वा!

एवढे झाल्यावर गुरूराजला भेटणे आले. त्याला सिक्रेट ठेवण्याच्या अटीवर.. थप्पड वगळता.. अख्खी गोष्ट सांगून झाली.. म्हणजे वेशांतराचे महत्त्व त्याच्या मनावर बिंबावे. गुरू माझ्याखातर तयार झाला. दुसऱ्या दिवशी परत त्याच्याकडे आमची वारी निघाली. आणि तिकडे जुई देखील आलेली!

आम्हाला एकमेकांच्या बाजूस उभे करून त्याने काही मापे घेतली. मी मनात लड्डू फुटणे म्हणजे काय त्याचा अनुभव घेतला!

मग एकाएकी गुरू म्हणाला, "राधिकाच्या घरच्यांना तुमच्यापैकी कोण कोण माहिती आहे? त्याला अगदीच वेगळे रूप घ्यावे लागेल."

मुक्याने हात वर केला.

"ओके.. तुझे नीट माप घेतो.. नकली नाक लावू.. दाढी लावू.. केसांचा विग आहे तयार.."

वा! त्याने समोरच्या कॉम्प्युटर स्क्रीनवर मुक्याचा फोटो लोड केला.. त्यात एकेक बदल करत मुक्याचा तोंडवळाच बदलून टाकला.

"मुक्या.. तू असा? ओळखूच येणार नाहीस स्वतःस देखील.. हो की नाही जुई.."

आपल्या ओठांतून मोगऱ्याच्या कळया निघाव्यात तशी जुई बोलली, "हो रे.. विश्वास बसत नाही रे!"


आता मी ते मोगऱ्याच्या कळया वगैरे बोललो ते कदाचित योग्य उदाहरण नसेल ही.. पण माझी ही नेहमीची सवय. त्यात पुन्हा ही तर जुई! काहीतरी गडबड होणारच बोलण्यात, नाहीतर विचारात!

पुढे आमच्या तालमी झाल्या. आमची नावे बदलली.. आम्ही गरवारे कुटुंबिय बनलो. मुक्याला ते नकली नाक आले. पुढे आलेला एक दात आला..दाढीबिढी लागली! मुक्या नखशिखांत बदलला! गुरू गायकवाड होताच खरा गुरू!

७

वर वधू दर्शन झाले. खरेतर वर आणि वधू म्हणून प्रमोशन लग्न ठरल्यावरच होते. पण इथे आम्ही आधीच ते होणार हे गृहित धरलेले. जुई पण म्हणाली, "राधिका.. सो क्यूट वधू .."

हे म्हणताना तीच किती क्यूट दिसत होती हे मी तिला सांगू शकेन का?



तर मंडळी घरी आली. जुई अर्थातच तिच्या घरी गेली. मुक्याने आपले नाक नि बाकी केसांच्या जंजाळाचा सरंजाम काढून ठेवला. म्हणाला, "चल जाऊयात नरीमानकडे!"

आता मला या गोष्टीत (जुईमुळे.. खोटे कशाला सांगू?) अतिच इंटरेस्ट वाटायला लागला होता. म्हणून मीही निघालो.

एकूण छान झालेला प्रोग्राम. ढकांब्याने मुक्याला ओळखले नाहीच. गुरूची कमाल म्हणावी. कारण सिनेमात पण रूप बदलून येतात त्यांना शेंबडे पोर पण ओळखते..'तो बग.. तोच ए.. तो दाडी लावून आलाय..' म्हणत! पण मुक्या आम्हालाही ओळखू येत नव्हता. आमचे काय! तुकतुकीत म्हातारा.. म्हणजे वयस्कर माणूस म्हणून शोभत होतो मी.. सर्वात मस्त म्हणजे जुईची मी

मिसेस म्हणून करून दिलेली ओळख! गरवारे तर गरवारे.. पण मिसेस ऑफ मि.गरवारे.. म्हणजे मी! आणि ती काय खरीखुरी ॲक्ट्रेस.. तिची भूमिका नेहमीप्रमाणे मस्त!

आम्ही निघालो.

"तुला काय वाटतेय.. ढकांब्या मान जाएगा?"

"अरे.. नरीमान इज अवर चावी, म्हणजे की. नरीमानच्या मदतीनेच सारे कसे छानछान होईल बघ...किसको कोई शक?"

"आहे एक डाऊट.. डिटेक्टिव्ह मुक्या.."

"बोल.."

"राधिकाला तुझ्यापेक्षा तो क्षितिज गरवारेच आवडला तर? पाहिलेस ना ती कशी लाजत होती क्षितिजशी बोलताना?"

"हा.. हा.. मग जन्मभर ते नकली नाक लावून फिरावे लागेल! जुईची कमाल आहे हा.. तिने आत घुसण्यासाठी काय मस्त युक्ती केली.. राधिकाला सारी गोष्ट कधी आणि कशी सांगितली कुणास ठाऊक.. पण दॅट मेड जॉब ईझी.. जुई इज ग्रेट!"

जुईच्या वतीने थ्यांक्स बोलायची मला इच्छा झाली.. पण नाही बोललो.

"पण मजा आली. गनिमाच्या गोटात जाऊन त्याचेच चहा पोहे खाऊन आलो."

"एक अजून डाऊट बॉस.. आता आपण नरीमानकडे चाललोय.. तिथे आताच ढ आला तर?"

"छे रे! अजून तिथे त्या पोह्यांच्या बशा उचलून झाल्या नसतील.. आणि बहुधा ते लोक राधिकाला या मुलाला तरी हो म्हण म्हणून प्रेशराईज करत असणार! ढ मस्ट बी टू बिझी.."

मला वाटतेय तू म्हणतोस ते खरेय..

ऑफिसमध्ये नौशेर नरीमानपुढे आमच्या मोबाईलमधले फोटो टाकत मुक्या म्हणाला, "सर.. हे अप्पासाहेब आणि सईबाई गरवारे आणि हा क्षितिज.. त्यांचा मुलगा. आताच कांदेपोहे खाऊन आलेत ढकांबेकरांकडचे."

"मग.. आमी काय करते?"

"कन्फर्म करा सर!"

"व्हॉट?"

"तुम्हाला यांच्यात नि आमच्यात काहीच साम्य दिसत नाही?"

मुक्याने विचारले.

निरखून पाहात नौशेर.. "ओहो! सो.. यू हॅव डन इट माय बॉय! कॉंग्रॅट्स.."

"थ्यॅंक यू सर.. प्लीज त्या ढकांबेकरांकडून.."

"यस.. आय विल डू इट.. अने अजून दोन गोष्टी.."

"कुठल्या सर?"

"एक ते तुजा जॉब.. यू साला ब्रिलियंट चॅप.. जॉइन मी फ्रॉम नेक्स्ट मंथ!" मग माझ्याकडे वळत म्हणाला, "तुला सांगते.. ह्याने साले आपल्या गर्लफ्रेंडसंग वार्ता करायला कोड लॅंग्वेज बनवली.. ब्रिलियंट चॅप.." आणि मग मुक्याकडे वळून म्हणाला, "तुजा जॉब पक्का रे खातरी जाली मंजी.."

"वॉव! कॉंग्रॅट्स मुक्या.." मी म्हणालो.

"आने हजी एक.."

"त्याआधी सर.. त्यांना गरवारे कुटुंब फार आवडलेय.. हा क्षितिज.. त्यांच्या क्षितिजावरचा उगवता तारा जणू.. तर.."

"माय बॉय.. हे बाल खालीफुकट पांढरे नाय झाले .. म्हंजे जेवडे उरलेले हायेत त्याची गोश्ठ करते मी.. तर मी साला प्रायव्हेट डिटेक्टिव्ह.. त्याचे नाव काय बोलला.. गरवारे.. ब्लडी डर्टी लॉंग नोज! सांगतो त्यांच्या स्टोरी रे.. एक सो एक.. त्या गरवाऱ्याचे नकली नाक कापू साला.."

"सर ते घरी काढून ठेवलेय.."

"हा हा.. गुड जोक.. माय बॉईज.. एवडेच नाय.. आय विल स्ट्रॉंगली रेकमेंड यू! ॲज अ ग्रूम! माज्या कुंपणीतला डेप्युटी मॅनेजर!"

"वॉव! डेप्युटी मॅनेजर.. डायरेक्ट!"

मी बोललो तसा नरीमान म्हणाला,"एक्झॅक्टली! माज्या कुंपणीत मी सोडून समदेच साला डेप्युटी मॅनेजर! सांगते तवा ग्रेट वाटते साला लोकांना. आमी त्या ढकांबेकराला सांगते.. याला आमी डायरेक्ट डेप्युटीच्या पोस्ट वर घेते बिकॉज ऑफ हिज क्वालिफिकेशन्स! आता काय म्हणेल ते? डिक्रा होशियार.. अने आता नोकरी बी हाये.. आन मेन म्हंजे आमी क्लिअर केला साला त्याचा नाव!"

"थ्यंक्यू सर.. तुमच्यामुळे.."

"ते आबारप्रदर्शनाचे फंक्सन तुज्या लगीनमंदे करू साला. व्हॅलेडिक्टरी फंक्सन! आमाला वाट्टे की साला तुजी जोडी ते स्वरग मंदे बनवून टेवली गॉड नी म्हणूनशान साला तू माज्याकडे पोचला.. ऑल द बेस्ट डिकरा!"

यावर मुक्या गहिवरला आणि बावाच्या पाया पडला. बावा चश्मा काढून डोळे पुसत म्हणाला, "साला आपला ब्लेसिंग हाय.. तुमी हॅप्पी होनार.."

आम्ही खूश होऊन निघालो. घरी आलो. आता मुक्याचे सारे प्लॅनिंग परफेक्टली फिट झाले होते. किती मेहनत आणि किती प्लॅनिंग! डिटेक्टिव्ह बनायला एकदम फीट आहे बेटा!

मग पुढे काय? नरीमाननी सूत्रे पडद्याआडून फिरवली. अशी की ढकांबेकर काका चक्क मुक्याच्या घरी मागणी घालायला आले! मुक्या मोठ्या मनाचा.. ती थप्पड विसरून गेला. आणि आपली शपथ पुरी केली त्याने! मग काय.. काही महिन्यांतच 'वाजवा रे वाजवा' झाले दोघांचे! मुक्याचा नवा बॉस नरीमान त्याच्या बायकोसोबत म्हणजे फरीनसोबत स्वतः अक्षता टाकायला हजर होता. इतकेच नाही तो गायला देखील आपल्या भसाड्या आवाजात! आणि मी? अर्थातच होतो तिथेच! आणि समक्ष जुई देखील माझ्याबरोबर होती.. लग्नाला हजर होती साडीबिडी नेसून..! नरीमान बोलला देखील, "जो ना फरीन डार्लिंग.. एवन केटली सारी जोडी छे! ते तुजी गर्लफ्रेंड छान अस्ते हां.." ते ऐकून माझी जुई चक्क लाजली!

माझी जुई.. दचकू नका.. या साऱ्या गोष्टीचा हा बायप्रॉडक्ट! हे कसे नि केव्हा झाले? वेगळ्या गोष्टीचा विषय आहे तो! पण मुक्याच्या रक्तवर्णी गालाने सुरू झालेली ही गोष्ट जुईच्या आरक्त गालांनी संपावी! वा! कुणास अतिशयोक्ती वाटो..विश्वास न बसो.. पण.. झाले ते असे झाले हे खरे!

लीलाई दिवाळी २०२१

# एका आमंत्रणाची गोष्ट!

१.

शेवटी ज्याची भीती होती तेच झालं.

धुडमल गरोडिया शेटच्या मुलाच्या लग्नाचं आमंत्रण मला आलंच. धुडमल शेट म्हणजे धनाढ्य उद्योगपती. गरोडिया अँड गरोडिया इंडस्ट्रीज नामक नानाविध उद्योगांचे मालक. त्यांचे विविध धंदे आणि त्यातून त्यांच्या तिजोरीत आलेला संपत्तीचा महापूर आणि त्या ऐश्वर्याचा बाहेरून दिसणारा धूर. धुडमल शेटच्या एका फॅक्टरीत कामाला लागलो मी त्यालाच पंचवीस वर्षे लोटलेली. धुडमलांचं 'धुडमल ब्रँड मीठ' आम्हाला निम्म्या किमतीत डायरेक्ट त्यांच्या फॅक्टरीतून मिळायचे. तेव्हा शेटजींचे मीठ शब्दश: खाल्लेलं. त्याला जागणं क्रमप्राप्त होते. त्यांचं आमंत्रण कसलं, आलिया भोगासी म्हणत त्यास सादर होणं आले. त्याला कारणं ही तशीच होती. तयारी करावी नुसत्या लग्नाला जाण्याची तर कुठून करावी? संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी लागते. इथे धुडमलसुताच्या लग्नाची तयारी धूमधडाक्यात सुरू आहे. पेपर म्हणू नका, टीव्ही म्हणू नका.. सगळीकडे एकच बोलबाला आहे. धुडमलनंदनाचा विवाह याखेरीज दुसरी बात नाही. सारे जग दोन भागांत विभागले गेले आहे. ज्यांना धुडमल शेट चे आमंत्रण आहे ते नि ज्यांना ते नाही ते. हॅव्ज नि हॅव ना ्ट्स ची ही नवीन विभागणी झाली आहे. न जाणारे लोक जाणाऱ्यांकडे असूयेने बघताहेत. लग्नाचे विविध समारंभ विविध भागात विविध पद्धतीने होताहेत नि देशभर धूम धडाका सुरू आहे. कित्येक टीव्ही चॅनेल्सनी प्राईमटाइमचा वेळ या साठी राखून ठेवलेला आहे, तसा न ठेवणं हा क्राईम समजला जाऊ शकतो हे

त्यांनी वरून ऑर्डरी न येता ही ओोळखले आहे. विवाह सोहळा प्रत्यक्षात एक महिन्यानंतर असला तरी नमनाला घडाभर तेल ओतावं तसं शेटजींनी देशविदेशातल्या शहरांत, जमिनीवर, समुद्रात, नि आकाशातही सोहळे आयोजित केले आहेत. जाणारे जाताहेत नि कवतिकं सांगताहेत. न जाऊ शकलेले अंचब्याने आ वासून उघडलेल्या तोंडात दोन्ही हाताची दहाच्या दहा बोटे घालून बसलेले आहेत. अशा ह्या सोहळयांच्या मालिकेतलं विवाह सोहळयाचं आमंत्रण सर्व धुडमलच्या नोकर चाकर, सेवक वर्गास असणं साहजिकच होतं. धुडमलशेटच्या कारखान्यात कामगारांनाही आमंत्रणं जाणार होती म्हणे. तर मी तर कारकुनी पदावरचा. ते आमंत्रण येणारच होते. कितीही विचार केला तरी संकट काय टाळता येतं? ते आलंच.

कुणी म्हणेल यात संकट कसले? सारे जग या आमंत्रणाची वाट पाहात असताना मी मात्र एवढा निरिच्छ असणे जरा आश्चर्याचे वाटेल. पण ते तसे नाही. तसा मी काही फार माणूसघाणा नाही. किंवा अगदी अंतर्मुखी ही नाही. त्यामुळे लग्नाला जाण्यास तशी हरकत नसावी, तरीही हे असे का व्हावे?

२.

घरात ती आमंत्रण पत्रिका आली नि एकच उत्साह संचारला. पत्रिका कसली एक मोठी पत्र्याची सोनेरी पेटी होती ती. खरेतर आमच्या त्या चाळीतल्या घरात तो आमंत्रण पत्रिकेचा बाॅक्स हीच काय ती चमकदार गोष्ट दिसत होती. आजवर पत्रिका कितीतरी पाहिल्या. 'आमच्या बहिणीच्या लग्नाला यायचं हं' म्हणून लाडिक आग्रह करणाऱ्या, एखाद्या घराण्याचा

आदिपुरुषाच्यापासून त्यापुढील सर्व पिढ्यांतल्या पुरूषांची नि त्यांच्या बायकांची सत्राशेसाठ नावे असणाऱ्या नि आजकाल काही तर नवरा नवरीने स्वत:च्याच नावाने काढलेल्या. काही मोठाल्या म्हणाव्यात तर अगदी पुस्तिकांसारख्या तर काही छोट्या चिटोऱ्यांसारख्या. पण हा आमंत्रणाचा खोका पहिल्यांदाच पाहिला मी.

खोका म्हणावं तर पत्र्याची ती छानशी पेटी होती एक. पाहताच ही म्हणाली, "बघू बघू, अय्या छान आहे नाही. मला दागिने ठेवायला असलीच पेटी हवी होती!"

हिची दागिन्यांची हौस काही संपत नाही. हिचे मोजून दोनचार दागिने ठेवायला इतका मोठा खोका कशाला लागतोय? पण त्याबाबतीत ती बोलत नाही नि खोक्यात ठेवण्यासाठी ती नवीन काही दागिने मागणार नाही. इतकी शहाणी आहेच ती. तरीही तो खोका पाहताच ती उत्साहात तो उघडायला पुढे झाली.

"थांबा. मी उघडते. तुम्ही लोकं तो खराब कराल.."

साडीच्या पदराला हात पुसत ती पुढे झाली.

ती सोनेरी पेटी तिने उघडली तेव्हा तिच्या चेहऱ्यावर कृतार्थ भाव होते. आजवर तिला मी काही जास्त देऊ शकलो नव्हतो पण आज धुडमल शेटच्या मुलाच्या लग्नाचे आमंत्रण मिळवून मी मोठाच पराक्रम केल्याचे तिला वाटत असणार. आमच्या आजूबाजूच्या शंभर चाळीतील कुठल्याही घरात असा पराक्रमी नवरा कुणाही बाईचा नव्हता. त्यामुळे तिला माझा अभिमान वाटणं साहजिक होतं!

त्या पत्र्याच्या पेटीच्या आत अजून एक लाल रंगाचा खोका होता. त्याचे झाकण उघडले की आत गणपतीची सुंदरशी सोनेरी मूर्ती आणि एक आंबा बर्फीचा अजून खोका. मग धुडमल इंडस्ट्रीजच्या सर्व फॅक्टरीजच्या माहितीची रंगीबेरंगी सचित्र पुस्तिका आणि लग्नाची आमंत्रण पत्रिका. सोनेरी अक्षरांतली. त्यात

इंग्रजी मजकुरात लिहिलेले, आशीर्वाद द्यायला यायचे हं! धुडमल गरोडियांची थोरली पाती, छितरमल गरोडिया, त्याला आशीर्वाद माझ्यासारख्याने काय द्यावेत? त्याची अर्ध्याएका दिवसाची कमाई तो माझा वर्षाचा पगार. अर्थात हा माझा कारकुनी अंदाज. कितीही मनात सदिच्छा असल्या तरी आपापली आर्थिक यत्ता पाहावीच लागते. कारण शेवटी पैशापाशीच तर सारे येऊन थांबते. नाहीतर 'तुझा पगार किती नि बोलतो किती' हा प्रश्न यायला वेळ लागायचा नाही. सोनेरी पत्रिकेत ही सुंदर अक्षरे कोरलेली. त्या पत्रिकेस म्हणे सोन्याचे पाणी दिले आहे. नि आंबा बर्फीवर खऱ्याखुऱ्या चांदीचा वर्ख आहे. असेल. नशीब आमची सौ त्या सगळ्यांची तुलना माझ्याशी करत नाही. 'त्यांनी पहा, सोन्याचं पाणी चढवलं पत्रिकेवर, नाहीतर तुम्ही!' असं काही बोलली असती तर माझ्याच तोंडचे पाणी पळाले असते. सोन्याचे नव्हे, तर खरेखुरे. गरोडियांचं काय? सोन्याची कौलंही चढवतील त्यांच्या सहामजली बंगल्यावर. सहज विषय निघाला म्हणून सांगतो, एकदा त्यांच्या बंगल्यावर जायची वेळ आलेली. काहीतरी कागदपत्र घेऊन. शेटजींचं दर्शन झालं नाही कारण ते कुठल्यातरी मजल्यावरच्या कुठल्यातरी खोलीत आराम करत होते. आमची वरात खालीच थांबवली गेली. त्यांच्या त्या किल्ल्यावजा घरातला व्हरांडाही माझ्या अख्ख्या घराहून मोठा होता. त्यांच्या घरात किती खोल्या असतील याचा अंदाज घेत बसलेलो मी. घरात राहणारी माणसं मोजून चार.

आणि मजले सहा. शेटजींना घरातून निघतानाही किती वेळ लागत असेल? एखाद्या वेळी काही, म्हणजे रूमाल किंवा चावी विसरले घरात तर शोधायला किती वेळ लागेल? मोठाच प्रॉब्लेम! मोठ्या लोकांचे प्रॉब्लेम्सच मोठे म्हणावेत आणि काय! त्यातल्या त्यात आपलं बरं! घरात एका कोपऱ्यात कुजबुजलेलं ही पूर्ण घरात ऐकू जातं इतकं वीतभर घर! त्यामुळे काही शोधाशोध करणं किती सोपं जातं? तर हे एक असो.

त्या पत्रिकेच्या पेटीचा ताबा सौ ने लगेच घेतला. आंबा बर्फी संपायला ती पत्रिका वाचेपर्यंतही वेळ लागला नाही. नाही म्हणायला ती पत्रिका आणून देणाऱ्याला थांबवलेलं, त्यानेही चाखली ती. रोज दहा वीस घरांत व्यक्तिश: पत्रिका देण्याचं टारगेट म्हणे त्याला. मुंबईत असं फिरेपर्यंत दिवसाचे कितीही तास जाऊ शकतात.

मी पत्रिका वाचत म्हणालो,

"अगं, सर्व काही आहे, श्री कृपेकरून हा विवाह करण्याचे योजिले आहे. नि कार्यसिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेत.. वगैरे मजकूर आहे.. इंग्रजीत. पण एक दिसत नाही.."

"घेलाशेटच्याकडे अशी कोणती गोष्ट आहे जी त्यांच्याकडे नाही?"

भाषेची तोडमोड करत सौ म्हणाली.

"अगं, हे सगळं ठीक आहे पण एक गोष्ट यात दिसत नाही.."

माझं वाक्य तोडत माझी छोटी मुलगी म्हणाली,

"पण बाबा, तुम्ही जाणार ना?" आमची चिमुरडी नाचत म्हणाली. "मी पण येणारे! साॅलिड भाव वाढणार शाळेत माझा!"

घेलाशेट मोठे हे खरं. आणि त्यांच्या श्रीमंतीचा परावर्तित प्रकाशदेखील आमच्यासारख्या सामान्यांची किंमत वाढवू शकतो हे ही खरं.

"मी पण येणार! आई, मी ती नवीन चड्डी घालणार! मी हैना सगळ्यांना सांगून येतो.." चिरंजीव सुसाट सुटले नि मित्रांना सांगून येतो म्हणत निघून गेले. वय वर्षे साडे दहा मात्र! मग छोटी कशी मागे राहिल? ती देखील पळालीच बाहेर.

"काय दिसत नाही पत्रिकेत तुम्हाला? अजून काय लाडूबिडूंची अपेक्षा होती की काय? की सोन्याचं अजून काहीतरी?"

"ते नाही. बर्फी वगैरे ठीक आहे.. पण.."

"पण काय? तुम्हाला ना हाव सुटलीय फार.."

"हाव कसली? अगं यात आहेर आणू नये हे लिहिलेलंच नाहीए.."

"म्हणजे?"

"म्हणजे काहीतरी देणं आलंच. अगं या शेटच्या मुलाच्या लग्नात काय देणार? शंभर रूपयांचं पाकिट? या नुसत्या एका पत्रिकेची किंमतच हजारांत असेल.."

"मोठ्यांच्या गोष्टी ही मोठ्या. पण आजकाल कुणी अहेराची अपेक्षा नाही करत हो."

"कुणास ठाऊक!"

पत्रिका तर आली. पोरांनी चाळीत गाजावाजा करायला उशीर लावला नाही. ही देखील लगबगीने म्हणाली, मी पण जरा जाऊन येते.

थोड्याच वेळापूर्वी भरलेलं घर मग रिकामं झाले. मी एकटाच उरलो, त्या पत्रिकेबरोबर! मनाशी म्हटलं, श्रीमंतांचं नि श्रीमंतीचं काही खरं नाही. एका क्षणात त्या पायगुणानं घर खाली झालं.

३.

एखादा तास गेला असावा मध्ये. पोरं परतली.

"मी हैना सगळ्यांना सांगितलं. लगिनाला जाणार म्हणून.." मुलीच्या उत्साहाला पारावार नव्हता.

"नुसतं लग्न नाही काय बावळट, मोठ्ठं लग्न. मी पण सांगितलं सगळ्यांना. माझ्याकडे नवीन पँट पण आहे."

"ए, पँट नाही काय, चड्डी म्हणतात. पँट अशी लांब असते.." हात लांब करत नि माझी साक्ष काढत म्हणाली,"होय की नाही बाबा?"

इतक्यात सौभाग्यवतींचा प्रवेश झाला.

तिच्या चेहऱ्यावर वेगळंच समाधान होतं. टीव्हीवर नि पेपरात गाजावाजा चाललेल्या लग्नात आमंत्रण येण्याइतका महत्वाचा तिचा हा नवरा.. आजवर काहीही विशेष न घडलेल्या आमच्या निम्न मध्यमवर्गीय घरात ही मोठी घटना घडणार होती. आणि आमच्या वस्तीत कोणालाही आमंत्रण नाही, फक्त आमच्या घराला.. या गोष्टीनी तिला इतका आनंद वाटावा?

"फारच खुशीत दिसतेयस.."

"तर हो! त्या केळुसकरणीचं तोंड बघण्यासारखं झालेलं आणि ती कुलकर्णीण! काळी ठिक्कर पडायची बाकी होती.."

"कशामुळे?"

"कशामुळे काय? काहीपण समजत नाही तुम्हाला."

"पण तुझ्या महिलांच्या मंडळात कुणाचं तोंड काळं ठिक्कर का पडावं हे मला कसं माहिती पडावं? त्यात ती तुझी काळी ठिक्कर पडलेली कुलकर्णीण मुळातच काळी की गोरी हे कसं माहिती असावं मला?"

वास्तविक मिसेस कुलकर्णी कोण ही माहिती नसण्यासारखी बाब नाही. कदाचित चाळीत सौंदर्यस्पर्धा घेतली तर 'मिसेस चाळ' व्हावी अशी ती. पण नवरेसुलभ निरागसता म्हणा किंवा बावळटपणा म्हणा, बायकोसमोर त्यांचे प्रदर्शन केले की एक बरं असतं हा माझा इतक्या वर्षांचा विवाहोत्तर अनुभव!

"तुमचं लक्षच कुठे असतं मुळात? खाली मुंडी पाताळ धुंडी.."

"मग? उद्यापासून जाणाऱ्या येणाऱ्यांकडे पाहात चालू म्हणतेस?" मी बायकांकडे पाहात चालू मधला 'बायकांकडे' हा एक शब्द शिताफीने वगळत विचारले.

हा माझा गनिमी कावा. याला ती होकारार्थी उत्तर देईल कशी? पण बायकोची जात ती. हार न मानणं तिचा जन्मसिद्ध अधिकार. पत्नीसुलभ हुशारीने विषय टाळत म्हणाली,"अहो, ते धुडमलशेटकडच्या लग्नाबद्दल बोलत होते मी.."

"तू काय लाउडस्पीकर वरून घोषणा देऊन आलीस की काय?"

"छे हो! उगाच विषयात विषय निघाला म्हणून सांगितलं झालं!"

हे बोलताना तिने हळूच ती पत्रिका नि ती पुस्तिका बाजूला ठेवलेली नजरेतून सुटली नाही माझ्या. आणि विषयात विषय काढणे काय.. बायकांना मुळात बोलायला विषय लागतातच कुठे?

"म्हणून तू इतकी खुश?"

"छे हो! इतकंच नाही! हे बघा!"

तिनं ते आधी हळूच बाजूला ठेवलेलं पुस्तक उचललं नि ते उघडत म्हणाली,

"हे पहा! कष्टाचं चीज झालं हो तुमच्या. शेटजींना कदर आहे माणसांची.."

पुस्तक हातात घेऊन ती बोलत होती. मग तिने त्या पुस्तकातला एक फोटो काढून दाखवला. आमच्याच कार्यालयातला. त्यात खाली मान घालून काम करतानाचा माझा फोटो होता!

"पहा.. तुमचा फोटो!"

"खरंच गं. कधी काढला कुणास ठाऊक!"

"देशाविदेशात गेलंय हे पुस्तक आमंत्रणाबरोबर. म्हणजे हा फोटोदेखील.."

"म्हणजे मी काम करतो याचा पुरावा म्हण की!"

मी म्हणालो खरा पण हिच्या मनात वेगळंच काही सुरू होते.

"त्या कुलकर्णीणनेच दाखवला बरं. म्हणाली बघा, तुमच्या मिस्टरांचा फोटो. जोशीण बघतच राहिली. नि केळुस्कर? उगाच चेहऱ्यावर नाही नाही ते भाव आणत कौतुक करत होती. कुलकर्णी बाई म्हणाली देखील, अशा कर्मचाऱ्यांच्या जिवावर तर शेट झालाय धुडमल!"

आता त्या पुस्तिकेत इतरही अनेक फोटो होते. फॅक्टरीचे, कार्यालयातले, साईटस् चे, कामात मग्न कितीतरी कर्मचाऱ्यांचे. त्यात एखादा चुकून फोटो माझा निघावा.. यात मोठी गोष्ट ती काय असावी?

पण नाही. सौभाग्यवतीला आपल्या नवऱ्याचा फोटो असा प्रसिद्ध व्हावा यातच सौभाग्य वाटत होतं! चालायचेच. मध्यमवर्गीय आनंद असे मध्यम मार्गानेच नि मध्यम प्रमाणातच मिळवावे लागतात!

पोरं शांतपणे हा संवाद ऐकत होती. त्यांनी त्यात उडी घेतली..

"बघू बघू.. बाबांचा फोटो?"

"मी पहिल्यांदा बघणार.."

"मी मोठाय ना.. मी पहिल्यांदा.."

त्या फोटोवरून नाही तर तो पहिल्यांदा कुणी पहावा यावरून दोघांचे रणकंदन माजण्याच्या आत म्हटले,"दोघांनी एकत्रच बघा.."

मग दोघांनी त्या पुस्तकात डोकं खुपसलं नि सौ कौतुकाने त्यांच्याकडे पाहात राहिली!

४.

आमंत्रण आलं आणि धुडमलसुताच्या घरच्या लग्नाची लगिनघाई जणू आमच्या घरी सुरू झाली. लग्नसमारंभ जवळ जवळ येईल तसतसा हा मॅरेज फिव्हर म्हणजे लग्नताप चढायला लागणार याचा अंदाज होता मला. लग्नताप कसला, हा ताप म्हणजे माझ्या डोक्याला ताप नि खिशाला चाप! जे नको तेच होणार नि धुडमलशेटच्या लग्नात माझा खिसा कापला जाणार ह्याचीच तर भीती होती. शेटजींच्या नुसत्या पत्रिकेच्या किंमतीत आमच्या घरचा एखाद्या आठवड्याचा खर्च निघू शकेल. अर्थात हा नुसता माझा अंदाज. कारण हौसेला

मोल नाही. नि धुडमलशेट सारख्या धनाढ्यांच्या हौसेचं मोल कल्पनेत कळण्याइतकी ही माझी कल्पनाशक्ती मी हौस म्हणूनही ताणू शकत नाही!

पण एक होतं, अशा लग्नाला साजेसे तरी जायला हवे. किमान कपडे हवेत. थोडेफार तरी शोभून दिसायला हवे. अगदी सदरा नि पायजमा घालून तर जाता येणार नाही. माझ्या लग्नात शिवलेला एकुलता एक सूट आता माझे वाढलेलं पोट लपवण्यास असमर्थ होता. माझं दिसणं महत्वाचं कारण मी त्या आमंत्रण पत्रिकेत छापून आलेल्या फोटोमुळे फेमस असणार असा सौ चा गोड का होईना, नि गैर का होईना, असा समज झालेला.

"अहो असं काय? असं आपण काय रोज रोज करतो का? रोज रोज कुठे अशा लग्नाला जातो? आणि बाकी कुणाला तरी बोलावलंय का तिकडे?"

"म्हणून आपण खर्च करत सुटायचं? अंथरूण पाहून पाय नको पसरायला?"

"हेच मेलं आयुष्यभर ऐकत आलेय. कुठं येणं नाही नि जाणं नाही.."

"अगं पण.."

"पण नाही नि परंतु नाही.. मोठ्या माणसांच्या घरचं आमंत्रण आलंय. तिकडे काय हे असल्या कपड्यात जाणार आपण? दरिद्री लक्षणं सगळी. सिद्धारूढ गुरूजी म्हणतात, मोठा विचार केला की आपोआप प्रगती होते.."

हिचे गुरूजी बरे हिला हवं तेच बोलत असतात!

"यात कसली आलीय प्रगती?"

मला खरेच या कपड्यांतली गतीच नाही, तर प्रगतीचं काय ठाऊक असणार? हिचं पुढे चालूच राहिलं..

"मेली हौस नाही की मौस नाही. नुसतं आपलं घर सांभाळा नि पोरं सांभाळा.. माझं मेलं नशिबच खोटं.. नशिबातच नसेल तर कोण काय करणार?"

यापुढे आता अश्रूपातास्त्राचा मारा होणार याचा अंदाज मला आलाच. तसा अंदाज इतक्या वर्षांच्या अनुभवातून येतोच. आणि स्त्रीहट्टापुढे कुणाचे काय चालतेय? प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रास कांचनमृगामागे धावावे लागले तर माझ्यासारख्या सामान्य माणसाची काय कथा? धुडमलनंदनाच्या त्या विवाहासाठी स्वत: शेटजींनी काय केले ते ठाऊक नाही पण मला मात्र बँकेतील एक फिक्स डिपॉझिट मोडावंच लागले. गृहशांती सलामत तो एफ डी पचास आणि काय? आणि रविवार दुपारी लग्नाच्या तयारीला आम्ही बाहेर पडलो.

जिवाची मुंबई करणे या वाक्प्रचाराचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी जणू हा दिवस उगवला असावा. एकतर बाहेर जायचेय नि नवीन कपडे आणायचे या कल्पनेनेच दोन्ही पोरं सकाळपासूनच उड्या मारत होती. रविवारच्या सुटीत जायचं ठरलेलं दोन दिवसाआधी, पण हिला बजावून ठेवलेलं, पोरांना सांगू नकोस, नाहीतर गावभर डंका पिटायची. खरेतर हेच मला तिला ही सांगायचं होतं, कुणाला सांगू नकोस. तोंडात तीळ ही न भिजणारी ती, तिच्या महिलामंडळात घोषणा केल्याशिवाय दोन दिवस काढू शकेल? पण हे तिला प्रत्यक्ष सांगण्याची हिंमत मात्र झाली नाही. 'जे जे होईल ते ते पहावे' नि 'आलिया भोगासी असावे सादर' असली काही वचने आठवत दोन दिवस काढत राहिलो. अर्थात हिने तिच्या त्या कसनुश्या तोंड करणाऱ्या केळुसकर बाई, मध्ये काळ्या

ठिक्कर पडलेल्या पण आता परत मूळरूपात आलेल्या कुलकर्णी बाई, आणि जोशीणबाई यांच्याशी साग्रसंगीत सारी चर्चा

केल्याचं नंतर ध्यानात आलंच माझ्या. कारण बोलता बोलता दादरच्या वेगवेगळ्या दुकानांबद्दल ही सांगू लागायची, "तिकडे नको. कुलकर्णीबाई म्हणाली इकडेच चांगलेय.."

"लहान मुलांचे कपडे या बेबीशॉपमधेच. जोश्यांची बहीण बाळंत झाली ना.. जोशीबाईला अनुभव आहे.."

"केळुसकरांकडे लग्नात त्याच दुकानातून घेतात म्हणत होती ती.."

स्व अनुभवाने शहाणपणा येतो म्हणतात, पण दुसऱ्याच्या अनुभवाने ही तो येत असावा!

मग आमची रविवारची वरात निघाली.. पुल देशपांडेंनी वर्णन केलेय एका ठिकाणी तशी. शॉपिंग हा शब्द तेव्हा प्रचलित नव्हता. पण दुकानदारी म्हणावं का? दुनियादारी असावी तशी ही दुकानदारी. एकेका दुकानाच्या दारात पाऊल टाकावे नि पोरांना दुसरेच काही हवे असावे. मग एक बर्फासहित उसाचा रस पिऊन झाल्यावर तशी पोरं बरी वागत होती.

"शिलेदार नावाच्या दुकानात मुलामुलींचे खास कपडे मिळतात म्हणत होती जोशी." हिने माहिती मोठ्या जोशात पुरवली. मनात म्हटलं, किंमत खास आहे का ते विचारलं नाहीस? पण असं काही विचारलं तर ही हमखास म्हणाली असती, पैसे काय चाटायचेत नुसते? पोरांची ती शर्ट पँट नि फ्रा ॅकाची खरेदी तशी लवकर संपली. पण हा धुडमल पुस्तिकेतून जग प्रसिद्ध असा नवरा चारचौघांत उठून दिसावा म्हणून मी जॅकेट घालावं असं हिचं म्हणणं पडलं. मग

नेहरू जॅकेटसाठी दादरची रानडे, गोखले नि टिळक पथांवरची दुकानं पालथी घालणं आलं. पाकिट उघडं सोडल्यावर ते जाकिट बापडं मिळालं. मग आमच्या तिघांच्या वस्त्र खरेदीनंतर मला पतिसुलभ दया येऊन मी म्हणालो,"अगं हे सगळं ठीक आहे. पण तुझ्यासाठी साडी घेऊन टाकू. कितीतरी दिवसात नवीन साडी घेतली नाहीए तू. तसं तुला काय सगळंच सुंदर दिसतं.."

तो क्षण बेसावध होता. मला वाटलं ही आढेवेढे घेईल. पण नाही. हिने दोन चार दुकानांची नावे पटापट घेतली. आधीच ठरवलेली असणार हिने. पुढच्या रणसंग्रामाआधी श्रमपरिहार म्हणून किंवा त्याची तयारी म्हणून असेल, समोरच्या एका हाॅटेलात चहा पिऊन झाला. पोरांनी बटाटेवड्याच्या दोन प्लेटी हाणल्या. नि नव्या दमाने खरेदीच्या उत्तरार्धाकडे आम्ही कूच केलं. परत तेच पुल देशपांडेंचे वाक्य आठवले, बायको बरोबर साडी खरेदी करायला निघालेला नवरा आणि वधस्तंभाकडे जाणारा कोणीतरी.. यांची तुलना त्यांनी केलेली.. ती मनात आठवत मी निघालो. आलिया भोगासी सादर व्हायचे तर सद्वचनांची साथ हवीच!

पण हिच्या साडीचा शोध हा कोलंबसाला अमेरिका शोधण्याहून कठीण निघाला.

टिकाऊ नि मळखाऊ ह्या व्यतिरिक्त कपड्यांचे एक दोन गुणधर्म पोरांचे कपडे घेताना मी ऐकलेले. पण हिने माझ्या सामान्य अज्ञानात भर घालायची ठरवलं असावं. साड्यांत काठ, पदर, रंग, पोत वगैरे असे काही बघावे लागते हे मला कळाले. दुकानातील त्या स्थितप्रज्ञ सेल्समॅननी दाखवलेल्या साड्यातं

एकाचा काठ, दुसरीचा पदर, तिसरीचा रंग, चौथीची डिझाइन वगैरे एकत्र असणारी साडी तिला हवी होती. साडीला पोत असतो म्हणे, आणि साड्यांच्या व्हरायटीला वेगवेगळी नावं देखील असतात म्हणे. मी म्हटलं, उगाच नावं का ठेवा? पण एकुलत्या एक साडीच्या शोधात काही तास खर्चल्यावर एकूण तिने दोन साड्या पसंत केल्या. वेगवेगळ्या आठ दहा दुकानांतून दोन साड्या हिच्या पसंतीस पडाव्यात म्हणजे हा दादरच्या साडी विक्रेत्यांसाठी मोठा दिवस म्हटला जायला हवा!

एकूण पाच सात तासांच्या खरेदीत पोरांचे ड्रेस घ्यायला अर्धा तास, माझे जाकिट, दुकान शोधण्याचा वेळ वगळला तर, पाच मिनिटे नि बाकीच्या वेळात दोन साड्या! पोरं शेवटी कंटाळली. कुरकूर करू लागली. त्यांचं बरंय, हा ऑप्शन मला उपलब्ध नव्हता. तेव्हा साड्यांच्या दुकानात मिळेल त्या स्टुलावर बसून छान आहे, सुरेख, तुला शोभेल किंवा भडक आहे, काहीतरीच वगैरे शेरे हिच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून मारत राहणे इतकेच काम उरलेले मला. अर्थात पैशांचे पाकिट रिकामं करणं इतकं सोडून.

जिवाची मुंबई करून झाली. घरी परतलो तर ही समाधानाने म्हणाली, कुठं जाणं नको नि येणं नको मेलं. मी म्हटलं आता तरी ही लग्नाची तयारी संपली म्हणायची. साड्या खरेदीची हिची योजना मात्र पूर्ण तयारीने बनवलेली. म्हणजे झालं असं, दुसऱ्याच दिवशी घरी आलेली हिची एक मैत्रीण. मी बाहेरच्या खोलीत येऊन बसलो तरी हिला पत्ता नव्हता एवढी गप्पांत दंगलेली. आत जोरदार आजच्या, कालच्या नि परवाच्या ठळक बातम्या ऐकवल्या जात

होत्या. गंमत म्हणजे दोघी एकाचवेळी बोलत होत्या. मला आठवलं, एकदा हिला मी म्हटलेलं,"काय गं, तुम्ही दोन बायका जमल्या की एकाच वेळी कसं काय बोलता?" यावर तिचं उत्तर अगदी ताडकन आलेलं,"किती अज्ञान एका माणसाचं! ऐकतात कानाने नि बोलतात तोंडाने! तुम्हाला काय कळणार म्हणा! एकावेळी कितीतरी कामं करायची सवय असते आम्हाला!"

यावर मी काय बोलणार? एका कानाने ऐकून गप्प राहिलो झालं.

तर सांगत त्या गप्पांबद्दल होतो. हिने बोलता बोलता सांगितलं.. बरंच काही बोलत होत्या दोघी. पण मुद्द्याची गोष्ट ही..

"तुला सांगते शरू, यांना माझी किंमत म्हणून नाही अजिबात. दोन वर्ष बायकोसाठी नवीन साडी म्हणून घेतली नाही. या लग्नाचं आमंत्रण काय आलं, जरा हात म्हटलं ढिला सोडायला लावते. एक नाही दोन साड्या आणायला लावल्या काल.. गाठ माझ्याशी आहे म्हटलं!"

थोडक्यात गनिमी कावा फक्त मलाच जमतो असं नाही. खरंतर हिलाच अधिक जमतो हे खरं!

५.

आम्हाला आलेल्या लग्नाच्या आमंत्रणाची गोष्ट कानोकानी झाली. रस्त्यात कुणीही भेटलं की हटकून विचारू लागला,"काय झाली का तयारी?"

पहिल्यांदा मला कळेनाच. मीच विचारायचो,

"कसली तयारी?"

"कसली काय? सगळा देश एकाच गोष्टीच्या तयारीत मग्न आहे.."

"कसल्या?"

"उगाच वेड पांघरून पेडगावला जाताय राव! अर्थात गरोडियांच्या घरचं लग्न! अजून काय?"

लग्न धुडमल शेटच्या घरी नि इकडे भाव वाढलेला तो माझा. समर्थाघरीचे आवतण.. त्यास सर्वही देती मान हे खरेच!

"कमाल आहे हा तुमची. मोठी माणसं तुम्ही!" "धुडमलच्या लग्नाला आमंत्रण म्हणजे काय साधी गोष्ट आहे?"

"तुमचा फोटोदेखील छापलाय म्हणे! तुम्ही एवढे मोठे असाल असं वाटलं नाही कधी!"

"तुम्ही जाताय म्हणे सहकुटुंब!"

असली कवतिकं ऐकल्यावर वाटलं माझ्या पाठीमागे काय बोलत असतील?

"कसलं काय नि कसलं काय! शेटकडे कामाला आहे नि तोरा कसला मिरवतोय? जणू स्वत:च शेट!"

"हुं.. लग्नाला आमंत्रण म्हणजे आकाशाला हात पोहोचले की काय?"

"ह्याची बायको असते नाचत सांगत, धुडमलकडे लग्नाला जातायेत. दोन नंबरचा पैसा हो शेटचा! मी असतो तर गेलो नसतो!"

"जातोय खरा.. अहेर काय देईल? कप्पाळ?"

माझी खात्री होती, कुणीना कुणी ह्यातलं काही ना काही पाठीमागून बोलत असणार.

लग्नघटिका समीप येत आली. घटिका म्हणजे लग्नाचा दिवस. सकाळचं आमंत्रण होतं ते सगळ्या स्टाफला. त्यामुळे सकाळी जाणं आलं. आधीचे पाच दहा समारंभ कुठे कुठे पार पडलेले. आता हा अजून एक. दर समारंभागणिक लोकांचा त्यातला रस वाढत चाललाय. नि आमच्या आजूबाजूच्यांची आमच्याकडे बघायची दृष्टी बदलत चाललीय. आधी कौतुक होतं.. आता कदाचित असूया. असेल. धुडमलशेटना मी काही सांगितलं नव्हतं आमंत्रण द्या म्हणून.

प्रत्यक्ष लग्नाचा दिवस उगवला.

आदल्या दिवशी पोरं शहाण्यासारखी लवकर झोपून गेलेली. नवीन कपडे घालून मिरवण्याची स्वप्न पाहात. एरवी झोपा म्हणून ओरडलं तरी मस्ती करणारी दोघं पटकन झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी दिवाळसणासारखे लवकर जागे झाले सारे. पोरं शहाण्यासारखी उठून तयार व्हायला लागली. पोरगा अर्धवट झोपेत तयार झालेला, एकाएकी म्हणाला ही,"आई मी जाऊ फटाके फोडायला?"

मग माझी फटाकडी छोटी काय सोडतेय त्याला?

"आई, दादाला वाटतंय आज दिवाळी आहे म्हणून! हे! हे! वेडा!"

पोरं एकमेकांना चिडवेपर्यंत आमची तयार व्हायची वेळ झाली. माझं नवीन जॅकेट चढलं अंगावर. तोवर ही दोनांपैकी कोणती साडी नेसू याचा मनाशीच विचार करत होती.

"कुठली नेसू हो साडी?"

"कुठलीही नेस! तुला सगळ्याच शोभतात!"

सगळ्याच सारख्या या ऐवजी सगळ्याच 'शोभतात' हा सुरक्षित शब्द वापरत मी निर्णय तिच्यावर ढकलला.

"तुम्हाला काही विचारून फायदा नाही.. सगळं मेलं मलाच बघावं लागतं इथे!"

एवढं बोलून ती साडी निवडण्याच्या महत्वाच्या कामाला लागली.

आमची वरात घरातून निघाली तोवर साडेदहा वाजून गेलेले. एवढ्या थोरामोठ्यांच्या लग्नाला काय बसने लटकत जाणार? मग टॅक्सी बोलावणं आलं. गाडीत बसायला मिळणार म्हणून पोरं आधीच उल्हास त्यात अजूनच उल्हसित होऊन नाचायला लागली. वेळ थोडा होता, त्यातही पोरं धावत जाऊन 'आम्ही है ना टॅक्सीने जाणारे..' अशी उद्घोषणा बाकी घरात करायला धावली. अर्ध्या पाऊण तासात हिची तयारी आटोपली.

टॅक्सी घरासमोर येऊन थांबली.. सिनेमात जसा करकचून ब्रेक मारतात तशी ब्रेक मारत थांबली.

- आणि माझ्या स्वप्नाला करकचून ब्रेक लागला..

६.

गरोडिया इंडस्ट्रीजचा मी एकनिष्ठ नोकर. वीस-पंचवीस वर्षे एकाच नोकरीत टिकायचे दिवस होते ते. तिथे चिकटलो नि तिथेच टिकलो.

धुडमलशेटच्या मुलाच्या शाही विवाहाची चर्चा सुरू होती. वेगवेगळे समारंभ झडत होते. अशात कंपनीत बातमी आलेली, शेट आपल्या सर्व नोकर नि कर्मचारीवर्गास खास आमंत्रण देणार आहे. धुडमलची कीर्ती तशी एक नंबर कंजूष अशी होती त्यामुळे आपल्याच कर्मचाऱ्यांना बोलवण्याचा अव्यापारेषु व्यापार शेटजी करणार नाहीत हे सगळ्यांना समजत होते पण उमजत नव्हते. त्या बातमी नंतर माझी धडधड वाढलेली. न जाणो खरंच आमंत्रण आले तर? कसाबसा महिना निघतोय, खर्चाचा ताळमेळ बसवता बसवता नाकी नऊ येताहेत नि त्या दुष्काळात हा तेरावा महिना आला तर? मग मनी वसे ते स्वप्नी दिसायला मग वेळ तो काय लागणार?

आता याची आठवण येण्यास कारण झाले ते हल्लीच एका मोठ्या नि धनाढ्य व बलाढ्य उद्योगपतीच्या सुपुत्राच्या लग्नाची आलेली मोठी बातमी. विविध सोहळे झाले. मोठमोठे लोक लग्नात हजेरी लावून जायला लागले. पेपर नि टीव्हीत एकच बातमी.

आणि मला तो आमचा काळ आठवला.

धुडमलशेट गरोडिया आणि त्यांच्या इंडस्ट्रीज. त्यावेळी ते नावच मोठं होतं. शेवटी काळ कुठला ही असो, धनाढ्यता ही महत्वाची. समर्थाघरीच्या श्वानासही मान मिळत असेल तर त्याच्या घरच्या विवाहाच्या वेळी इतपत उन्माद तर हवाच. या इतिहासाची पुनरावृत्ती म्हणावी अशा सोहळ्यामुळे ही जुनी आठवण निघावी..


आठवण नुसती कसली निघतेय.. अगदी सविस्तर स्वप्नच आठवतेय तेव्हा पडलेलं.

त्या धुडमलसुताच्या विवाहाचं आमंत्रण अर्थातच गरोडिया इंडस्ट्रीजच्या कोणाही कर्मचाऱ्याला आलं नाही. कित्येक जण तेव्हा चिडलेले, शेटजीनं कमीतकमी नुसतं आमंत्रण तरी द्यायला हवे होतं म्हणून. पण मी निवांत होतो.. एकदाचा तो विवाह सोहळा संपला.. आमंत्रण शेवटपर्यंत आलं नाही नि मी नि:श्वास सोडलेला. पण तेव्हा एका रात्री पडलेलं स्वप्न मात्र चांगलंच आठवणीत राहिलं!

कुणास ठाऊक.. आताच्या या धनाढ्य उद्योगपतीच्या पुत्राच्या विवाहाच्या वेळी कदाचित त्याच्या कर्मचाऱ्यांपैकी कुणाला हे असलं स्वप्न आताही पडत असेल!

लीलाई दिवाळी २०२४

# आमच्या घरातील वास्तुशास्त्र



घरात शिरलो तर काहीतरी विचित्र आवाज ऐकू आला. कसला आवाज असावा याचा विचार करत होतो तोच ही बाहेर आली.

"कसला विचार करताय? अहो हा आवाज आहे पिगलेटचा."

"पिगलेट? हा कोण?"

"पिगलेट म्हणजे डुकराचे पिल्लू. पिगलेट म्हणतात त्याला. किती गोड आहे ना आवाज."

"बापरे ! डुकराचे पिल्लू? कुठून शिरले सोसायटीत? आणि तुला हा आवाज गोड वाटतोय? म्युनिसिपालटीत कळवून हाकलून लावले पाहिजे."

"दर्शन म्हात्रे."

माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत ही म्हणाली.

'दर्शन म्हात्रे? हे काय?"

"नाव आहे."

"डुकराचे? आडनावासकट?"

कुत्र्याला टॉमी बिमी अशी नावं असतात पण तरी कोणी कुत्र्याला आडनाव ठेवलेले ऐकले नाही मी. मोत्या देशपांडे किंवा टॉमी ठाकूर अशी नावं कुणी ऐकली आहेत का?

"अहो हे त्या पिग्लेटचे नाही, त्या वास्तु कन्सलटंट चे नाव आहे."

"वास्तु कन्सल्टंट?"

"हो. आम्ही बोलावलेले दर्शनसरांना. आपल्याकडे फारच गोंधळ माजलाय तो निस्तरायला." ही आपली आपल्याच तंद्रीत होती.

दर्शन सर? आणि वास्तु? नवीन काय वाढून ठेवलेय कुणास ठाऊक मी मनात म्हणालो.

"अहो, काय झालंय आपल्या बाब्या नीट अभ्यास करत नाही, मनी नुसतीच टीव्ही पाहत बसते. आपल्याला पैसे नेहमीच कमी पडतात, तुमचे प्रमोशन काही होता होत नाही, महागाई जाम वाढलीये."

हिने सगळी जंत्रीच सादर केली. आता यात काही चूक होती असे नाही पण याचा डुकराशी संबंध काय ते मला कळले नाही.

"अहो, आपल्या बिल्डिंगीत सर्वांनाच काहीना काही प्रॉब्लेम आहेत. वास्तुतच दोष आहे असे आम्हाला वाटले म्हणून आमच्या साळकाया महिला मंडळाने दर्शन सरांना बोलावले. ते डिटेल मध्ये करतायत अभ्यास वास्तुचा."

"डुक्कर खाऊन टाकेल वास्तुदोष?"

"अगदी बरोबर. दर्शन सर पण हेच म्हणाले. अजूनही उपाय सांगणार आहेत पण त्यासाठी ते बिल्डिंग आणि प्रत्येक घराचा नीट अभ्यास करताहेत. सध्या त्यांनी दोन ऑप्शन्स दिले होते. एक कासव आणि दुसरे डुक्कर."

"कशासाठी?"

"अहो वास्तुदोष काढायला. कासव खूप जणांकडे असते पण डुकराचे तसे नाहीना. डुक्कर यंत्र पण चालेल म्हणाले पण आम्ही म्हटलं जिता जागता पिग्लेटच आणू म्हणजे बरं."

"सोसायटीने बरी परमिशन दिली?"

"न देऊन जातात कुठे? आपले सेक्रेटरी रामनाथन ची बायकोच तर पुढे पुढे करत होती. रामनाथन नाही म्हणून सांगतात कोणाला? आणि आम्ही ते पिग्लेट आणलं सुद्धा. किती क्यूट आहे सांगू."

मी डोक्याला हात मारला. दर्शन म्हात्रे म्हणे. काय आरती म्हणतो काय? मी मनातल्या मनात त्याला शिव्या घालायची मनोकामना पूर्ण करून घेतली.

"मग कुठे पार्क केलंय ते डुक्कर?"

’सर म्हणाले पूर्वेस ठेवा, म्हणून त्याचे घर बांधले आहे बिल्डिंग मागेच. आणि त्याला डुक्कर काय म्हणता?"

"मग काय त्याला उंट म्हणू?"

"नाही हो, पिग्लेट म्हणा. डुक्कर म्हटलं की कसं गावठी गटारात लोळणारं काळं डुक्कर डोळ्यासमोर येतं आणि आमचा पिग्लेट किती स्वच्छ आणि सुंदर आहे."

"म्हणजे डुक्कर म्हणजे पायजमा घालणारा गावठी आणि पिग्लेट म्हणजे सूट बूट टाय तील साहेब की काय?"

"अहो, ते जाऊ द्या पण आम्ही ना थोड्या मोठ्या साइझचेच आणले पिल्लू, म्हणजे त्याची पॉवर अख्ख्या सोसायटीवर चालेल. खूप पॉवरफुल्ल आहे म्हणे ते."

हॉर्स पॉवर ऐकले आहे मी पण डुक्कर पॉवर? किंवा पिगपॉवर ?

"अहो, त्या पिग्लेटच्या गुडलक चार्मने पहा सर्व घरेच बदलतील सोसायटीतील."

डुक्कर आणि चार्म? आणि त्यात परत गुडलक. मी चक्रावलो, पण ही आपल्याच तंद्रीत पुढे म्हणाली,

"आता हे पिग्लेट आलंच आहे, पण आजच त्यावरून भांडणं झालीत. म्हणजे त्याला खाऊ कोण घालणार? सर्वांनाच पुढे पुढे करायला पाहिजे पण मी निक्षून सांगितलंय, पिगूचं लंच मी भरवणार. डिनर वरून सिंग आंटी नि डबराल आंटीत वाजलं खूप आज."

फेंगशुई नि वास्तू ने आमच्या घरात असा चंचुप्रवेश केला. आणि थोड्याच दिवसात अरब आणि उंटाच्या गोष्टी सारखे झाले. मी अरब आणि ते डुक्कर उंट. कारण थोड्याच दिवसात घडले ते असे :

रविवार दुपारची वेळ. आज खास बेत असावा असे दिसत होते. म्हणजे सकाळपासूनच हिची धावपळ चालली होती आणि स्वयंपाक खोलीतून मस्त सुवास येत होता. इकडे माझ्या पोटात कावळे कोकलत होते.

"काय आज स्पेशल बेत?"

"हो ना. आज आहेच काहीतरी खास."

"काय आहे सांग तरी?"

"अहो मुर्ग टमाटर बनवतेय."

"लवकर वाढ. तोंडाला नुसतं पाणी सुटलंय बघ. आज काय बरं खास?"

"अहो आज आपला दुष्यंत एक महिन्याचा झाला ना त्या साठी हा खास मेनू."

"हा दुष्यंत कोण?"

"अहो, असे काय करता आपला पिग्लेट. आम्ही कालच त्याचं बारसे केले. त्यातही भांडण. शेवटी आम्ही मराठीच नाव ठेवलं त्याला. आज त्याला आपल्याकडे येऊन एक महिना झाला म्हणून मुर्ग टमाटर आणि सरसोंका साग. व्हेट नी दिलीय रेसिपी मुद्दाम."

असे म्हणून हिने गरमागरम जेवण ताटलीत वाढले देखील.

"मी जरा दुष्यंतास भरवून येते, तुम्ही जेऊन घ्या, आपल्यासाठी आज साधेच वरण भात आहे कुकरमध्ये."

असे बोलून ही घराबाहेर पडली सुद्धा. मी खातोय गवतपाला आणि त्या डुकरास सोन्याचा चारा? आपल्यात एक वर्षाचा कोणी झाला तरी कोणी साधे जेवण देखील जेवत नाही आणि डुकरांच्यात साग्र संगीत जेवणाची पद्धत? मी

वैतागलो पण सांगणार कोणाला? रविवार दुपारी वरण भात खात बसलो मुकाट्याने, तिकडे तो डुक्कर खातोय मुर्ग टमाटर.

पुढे वास्तुचे आणि फेंगशुईचे प्रयोग येता जाता सुरू झाले.

एके दिवशी तर अजूनच गंमत झाली. घरी आलो तर सोफासेट सगळे भिंतीकडे तोंडकरून ठेवलेले. लहानमुलाने रुसून बसवे असे ते दिसत होते. म्हटले ही आता का आवरतेय या वेळी?

"आवराआवर नाही काही, ती तर झाली करून. हे आता असेच ठेवायचे आहेत. दर्शन सरांनी सांगितलंय. त्यामुळे लक्ष्मीला यायला नीट जागा मिळेल."

"लक्ष्मी कोण? नवीन गाय की म्हैस? तुमच्या दर्शन सरांनी गोमातेस घरात ठेवा सांगितले की काय?"

"नाही हो. ओरिजिनल लक्ष्मी, मिसेस विष्णू. पहा नक्कीच तुम्हाला प्रमोशन मिळून पगार वाढतो की नाही?"

"पण यावर बसायचे कसे?"

"ते जाऊ द्या हो. आता मी भिंतींवर आरसे बसवून घेणार आहे म्हणजे निगेटिव्ह एनर्जी घराबाहेर जाईल."

असे म्हणून ही हातात ताट घेऊन घराबाहेर पडली.

"निगेटिव्ह एनर्जी? कुठे चाललीस?"

"दुष्याला डिनर द्यायला चाललेय. आज सिन्हाबाई नाहीत म्हणून माझी टर्न. सिन्हाबाईंच्या नणंदेच्या मुलाच्या मुलीच्या मैत्रिणीच्या भावाचा साखरपुडा आहे तिथे गेली ती. तुम्ही बसा."

असे म्हणून ही दिसेनाशी झाली.

बसा? आणि कोठे? आणि या भिंती पाहात? डोक्यावर हात मारत मी जमिनीवर बसकण मारली. हे सगळे कोठवर जाईल कोणास ठाऊक? माझ्या रूपातील अरबास या डुक्कर रूपातील उंटाने घराबाहेर हाकलवण्याची तयारी चालवली होती. विचार केला तर खरा उंट कोण? ते डुक्कर की दर्शन म्हात्रे? तरी पण विचार करणे मला अलाऊड नव्हते. पुढे काय झाले कोणास ठाऊक पण दोनच दिवसांत सोफे सरळ झाले.

ही म्हणाली, "दररोज फक्त एकदा ते तसे हलवायचे नि नीट परत ठेवायचे असे सांगितलंय सरांनी. माझा थोडा समजण्यात घोटाळा झाला. आता सकाळी उठलात ना की दररोज तुम्ही फक्त हे करून द्या बरंका प्लीज. माझी कंबर दुखते म्हणून. नाहीतर मीच केले असते सगळे."

हा माझ्यामागे नवीन व्याप, तोही रोज सकाळी सकाळी. त्यात एनर्जी खर्च होऊ लागली. कुठली तरी का होईना एनर्जी जाणे महत्त्वाचे.

एकदा घराबाहेर शाळेत असते तशी मोठी घंटाच टांगलेली दिसली. ह्या घंटानादाने पॉझिटीव्ह एनर्जी घरात खेळेल असे ही म्हणाली. नंतर एकदा घरात शिरताच दारासमोरच एक पडदा आला. अजून कुठला एनर्जीचा प्रकार बाकी असावा याचा मी विचार करू लागलो. तर ही म्हणाली हा पडदा दुष्ट शक्तींना बाहेर ठेवेल म्हणून. मग मी या दुष्ट शक्ती अशा पडदेवाल्यांच्या घरात शिरता यावे म्हणून काय उपाय करत असाव्यात याचा विचार करू लागलो.

माझ्या प्रमोशनची, म्हणजे ते न होण्याची गोष्ट मी हिला एकदा सांगितली होती. तर ही म्हणाली, "तुम्ही काळजी करू नका, मी दर्शनसरांना विचारते, नक्कीच काहीतरी तोडगा मिळेल."

मी घाबरलो.

दुसऱ्या दिवशी ही म्हणाली,"तुम्ही तुमच्या केबिन बाहेर पडदा लावा पिवळा छोट्या फुला फुलांच्या नक्षीचा."

"पडदा? ते काय हॉटेल आहे?"

माझ्याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत ही म्हणाली,"कारण तुमची आणि तुमच्या साहेबांची केबिन यातील जो कोन आहे ना त्यामुळे तुमचे प्रमोशन अडते आहे. पडदा लावा म्हणजे काम होईल. नाहीतर एक आरसा लावा, बहिर्गोल."

"ते काय टॉयलेट आहे की सलून? आरसा लावा म्हणायला."

"नाही हो. तसे नाही बहुधा अंतर्गोल लावा म्हणाले सर. मला मेलीला लक्षात राहात नाही बघा, विचारून सांगते."

आता हिच्या मेमरीसाठी आणि नवीन काही घरात येईल कोणास ठाऊक?

मी मात्र तिला म्हणालो,"हे पहा, माझे प्रमोशन झाले तर तिथल्या साहेबाचे काय होईल? आणि तिथून तो हलू नये म्हणून त्याने लाल पडदा पिवळ्या फुलांचा लावला तर?"

माझा चेष्टेचा सूर तिच्या लक्षात आला असावा.

"तुम्हाला नाही श्रद्धा तर नसू दे मी आपली एवढे करते तुमच्यासाठी."

एवढ्यात तिच्या डोळ्यात पाणी येईल की काय वाटले नि मी घाबरलो. नशिबाने तो विषय तिथेच संपला.

योगायोग बघा पण त्यानंतर तीन चार दिवसात साहेबाची बदली झाली आणि माझे प्रमोशन. हिला ते सांगितले तर ती खूश तर झालीच आणि म्हणाली,

"पहा मी म्हटलं होतंना, नुसत्या पडद्या, आरशाच्या नावानेच गुण आला, प्रत्यक्ष लावले असते तर अख्खी कंपनीच तुमच्या मालकीची झाली असती. सर म्हणाले तसेच झाले."

मी यावर काय बोलणार?

नंतर एक दिवशी ही पोळया लाटत होती, ती ओट्याला काटकोनात उभी राहून. बाजूला वळून वळून गॅस वरच्या तव्यावर टाकायची कसरत चालली होती.

"हे काय गं ही कुठली पद्धत?"

आता पर्यंत अशा गोष्टींची खरंतर मला सवय व्हायला हवी होती.

'काही नाही हो, हा ओटा जरा चुकीच्या दिशेला आहे. तो पहा दिशांचा चार्ट."

हिने पूर्व पश्चिम पासून ईशान्य नैऋत्य वगैरे दिशांचा मोठा चार्टच फ्रेम करून लावला होता.

"ओट्या समोर पूर्व नको, ओटा इशान्येस हवा. अग्नीची दिशा वायव्येस आणि पाणी आग्नेयेकडून वहावे. सगळेच उलटे पालटे आहे इथे. त्यातल्या त्यात मी तोंड फिरवून दिशा ॲडजस्ट करते जमेल तेव्हढी पण नंतर हा नवीन ओटा बनवावाच लागेल."

झाले एवढेच, नेहमी मऊसूत होणाऱ्या पोळया आज जरा कडक झाल्या आणि थोड्या करपल्या. पण हे तिला सांगायची सोय नव्हती.

पुढे मग अंतर्गोल, बहिर्गोल नि सपाट आरसे लागले, कुठे कुठे पडदे लागले. खिडक्यात घुंगरासारखे आवाज करणारी घंटी लागली.

एकदा तर कमाल झाली. रात्री बारा वाजलेले. मी गाढ झोपेत. हिने उठवले

"उठा लवकर."

"काय झाले?" मी डोळे चोळत म्हणालो.

"तसे झोपा."

"तसे म्हणजे?"

"तुमचे तोंड ईशान्येकडे नि पाय वायव्ये कडे ठेऊन."

झोपेतही तिच्या तोंडी दिशा आणि त्याही चुकवीत होती. ईशान्य वायव्य झोपण्या इतका मी फ़्लेक्सिबल नव्हतो.

"नाहीतर मुख पश्चिमेस आणि पाय उत्तरेस करा. सर असेच म्हणाले."

"मी काय फोल्डिंग आहे वाटते तुला? नीट वाच आणि तुझा तो दिशांचा तक्ता आहे तो प्रत्येक खोलीत एक लावून घे."

रात्री बारा वाजता ही उत्साहात उठून कागद घेऊन आली.

"सॉरी. तोंड पश्चिमेस आणि पाय पूर्वेस असे झोपा."

मी सुटकेचा निश्वास टाकला. कमीतकमी सरळ तर झोपता येईल, दिशा कुठली का असेना म्हणून पटकन झोपून गेलो.

सकाळी ही म्हणाली, "आता दररोज वेस्ट इस्ट झोपा."

"म्हणजे सगळे बेस्ट होईल." मी म्हणालो.

"अहो, त्यामुळे पॉझिटीव्ह वाइब्स येतील."

"व्हाइब्स? म्हणजे ?"

"सर म्हणाले तेच. व्हाइब्स. काहीही असो पॉझिटिव्ह आहे ना, मग झाले."

'फक्त तू एक कर रात्रभर जागी राहून पाहा मी दिशा बदलत नाहीना' मी म्हणणार होतो, पण म्हटलं झोपता येतंय सरळ तोवर राहू दे. उद्या दुष्ट शक्तींच्या सामन्या साठी कदाचित रात्रभर जागे रहावे लागायचे नाहीतर ऊर्ध्व अधर म्हणजे उभे राहून झोपावे लागायचे. उगाच जास्त चेष्टा नको म्हणून गप्प राहिलो.

असे प्रयोग वरचे वर होत राहिले. पिग्लेट पण मोठा झाला. त्याचा पिग-लेट पणा जाऊन तो पिग झाला. डुकरांचे बालपण किती दिवसांचे असते कोणास ठाऊक पण समस्त भगिनी वर्गाच्या हातचे फोर कोर्स मिल्स खाऊन नक्कीच हा लवकर मोठा झाला असणार. सोसायटीभर उंडारणाऱ्या डुकराला नक्कीच गटारांचे नि चिखलाचे आकर्षण वाटत असणार. कारण एके दिवशी तो गेट मधून बाहेर पळून गेला आणि परत आला ते काळेकुट्ट होऊन. सोसायटीत हलकल्लोळ माजला.

"काय झाले गं?"

"दुष्यंत गटारीत पडला, कुठे लागले बिगले नाही नशिबाने. आम्ही त्याला नळीने अंघोळ घातली. नशिब लागले नाही. पाय बिय मोडला असता तर?"

मी काही बोललो नाही. शेवटी वराह महाशयांना आपल्या डुकरत्वाची जाणीव झाली म्हणायची. नंतर रोजच असे होऊ लागले. भगिनी वर्गाच्या हातचे सुग्रास भोजन खाण्यापेक्षा त्याला उकिरडे फुंकण्यात जास्त मजा येत असावी. काही दिवसातच बायका समजायचं ते समजल्या. आणि जड अंत:करणाने

गावाबाहेरच्या चांगल्याशा उकिरड्यावर त्याला बिदाई देण्यात आली. त्याला सोडले तसे त्याने लगेच त्या कचऱ्याच्या ढिगात तोंड खुपसले म्हणे. बिचारा फार दिवसांपासून भुकेला असावा. पुढे  चिखलात मनसोक्त लोळून आणि गटारात हुंदडून त्याने आपला स्वातंत्र्यदिन साजरा केला असणार.

भगिनी वर्ग परतता परताताच कासव खरंखुरं आणायचं की कासव यंत्र आणायचं या चर्चेत गुंतला.

आता हे माझ्या अंगवळणी पडून गेलंय. मूक पणे मी पाहात राहातो. नवी ॲडिशन्स होतात, कधी घरातील सामानाची दिशा बदलते, कुठे पडदे लागतात तर कुठे आरसे लागतात. मला फक्त आता एकाच गोष्टीचे टेन्शन आहे. कधी हिचे दर्शन सर हिला सल्ला देतील नि ही दरवाजा ऐवजी मला खिडकीतून प्रवेश करायला लावेल. दिशा महत्वाची. ती चुकू नये मग त्यासाठी डोंबाऱ्यासारख्या उड्या मारायला लागल्या तरी चालेल. त्यासाठी ही म्हणेल असे तुम्ही आग्नेयेतून घरात शिरलात ना तर प्रकृतीचे विकार टळतील. मी तरी काय करणार? हिचा हुकूम मानेन ही आणि दररोज उड्या मारून घरात येईन ही. शेवटी प्रश्न प्रकृतिचा आहे!

हास्यानंद दिवाळी २०१६

# एका लग्नाच्या मागणीची गोष्ट

मंदार आणि मनाली यांची ही प्रेमकहाणी. खऱ्या अर्थाने ती प्रेमकथा नाहीच. नेहमीच्या कथांहून ही जरा हटके आहे बरे.

कित्येक सिनेमे कसे नेहमीच्यापेक्षा हटके असतात तशी ! का हटके ? वेल, कथालेखक म्हणतो म्हणून.

मंदार. मंदार भुसनळे.

भुसनळेकुलोत्पन्न गजाभाऊ भुसनळेंचा ज्येष्ठ पुत्र. त्याच्या जन्मानंतर गजाभाऊंनी चांदीचा कळस भुसनळे बुद्रुक च्या गावदेवीला चढवला होता. मंदारला मात्र आता भुसनळे आणि मंदार हे नाव मिसमॅच वाटू लागले हल्ली. पेपरातल्या 'मी सुधीर गोपाळ गजभिये यापुढे धीरज गोपाळ घोडनवरे या नावाने ओळखला जाईन' अशा छोटी जाहिराती पाहून मंदारला पण आपले नाव बदलून मंदार गजाभाऊ गोडबोले, नाहीतर ठाकूर नाहीतर कोकाटे किंवा अगदीच फातरपेकर ठेऊन घ्यावेसे वाटत होते. पण चांदीचा कळस बसवणारे तीर्थरूप (तो कळस पुढे चोरीस गेला हा भाग निराळा) याची कधीच परवानगी देणार नाहीत याची त्याला खात्री होती, मग कॉलेजात गेल्यावर तो मंदार जी.बी. म्हणून नाव लावीत असे. अर्थात दरवेळी हे आडनाव लपवणे त्याला जमत असेच असे नाही.

ती. मनाली.

रावसाहेब ठाकूरांची एकुलती एक कन्या. रावसाहेब म्हणजे रावसाहेब म्हटल्यावर जसे चित्र डोळ्यापुढे येईल तसे. रावसाहेबांची ती लाडकी. तिच्यावर त्यांचे बारीक लक्ष. मनाली कॉलेजात गेली की रावसाहेबांना तिची चिंता. या उलट कॉलेज हे फुकटचे वधूवर सूचक मंडळ असल्याचा मनालीचा समज. रावसाहेबांना मात्र तो माहित नसावा. जनरेशन गॅप आणि काय?

तर मंदार बी. आणि मनाली टी. दोघे एकाच कॉलेजात. मंदार हुशार आणि कलानिपुण आणि सर्व खेळांत पुढे. मनाली अति सुंदरतेचा नमुना. दोघांचे वरील वर्णन खरे तर खोटे आहे. दोघे ही तसे सामान्यच. तरीही ते एकमेकांच्या प्रेमात का पडावेत? त्याला मनाली का आवडावी? तिला ही तो त्याच्या आडनावासकट का आवडावा?

कारण सरळ आहे. लेखक म्हणतो म्हणून! मायबाप वाचक प्रेक्षक बनून सिनेमा पाहतात (ते ही खिसा हलका करून) तेव्हा कुठल्याशा पिच्चर मध्ये उदय चोप्राच्या मागे बिपाशा बसू लागते हे ॲक्सेप्ट करतात तर या पापभीरू लेखकाच्या गोष्टीत मनालीच्या प्रेमात मंदार किंवा उलट सुलट (म्हणजे vice versa!) हे ते उदार अंत:करणाने मानतील याबद्दल माझ्या मनात तसूभर किंवा तीळमात्र ही शंका नाही! असो. तर मंदार आणि मनालीची प्रेमकहाणी अशीच फुलली. बहरली. त्या भरात मंदार टेंपरवारी कवी देखील झाला.

माझी खरी खुशाली
तू गोड ग मनाली
बोट माझी ही बुडाली

तू नाही का म्हणाली

किंवा

तोडीन फूल पाने

तोडीन चंद्र तारे

तू मनालीस जात

व्यर्थ वाटे सारे

(हे काव्य कॉलेजच्या मनाली ट्रेक वेळी. मनाली गेली पण मंदार नाही. तेव्हाचे हे विरह गीत !)

हे काव्य प्रेम माणसाला काय काय करायला लावू शकते याचा नमुना होते. अशा आकंठ प्रेमात डुंबणाऱ्या नि हवेत उडणाऱ्या जोड्यांना जमिनीवर यावेच लागते ते लॉजिकल शेवटासाठी !

म्हणजे लग्नासाठी !

प्रेमकथेत स्टेजेस असतात. ओळख, प्रेम, इकरार-इजहार, मग आपल्या घरी जाहीर नामा. त्यात कोणा कोणाचा आडवा हात. वगैरे वगैरे. हा फॉर्म्युला काही कधी चुकला नाही.

कहाणी पुढे सरकतेय..

सर्व प्रथम मंदारचे प्रपोझल मनालीस. तशी मनाली चतुर आहे. म्हणजे मंदारला वाटते की ती त वरून ताकभात ओळखेल. पण तरीही कन्फर्मेशन हवे. त्याची जीभ रेटेना. तोंडातून शब्द फुटेना. चिठ्ठी लिहू तर मायना काय लिहावा यावर तो अडकला. तशातच त्याच्या वाचनात ’अंतू पडला...’ नावाची कविता आली.

त्या मध्यरात्री त्याला घाम सुटला. स्वप्नात तो आमंत्रणे करतोय. आमच्या मनालीताईच्या लग्नाला यायचं हं. मग तिचा विवाह सोहळा. बाजूला मंदारच्या कल्पनेतील रावसाहेब. त्यांच्या खांद्यावर सिनेमातले डाकू घेऊन फिरतात तशी मोठाली बंदूक. मंदार, मनाली आणि तिच्या वरावर अक्षता टाकतोय. मंदार एकाएकी घाबरून जागा झाला. नंतर कसाबसा झोपून गेला.

दुसऱ्या दिवशी पहाटे मनालीला फोन.

"अर्जंट. लायब्ररीत ये. भेटायचेय."

"अरे, आज तर रविवार."

"सो व्हॉट? आठ ते चार लायब्ररी उघडी असते."

"मला जर्नल सबमिशन.."

"ते गेले खड्ड्यात. सॉरी सॉरी. आपण लायब्ररीत बसून खाऊ, सॉरी, कॅंटीन मध्ये बसून खाऊन लिहू. सॉरी, लायब्ररीत खाता खाता बोलू."

"तू काय बोलतोयस तुला तरी कळते का?"

"नाही. आठ वाजता. लायब्ररी. बाय."

तिच्या हो ना ची वाट न पाहता त्याने फोन ठेवून दिला. ही स्टाईल मोठ्या लोकांची. नुसती ऑर्डर द्या मग उत्तराचा प्रश्न नाही. त्याला आपण कोणीतरी मोठे झाले आहोत असा भास झाला.

मनाली तर येईल पण बोलू काय? तो विचारात पडला. एकाएकी त्याला हातपाय गळल्यासारखे वाटले. विचार करून दमला तो. नंतर एकाएकी त्याच्या सुपीक डोक्यातून आयडिया निघाली. पहाटेची वेळ म्हणजे त्याच्या डोक्यातून अशा कल्पना निघण्याची वेळ जणू !

आठ वाजता मनाली हातात जर्नल घेऊन येताना त्याला दिसली. आज त्याच्या नजरेत ती अधिकच छान दिसत होती. पाहून घेऊ. कल हो न हो. ती नाही म्हणाली तर..

"काय अर्जंट?"

"इथे नको. कॅंटीन. चल."

"माझे जर्नल..?"

"होईल. मी मदत करीन."

"तुझे झालेय?"

"माझ्यासमोर जर्नल हा अति क्षूद्र विषय आहे सध्या."

कॅंटीन मध्ये बसता बसता त्याने आपल्या खिशातून कागद काढला.

"वाच हे."

मनालीने पाहिले.

"कविता? तुझी?"

"नाही. पण वाच."

मनाली कविता वाचू लागली..

अंतू पडला....

अंतू नावाप्रमाणेच संतू
प्रेमात पडला परंतु
मनात होता पण किंतु
एक चिंतातुर जंतु
हो का नाही? नाही का हो?
काय म्हणे मंतू?

बसला लिहायला पत्र मंतूस
सांगू म्हणाला मनीचे गूज

प्रिय प्रियतर प्रियतम
छे! छे! फारच
खड खडतर खडतम
काय मनीचे गूज?
छे, छे, अलगूज
किंवा टरबूज?
प्रेम बनवते म्हणे कवी

मग ही जुळवाजुळव का हवी?
मंतूला आवडेल ही कविता नवी?
की सांगू सरळ?
काय सांगू? कसं सांगू?
काय लिहू? कसं लिहू?
हाय मैं क्या कहूं?
प्यार हुआ इकरार हुवा की
जिया बेकरार है?
छे! हिंदी नकोच..
माझी होशिल का ?
की
अजून काही? की
काही बाही?
काय बोलू कळत नाही

थांबीन दोन चार दिवस
जरा करतो विचार
चार दोन दोन चार ?
दिवस निघून गेले फार

मग एके दिवशी काय व्हावे?
नशिबच आपले कोणा ठावे?
समोर उभी ठाकली मंतू

त त प प झाला अंतू
माझ्या लग्नाला ये हां भाऊ
आम्ही तुझी वाट पाहू
मंतूचा स्वर मंजूळ मधुर
अंतूचे काळीज चूर चूर
हो ना, ताई येईन जरूर !
अंतू आहेच तसा चतुर
कोण बरे हा राजकुमार?
आहे एक
आला घोड्यावर स्वार

भर रस्त्यात व्हावे पंक्चर
काळजाचा ठोका चुकला
संपली प्रेमकहाणी
प्रेमातला अंतू
खरोखरीच पडला

"मग यात काय आहे अर्जंट?"

"काय अर्जंट? काल मला स्वप्न पडले. तुझ्या लग्नात मी अक्षता टाकतोय. बाजूला तुझे बाबा बंदूक घेऊन उभे. माझा अंतू झाला नि तू मंतू. माझा अंतू व्हायला नको असेल तर.."

मनाली जरनलच्या टेन्शन मधून बाहेर आली.

"घाबरू नकोस. काकांकडे बंदूक नाही आहे."

"काका?"

"मी बाबांना काका म्हणते."

"मग काय काकांना मिशीवाली आत्या?"

"तुला काय करायचे?"

"मला काय म्हणजे? माझे सासरे आहेत ते." तो एका झटक्यात बोलून गेला.

मनालीची इच्छा नसूनही तिला लाजणे थांबवता आले नाही.

"जास्तच चालते रे तुझी जीभ. पण जा. मला आवडली तुझी आयडिया ऑफ प्रपोझल."

मनाली लाजत बोलली खरी. मंदारचा कानावर विश्वास बसेना.

"पण एक प्रॉब्लेम आहे.."

"प्रॉब्लेम?"

"माझे बाबा.."

"आता बाबा कोण? आजोबा?"

"खरे बाबा. म्हणजे काका."

"म्हणजे रावसाहेब ठाकूर."

"हां. ते मानतील? तू मला तर प्रपोज केले आडवळणाने. त्यांना डायरेक्ट विचारावे लागेल."

"म्हणजे?"

"म्हणजे.."

"सिंपल. तुमची कन्या, सुकन्या म्हणा हवंतर, मनालीशी मला लग्न करायचेय. अशा शब्दांत सांगू?"

"मंदार विचार कर. मला नाही वाटत काका म्हणजे माझे बाबा मानतील. इट डिपेंड्स हाऊ यू डू इट. त्यांचा भरोसा नाही. त्यांना तुझी पद्धत आवडली तर झटक्यात ऐकतील. नाहीतर हाकलून देतील. ट्राय युवर लक."

"म्हणजे तुझ्या सारखेच की. तुला आवडली मागणी घालायची पद्धत तशी. आणि काय माय लक? मी काय तुझ्या डोक्यावर अक्षता टाकू की काय?"

"काय हरकत आहे मंदार, सॉरी मंदार भाऊ?"

ती चिडवत बोलली आणि चिमटा काढून निघून गेली.

फायनल झाली. कॉलेज संपायला आलेले. मनालीला कॉलेजात भेटणे सोपे. आता सासरेबुवांवर प्रयोग करावाच लागेल. आजवर प्रपोझलच्या एवढ्या पद्धती पाहिल्या. पण कुणी 'सासऱ्या सासरा होशील का?' असे म्हटले नसेल. मंदारच्या डोक्यात चक्रे चालू. हाऊ टू प्रपोझ टू टू बी फादर इन लॉ?

"आयडिया! रिहर्सल!"

तो मनालीला म्हणाला.

"समज तू तुझे काका. ही खुर्ची म्हणजे तू, मनाली. नि मी मि. मंदार जी.बी.हा असा उभा. चल आपण तालीम करूयात."

नाजूक मनाली राकट रावसाहेबांच्या आवेशात बसली.

"कोण तुम्ही?"

"मी मंदार."

"बापाचे नाव सांगायची पद्धत न्हाई का तुमच्यात?"

"मंदार गजाभाऊ.."

"आडनाव न्हाई?"

"भुसनळे. मंदार गजाभाऊ भुसनळे."

"काय काम? लवकर बोला."

"काही नाही.. ते जरनल कडून मनाली, नाही मनालीकडून जरनल घ्यायचे होते."

मनालीला हसू फुटलेच.

"तू खोट्या रावसाहेबांस घाबरतोस तर खऱ्यांचे काय?"

"नाही. परत. आता नीट."

"मी मंदार गजाभाऊ भुसनळे. राहणार सदाशिव. मूळगाव भुसनळे बुद्रूक. मनालीच्या कॉलेजात शिकवतो."

"शिकवतो? प्रोफेसर तू? वाटत नाहीस."

"शिकवत नाही. शिकतो."

"मग इथे काय काम?"

"मनाली आहे ना ती आणि मी म्हणजे अख्खा क्लास पिकनिकला जाणारे त्याची परमिशन..."

"जाऊ देत तुला नाही जमणार. तू टाकच आता अक्षता."

मंदार काकुळतीला आला.

"मि. रावसाहेब ठाकूर. आय ॲम मंदार जी. भुसनळे. आय डिमांड हॅंड ऑफ युवर डॉटर मिस मनाली फ्रॉम यू. प्लीज ग्रांट द परमिशन. थ्यांकिंग यू इन ॲंटिसिपेशन सर.."

"कोन रं तू साह्येब?' मनाली खुर्चीरूपी मनाली कडे पाहात म्हणाली,

"कोन गं हा फाड फाड इंग्रजी? हितं काय करतोय?"

"मंदार, काका म्हणजे बाबांना इंग्रजी इल्ले."

"छे. दॅट्स नॉट फेयर. इंग्रजी सोपे पडते. कसे रोखठोक."

"रोखठोक? ठोक खाशील बाबांकडून."

"ठोक? ते काय गब्बरसिंगच लागून गेलेत जणू."

मनाली हसत सुटली.

"आता काय विनोद झाला यात?"

"गब्बर! अरे गब्बरवरून आठवले. बाबा म्हणजे काका रोज शोले पाहतात. डायलॉग च्या डायलॉग पाठ त्यांचे."

"शोले? मी पण पाहिलाय मागे. बसंतीवाला."

"काका इज मॅड आफ्टर शोले. दुसरा कुठलाच सिनेमा ते पाहत नाहीत. चल. काही खरे नाही मंदार. त्यांना पटवणे कठीण."

मध्ये काही दिवस गेले. मंदारचे विचारचक्र चालू. मनालीला प्रपोझ करायल कसे झटक्यात जमले तसे काहीतरी करायला पाहिजे. काय करू की ससुर सासरा मान जायेगा? एके रात्री मग परत स्वप्न पडले. तो पुढे नि रावसाहेब मागे. गब्बरच्या वेशात. शेवटी त्यांच्या हाती तो लागतोच. मग त्याचे हात

बांधले जातात. मागून हा! हा! हा! हा! हसण्याचा आवाज. मग मंदार दोन्ही हात नसल्यासारखा उभा. त्याला दरदरून घाम फुटला. स्वप्नात काय पहावे? मनी वसे तेच स्वप्नी दिसे? त्याने घड्याळात वेळ पाहिली. बारा वाजलेले. नशिब पहाटेचे स्वप्न नाही. त्याला आधी झोप लागेना. कधी तरी त्याचा डोळा लागला. जाग आली तेव्हा पहाटेचे पाच वाजलेले.

पहाटेची वेळ म्हणजे मंदारच्या सुपीक डोक्यातून आयडियांचे पीक येण्याची वेळ. त्यात अर्धवट झोप डोळ्यात. तो, रावसाहेब, गब्बर, डायलॉग, ठाकूर, हाथ..

एकाएकी तो ताडकन उठून बसला, स्वत:शीच म्हणाला,'येस आय हॅव डन इट!'

पहाटे पहाटेच त्याने मनालीला फोन केला.

"मनाली मी आज येतोय. सकाळी. काका घरी आहेत ना तुझे?"

मनाली काही बोलायच्या आत फोन कट. मंदार तयारीला लागला.

रावसाहेबांचा वाडा.त्यांची जुन्या डिझाईनची आरामखुर्ची. समोर टीव्ही वर शोले. बाजूला मनाली अंग चोरून उभी. सारे काही त्याच्या कल्पनेप्रमाणेच.

रावसाहेबांनी क्षणभर वळून पाहिले.

"कोण तुम्ही?"

त्यांच्या शोले दर्शनात व्यत्यय आल्याने वैतागले असावेत.

"मी मंदार गजाभाऊ भुसनळे."

"मग? मी काय करू?"

"एकच. एकच करा रावसाहेब."

मनाली टेन्शन मध्ये ऐकतेय. मंदार तिच्याकडे पाहात म्हणाला,

"ये हाथ, ये हाथ मुझे दे दे ठाकूर."

हा डायलॉग ऐकताच रावसाहेब खूश झाले. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुटले.

"मनाली. वा ! काय मुलगा आहे ! हा म्हणतो ते खरे आहे?"

मनाली ने मान हलवली.

"नंदीबैल नुसती. पण जा. आम्हाला ही पद्धत आवडली.जो मुलगा शोलेचे डायलॉग बोल्तो तो नाहीतर अजून कोन होणार आमचा जावई? दिले रे तुला हे हात."

पुढे काय होणार? मोगॅम्बो खुश व्हावा तसे रावसाहेब खुश. नंतर मंदार नि मनालीचा विवाह.

मनाली नि मंदार चे शुभमंगल होऊन या प्रेमकथेचा सुखांत झाला. येथे सुखांत या शब्दाचा विग्रह 'अंती ज्याच्या सुख आहे' असा तो करायचा की 'लग्नाआधीच्या सुखांचा अंत' असा करायचा हे ज्याचे त्याने ठरवावे. तुम्ही म्हणाल हे असे कधी होते का? कोणी सिनेमातले डायलॉग मारून मागणी घालेल का? का नाही? लेखक म्हणतो म्हणून असे होऊ शकतेच. आता

थोडीफार अतिशयोक्ती असेलही पण सिनेमॅटीक लिबर्टी प्रमाणे लेखकाची सुद्धा कथाकथनात्मक लिबर्टी असे का समजू नये?

आणि ज्याचा शेवट गोड ते सारेच गोड. नाही का?

एकच संक्रमण दिवाळी २०१६



# मिताक्षरी डे ची गोष्ट!

(एक पटकथा)

१

प्रिया आणि मोनिका दोघी आपापल्या घरून मोबाईलवर व्हॉट्सअॅपवर मेसेजेस पाठवताहेत.. प्रिया आपल्या बेडरूममध्ये लोळलेली. मोनिका घराबाहेरच्या बागेत..

-हाय मोनी!

-हाय प्री! किती दिवसांनी गं?

-यस्स .. आज तुझी आठवण आली ना..

-का? या नाचीजची आठवण?

-ना चीज? तू चीज अशी आहेस म्हणून!

-बोल.. हाऊ आर यू?

-मी मस्त! तेच तर सांगायला तुला मेसेज करतेय!

-म्हणजे? लेट मी गेस..

-कर.. विचार कर.

-हुं.. तू इतकी खूश आहेस म्हणजे .. कोण आहे?

-कोण?

-कोण आहे तो?

-अय्या .. तू कसे ओळखलेस?

-ओळखणारच.. कारण मी तुला ओळखून आहे ना!

-बोल कोण आहे तो सूक्ष्मातिसूक्ष्म नामक?

-अय्या .. तुला कसे कळले?

-तेच.. मी ओळखून आहे.. तुला!

-होय गं. मी ते मोठाले नाव लिहून वैतागून गेले होते गं..

-हुं.

-आपल्याला बरी सोय आहे ही.. नामबदलाची!

-म्हणजे तू फक्त नावच तर नाही ना पाहिले .. नाही आमच्याकडे एक आहे देव पै.. ऑलरेडी बुक्ड पण आहे पण फक्त तीन अक्षरी. चालेल तर सांग. काहीतरी करते.. तुझा किती अक्षरी आहे?

-चल. चहाटळ आहेस तू नुसती ..

-मी चहाटळ? मी चहाबाज आहे प्रिये..

-चहाबाज नाही जहांबाज आहेस तू बरे..

-नाही पण नाव तर सांग त्याचे..

-मी नाही ग डे..

-या व्हॉट्स्यापी सांग नाव ना.. का लाजते?

-वा! डे इन डे आऊट.. विनोद!

-नाव सांग सांग सांग नाव सांग..

-मी तुला आधीच सांगितलेय.. परत नाही सांगणार..

-तू? सांगितलेस?

-अर्थात .. तू ओळखशील तर..

-सांग.. हरले मी..

२

(फ्लॅशबॅक)

छोटीशी प्रिया. पहिलीतली. शाळेच्या युनिफा ॅर्ममध्ये. पाठीमागे दप्तर. गळयात पाण्याची बाटली. तोंड फुगवून येतेय.आईचा हात धरून घरी परत येते.. तिचे बाबा समोरच आहेत

"प्रिया छकुली आलीस तू.."

"ती रागावलीय.."

"कशासाठी?"

"नेहमीचेच.. म्हणजे म्हणते, नाव खूप मोठेय तिचे .. प्लियदल्शिनी.. बोलता येत नाही म्हणते.."

बाबा तिला कडेवर घेत..

"ओह! म्हणून रागावलीय प्रियू राणी .. आमची प्रियाराणी.. किती शहाणी.. सांगे गोड कहाणी .."

तिला गुदगुल्या करतात .. ती तशीच तोंड फुगवून..

३

प्रिया आता कॉलेजकन्यका झालीय. स्मार्ट सुंदर तरूणी. कॉलेजचा वर्ग. समोर प्रोफेसर डे यांचे लेक्चर. प्रोफेसर म्हटले तरी तरूण तरतरीत पण थोडा बुटका असा विनोद डे. तो शिकवतोय

प्रिया त्याच्याकडे बघतेय एकटक. तो बोलतोय. समोर सारी मुले नि मुली ऐकताहेत.

परत एकदा तोच क्लास. विनोद फळ्यावर लिहितो काहीतरी. पाठोपाठ समजावून सांगतो. पोरं नोट्स घ्यायला लागतात. प्रिया तशीच बसून आहे.

परत एकदा तसाच क्लास. समोर लिहिलेले काही. सगळे उतरवून घेताहेत. प्रिया स्वप्नात रंगल्यासारखी बसून आहे.

वर्ग संपतोय.

"कुणाला काही डिफिकल्टीज असतील तर उद्यापासून दुपारी तीन वाजता मी रोज भेटेन अर्धा तास. माझ्या केबिनमध्ये येऊन भेटा.. हे सारे परीक्षेसाठी खूप महत्त्वाचे आहे."

विनोद सर्व क्लासला उद्देशून म्हणतो. प्रिया एकाएकी जागी होते. विनोदचा क्लास संपतो. तो निघून गेल्यावरही प्रिया तशीच बसून राहते.. बाकी मुली प्रियाकडे पाहताहेत.

४.

परत तोच वर्ग. विनोद शिकवतोय. प्रिया डे ड्रिमिंग करत बसल्यासारखी..

"मिस प्रिया.. कॅन यू रिपीट व्हॉट आय सेड जस्ट नाऊ.."

प्रियाचे लक्ष नाही.

"यस सर..?"

"तुला कळलं काय शिकवलं मी?"

"यस सर.."

"संकल्पना स्पष्ट पाहिजेत कुठल्याही विषयाच्या."

"होय सर.."

क्लास संपतो.. विनोदला जाताना पाहात प्रिया म्हणते

'माझ्या कल्पना नि संकल्पना स्पष्ट आहेत अगदी .. तुम्हाला याची कल्पना नसेल.. कल्पना करा जेव्हा कल्पना येईल तेव्हा काय होईल!'

५

प्रियाचे घर. रात्रीची वेळ. प्रिया स्टडी टेबलवर बसलीय. समोर नोट्स काढायच्या वह्या. राज्यशास्त्राचे जाडजूड पुस्तक समोर. आई हाक मारतेय आतून

"प्रिया.. लवकर ये जेवायला.."

प्रियाचे लक्ष नाही.

आईच्या अजून दोनवेळा हाका येतात. ती दचकून जागी होते अभ्यासाच्या तंद्रीतून.

"आले गं.."

म्हणत उठते. हळूच म्हणते,

"डिफिकल्टीज यायला विषयाचा अभ्यास पाहिजेच. नाहीतर विचारणार काय?"

जेवता जेवता आई विचारते,

"काय प्रियू अभ्यास जोरात?"

"हो ना गं. परीक्षा आली जवळ. नि नवीन टॉपिक थोडा कठीण आहे. तरी बरे नवीन प्रोफेसर चांगलेत .."

"प्रियू, लास्ट इयर तुझे .."

"हो ना! लवकर काहीतरी करायला हवे.. "

"काय?"

"अभ्यास गं.. वेळ थोडा आहे ना.."

मनातल्या मनात.. 'वेळ थोडा.. कॉलेज सुटलं की विनोद कसा भेटेल? यशाचा सोपा मार्ग डिफिकल्टीज मधून जातो..'

६

प्रिया परत अभ्यास करतेय.. वहीचे पाठचे पान उघडून सही करतेय.. प्रिया विनोद डे.. प्रिया डे.. पी व्ही डे..

व्हॉट अ शॉर्ट अँड स्वीट नेम .. मस्त ..'

८

प्रिया घरी येते.. आठवी नववीत असेल अशी.  आई घरीच आहे. प्रिया परीक्षेहून आलीय..

"काय गं कसा होता पेपर?"

"ठीक. पण मोठा होता खूप.."

"संपला ना की सुटला काही?"

"हुं.. चार पुरवण्या लावल्या .. प्रत्येकावर आगगाडी सारखे नाव लिहिता लिहिता .. मला वाटले पेपर राहतो की काय.. प्रियदर्शिनी पुणतांबेकर.. काय आगगाडी सारखे नाव.. तुला चांगलेय.. दोन अक्षरे नुसती .. कला!"

"काय गं प्रियू.. अजून तेच."

परत ती कॉलेज मधील प्रिया.

"या परीक्षेत पेपर न सुटो.. अजून तेच नाव आहे ना माझे.."

९

प्रिया एकाएकी जागी होते.. मनाशीच म्हणते,

"जल्दही सब बदलेगा.. जय गुरूदेव. विनोदयुग आएगा!अ"

१०

क्लासरूम. प्रिया सगळया मैत्रिणींना आग्रह करतेय..

"अगं हा टॉपिक महत्त्वाचा आहे. चला सरांना भेटूया.."

"तू जा की.."

"एकटी?"

"मग काय विनोद खाणार आहे तुला?"

"डे कडे डे टाईम जा.. म्हणजे खाणार नाही .. "

"तू पण ये.."

कॉलेजातली विनोदची केबिन. तो बसलाय.

सगळया मुली विनोद समोर. डिफिकल्टीज विचारत बसल्यात.. प्रिया पण त्यांच्यात आहे. विनोदकडे पाहात. एकाक्षणी विनोदला ही आपल्याकडे नुसतीच पाहाते आहे याची जाणीव होते.

पुढे प्रियाबरोबर येणाऱ्या मुलींची संख्या कमी कमी होत जाते..

पाठून प्रियाच्या आवाजात कवितेचे शब्द..

"सख्या रे
तुझी न माझी प्रीत
एक सुरीले गीत
वेळू बनातून वाजे आपसूक
वारा वाहता संगीत ..

सांगू कशी मी तुला पाहायचे
होशील माझा का भीत
हृदयी उठती तरंग माझ्या
विचार तुझाच मनी तो नित

सूर जुळती तुझे न माझे
वाटे मधुर कसे संगीत
काय म्हणू मी माझ्या दैवा
असा मिळे मज मनीचा मीत

लाख पुण्य ते पूर्वजन्मीचे

जुळली तुझी न माझी प्रीत
सांगू सख्या तुज, न तमा कुणाची
असो काहीही जगाची रीत
सख्या रे..
तुझी न माझी प्रीत"

कविता पार्श्वभागी सुरू असतानाच..

विनोदच्या केबिनमध्ये पाचसहा मुली शंका विचारत बसल्यात. प्रिया भिंतीमागे लपून बघतेय. सगळया गेल्या की आत शिरते.

संध्याकाळी विनोद निघतोय.. पाठून प्रिया गाठते त्याला.. दोघे पुढे निघतात ..

एक चौपाटीवरची संध्याकाळ.. दोघे वाळूत रेघा मारत बसले आहेत.. मग एकत्र भेळ खाताहेत..

प्रिया विनोदच्या मागे बाईकवर. त्याच्या खांद्यावर हात ठेवून. कुठेतरी जाताहेत दोघे. आपल्यातच दंग. प्रियाचे बाबा चाललेत दुरून. दोघांना बघत उभे राहतात.

११

प्रिया घरात शिरतेय. आईचा पारा चढलाय. बाबा साळसूदपणे पेपरात तोंड घालून बसलेत.. आईच्या तोंडाचा पट्टा सुरू होतो..

"कोण आहे तो?"

"कोण?"

"ज्याच्या बरोबर फिरतेस तो?"

"कुणी नाही .."

"मग ते काय भूत होते त्याच्या फटफटीवर?"

"नसणार.. ती मीच होते .. भूत कसे असणार?"

"निर्लज्ज .. बेरफण कार्टी.."

प्रिया काहीच न बोलता आत निघून जाते.

आई बोलत राहते..

"म्हणून मी सांगत होते, पोरीला सूट देऊ नका. पण नाही. नव्या जमान्याची पोर आहे म्हणे. थेरं पहा. याच्यासाठी जाते काय कॉलेजात? कोण कुठला कोणास ठाऊक.. कुणीही यावे पोरीला उचलून घेऊन जावे.. अशी उघड्यावर पडलेली नाही पोर माझी.."

बाबा तिकडे शांततेची वाट पाहात बसतात.

आईची रेकॉर्ड चालू आहे. ती आणि बाबा आपापल्या जागी शांत बसून आहेत..

प्रिया मोबाईलवर.. मेसेज पाठवतेय विनोदला..

-गनिमास पत्ता लागलाच..

-व्हॉट्स गनिम?

-आई माझी ..

-मराठीमें आईको गोनीम कहते हैं.. गोनीमत है..

-अरे तुला पाहिले कुणीतरी माझ्या बरोबर .. माझ्या पुढे होतास तू बाईकवर..

-प्रिये पहा .. तू आमार मागे बाईकवर..

-आ मार? का मार?

-आमार म्हणजे माझ्या.. बाईकवर गं बाई..

-असेल. तेच सांगतेय मी.. तर आई चिडलीय खूप

-चिडणारच. आईला गनीम म्हणालीस तर ती चिडणारच. आणि कॉलेजात जातात याच्यासाठी का म्हणाली असणार?

-तुला कसे ठाऊक?

-अ ा ॅफकोर्स मला माहिती .. माझ्या गोष्टी वाचल्या नाहीस तू. पण कोण काय बोलेल त्याचा अंदाज येतो मला ..

-तुझ्या गोष्टी .. तू लिहितोस ते ठाऊक होते पण इतक्या सिरियसली बघतोस सारे?

-पुढे काय होईल ते ही माहितीय मला..

-म्हणजे?

-लवकरच तुला बघायला मुलगा येईल एक.. कदाचित दोन तीन ही.

-बापरे!

-त्यात काय? आई आहे ती तुझी. तिला चिंता वाटणारच..

-मग रे?

-मग काय.. तू रडणार .. डोळे सुजणार .. परीक्षा जवळ आहे म्हणून, नाहीतर तुला कॉलेजात यायला पण बंदी केली असती तिने ..

-मग?

-मग काही नाही. पुढचे पुढे!

१२

प्रिया कॉलेजात जायची तयारी करतेय. आई थोडी आदळआपट करतेय.

"प्रिया, आज लवकर घरी ये."

"चार वाजतील."

"चालेल."

"का?"

"तू ये, मग सांगते."

प्रिया निघून जाते. बाबा पेपरामागून बघतात. आईची टकळी सुरू होते..

"तीन मुलं कटाप केली. एक तो अमरावतीचा. एवढया दूर नाही द्यायची माझी पोर. दुसरा काहीच काम करत नाही म्हणे. ऐदी! बसून खाईल की काय.. काय बाई पोरं असतात आजकाल. आज येणार तो चांगला आहे म्हणे.. मी सांगते, चांगला असेल मुलगा तर उडवून टाका बार. तरणी पोर न जिवाला घोर..

तुम्ही नुसता पेपर वाचा. नाही वाचला तर जग बुडेल .. इथे घरावर प्रसंग काय.. तुम्ही करताय काय.."

"थांब गं, एवढा लेख वाचून उठतो."

"आज येईल त्या मुलाचे कुटुंब चांगलेय म्हणे. तुम्ही प्रियाला समजवा."

"बरं. समजावतो.."

"काय हो तो कोण आहे तिच्या बरोबरचा?"

"अगं चांगला आहे तो. प्रोफेसर. डे नावाचा आहे कुणी."

"हुं. बंगाली बाबू. मासे खाऊ.. तुम्हाला निक्षून सांगते, आपली पोर अशी अमक्यातमक्याच्या गळयात नाही बांधायची मी."

"ठीक आहे. तो येईल आज त्याच्या गळयात बांधून टाकू .."

"अशी तशी नाही बांधायची. पाहून घेईन नीट. माझी पोर काय वाटेवर नाही पडलीय.. तिच्या श्रीराम मामाला बोलावून घेईन नाहीतर.."

"छान. नुसता पोरं पहायला अमेरिकेतून येईल तुझा भाऊ?"

"अर्थात. मीच बोलावत नाही म्हणून. नाहीतर आला असता तो. रामदादा आहे माझा. तुम्हाला नसेल काळजी पण मला आहे आणि दादाला पण आहे.. पोर वेळेवर येईल तर बरे. एक किलो पोहे घेऊन या. मिरच्या पण हव्यात. आणि तो बाथरूममधला नळ गळतोय तो रिपेअर करून घ्या. पेपरवाला आला सकाळी. मी नाही बिल भरले, जो वाचतो त्याने भरावे.. सकाळचे औषध घेतलेत का विसरलात. आणि त्या कमलाच्या पायाला फ्रॅक्चर झालेय. त्या मंगलाच्या मुलीला मंगळ होता तरी जमले तिचे."

"मंगळाच्या मुलीला मंगल? की मंगलाच्या मुलीला मंगळ?"

"तुम्ही बसा टंगळमंगळ नि विनोद करत. स्वामी म्हणाले ते खरेय, टवाळा आवडे विनोद."

"हे कोण स्वामी?"

"अर्थात समर्थ रामदासस्वामी. तुम्ही एक टवाळकी करा नि मुलगी दहा टवाळ. टवाळ कार्टीने डोक्याला ताप दिलाय नुसता .. उठा आणि कामाला लागा .."

"जो हुकूम राणीसाहेब .. हा निघालो, एक किलो मिरच्या अन् शंभर ग्रॅम पोहे आणून टाकतो.."

१३

मुलगा येऊन गेलाय. पुढे ही अजून एक दोन मुलं येऊन गेलीत.. प्रियाचा नकार तर ठीक पण तिच्या आईलाच पसंत नाहीत कोणी..

"जो मिळतो तो नारगुच्च .. एक म्हणे तोतरा आहे. प्रियाला हाक मारायला किती वेळ घेईल तो. आणि

तो चंदनशिवगावकर.. त्याच्या चपला पाहिल्यात? मोजे कुठले चपला कुठल्या. नि तो तिसरा .. जाऊ देत .. कसं होणार प्रियाचे कुणास ठाऊक.."

"कसे काय.. एकदा बघून तर घे तो तिला आवडलेला मुलगा .. नजरेखालून घाल तर. आवडला तर पाहू.. नाहीतर देऊ राहू .. काय?"

"मी मुळीच परवानगी देणार नाही अगदी सोन्याचा का असेना तो. आधीच सांगते. तुम्ही म्हणता म्हणून पाहते .. पण .."

"तुझे पण राहू देत बाजूला. मुलीला लाव पणाला आणि काय .. प्रिया.."

प्रिया आतून बाहेर येते.

"काय बाबा?"

"काय नाव त्याचे?"

"कोणाचे?"

"एकच आहे ना गं डे संडे हो या मंडे?"

"हे काय बाबा.."

"त्याचे नाव तर सांग तुझ्या आईला.."

"विनोद डे."

"बंगाली. मासेखाऊ .. बोलाव त्याला. बघते कसा आवडतो तुला .. डे म्हणे डे. मराठी समजतं तरी का त्याला .."

"अगं प्रेमाला भाषा नसते.."

"हीच फूस तुमची म्हणून शेफारलीय कार्टी. टवाळ कुठली.."

"हे खरंय.. प्रिया प्रत्यक्ष रामदास स्वामींनी सांगितलेय तुझ्याबद्दल बघ.. टवाळा आवडे विनोद.. तू टवाळ.. हिचा नाईलाज झाला असणार .."

"तुम्ही आणि तुमचे पांचट विनोद तुमच्याकडेच ठेवा.."

"आणि डे? म्हणजे विनोद डे? तो प्रियाकडे देऊया?"

"तुमच्याशी बोलण्यात अर्थच नाही .. मीच मेली मूर्ख. पोरीच्या काळजीने झोप येत नाही रात्ररात्र. तुम्ही पडता घोरत बिनघोर .. माझा रामदादा असता तर कोणाचा आधार असता. त्याला जे जमते ते अख्ख्या दुनियेत जमणार नाही कुणाला .. आणि तुम्हाला तर मुळीच नाही .. पण बोलाव एकदा. पाहू तर देत बाप लेकींना कुणीही कसाही असा कसा आवडतो ते.. बोलावून घे त्याला .."

बाबा प्रियाला हळूच इशारा करतात..

"खा मनात मांडे..बुलाओ बिनोद डे.."

प्रिया लाजत आत निघून जाते. आतल्या खोलीत प्रिया मोबाईलवर विनोदचा फोटो घेऊन बसलोय गुणगुणत ..

'शायद मेरी शादी का खयाल दिलमें आया है.. इसी लिए मम्मीने मेरी तुम्हें चाय पे बुलाया है..'

१४.

विनोद आलाय घरी. प्रथम आई तोंड वाकडे करते. बाबा नि विनोद गप्पा मारत बसतात. प्रिया येते. ती पण बसते. आई हळूच गप्पांत सामील होते. तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत जातात. आधीचे वाकडे तोंड विनोदशी बोलताना सरळ होत जाते. समाधानाने ती बघू लागते.. चहापाणी होते.. विनोद निघून जातो. एकाएकी आईच्या ध्यानात येते .. हे असे कसे होऊ शकते?

"काय कसा वाटतो विनोद?"

"हसू? हसू विनोदाला? चापलूस आहे एक नंबरचा.."

"काय वाईट आहे त्यात?"

"काय नाही, काय काय विचारा.."

"बरं.. अनेकवचनी.. काय काय वाईट ते सांग.."

"आता मला वेळ नाही. पण प्राण गेला तरी त्या मासेखाऊशी लग्नाला परवानगी नाही द्यायची मी."

"अगं.. काटा काढू म्हणतेस मासेखाऊचा? पण मराठी किती छान बोलतो तो. त्याला अजून पाच भाषा येतात म्हणे. आणि लेखकही आहे तो."

"असेल. त्याच्या घरी. त्याच्या पुस्तकाची रद्दी घेऊन माझी पोर सुखात राहिल?"

"अगं.. चांगला प्रोफेसर आहे. शिकलेला, सुस्वभावी देखणा.. वर पाहिजेच्या जाहिरातीत लिहितात ना वर पाहिजे तसा .."

"तुम्ही आणि ती प्रिया.. दोघांना अक्कल नाही. एक पोरीला नाही कळत. बाप पण तसाच? बुटकबैंगण.."

"कोण? मी?"

"तुम्ही नाही .. तोच विनोद.. इतका बुटका .. त्याच्या बरोबर प्रिया.. कसा दिसेल जोडा?"

"अगं गावस्कर पण साडेपाच फुटी नि तेंडुलकर पण.. लिट्ल मास्टर्स दोघेही .."

"असतील त्यांच्या घरी. मला हा नको. मी नाही परवानगी द्यायची .."

प्रिया आपल्या रूम मध्ये बसलीय. उदास. हताश.

बाबा येतात. पाठीवर हात फिरवतात तिच्या.

बाबा जातात. प्रिया लिहितेय. पाठून तिच्या कवितेचे शब्द..

काय करावे नकळे काही
ही शुद्ध असे ना प्रीत
व्यवहार नसे हा नसे लढाई
न कुणाची हार ना जीत

म्हटले मी ना तमा कुणाची
पण आडवी येते रीत
कशी फळावी सांग सख्या रे
तुझी न माझी प्रीत..

१५

आई उठलीय सकाळी. प्रिया अजून झोपेत आहे. बाबा पेपरात डोकं खुपसून बसलेत.

आईची टकळी सुरूच आहे..

"काय करावे पोरीचं. पोरगी अशी नि तिचा बाप तसा. आणि तो बंगाली बाबा.. वशीकरण करून गेला माझ्या साध्या सुध्या पोरीवर. जादूटोणा .. मासेखाऊ कुठला. आणि आली ती पोरं पण असलीच .. एकाहून एक भाकड.

काय करावं या पोरीचं. काही कळत नाही. माझंच मेलीचं चुकतंय. तिला नि तिच्या बापाला नाही चिंता तर. जा मारा उडी डोंगरावरून. नाहीतर मारा डुबकी समुद्रात. माझा रामदादा असता तर .. "

इतक्यात फोन वाजतो..

"बघा हो जरा. नुसता आपला तो पेपर पेपर. एवढा इंटरेस्ट पोरीत दाखवला असता तर आज हे दिवस नसते पाहायला लागले. देवा पाहतोयस रे सारे तू..

बघा फोन..कोण कडमडतंय आता.."

बाबा उठून फोनवर..

"हॅलो .. अरे वा! कधी? बाय आफ्टरनून.. व्हॉट अ सरप्राईज. कला खूश एकदम .. आणि ती खूश तर आम्हीपण खूश.. मोस्ट वेलकम .. या लवकर .. वाट पाहतोय .."

फोन ठेवतात.

"काय हो कोण आहे? आणि कोण येतेय आता इकडे .. मी स्पष्ट सांगते, ती तुमच्या गावाकडची मंडळी असली तर मी चालले बाहेर. मला नाही जोर आणि इच्छा कोणाचे काही करायचा. सांगाल तर फोन कुणाचा होता ..?"

"तू बोलू देशील तर ना .."

"हे बरे बोललात मध्ये.. मला मेलीला कळायला हवे.. या घरात माझी किंमत हीच.. सांगता की आहे काही सीक्रेट. मागे ते अप्पाजी डोंगरे आलेले असेच न सांगता. रोज त्यांचे पथ्यपाणी पाहताना माझीच बिघडली तब्येत. आता हे कोण.. आधीच सांगते मी.."

"हे बघ. दोन वाक्यांत थोडा पूर्णविराम घालत जा. मला बोलायला संधी दे.."

"मग मी घालतेय आडवा हात? तुम्हाला सांगायचे नसेल तर नका सांगू. मी पण बघून घेईन.."

"आता ऐकशील तर बोलतो."

"ऐकतच आलेय गेले तीस वर्षे. नाहीतर निभावला असता संसार तुमचा .."

(एकदम घाईघाईत बोलत)

"आता एक शब्द न बोलता ऐक.. आज दुपारी तुझा रामदादा इकडे पोहोचतो आहे.."

"काय? मग हे आधी नाही सांगायचे? देवासारखा धावून आला हो रामदादा .. तरी म्हटले इतका वेळ बोलत का नाहीत तुम्ही? माझ्या माहेरचे कोणी येणार म्हटले की बोलती बंद होते जणू."

"आता कमीत कमी तुझा दादा येणार म्हणून तरी हास."

"ते सांगायला नको मला. माझा दादा आहेच तसा .."

१६

श्रीरामदादा घरी आलाय. मध्यमवयीन. थोडासा बुटकाच. पण चेहऱ्यावरूनच एकदम हुशार वाटेल असा. सगळे बसलेत गप्पा मारत. आई आता एकदम खुशीत आहे. प्रियाशी नीट बोलतेही आहे.

आईच विषय काढते..

"बरं झालं आलास बाई तू दादा. या दोघांनी जीव नकोसा करून टाकलाय माझा."

"अस्सं. अस्सं काय केलंय माझ्या प्रियाबाईने?"

"करणार काय.. कॉलेजात दिवे लावलेत आणि काय!"

"कॉलेजात दिवे?"

"लँप्स इन कॉलेज!" मध्येच बाबांनी भाषांतर करतात. आई डोळे वटारते तसे चपापतात.

"म्हणजे आहे एक कुणी प्रोफेसर .."

"तुम्हाला सांगतो श्रीरामपंत.. अहो पॉलिटिकल सायन्सचा प्रोफेसर. चांगला पी एच डी आहे."

"डिग्री काय चाटायचीय."

"खरंय तुझं ताई .."

हळूच प्रिया आणि तिचे बाबा या दोघांना हात करत श्रीराम.

"अहो पंत मुलगा चांगलाय तसा."

"तसा.. हुं.. मासेखाऊ."

"काय मासे खातो मुलगा ..? खरंय तुझं ताई."

"मी म्हणते तेही चालेल.."

"त्याचा काढू काटा..?" बाबा.

"तुम्ही नका बोलू मध्ये. तर दादा ते एक ठीक. पण बंगाली आहे तो.."

"बंगाली बाबू? बाप रे! तापट असतात फार! तू म्हणतेस ते खरंय ताई.."

"ते चालेल एक वेळ रे. असतात तापट कुणी. घरचा बरा आहे. तसा मुलगा चांगला आहे म्हणतात. मी नाही बाई, हे दोघे म्हणतात."

"अगं ताई, तू म्हणशील तसेच होणार. तसे व्हायलाच हवे.."

"तुला पटते ना? मी म्हटलेच रामदादाच सारे सरळ करेल."

"मग आता अडलंय कुठे गाडे?"

"नाही मी काय म्हणते.. मुलगा शिकलेला आहे .. असेल. माझी पोर पण एम ए होईल आता.."

"खरंय तुझं ताई.."

"मुलगा सहा भाषा बोलू शकतो म्हणे.. असेल. काय करायच्यात त्या? एक आपल्या बायकोशी प्रेमाने बोलण्याइतपत आली भाषा तर पुरेशी .."

"हे मात्र खरेय.. आणि असे पण बायको समोर बोलती बंद हेच सुखी संसाराचे रहस्य आहे .."

"तुम्ही नका बोलू मध्ये. तर मी काय म्हणते ना.. सारे चांगले आहे.. तसे मानून चालू. त्याचे मासे खपवून घेऊ. बंगाली बाबा तर बंगाली बाबा. ठीक पण.."

"पण काय ताई?"

"अरे, बुटकबैंगण आहे रे तो.."

"हां पंत हा पॉइंट खरा.. म्हणजे काय प्रत्येक माणूस कसा उंच ताड पाहिजे असे हिला वाटते. त्यात चूक नाही तिची.."

"पण बुटका म्हणजे .."

"किती असेल गं.. मला वाटते.. कले, या श्रीरामपंतां एवढा असेल नाही.. साडेपाच फूट."

आईचा चेहरा गोरामोरा होतो. आजवर रामदादा तिचा आदर्श भाऊ. तसा आहेच तो. पण तो साडेपाच फुटी असल्याचे कधीच ध्यानात नाही आलेले.

"बघा बाई, तुम्ही सगळे एक झालात तर.. तसा बराय पण माझ्या प्रियाला शोभणार नाही."

"खरंय ताई.."

"पण आता सगळे म्हणताच आहात तर मी कशाला नाही बोलून वाईटपणा घेऊ रामदादा.."

"खरंय तुझं ताई. आता होऊन जाऊदे तुझ्या मनासारखं, वाजवा रे वाजवा .. काय म्हणतेस?"

१७

लग्न मंडप. सारे आहेत आजूबाजूस. विनोद नि प्रिया आहेत. आई बाबा नि श्रीराममामा नि विनोदकडची मंडळी आहेत. दोघे स्टेजवर. आजूबाजूस लगीनघाई. वाजंत्री वाजताहेत. स्टेजमागे 'विनोद वेड्स प्रिया' लिहिले आहे. रामदादा त्याच्या ताईस विचारतोय,

"ताई, ह्या प्रियदर्शिनीची प्रिया कधी झाली?"

"ही. आताच. तशी अटच घातलेली तिने जावई बापूंना .. लग्नानंतर नाव छोटे करणार म्हणून.. अकरा अक्षरांवरून प्रियदर्शिनी पुणतांबेकर थेट मिताक्षरी प्रिया डे झाली बघ.."

"खरंय आणि मिताक्षरी डे परफेक्ट बंगाली नाव वाटतेय नाही? "

# माझ्या पहिल्या विनोदी कथेची कथा

गोष्ट तशी जुनीच. मी तेव्हा लेखकसुद्धा नव्हतो. विनोदी लेखकाचे स्पेशलायझेशन तर दूरची बात. लेखनाचे प्रयत्न करणारा, स्वत:स होतकरू नि हरहुन्नरी समजणारा एक लेखक होतो. काय गंमत आहे पहा. माझ्या आधी-आधीच्या साभार नाकारलेल्या कथा नंतर मला नाव मिळाल्याचर त्याच मासिकांच्या कथा स्पर्धेत पाठविल्या तर त्यातील दोघांना बक्षिसही मिळाले. त्याच संपादकांना नंतर त्याच कथा बक्षिसे

देण्यापर्यंत आवडाव्यात? एखाद्या वस्तूपेक्षा पॅकिंग महत्वाचे असावे तसे काय म्हटले पेक्षा कोणी म्हटले हेच महत्त्वाचे! मुद्दा मात्र तो नाही सध्या.

तर माझी मैत्रिण अरूणा आणि मी, आमच्यात पैज लागली. अरूणा तेव्हा माझी मैत्रीण होती. आता काय आहे? खवचट प्रश्न येणार आणि कान टवकारले जाणार, मला माहित आहे. सांगूनच टाकतो. अरूणा माझी लग्नाआधीची मैत्रीण. लग्नानंतर मैत्री संपली. म्हणजे लग्न माझे तसे तिच्याशीच झाले पण लग्नानंतर मैत्रीण चेंजेस हर कलर्स. बायकोपणाच्या सत्तापदावरून राज्य हाकणारी अरूणा लग्नाआधी होती मात्र माझी मैत्रीण. तिला माझ्या (तिच्याच शब्दात) लेखनचाळयांची गंमत वाटे. लिहा, पाठवा, (नाकारल्यावर) फाडून टाका हे माझ्या लिखाणाचे धोरण असे अरूणा रांधा.वाढा,उष्टी काढाच्या धर्तीवर म्हणायची. पोष्टाच्या खर्चाएवढे पैसे नि परत लिहिण्याच्या कागद नि पेनावरचा खर्च कसा भरून निघणार? तिचा सवाल बिनतोड असायचा. तर असे ते दिवस आणि असा तो जमाना.

त्या दिवशी पिरीयड बुडवून कट्ट्याचर बसलेलो. नवीन कथेची जुळवाजुळव मनात सुरू. ष्टोरी फार सीरियस. अपंग नायकाची. नायकाला व्यंग काय दाखववावे याचा विचार चालू होता. अरूणा आली ती पेपर दाखवायला. कोणत्यातरी मासिकातील विनोदी कथास्पर्धेची 'बातमी'. कथा आणि विनोदी? मला मानवी मनाच्च्याही अंतर्मनाचे पापुद्रे सोलून त्यातून भावभावनांचे अविष्कार दाखवणे आवडे. माझे नायक आणि नायिका नेहमी गंभीर किंवा अति गंभीर असत. जगात सर्वत्र दु:ख भरलेले असताना हसणे सुद्धा त्यांना पाप वाटे. त्यात माझ्या सध्याच्या कथेत नायकाला व्यंग आहे आणि अरूणा व्यंग्याची गोष्ट करतेय?

"अरे, लिही. चांगले शंभर रूपयांचे बक्षिस आहे. मिळाले तर आतापर्यंतचा खर्च निघून जाईल."

त्या काळी शंभर रूपये ही मोठी रक्कम होती. मी काहीच बोललो नाही. आजवर काय कमी स्पर्धांतून कथा पाठवल्या? बाकी काही नाही पण उत्तेजनार्थ देखील बक्षिस न मिळण्याची मला पाठवताना खात्री असे. त्यात माझी गंभीर लेखन प्रकृती आणि मी विनोदी कथा लिहू?

"नाहीतर ती मागचीच गंभीर कथा पाठव. त्यांना हसू येईल."

बाकी काही असो. माझ्या लिखाणाची टवाळी मला नाही खपत. मी चिडलो पण अरूणा म्हणाली,

"बघू तर लेखकराव. जमतेय का काही विनोदी. हरहुन्नरी ना तू? चल पैज आपली. तू नुसती विनोदी कथा लिहूनच दाखव मग बक्षिस मिळो न मिळो. मला मात्र हसू यायला पाहिजे."

माझ्या अंगात कोण्या विनोदी लेखकाचे भूत संचारले कोणास ठाऊक. मी म्हणालो,

"पैज? मग ठीक आहे. लिहूनच दाखवतो."

माझे डोके त्या व्यंगवाल्या नायकावरून व्यंग्यवाल्या नायकाकडे चालू लागले..

दुसऱ्या दिवशी थेट लिहायलाच बसलो.

***

खाली एक नळ होता. आम्हाला जाम तहान लागलेली. घसा सुकला होता. त्या नळावर पाटी होती,

'पाणि वरूण पीणें'

वरूण?

"अरूण पाणि पी वरूण!"

मी शीघ्रकवित्वाचा नमुना पेश केला.

*

मी पाटीतल्या वरूणला अनुप्रास जमतो म्हणून एका नायकाचे नाव अरूण ठेवले !

*

त्याकडे दुर्लक्ष करीत अरूण म्हणाला,

"नळ एवढा खाली, त्याच्या वरून? अजिबात नाही."

"वाकूण पी पाणी नळावरून. ग्लास काही कुठे दिसत नाही."

"मी आणि वाकून? अस्सल खानदानी मी. ब्रेकेन पण बेण्डनार नाही."

"तू काही कर. मी पितो पाणी."

मग मी नळावर माझा 'पाणि' लावून पाणी प्यायलो. अरूणला तहान लागलेलीच. तोही बेन्डून पाणी प्यायला. बेन्डून! न वाकणाऱ्या त्याचा हा इंग्रजी शब्द! आणि आम्ही मार्गस्थ झालो.

*

चला, गोष्टीची सुरूवात तर झाली. माझी आणि अरूणची पाणी वरूण पिणे ची करूण कहाणी. आता यात करूण काय? नाहीच आहे काही तसे पण वरूणशी यमक जुळवायला आधी अरूण आणि आता करूण. जुळणारे यमक हेच या शब्दांचे गमक आणि काय? विनोदी लिहायचे तर विनोदी विचार हवाच की नाही?

माझ्या या कथा लेखनाची अशी सुरूवात तर झाली पण दोघांचे पुढे काय करायचे ते कळेना. ब्रेकेन चा ट्रेंड पुढे कथाभर सुरू ठेवावा तर पुढची कथा सुचायला हवी. करू तर काय करू? परत त्यात विनोदप्रचुरता आणायची कारण हीच तर कथालेखनातली मुख्य अट होती. एखाद्यास बोट न लावता गुदगुदल्या (अरूणा गुदगुल्यांना गुदगुदल्या म्हणते!) करायच्या हे कठीण काम. जमेल मला हे शिवधनुष्य पेलणे? शेवटी सीता

मिळेल मला? माझी सीता मला धनुष्य न उचलताच मिळालेली. आता ही दुसरी सीता म्हणजे एखादे उत्तेजनार्थ बक्षिस !

माझी जुळवाजुळव सुरू होती. सवयीप्रमाणे मी त्यात दोघांना तहानलेले दाखवून गांभीर्य आणणार होतो, पण विनोदी भूत मानगुटीवर बसवून घेतले नि कल्पना सुचायची वाट पाहू लागलो.

अरूण आणि मी कुठे निघालो असावेत? तहानलेलो म्हणजे कुठे पायपीट करतोय. कुठे? आणि कशासाठी? यात विनोद कोठून येणार? अरूणला थोडा विक्षिप्त दाखवावा काय? की भाषेचे खेळ करून घ्यावेत? अर्धइंग्रजी किंवा अर्धमराठी वापरावी का अर्धमागधी सारखी? आमच्या कॉलेजात होती काही मुले अर्धमागधीची. ते पूर्णमागधी का घेत नाहीत असा माफक विनोद वाचलेल्या पुस्तकातून उचलून अरूणाला सांगितला तर ती हसलीसुद्धा नव्हती. शेवटी हा पुलंच्या पुस्तकातील विनोद आहे हे सांगितल्यावर हसली. हे आठवले नि मला कथेसाठी विनोद कुठून आणावेत वा उचलावेत हे कळेना. एकच विनोद पण कोणी केला यावर हिचे हसणे ठरावे? कसे हसवू मी कोणास? काय होणार माझ्या या कथेचे?

या विनोदाचे मला टेन्शनच आले. हसल्याने टेन्शन कमी होते म्हणे आणि मला इथे हसवण्याचे टेन्शन आलेले. मी विनोदाबाबत सिरीयस होऊ लागलो खरा. अरूणाशी पैज लावली तर होती. नुसत्या कथेचे एक ठीक पण ही हास्यरस निर्मिती कशी होणार? त्यासाठी मी इतका सिरीयस? मग मी दोघांना पुढे दामटवायचे ठरवले. बघू जसे जसे जातील पुढे तसे काहीतरी घडेलही.

*

मी आणि अरूण पाणी पिऊन पुढे निघालो. घसा ओला झाला होताच. अरूणला त्या पाण्यामुळे की काय कंठ फुटला,

'छुपी हो कहां, मैं तडपता यहां तेरे बिन फिका फिका दिलका जहां...'

*

म्हणजे आम्ही काहीतरी का कोणालातरी शोधत आहोत. हा भर रस्त्यात गातोय? हा सिनेमा थोडीच आहे? म्हणजे कुठल्या निर्जन जागी आम्ही आलो आहोत तर..

*

"हळू जरा. तुझा आवाज ऐकून छुपी हुई पळून जाईल." मी म्हणालो.

यावर अरूण म्हणाला,"जानी हमारे इंतजार में बैठी है वो. हमें देखेगी तो फुला न समायेगी. इस शक्स को अरूण बळवंतराव पाटील कहते हैं !"

*

म्हणजे याचे नाव अरूण पाटील, बळवंतरावांचा सुपुत्र. मी कथा पुढे सरकवली.

**

"तुला वाटते या ओसाडगावात ती भेटेल?"

"तीच काय, तिचा बापही भेटेल."

"चालेल तुला ते?"

अरूणने जीभ चावली, म्हणाला,"तिच्याबापाचीच भीती मला."

"अरे, प्यार करनेवाले डरते नहीं!"

"तू सांगतोयस? तुझा काय अनुभव? पोरींशी साधा बोलतही नाहीस तू. थियरी नको प्रॅक्टीकल बोल."

मी साहजिकच गप्प या बेगान्या शादीत अब्दुल्ला दीवान्यासारखा का आलोय? अरूण नि ती पाहून घेतील..

*

म्हणजे अरूण आणि मी त्याच्या तिला शोधायला निघालोय. कुठल्यातरी गावी. तिचा बाप खडूस, इतपत तर खेचूनच आणली गोष्ट. पण त्यात विनोद? पाहू आधी एक गोष्टीचे स्ट्रक्चर बनेल नि मग त्यात विनोदाच्या भिंती बांधून गोष्टीचा महाल बनवून टाकू. माझ्यासारख्या सिरीयस लेखकाला या विनोदी भिंती बांधणे थोडे मुश्कीलीचे असेल पण अखेर सवाल पैजेचा आहे. पूर्वी मोठमोठ्या मोहीमेसाठी विडा उचलत. या छोट्याश्या गोष्टीसाठी मी पैजेची विडी उचलली होती हे खरे ! (म्हणजे विडी ही विड्याची बहीण असेल का? छोटी बहना?)

*

आम्ही निघालो मग पुढे. आजूबाजूला गाव. झाडे, डोंगर. सगळीकडे नुसती शांतता.

*

अशा गावी ’पाणि वरूण पीणें’ वाल्या पाटीची पाणपोई असेल का? बघू नंतर. पहिला तो गोष्टीचा सांगाडा बाकी डिटेल्स नंतर...

*

"हे बघ, इट्स सिंपल. मिया बिबी राजी, तो क्या करेगा काजी? हर बापूस कान्ट ऑब्जेक्ट!"

"काजी नव्हे, दाजी. तिच्या परमपूज्य पिताजींचे नाव. दाजी तुकडोजी शेवरेपाटील. तिने एकदा त्यांचा हातात बंदूक घेतलेला फोटो दाखवला होता मला."

"बंदूक? शिकार बिकार?"

"गा ॅड नोज! पण उग्र चेहरा होता. राकट आणि धडधाकट. फोटोत बघून ही धडकी भरेल."

मी विचारात पडलो. या वाघाच्या गुहेत जायचे? त्याच्याच गावातून त्याच्याच मुलीला पळवून न्यायचे? ते ही ती इथे असेल असे assume करून?

"आयडिया!" मी म्हणालो तसा अरूण दचकलाच.

"हे बघ. आपण बापूस म्हणजे दाजी पाटलासच पटवू."

अरूणने प्रश्नार्थक अर्थाने पाहिले.

"राकट नि धडधाकटास व्यायामाची आवड असणार.."

"मग मी काय पैलवान बनू? ते ही आताच्या आता?"

मी विचारात पडलो नि म्हणालो, "मग आपण वेशांतर करून जाऊया."

*

मी खूश. वेशांतर म्हणजे विनोदाच्या शक्यता वाढल्याच.

*

"म्हणजे?"

"इझी! दाढी मिशा नसतील तर लाव, असतील तर काढ."

"हे हिंदी सिनेमात. तिथे ज्याच्या समोर वेशांतर करून जायचे तो सोडून सर्व त्या वेशांतरितास ओळखतात, अगदी बघणारे शेंबडे पोर देखील."

"बाय द वे, आपण कुठे चाललोय?"

"गाव आहे पण लोकांचा पत्ता नाही. शेवरे पाटील म्हणजे वाडा असणार. विचारू कोणाला तरी पत्ता."

पण पत्ता विचारायला आजूबाजूला कोणाचाच पत्ता नाही.

*

हे खूप झाले. अजून तरी ठीक आहे. जमेल. आज प्रथमच माझ्या कथेतून भावनांचा कल्लोळ नाही. चुलीवरल्या फुलक्यांसारखी हलकी फुलकी गोष्ट लिहीतोय. विनोदाच्या जागांचा शोध चालू आहे...

*

अरूण नि मी विचारात पडलो. त्याची प्रिया, तिचे नावही प्रियाच, कुठे असेल? काल कॉलेजात गावचे काही लोक आले नि प्रियाला उचलून घेऊन गेले. अरूण नि प्रियाच्या भानगडींचा पत्ता लागला की काय? त्यावेळी अरूण तिथे नव्हता. मी होतो. मग रात्रीच आम्ही प्रियाच्या गावी जाऊन तिला शोधायचा निर्णय घेतला. निघालोही. त्यानंतरचीच ही कथा.

*

आता पुढे काय घडवावे? वेशांतर? ते कदाचित होईलही पण शेवरेपाटलांचे कसे घडवावे हृदयांतर? घराण्याची इज्जत की मनका प्यार? काय होईल आणि ते ही परत विनोदी? अरूणाच पैज जिंकेल काय? माझा स्ट्रगल सुरूच...

*

शेवटी एक खेडूत दिसला.

"शेवरेपाटीलांचा वाडा कुठेय?"

मी त्या गावकऱ्यास विचारले.

"असे सरळ नाकासमूर जा. तिथे एक काळा कुत्रा बसला असंल. तिथं डावीकडे वळा. मग मग एक पांढरी गाय लागंल. तिथं उज्वीकडं वळा."

"ती गाय नि कुत्रा तिथे कायमचे राहतात काय?"

"न्हाई, ते काय आपल्यावानी हायेत एका जागी र्‍हायला? काल व्हते. बरं रामराम."

आम्ही काही बोलायच्या आत तो तरातरा गेला निघून. आम्ही एकमेकांकडे पाहून कुत्रा गाय, गाय कुत्रा म्हणत पुढे निघालो. तेवढ्यात त्या पत्तेवाल्याचा आवाज आला,

"पावणं, शहरी दिस्त्यात."

"हां, मग?"

"मी आप्ली येक वारनिंग द्यून ठिवतो. त्या पाटलाचं टक्कूरं फिरलंय. शहरी मान्साच्या अंगावर म्हशीवानी धावून जातंया. तुम्ही सांबाळून जावा."

असे म्हणून तो आल्या पावली परत गेला.

आम्ही परत कुत्रे गाय म्हणत होतो त्यात म्हैस म्हैस म्हणत पुढे निघालो.

"आयडिया. आपण खेडुताच्या वेशात जाऊ. बोलताना इंग्लिश शब्द बंद. पाटलाच्या वाड्यात शिरलो की बघू पुढे."

"प्रिया असेल ना तिथे? दोन दिवस झाले भेटून."

*

गोष्ट कशी पुढे सरकत होती. मी एरव्ही अख्खे चित्र रंगांसहित डोळ्यापुढे आणून काढल्या सारखा गोष्टी लिहीतो. ही नवी गोष्ट म्हणजे आधी ठिपके, मग ते जोडा, मग त्यात रंग भरा असे सुरू होते. तशी मला मजा येत होती. मीच त्या गोष्टीत गुरफटत चाललो होतो. अरूणाला हे सहन होईल तर? लग्नाआधीच माझे लेखन म्हणजे तिला सवती सारखे वाटे. बायको आधीच सवत? आधी

सवत की आधी बायको? आधी कोंबडी की आधी अंडे? ती चिडून म्हणाली,"तुझे माझ्याकडे लक्षच नाही."

अजून काय लक्ष देणार? तिचा ड्रेस पिवळया फुलांचा आहे, नवा आहे की काय? की पायातली सॅंडल नवीन? तेवढ्यात तीच म्हणाली,

"काय लिहीतोस? नाहीना जमत? विनोद म्हणजे काय खायचे काम आहे की काय?"

"नाही, जमतेय, सांगू?"

मग मी तिला चार ओळींत आतापर्यंतची गोष्ट सांगितली. यावर तिने काय म्हणावे?

"मला असे पळवून नेले तर तू येशील ना?"

"असे म्हणजे?"

"गोष्टीतल्या सारखे?"

"येस्स. पण तुझे बाबा काय पैलवान नाहीत नि त्यांच्याकडे बंदूकही नाही. आणि तशी वेळच येणार नाही."

"का?"

"त्यांचा तुझ्या चॉईसवर पूर्ण विश्वास आहे."

ती खूश झाली आणि म्हणाली,

"आहेच मुळी."

"बघ अरू, एक वेळ माझा चॉईस चुकेल पण तुझा? शक्यच नाही!"

मी काय बोललो ते अरूणाला पटकन समजले नसावे. कारण ती एकदम खूश झाली. थोड्यावेळाने ट्यूबलाईट पेटावी तसा तिच्या डोक्यात प्रकाश

पडला तशी ती चिडलीच. अरूणाचे चिडणे महाग पडते. त्यावेळी चार रूपयात जंबो आइस्क्रीम मिळायचे. त्याच्यावाचून तिचा राग शांत होत नसे. काय भावात पडतो विनोद?

मग काही दिवस असेच गेले. काही सुचेना. माझे कथानायक अडकून पडलेले. करावे का वेशांतर नि पळवून न्यावे हिंदी सिनेमा सारखे नायिकेस? मग त्यात कथेतला मी कोण? बेगानी शादी मे दीवाना अब्दुला?

*

"एवढ्या लांब आलोय. घुसू चल पाटलाच्या वाड्यात."

"मी सांगतो पाटलाला, तुम्ही बी पाटील नि मी बी पाटील, पाहू काय करतोय?"

अरूण उसन्या अवसानात बोलला.

माझ्या डोळ्यासमोर बंदुकीची नळी आली. काही पूर्वीचे रावबहादूर जुन्या बंदुका जपून ठेवतात, त्या चालू असोत किंवा नसोत. अशीच शेवरेपाटलांची बंदूक असायचा संभव होता. पण विषाची परीक्षा कोण घेईल? अरूण मात्र बाशिंग गुढग्याला बांधून उतावीळ झालेला. मग मीच त्याला म्हणालो,

"अरूण, तू हो पुढे. मी बाहेर बघतो कोणी येतोय का?"

"बस क्या? ये ही तेरी दोस्ती?"अरूणने हिणवले.

"बघ, माझा प्लॅन असा आहे. तू वाड्यात शिरून प्रिया कुठे दिसते का ते बघ. मी बाहेरून कोणी येत नाही ना याकडे लक्ष ठेवतो."

"वा ! गनिम आत आहे नि तू बाहेरून लक्ष ठेवतोस? तुम लडो हम कपडे संभालते हैं?" अरूण उखडला.

"नाहीतर असे कर तुझी ही अंगठी मला दे. मी शिरतो वाड्यात. त्या रावणाने आपल्या सीतेस बांधून ठेवले असेल. मी हनुमान बनून जातो दाखवायला."

शेवरेपाटलांना रावणाची उपमा दिली तसा अरूण माझ्यावरचा राग विसरला. काय रामायण आहे? तो राम, मी लक्ष्मण किंवा हनुमान नि प्रिया रावणाने पळवलेली सीता. रावण म्हणजे खुद्द पाटील !

"रावण! रावण!"

दातओठ खात अरूण म्हणाला. माझ्यावरचा राग त्याने शेवरे पाटलांवर ट्रान्स्फर केला होता. त्यामुळे मी तर सुटलो.

गावचे रस्ते दिसतात जवळ जवळ पण अंतर खूपच जास्त असते. हा इथेss म्हणून सांगितलेला रस्ता काही संपता संपत नाही. अजूनही ते अ-स्थायिक कुत्रे नि गाई काही दिसायला तयार नाहीत. ते दिसतील, मग ते म्हैस का म्हसोबा दर्शन. आज जितका चाललो तितका शहरात एक महिन्यातही चाललो नसेन मी. आम्ही एका ध्येयाने भारून निघालो होतो. 'ध्येयप्राप्तीसाठी रस्त्यातल्या काट्याकुट्यांची पर्वा करू नका' हा तिसरी चौथीतील सुविचार प्रत्यक्षात आणण्याची वेळ आली होती. आम्ही रस्ता तुडवीत चाललोच होतो. रस्त्यावर धूळच धूळ. त्या धुळीने आम्ही माखून गेलो होतो. धुळीने कपडे सुद्धा पूर्ण मातकट झालेले. मला बरे वाटले. तेवढे आपोआपच वेशांतर !

एकदाचे आम्ही मग पाटलांच्या वाड्यासमोर पोहोचलोच. वाडा खूपच मोठा असावा. जुने पुराणे मजबूत दार. त्यावर कडी आणि कोयंडा. आजूबाजूला काही हालचाल जाणवत नव्हती. आम्ही धीर करून आत शिरलो.

"डस्ट वॉश जीन्स !"

तशाही अवस्थेत मी आमच्या जीन्सच्या बदललेल्या रंगावर विनोद केला पण अरूण टेन्शनमध्ये तो समजण्याच्या अवस्थेत नसावा. तो टेन्शन घेऊन अटेन्शन मध्ये उभा. मी माझा विनोद तिथेच सोडला. शेवरेपाटलांचा काही नेम नाही. कदाचित धारातीर्थी पडण्याआधीचा माझा हा शेवटचा विनोद असेल. अरूणने तोही ऐकण्याची तसदी घेतली नाही...

*

या ठिकाणी मी विचारात पडलो. काय करावे पुढे? इथवर तर आलोय. कथा पुढे सरकतेय. विनोदाच्या जागा ही मी हेरून ठेवल्या आहेत. अजूनपर्यंत शेवरेपाटलाला दांडगटपणा करताना दाखवलेय म्हणजे तशा हिंटा दिल्यात. प्रत्यक्षात आयुष्यात असे झाले तर काय होईल? पाटील अंगानेच नाहीतर पैशानेही दांडगट दिसतोय. त्यामुळे होऊन होऊन होणार काय? अरूणची माघार आणि प्रियाचे तोलामोलाच्या घराण्यात लग्न. ट्रॅजेडी ठरलेली. अरूणाला ट्रॅजेडी आवडत नाही. तिच्या मते शेक्सपियर केवळ ट्रॅजेडी लिहिल्याने वाया गेलेला लेखक होता. मी अरूण आणि प्रियाला भेटवले नाही तर माझी खैर नाही. त्या गोष्टीतल्या सारखी आमची पण ट्रॅजेडी होणार. मी ठरवले. त्या राकट पैलवानी बापाच्या आत एक कोमल हृदयवाला पिता बसवायचा आणि स्टोरीला ट्विस्ट द्यायचा. कारण संपूर्ण गोष्ट ऐकून अरूणा खदाखदा हसली की गडाबडा

लोळली तरी दु:खांतिका झाली तर हे सर्व क्षणार्धात विसरेल एवढे नक्की. परत एका गोष्टीसाठी अरूणाची नाराजी आणि चार रूपयांचे आइस्क्रीम. किती महागात पडेल? मग माझे ठरले, दोघांना काही करून भेटवायचेच.

*

आम्ही मग आत घुसलो. अरूण शक्य तितकी छाती पुढे करून. मी त्याच्या मागे. एका कुठून तरी एक धिप्पाड माणूस आला. फोटोतले शेवरे पाटील ते हेच.

"हा! हा! हा!" गडगडाटी हास्याचा आवाज आला.

"शिरप्या बग. नाक दाबले की तोंड उघडतया."

पाटीलांचा आवाजही बुलंद होता. या धाकट पाटलांची कन्या प्रिया, म्हणजे माझी प्रिया बहिनी इतकी नाजूकसाजूक असावी? तशाही स्थितीत माझ्या मनात हा विचार आला.

"सीधी उंगलीसे घी नहीं निकलता." मी एकाएकी म्हणालो. मला काय झाले कोणास ठाऊक. मी पर्यायी हिंदी म्हण सांगून मोकळा झालो. पाटलांना ते अनपेक्षित असावे. बहुधा त्या बुलंद आवाजापुढे कोणी बोलतच नसावे. एक नजर माझ्याकडे नि एक नजर अरूणकडे टाकत ते म्हणाले,

"तुमच्यापैकी अरूण पाटील कोन?"

आम्ही दोघे त्या आवाजानेच घाबरून गेलो. मी अरूणकडे बोट दाखवले ते एक ठीक पण अरूणनेही माझ्याकडे बोट दाखवले ! क्षणभर मलाही मीच अरूण की काय अशी शंका आली. अरूणला प्रियाचा चेहरा डोळ्यांसमोर आला असावा. त्याने एकाएकी ते बोट मागे घेतले नि म्हणाला,

"मीच तो पाटील, अरूण...पाटील."

"कॉलेजात कशाला जाता? दुसऱ्याच्या पोरी पळवायला?"

"पटवायला म्हणायचे का तुम्हाला?"

मी म्हणालो. अरूण फायरिंग रेंज मध्ये असल्याने मी तसा सेफ होतो पण जरा आगाऊपणाच झालाच असे मला वाटले. शेवरेपाटलांनी ज्या नजरेने पाहिले तिलाच भेदक नजर म्हणत असावेत. मी यापुढे न बोलण्याचा स्वत:शीच निर्धार केला.

"काय इचार तुमचा ? लगीन करनार काय ? माजी मुलगी कोनाची हाय म्हाईत हाये?"

"तुमची मुलगी अर्थातच तुमचीच आहे."

मी न बोलता बोलण्याचा निश्चय एवढ्या पटकन मोडेन असे मलाही वाटले नव्हते. उगीच नाही आई मला आगाऊ म्हणत. मी परत जीभ चावली. ते भेदक डोळे माझ्याकडे वळले. त्यात परत शब्द आले,

"आलास तू याच्या बरोबर, तुझ्याशी घेणे न देणे. गप् गुमान उबा ऱ्हा!" मग अरूणकडे वळून म्हणाले,

"काय करतो बा तुजा?"

अरूण शब्दांची जुळवाजुळव करीत असावा. तोंडी परीक्षा हा त्यांचा वीक पॉइंट. या उलट मी. पण दम मिळालेला अजून ताजा होता. म्हणून मी गप्प बसलो.

"बा हाय की ग्येला?"

"आहेत. बॅंकेत मॅनेजर."

"हुडूत, आम्ही इथून बॅंक काढायची नि शिकल्या सवरलेल्याला नोकरीस लावायचे. बरे पोटापाण्यासाठी काय करता?"

"डबा नेतो घरून, नाहीतर कॅंटीन मध्ये खातो काहीतरी. कॅंटीन चांगले आहे आमचे."

उत्तर अचूक असले तरी अजागळपणाचेच होते.

मराठीत फाफलणे असा शब्द आहे. त्याचा अर्थ समजावयचा असेल कोणाला तर अरूणची उत्तरे ऐकावीत.

त्यांच्या शेवटच्या उत्तराने मात्र शेवरे पाटलांना हसू फुटले. कुठल्यातरी सिनेमात 'रावण हसा' असा डायलॉग आहे. पाटलांकडे पाहून तसेच वाटत होते.

"बरं कारे, शिरप्या, गणप्या हे शहरी पावणं घरासून डब्बा घ्यून जात्यात पोटापाण्यासाठी."

शिरप्या,गणप्या मोठ्याने हसले. मालकांच्या जोकला हसणे हा त्यांच्या ड्यूटीचा भाग असावा.

"माज्या पोरीमागं का लागलास?"

ह्या प्रश्नाचे उत्तर किती कठीण आहे हे होतकरू प्रेमिकास विचारा. ते ही प्रत्यक्ष पोरीचा बापच ते विचारत असेल तर? अरूण त्या पैलवानाला काय सांगणार? प्रिया हसली की कसे चांदणे सांडते म्हणून? की अजून काही? अरूण मख्खासारखा उभा. मला उत्तर सुचले,"ती तुमची पोरगी आहे हे आधी माहित नव्हते !"

पण त्या भेदिले सूर्यमंडळाची नजर डोळयांपुढे आली नी मी गप्प राहिलो. अरूण आपला तोंडी परीक्षेत नेहमीप्रमाणे गटांगळया खातोय. एरव्ही कट्ट्यावर चुरूचुरू चालणारी जीभ अशावेळी कशी चिकटते?

"शिरप्या, जा घ्येऊन ये तिकडून."

आता हिंदी सिनेमासारखे आम्हाला बांधून लटकवणार की डायरेक्ट बंदुकीने ठो ठो?

*

येथे मला सिनेमासारखा ट्विस्ट सुचला. प्रियाला शिरप्या घेऊन येतो. पाटील तिच्यावर बंदूक रोखून धरतोय, अरूण धावत तिच्यापुढे उभा. पण बंदूक आणावीच का? विनोदी कथेत हिंसा? नकोच. काय होऊ शकते? दोघांना एकच गोळी लागते, मग दोघे हॉस्पिटलात, मग पाटलाला पश्चाताप.. हे फिल्मी होईल. अरूणाला काय आवडेल? जास्त न ताणता दोघांचे लगीन.... मी अरूणाचा चेहरा डोळ्यासमोर आणला. प्रत्यक्षात कोणी माजलेला पाटील अशा ऐऱ्यागैऱ्यावर मेहेरबान होईल? उलट घराण्याची इज्जत वगैरे ऐकवून पोरीस घरात डांबेल नि लवकरात लवकर कोण्या तोलामोलाच्या घराण्यात बार उडवून टाकेल. बॅंक ऑफिसराच्या मुलाशी पाटलाच्या पोरीचे लग्न? ही शोकांतिका करावी? छे. मोठमोठे सिनेमावाले पण तसे करत नाहीत. कलाविष्कार मोठा की माझे स्वत:चे आयुष्य. गोष्टीच्या शेवटी झाले अरूण नि प्रिया एकत्र पाटलाचे हृदयपरिवर्तन होऊन तर काय बिघडणार आहे? वास्तववादी लिहीण्यात अरूणाच्या रागाचा धोका. नो! नेव्हर! मी पाटलाच्या कठीण हृदयास वितळवण्याचे ठरवले. पाटलाचा झाला इतका ताठरपणा पुरे आता.

*

शिरप्याने काय आणावे? बंदूक, बांधायला दोरी, लाठ्या काठ्या? नाही ! त्यांच्या पाठोपाठ प्रिया येऊन उभी ! शेवरे पाटील पुढे झाले.

"काय गं पोरी? कॉलेजात हे धंदे सुचत्यात? अभ्यासबिभ्यास न्हाई?"

प्रिया खाली मान घालून उभी.

"बोलं ना, कां मुकी जालीस?"

एका क्षणी हुंदका देऊन प्रिया रडायला लागली. ते पाहून अरूण पुढे सरकू लागला तसे पाटील कडाडले,

"आम्ही आहो जित्ते इथे, तूच कारण हायेस तिला रडवायला."

प्रियाने रडण्याचा व्हॉल्यूम अजून वाढवला. पाटलांच्या मनात काय असावे? त्या वाड्यात दहा पंधरा तरी खोल्या असतील. त्यातून आम्ही प्रियाला कसे शोधणार होतो? इथे पाटलाने तिलाच समोर हजर केलेले. पाटलांचा आवाज पण जरा नरम वाटला मला.

"पोरी, उगी. अशी रडू नकोस. तुझी आय न्हाई, मी तुला अशी वाढवली ते अशे रडवायला न्हाई. तुझी खात्री हाये ह्या पोराबद्दल?"

प्रियाकडे ऑन ऑफ चे बटन असावे. तिचे रडणे एकाएकी थांबले.

"आबा तुम्ही.."

तिने वेगळाच आवाज लावला. त्यात तो पैलवानी बाप न वितळता तरच नवल.

शेवरे पाटील एकाएकी अरूण कडे वळाले, म्हणाले,

"नीट सांबाळशील माज्या पोरीला ना? नायतर या पाटलाशी गाठ हाये."

अरूण पुन्हा एकदा फाफलला. त्याला काहीच सुचेना. त्याला हे अनपेक्षितच असावे. तोंडी परीक्षेस मोठ्या तयारीने कठीण प्रश्नांची अपेक्षा करून जावे नि परीक्षकांनी एक ते दहा आकडे म्हणून दाखवायला सांगावे असे झाले. मला कळाले. प्रियाच्या चार आसवांत पाटील वाहून गेले. पाटील म्हणाले,

"जावई बापू, चला. चांगले हात पाय धुवा नि खाऊन घ्या. शिरप्या सोय कर रे पावण्यांची. आन तुमीपण जा त्यांच्या संग."

माझ्याकडे पाहात पाटील म्हणाले.

आता पुढे काय? संघर्ष संपला नि सगळीकडे आनंदी आनंद झाला.

दुपारी मी प्रियाला विचारले,"हे असे कसे काय झाले?"

प्रिया हसली. म्हणाली,

"हे असेच होणार होते. आबा कितीही पैलवानी करोत माझ्या पुढे त्यांचे काय चालणार? आबा मला बोलले, तुझ्यामागे तुला सोडवायला तो शहरी पोरगा नुसता आला तरी समजेन तो खरा म्हणून, या शेवरेपाटलासमोर बघून कोणाची हिंमत होत नाही. नुसता तो वाड्यात आला तरी पण तुझे लग्न लावून देईन त्याच्याशी."

"म्हणजे हे कॉलेजातून पळवून नेणे वगैरे ठरवून झाले?"

"मला नव्हते माहिती. घरी आल्यावर आबांनी सांगितले. मी वाट बघत होते अरूण येईल कधी याची."

एवढा वेळ झाला तरी अरूणने तोंड उघडले नव्हते. नाही म्हणायला खाण्यापुरते तोंड उघडले होते त्याने. चांगले चापून जेवलो होतो आम्ही. एकतर पायपिटीने भूक चांगलीच लागलेली आणि त्यात परत गावरान जेवण.

*

संपली गोष्ट. तशी कथा म्हणून बरी आहे. नेहमीच्या गंभीर समस्या आणि भावनाप्रधान कथांहून वेगळी. विनोदाची अजून फोडणी द्यायला हवी. अरूणाला हसायला येईलच कारण शेवट सगळा गोड. मी पैज जिंकेन. अरूणा खूश होईल हेच उत्तेजनार्थ बक्षिस.

मी माझी कथा अरूणाच्या हातात ठेवली. अरूणाने वाचली तर खूश झाली ती.

"छान आहे."

"म्हणजे? मी पैज जिंकलो?"

"हो, लिहीतोस की विनोदी, उगाच काय ते सीरियस लिहीत बसतोस?"

"ते ठीक, पण माझे बक्षिस?"

"देईन की."

आता तिने काय बक्षिस दिले हे मी सांगत नाही नि तुम्ही विचारू नका.

ही कथा मी मग इथेच आणि अशीच सोडली. ती पुढे कुठे पाठवली नाही. एकदा अरूणाला आवडलेली गोष्ट कोणा संपादकाकडून नाकारून यायला नको होती मला.

पण त्यानंतर झाले इतकेच की मी लेखनाचा ट्रॅक बदलला. आणि मी (माझ्या मते) विनोदी लिहू लागलो. आजपर्यंत माझी दहा बारा पुस्तके आली. कुठेना कुठे काहीना काही छापून येत असते. थोडेफार माझे नाव झालेय. या सर्वांची सुरूवात या गोष्टीनेच झाली.

हीच माझ्या पहिल्या विनोदी कथेची कथा !

लीलाई दिवाळी २०१५

# रायटर्स ब्लॉकची गोष्ट!!

१.

खूप दिवस झाले.

सुचत काही नव्हते.

लिहू तर काय लिहिणार?

मी बाहेर पाहिले.. बाहेर आभाळ भरून आलंय. आधीच्या निरभ्र आकाशात एकाएकी ढग भरून आलेले.. अशा वातावरणात कसली लिहीणार गोष्ट आणि ती ही विनोदी?

मग लिहावी एखादी विरहकथा..

किंवा कविता?

कवितेचे बरं असतंय..

उगाच फाफटपसारा नाही. पंधरावीस लायनी लिहिल्या तरी बस्स! अगदी मोठीच  लिहायची तर अजून घातल्या पंधरा वीस. पण एकूण कारभार काही वेळात आटोपणारच. पण कथा म्हटली की विषय आला, आशय आला.. वर त्यात ते समीक्षक म्हणतात तसे काय काय. म्हणजे भावनांचे कंगोरे काय.. अभिव्यक्ती की काय ते काय.. हे सारे करताना कथेचा तोल न ढळू देणे महत्त्वाचे. त्यातून परत शब्द योजना अचूक हवी, घटनांची गुंफण व्यवस्थित व्हायला हवी.. अशी की कथेला टोक यायला हवे! ही काय पेन्सिल आहे टोक काढायला? पण नाही! संपादक बिन टोकाच्या कथेकडे ढुंकून पाहात नाहीत

आणि चुकून छापली गेली तर समीक्षक आपली नजर ढळू न देता तिच्यावर तुटून पडण्यात कसर करत नाहीत! अशा कथांचा कसा काय वास लागतो शिकारी कुत्र्याप्रमाणे कोणास ठाऊक! मग उगाच कथेचे लचके तोडत तिची लक्तरे लोंबकळत चव्ह्याट्यावर मांडणे आले. असे की लेखकाला कथा लिहिण्याचा पश्चात्ताप व्हायलाच हवा हा ताप पाहून! पण लिहिण्याकरिता जन्म आपुला असताना लिहिण्यावाचून राहिना आणि लिहिण्यावाचून करमेना. लिहायला हे हवेच. मग छापणे आले. कुण्या मोठा संपादकाने छापलेच तर समीक्षेचा फेरा आलाच. छोट्याने छापले तर इथूनतिथून दुर्लक्ष.. म्हणजे अनुल्लेखाने मारणे! थोडक्यात मरण अटळ. तोवर होता होईल ती साहित्यसेवा. निरलस निर्विकार नि निष्काम! निर्गुण.. निराकार.. हे ही शब्द सुचतात इथे. पण अर्थात.. म्हणजे अर्थात अर्थातच बसत नाहीत.. तर ठेवून देतो बाराव्या खेळाडू सारखे रिझर्व्ह! उपयोगी पडतील कधीतरी!

एकेक दिवस कसा विचित्र उगवतो.

काही काम नाही म्हणावे तर कामाचा ढीग साचलेला. करू म्हणावे तर मूड नाही. वेळ काढून लिहू म्हणावे तर स्फूर्तीदेवी नि कल्पनादेवी दोघी रूसून बसल्यात. समोर कागद आहे कोरा.. पेन आहे हातात पण त्या मेंदूच्या ज्या कोठल्या भागात हे सारे घडते तो भाग जणू झोपलेला. हाय रे देवा! आजही लिहून झाले नाही काही तर अस्वस्थ होणार मी.. मग उगाच ह्याच्यात्याच्यावर डाफरत फिरणार मी. सुचेल का काही?

खरेतर याहून बाकीच्या लोकांचे बरे असते. अगदी कविवर्यांचे ही. सुचले चार शब्द.. जुळले की झाली कविता! कधी चारोळी लिहितील तर कधी तीन

ओळींत हायकू. मनात आले तर खंड नाहीतर महाकाव्य! न टोक जरूरी न अभिव्यक्ती!

पण माझे तसे नाही ना! देवदत्त प्रतिभा आणि तिचा हुंकार! तो सर्व कथा लेखनासाठी आहे.. असावा. हा दैवी इशारा आणि त्या मागील संकेत कळला मला त्यास काही वर्षे उलटून गेली. लिहितोय तेव्हापासून.

आणि आज कसला हा बोळा अडकून वाहते पाणी थांबावे तसे झालेय. नाही सुचत काहीही!

पण एक सेकंद..

बोळा अडकल्यास त्यामागे पाणी तुंबते.. तशा या ब्लॉक मागे तुंबल्या असाव्यात का भावना? एकाएकी तो निघाला की वाहू लागतील त्या दुथडी भरून नि माझ्याकडून होईल सकस नि रसदार साहित्य निर्मिती? आणि निघेल ना माझ्या कथेस टोक?

मनुष्यप्राणी हा विचार किती वेगाने करत असावा? प्रकाशाच्या वेगाहून जास्त हा मनोवेग! कारण सकाळी बैठक मारून बसलो लिहायला.. नि काही सुचेना तेव्हा हे सुचले! काही मिनिटांतच हे असले मौलिक चिंतन करून टाकावे ना मी! काही असो माझा वैचारिक पाया असा पक्का आहे म्हणून आजवर लिहित आलोय मी हे खरे! सर्व अडचणी झुगारून मी कागदावर पेन टेकवून लिहायला बसलो. कधीकधी कसे जोर लावला की अडकलेल्या पाण्याचा निचरा होतो तसा माझ्या तुंबलेल्या कथेस कदाचित मिळेल आता वाट!

२.

माझी ही, म्हणजे पत्नी, म्हणजे रत्न आहे असे म्हणता आले असते तर! म्हणतो मी तसे तिच्यासमोर, नाही असे नाही. पण अनुभवी जनांना 'तिच्या समोर' या एका शब्दातून एकूण खरा अंदाज यायला हवा! पण तशी ती रत्न आहेच! उगाच नाकारावे कशाला? अगदी नावाने ही आहे ती तशी!

तर ही रत्नमाला.. रत्ना.. रतन्मणी ..

ही माझी पहिली वाचिका की वाचक. खरे तर वाचक नव्हे तर श्रोती की श्रोता? तशी ही फार समजूतदार आहे. काही नाही तर माझे ऐकून तर घेते. म्हणजे याबाबतीत! नाहीतर माझा मित्र.. शीघ्रकवी जागृत जनार्दन.. लिहितो दणादण पण कोणाला ऐकवायला फिरतो वणवण! हे दणादण नि वणवण ही शब्द रचना त्याचीच! त्याची बायको त्याने कविता ऐकवली तर जेवण देत नाही म्हणे.. त्यामुळे कधी आगीसारख्या ज्वलज्जहाल कविता लिहायच्या असतील तर जा.जनार्दन तिला कविता ऐकवतो.. तिने भुके ठेवले की पोटात फुललेला अंगार मग तो कवितेत उतरवतो! हे त्यानेच सांगितलेले ट्रेड सिक्रेट!

तर सांगत माझ्या जास्त नशिबाबद्दल होतो.. जास्त नशीब हा कमनशीबचा विरूद्धार्थी शब्द.. त्याचा जन्मदाता मीच! विषयांतर होईल पण सांगूनच टाकतो.. मी अशा कित्येक शब्दांना निर्माण केलेय! ही सुद्धा एक देवदत्त प्रतिभाच!

तर .. गोष्ट राहिली अर्धवट.

ही घरात काही पसारा काढून बसलेली. अशावेळी हिचा मूड फारसा चांगला नसतो. ऑफिसातही बॉसचा मूड कधी चांगला असेल याचे ठोकताळे बनवलेत मी. तसेच हिच्याबद्दलही!

पण आज आश्चर्य झाले.. सूर्य एकवेळ पश्चिमेस उगवेल दिशेचा अंदाज चुकून.. पण उत्तरेस? कदापि नाही. तर सूर्य उत्तरेस उगवावा अशी ही स्वतःहून म्हणाली,

"काय नवीन लिहिणे? बघतेय ती झटापट तुझी.. सुचत नसेल तर चहा प्यावा नाहीतर कॉफी.."

मी ताडकन उडालो.

बाकी आम्हा लेखकांचे एक असते.. रायटर्स ब्लॉक बद्दल आम्ही कोणालाही सांगत फिरत नाही.. काय नि कसे सांगणार?

मागे एकदा असेच झाले..

कुठल्यातरी गोष्टीतला नायक नि नायिका.. गेले पळून.. म्हणजे मीच लावले त्यांना पळायला.. आता पुढे काय? देवळात लग्न? की त्यांच्या घरच्यांनी केलेला हिंदी सिनेमातल्या सारखा पाठलाग? काही लिहिले तरी यात नाविन्य ते काय.. आला ना आता अडथळा? मग मी जिगरी दोस्त माझा, कैलास ..त्याला विचारायला गेलो. म्हटले चांगला अनुभवी आहे..

"बाबा रे.. मदत कर. समज गोष्टीतला तू पळून गेलास.. सुंदरीस घेऊन.."

"मी? आणि सुंद्री कोण?"

"सुंद्री नाही.. सुं..द..री.. तुझी नायिका.."

"माझी? हिला पाहिलेयस ना?"

तो कल्पनावहिनीकडे निर्देश करत म्हणाला. ती तशी बऱ्यापैकी कडक स्वभावाची हे खरे पण नुसते सुंदरी नायिका समजायलाही हरकत?

"ते राहू देत..मग समज क्ष हा नायक य नायिकेबरोबर पळून गेला.."

"समजायचेच कशाला.. आणि य ही क्ष बरोबर पळाली असे का नाही म्हणू?"

"समतेच्या युगात तू म्हणतोस तसे होऊ शकते.. पण.."

"पण नाही नि बिण नाही! पळून बिळून जायला माझा सक्त विरोध आहे.."

बापरे! माणसाची स्मरणशक्ती अशी आणि इतकीही अधू असू शकते? कैलास नि कल्पना.. दोघे आमच्याच कॉलेजचे. दोघांच्या घरून सक्त विरोध.. त्यांना पळून जायला आम्ही मित्रांनीच मदत केलेली.. पठ्ठ्या आठ दिवस आमच्याच  घरी दडून होता त्याच्या नव्या बायकोबरोबर आणि आज म्हणतोय पळून जायला सक्त विरोध? कितना बदल गया इन्सान! झाली कित्येक वर्ष पण नाल्यातून इतके पाणी वाहून जावे? नाला!? नाला म्हटल्यामुळे ही गोष्ट मुंबईत घडलेली हे चतुर चाणाक्ष वाचक ओळखतीलच! याला म्हणतात चतुर लेखक!

तर ..

मी खरेतर त्याला त्याच्या भूतकाळाची आठवण करून द्यायला हवी होती. पण माझा मूळ मुद्दा वेगळाच होता ना! आणि इथेही सांगायचा मुद्दा वेगळाच आहे. म्हणजे त्या गोष्टीचे पुढे काय करावे? मागील गोष्टीत मी दोघांच्या घरी तुंबळ रण माजवून शेवटी दिलजमाई करवून आणलेली. या गोष्टीत काय..?

आणि आता ही स्वतः विचारतेय कुठे अडलीय गोष्ट! हे स्वप्न की सत्य? चिमटा काढून पाहू? पण स्वतः काढलेला चिमटा स्वतःला लागत नाहीत म्हणतात.. (ही माझीच माझ्या मातृभाषेस अल्पशी देणगी बरं) तर हे सत्य की स्वप्न?

३.

र चा चौकोन..

रमण आणि रमणी यांची गोष्ट!

रमण ऊर्फ रम्या आणि त्याची बायको रतनमणी ऊर्फ रमणी ऊर्फ रमी! रम्या आणि रमी एकाच शाळेतून शिकलेले. तिथून जोडी जमवून आणि टिकवून ठेवलेले! दोघे आपल्या विश्वात रममाण. एक रम्या नि रमी.. त्यांची मुलगी रजनी ऊर्फ रज्जू आणि मुलगा राजन ऊर्फ राजू.. म्हणजे हा र चा चौकोन.. रम्या रमी राजू रज्जू.. चौकोनी सुखी कुटुंब.. मध्यमवयीन.. रज्जूने प्रेमविवाह करून कष्ट वाचवलेले.. आणि कोर्टात लग्न करून पैसेही. राजू कामासाठी बाहेर.. आता रम्या करतोय आपले लेखनकाम नि रमी जातेय आपल्या भिशी पार्ट्यांत. दिवस कसे मजेत चाललेत . मग एक दिवस दोघांत येते वितुष्ट.. गैरसमज आणि काय? त्यातले डिटेल्स नाही सांगत बसत पण होते असे हे खरे! दोघे भांड भांड भांडतात. आता कोणी म्हणेल यात कुठे आलाय विनोद.. पण आहे. त्यांचे संवाद स्वतः नायक नायिकेस हृदय की काळीज पिळवटून टाकणारे वाटोत पण वाचणाऱ्यास हसू येईल.. तर त्यांचे ते वितुष्ट.. रमी ऑलमोस्ट बॅग भरून निघायच्या तयारीत! आणि हा ड्यूटीफूल त्या बॅगेसाठी कुलूप शोधतोय! म्हटले ना गोष्टीत विनोद आहे. गोष्ट विनोदीच आहे. कारण हा रम्या तसा वेंधळा आहे.. पाचपोच कमी असणारा! म्हणजे काय तसा मनातून चांगलाय पण कधी बोलून बसतो तर कधी करून बसतो काहीबाही. याचे लक्ष कुठे असते याची शंका येऊ लागते याचे बोलणे ऐकून तर कधी याच्या बुध्दीबद्दलच शंका यावी असा वागतो तो. पण तसा तो आपल्या विश्वात रममाण होणारा.. आपली आपली

कथा नि त्यातली पात्रे खेळवणारा.. रमी तशी समजूतदार पण तिची पण काही लिमिट असणार की नाही? ही मारे बॅग भरतेय नि हा कर्तव्यबुद्धीने तिला मदत करतोय..आठवणीने सांगतोय.. टूथपेस्ट नि ब्रश विसरू नकोस म्हणून! हिच्या अंगाचा तिळपापड होणार नाही तर काय.. आता ही निघणार.. हा रम्या तिला चक्क सोडायला निघालाय.. टॅक्सी आणू का विचारत! रमी खरोखरच निघण्याच्या बेतात.. आणि हा एकाएकी जागा झाल्यासारखा..

"रमी तू कुठे चाललीस? त्यापेक्षा चल रमी खेळू.. की लॅडिज.. तुला पाच तीन दोन आवडत नाही नि झब्बूपण. मला ठाऊक आहे!"

ही वेळ विनोद करायची नाही. खरेतर रमीशी कधीच विनोदाने बोलायची वेळ नसते.. पण रम्या कसले ऐकतोय. इतक्या वर्षांत या गाढवाला इतकेपण नाही कळले? मारे मारतोय विनोदामागून विनोद. पण या विनोदापायीच उद्भवले ना भांडण. भोगा कर्माची फळे! आणि आता रमी जातेच आहे.. आता काय?

४.

गोष्टीतला मतितार्थ सांगण्याची कला मला मस्त जमते! इंग्लिशमध्ये jist of the story म्हणतात ना तशी. शाळेत असताना मी कोणत्याही गोष्टीला असा आक्रसून टाकू शकायचो. आक्रसून म्हणजे.. मी त्याला चक्का बनवणे म्हणायचो! म्हणजे तिच्यातील महत्वाची गोष्ट ठेवून बाकी बाजूला काढून टाकणे! मला कधी कधी हे दह्यापासून चक्का बनवल्यासारखे वाटायचे.. बांधले फडक्यात नि पाणी निथळून जाईपर्यंत ठेवले उलटे टांगून! तशी

'चक्काकरणा'ची सवयच लावून घेतली आहे मी स्वतःला. शाळेत एक तृतीयांश परिच्छेद करण्यात मला पैकीच्या पैकी मार्क मिळायचे ते उगाच नाहीत!

तर हिला एकतर वेळ नसतो.. सगळी गोष्ट वाचायला लागलो तर ही म्हणणार.. लवकर.. मला काम आहे! म्हणून असे संक्षिप्त ऐकवतो. जाऊ देत. ऐकून घेते हेच खूप नाही का?

तेही थोड्याफार कौतुकाने असावे असा संशय येतो मला कधी कधी. म्हणजे काय आहे की नवऱ्याबद्दल उघड चांगले बोलत नाहीत आपल्यात म्हणून! तशी पद्धतच नाही आहे म्हणे!

तर ती गोष्ट..

रम्या कसला रेम्या डोक्याचा तो.. चांगली बायको नाही येत सांभाळता? कुणी तिच्या बरोबर असली थट्टा करतो? समजूतदार झाली तरी किती समजून घ्यावे बिचारीने? खरेच 'भयचकित नमावे तुज रमणी' म्हणून आराधना करावी तिची तर हा रेम्या डोक्या रम्या 'रमी खेळूया' सारखे थिल्लर जोक्स मारत बसलाय. तेही आलेला बाका प्रसंग विसरून?

तर हे तर होणारच होते. याला कसली सहानुभूती दाखवायची?

पण फक्त आता पुढे काय..

रमी गेली तर सोडून.. तसे जबरदस्त कारण असल्यावाचून नाही जायची ती. निघून जायच्या धमकीचे किंवा खरेच निघून जायचे वय लग्नानंतर काही वर्षांतच.. आता एवढ्या वर्षांनंतर..?

छे! पण घडलेय किंवा घडवलेय या गोष्टीत खरे मी!

प्रश्न फक्त एकच.. आता पुढे काय?

पुढे काय ?

हा प्रश्न जगात सर्वात गहन प्रश्न असावा! फिलॉसॉफीत नको शिरायला पण सध्यातरी हा प्रश्न गहन आहे. बाकी काही असो नसो.. सध्यातरी तसा तो नक्कीच आहे. तर आता पुढे काय? ब्लॉक ब्लॉक म्हणतात तो हाच नि असाच असतो.. पहिल्यांदाच हा होतोय असे नाही.. पण अशा पध्दतीचा प्रथमच! बाहेर हवा कुंद आहे. विरहाग्नीत जळणाऱ्याची कथा वा कविता लिहायची झालीय वेळ आणि मी मांडून बसलोय पसारा.. विनोदाचा! घडायला हवीय मला सुखांतिका.. अंती कशाला .. नेहमीसाठीच राहो ते सुख नि काय..असे म्हणताना मी कोणी ज्ञानेश्वर वगैरे झाल्यासारखे वाटते मला! पसायदान मागणारा!

तर असली सारी हकिकत. होतेय एवढंच की आता पुढे काय समजत नाही. या पुढे काय ने काही सुचेना झालेय. नळात अडकलाय कुठेतरी बोळा कसलातरी.. म्हणजे कुंठितावस्था! नळातून पाणी येणे बंद व्हावे तसे. आता करून करून काय करावे.. नाही समजत! म्हणून तर हिच्यापुढे बसलोय.. बाई आता यातून सोडव. सुटका तुझ्या हाती आहे.. लाज राख बये.. पण ही काहीच नाही बोलत. बोलेल कशी म्हणा!

मी बसलोय. एकटाच. समोर टेबल. त्यावर कागद. अडकलेली गोष्ट. मनाची कुंठितावस्था. गोष्ट अडकलीय. बाहेर कुंद हवा अजून कुंदतर होत होत कुंदतम झालीय. वारा पडलाय. ट्रॅफिक जाम व्हावा नाही तर पाईपात कचरा अडकावा असला जाम बसलाय. पुढे हलण्याची शक्यता नाही नि मागे जाण्याची सोय नाही. करू तर काय करू..

या गोष्टीवर उपाय एकच.. माझी रत्नमणी! पण..

थोरामोठ्यांच्या गोष्टीत गोष्टीतली पात्रे आढ्याकडे नजर लावून पाहात असतात. तसा प्रसंग हा. शहरातल्या फ्लॅट मधले फॉल्सिलिंग म्हणजे आढे की आढ्या असेल का? मी त्याकडे नजर लावली तर उत्तर मिळेल का? एखाद तास उलटून गेलाय! मी ही तिथेच नि माझी गोष्टही तिथेच. काहीतरी होऊन जाऊ देत.. पण ते काहीतरी .. चांगलेच काहीतरी व्हावे. कारण ही गोष्ट विनोदी आहे ना!

५.

किती वाजलेत कोणास ठाऊक. दरवाजा उघडाच असावा. माझा डोळा लागला असावा बहुधा. बहुधा कशाला. लागलाच होता तो. कसल्याशा आवाजाने आली जाग तर समोर रतनमणी. माझी रत्ना.. तिला मी रमी म्हणतो लाडाने. आज सकाळी रागारागात तावातावाने भांडून गेली. मी करंट्यासारखा पाहात बसलो. खरेच आलीय की भास.. चिमटा काढू तर माझ्याच थियरीप्रमाणे स्वतःचा चिमटा स्वतःला लागत नाही! हिलाच सांगावे.. म्हणालो,

"रत्ने.. रमी.. काढ गं जरा चिमटा.."

रमी पुढे झाली..

"हुं.. चिमटा काढ म्हणतोयस खरा.. पण मी गेले तेव्हा कुठे गेला होतास.. जाऊ नकोस इतकेही नाही बोलू शकलास?"

त्या चिमट्याचा नि जाऊ नको यांचा तार्किक संबंध काही नाही पण हिचे असेच असते. कुणाची शेपूट कुणाला जोडेल सांगता येत नाही. माझ्या गोष्टीत सारी पात्रे कशी लॉजिकली चालतात बोलतात. आणि ही.. यावरून तर झालेले आमचे भांडण! तसा मी जागृत होतो.. जागरूकही. आता हिच्या भाषेच्या चुका काढायची वेळ नाही!

"काहीतरी कारण काढून भांडत असतोस.. डाफरतोस उगाच.. मी गेले पण नंतर तुझीच दया आली.. तसा बरा आहेस रेम्या डोक्याचा असलास तरी.. पुन्हा नकोस भांडू.."

"काय करू गं.. म्हटले ना काय लिहावे सुचत नाही.. मग होते चिडचिड.."

आता लिहिणे सुचणे न सुचणे यात हिचा काय संबंध.. मला तो moment of truth जाणवला. ही अतार्किक वागते बोलते हे खरे पण मनाशी म्हणालो, तुम भी कुछ कम नही बॉस. एका क्षणी माझे मलाच जाणवले.

"सॉरी.. अगं गोष्टीतली पात्रे अडकली.. म्हणजे मी अडकलो ना की असे होते.. रायटर्स ब्लॉक म्हणतात याला.."

"असेल.. म्हणून तू मला टोचत असतोस..?"

च्यायला! म्हणजे हिला टोचतंय.. माझी गोष्ट हिला टोचतेय.. म्हणजे चांगलेच टोक आले असणार गोष्टीला! आता हरकत नाही.. जमणार! टोक असलेली गोष्ट जमणार!

"तू अशी का गं गेलीस डोक्यात राग घालून? मी मनातून होतो गोष्टीच्या विचारात आणि बोलत होतो तुझ्याशी! काही सुचत होतं नि पकडीत सापडत नव्हतं.."

"म्हणून हे टोचाटोची?"

"सॉरी! पण गोष्ट कशी टोकदार व्हावी म्हणून हे करणे आलेच ना?"

एकूण ही आली परत.

एका गोष्टीतला तो ब्लॉक..

त्या ब्लॉक मुळे खराखुरा आयुष्यातला ब्लॉक.. माझ्या लिहिण्यातल्या कुंठितावस्थेत मदत करायची ही.. या खऱ्या ब्लॉक मध्येही तीच आली सोडवायला!

रायटर्स ब्लॉक तर सुटला..

आता भावभावनांचे तुंबलेले पाणी वाहिल दुथडी भरून.. खरीखुरी रमी आली परत. पण गोष्टीतली?

तिलाही आणून टाकू परत?

यस्स.. ती परत येणारच.. सुटला..

प्रश्नही आणि माझा रायटर्स ब्लॉक ही!

# बावळट कासवाची कथा



जगाच्या कल्याणा संताच्या विभूती म्हणतात.. पण कल्याण ॲक्च्युअली करणाऱ्या की तसा नुसता विचार करणाऱ्या सुद्धा? कारण मी तसा विचार नेहमीच करत आलोय. म्हणजे मी संतांच्या विभूतीपदासाठी क्वालिफाय होतो का?

म्हणजे इथे इतका जागतिक संदर्भ नाही सध्या.. पण जो आहे तो इतरेजनांच्या कल्याणाबद्दल. म्हणजे माझा मित्र चंद्रकात.. ऊर्फ चंदू ऊर्फ.. चंद्रू बद्दल. अमोल.. अमेय..रोहन.. रोहित ..असल्या नावांत कुणी तरूण चंद्रकांत आजच्या जमान्यात असू शकतो..? त्याचे ते सत्तर ऐंशीच्या दशकात शोभेल असे नाव.. आणि एकूण मला त्याचे व्यक्तिमत्व ही तसेच वाटायचे.

एकविसाव्या शतकातील आम्ही.. आणि जुन्या सिनेमात जसे भीड न चेपलेले हीरो असायचे तसा हा. साधा सीधा नि एकदम सरळ. बावळट म्हणावा असा. म्हणजे जुन्या सिनेमात अमोल पालेकर हीरो असावा असा. अर्थात मला तो वाटायचा तसा. म्हणजे तो तसाच असेल असे नाही ना.. हे कळायला मात्र उशीर लागला. आणि त्या सगळ्या सिनेमातही अमोल पालेकर कधी हीरॉइन शिवाय राहिला नाही.. ही हिंट घ्यायला मी विसरलो.

तर चंद्रकांत साधासरळ सुतासारखा होता हे खरेच. सुतासारखा म्हणायची एक पद्धत आहे म्हणून.. नाहीतर सूत कसले असते सरळ! पण  हा चरणसुत साधासरळ होता हे खरे.  त्याच्या बाबांचे नाव चरणदास.. म्हणून हा चरणसुत! कॉलेजमध्ये साधे कपडे घालून यायचा. इस्त्री असेल नसेल.. अभ्यासात तसा बरा..पहिल्या फटक्यात पास होणारा ..  बाकी एक्स्ट्राकरिक्युलर मध्ये ही थोडाफार असलेला. फक्त कशातच अव्वल नाही.. कुणाच्या अध्यात मध्यात नसला तरी कुणाच्या खिजगणतीत रहावा असा चमकला नाही कधी.

चंदू ने मुख्य प्रवाहात यावे असे मला वाटायचे कारण तेच, त्याचे कल्याण व्हावे म्हणून. म्हणून म्हटले.. मला संतपद मिळू शकेल या जोरावर? मिळो न मिळो पण मुख्य प्रश्न चंदूचा आहे. म्हटले ना, मी स्वतःबद्दल चिंता नाही करत. संतपदाचा वगैरे तर मुळीच नाही. माझा तो काय म्हणतात तो, मोटो की मोट्टो, जस्ट एक या जगाचे कल्याण! सर्वेन सुखिन इ. तशी मुख्य प्रवाह वगैरे जरा राजकीय भाषा वाटते ना? पण माझा म्हणण्याचा उद्देश तोच आहे, राजकीय नसला तरी.

तर आजचा मुख्य प्रवाह काय आहे?

स्मार्ट कपडे. स्मार्ट लाइफस्टाईल. स्मार्ट फोन आणि स्मार्ट मुले नि त्याहूनही स्मार्ट मुली! आणि प्रत्यक्षात कुणी स्मार्ट असो की नसो.. या सगळ्या ॲक्सेसरीजच्या बळावर तो स्मार्ट म्हणवला जाऊ शकतो. बावळट चंद्रूला स्मार्ट बनावा.. म्हणजे त्याचे कल्याण होईल एवढा साधा माझा विचार त्याच्याबद्दलचा. जाता जाता सांगतो.. त्याला चंदू म्हणता म्हणता तो चंद्रू झाला.. कारण मला लागलेला शोध! म्हणजे कित्येक दशकांपूर्वी एक चंद्रू आत्मा नामक गायकाचे प्रस्थ होते. हे मला यू ट्यूबवर कळले. त्या आत्मा नावाच्या गायकाप्रमाणे ह्या चंदूचा आत्मा ही मला आजच्या जमान्यात ॲंटिक वाटायचा. मी मग त्याचे नामकरण चंद्रू करून टाकले!

तर चंद्रू कसला अजूनही साधा मोबाईल घेऊन फिरणारा. ज्यात नेट नाही तो मोबाईल पण कसला आलाय मोबाईल? त्याच्या त्या साध्या मोबाईलइतकाच चंद्रू साधा होता! त्याने स्मार्ट बनावे.. अगदीच मुलींमागे लागू नये पण किमान डोळे वर करून तरी पहावे.. इतपत त्याच्या कल्याणाची होती मला चिंता. मी त्याला तसे सांगायचोही पण तो सदा दुर्लक्ष करायचा माझ्याकडे. किंवा खरेतर माझ्या सांगण्याकडे. ज्याला स्वतःबद्दल काही पडले नाही. त्याला मी कसली मदत करणार होतो? नशीब ज्याचे त्याचे आणि काय!

***

पुढे माझे लक्ष चंद्रू वरून उडाले. असे नाही की माझा संतपणा काही कमी झालेला. पण मीच माझ्या भानगडीत अडकलो. आपल्या भाषेत हा भानगड शब्द कसा सर्व समावेशक आहे! अगदी दिलका मामला पासून चोरी-लबाडी. काहीही कव्हर होते त्यात. तर माझी भानगड.. तारूण्यसुलभ म्हणजे पहिल्या प्रकारातील! कोणास वाटेल मी या क्षेत्रात मुसंडी मारली असेल जोरदार.. तर तसे काही नव्हते. जस्ट मी एक शॉर्टलिस्ट करून ठेवली. दिनरात आपली दिवास्वप्ने पाहू लागलो. त्यात या बावळट चंद्रूकडे थोडे दुर्लक्ष स्वाभाविकच म्हणावे लागेल. या क्षेत्रातल्या दर्दींना मी म्हणतो ते नक्कीच पटावे.

तर माझे लक्ष विचलित करणारी ती.. कारखानीसांची कावेरी होती. कावेरी नाव चंद्रकांतासारखे जुनाट तुम्हाला वाटायचे तर वाटो. मला ते मॉडर्न वाटायचे. म्हणजे काय जुनी नावे नव्याने ठेवायची फॅशनच आहे आजकाल. मुलींत.. अगदी अनसुया, सत्यभामा.. वगैरे.

कावेरीला मी एकांतात काऊ म्हणायचो. हा एकांत म्हणजे मीच एकटा असेन तेव्हा! खरेतर चंद्रूला बावळट म्हणताना या क्षेत्रात मीही तितकाच मागास होतो. एकतर काऊ माझी ज्युनियर.  तिची माझी ओळख होणे ही कठीण. त्यात मी स्वतःला तसा स्मार्ट समजत असलो तरी माझ्या मोबाईल इतकाही स्मार्ट नव्हतो. काऊ सुंदर होती.. हुशारही असणार. अभ्यास करत लायब्ररीत बसायची. किमान सिन्सियर तर नक्कीच असणार. दोन दोन वर्षे ज्युनिअर असलेल्याची कशी काढावी ओळख? मी तसा याबाबतीत मुखदुर्बळ.

एक दिवस कॉलेज कट्ट्यावर मी आणि चंद्रू बसलेलो.. समोरून ती.

'ती पहा माझ्या दिलकी धडकन..'

मी चंद्रूला म्हणेपर्यंत खरेच माझ्या हृदयाची धडधड वाढलेली. आणि हा बावळटासारखा तिला पाहात बसलाय..

"तोंड मिट.. माशी जाईल.."

मी म्हणालो तसा त्याने वासलेला आ मिटला. चंद्र्याने पण पहावे अशी होतीच माझी काऊ! काही असो.. चंद्रू बोलला काही नाही.. अर्थात त्याच्याकडून असली अपेक्षापण नव्हती म्हणा! नंतर मी आपल्या त्या खयालोंमें हरवलो. काऊ अर्थातच निघून गेली. चंद्रू पुढे एकदोनदा तिच्याबद्दल बोलला चक्क! एकदा तर नावासकट! म्हटले थोडी तर प्रगती आहे! मी आपला जिथल्या तिथे होतो. तिच्यापर्यंत पोहोचावे कसे याच्या सदैव विचारात. अर्थात माझी ती कोंडी काय फुटायची नव्हतीच. आपले 'चांद को क्या मालूम चाहता है उसे कोई चकोर' म्हणत बसायचो. अशावेळी जुनी पुराणी दर्दभरी गाणी बरी वाटतात. आजच्या जमान्यात एकूण दर्दच कमी झालाय का न कळे.

त्या काऊच्या स्वप्नात दंगल्याने झाले इतकेच.. माझी चौथ्या टर्ममधली ग्रेड गेली खाली. घरून मिळाले रट्टे. इतका पिटलो मी की चंद्र्याला पण माझ्यावरची ग्रेड मिळाली. तर झुरण्यातून निष्पन्न झाले ते इतकेच. हां.. एक अजून झाले, ते चंद्रूबद्दल. माझ्याहून बरी ग्रेड काय मिळाली.. पठ्ठ्या शायनिंग मारतो की काय वाटायला लागले. बहुधा माझीच नजर थोडी कलुषित असणार.. कारण चंद्रू सुधरून सुधरून किती सुधरणार होता! पण एक दिवस तो चक्क नव्या कोऱ्या जीन्स नि टीशर्टात अवतरला! डोळयांवर गॉगल, पायात बूट! गधडा स्मार्ट दिसत होता.. कात टाकून आल्यासारखा. एरवी जगाच्या कल्याणासाठी झुरणारा मी त्याच्या ह्या रूपाकडे पाहून आनंदी व्हायला हवा होतो.. पण त्या परीक्षेच्या निकालामुळे माझे डोके आऊट झालेले! उगाच

डाफरलो त्याच्यावर. त्यात माझ्या पुढे न सरकलेल्या प्रेमप्रकरणामुळे आलेल्या निराशेचा ही भाग होताच.

काही असो..

मी त्यातून बोध घेतलाच..

आणि मी स्मार्टपणाने पटापट सात कलमी निर्णय घेऊन टाकले, ते असे..

१ काऊच्च्या नावाची कावकाव करत बसण्यात अर्थ नाही!

२ अभ्यास प्रथम.

३ डिग्री सलामत तो नोकरी पचास आणि नोकरी सलामत तो छोकरी पचास! थोडक्यात.. डिग्री सलामत तोहीच छोकरी पचास!

४ कट्ट्यावर जास्त चकाट्या पिटणे बंद.

५ चंद्रू सारखे व्हावे ..

६ उगाच कुणाच्या अध्यात मध्यात नाही..

७ ग्रेड उंचवावी.. पताका फडकवावी!

माझे एक आहे.. निर्णय घेतला की मी त्याची अंमलबजावणी लगेच करतो. आता लायब्ररी एके लायब्ररी नि अभ्यास एके अभ्यास!

काऊ.. नव्हे कावेरी बाद!

जिस रिश्ते का कोई भविष्य ना हो.. उसे क्यूं कवटाळके बसने का बाबू?

त्यामुळे झाले असे की चंद्र्याशी भेटी कमी झाल्या. तो विशेष लायब्ररीत बसत नसे. कावेरी असायची समोर अभ्यास करत, पण मी मात्र माझे परतीचे

दोर कापून ठेवलेले. काऊ .. नाही कावेरी होती मात्र छान.. पण माझी डिग्री त्याहूनही सुंदर असायला हवी!

चंद्र्या मात्र दिवसेंदिवस बदलत चालला.. स्मार्टपणाकडे वाटचाल चक्क!

आणि काही दिवसांत त्याने चक्क स्मार्ट फोन घेतला!

टर्म पुढे सरकत होती. मी बऱ्यापैकी माझ्या ढासळत्या अभ्यासाचा बुरूज सावरून होतो. चंद्र्याशी भेटी पण कमी झालेल्या.

एक दिवस भेटला.. छान टीशर्टात नि जीन्स मध्ये..स्मार्ट  कॉलेजकुमार! म्हणालो,"काय ऐकत नाही.. स्मार्ट.."

"तुझी कृपा यार..

"माझी..?"

"तुझा आग्रह होता ना.. त्यामुळे साधारण कॉलेजच्या पोरांसारखे कपडे.."

"बऱ्यापैकी महागातले दिसतात.."

"हुं..अरे आईबाबांकडे नाही मागत.. एक ट्र्यूशन धरलीय.."

"ट्र्यूशन?"

"हुं.. आहे एक. मॅथ्स शिकवतो. अर्न अँड लर्न!"

"चांगलाच सुधारलास की.."

"हुं.. वक्त वक्त की बात .. त्यामुळे बदलावेच लागते मित्रा. पण थ्यांक्स टू यू.."

एका मर्यादेपर्यंत मी त्याच्या सुधारणेला  कारणीभूत असेनही पण तीन तीनदा याने आभार प्रदर्शन करावे? एक होते, ही नो लॉंगर कुड बी कॉल्ड बावळट! म्हटले सगळे राहू देत बाजूला, आता अभ्यास एके अभ्यास! मी अभ्यासात झोकून दिले स्वतःला. ते वन वे प्रेमप्रकरण कम प्रेमभंग विसरलो. आणि पुढच्या परिक्षांच्या तयारीस लागलो.

***

मध्ये काही महिने गेले.

लास्ट टर्म आमची. मागच्या टर्मला मी बऱ्यापैकी प्रगती केलेली. मेहनतीची फळे दिसल्यावाचून राहात नाहीत. चंद्रू मागे पडला. मागे पडला म्हणण्यापेक्षा होता तिथेच राहिला. आधीच्या टर्ममध्ये खरेतर मीच त्याच्याहून मागे पडलेलो. तो काही पुढे गेला नव्हता. कावेरी दिसायची. का कोणास ठाऊक एक दोनदा ती माझ्याकडे पाहून हसल्याचा भास झाला मला. भासच असणार. पण एकदा ज्या गल्लीत जायचेच नाही ती कशाला गुगलवर सर्च करायची? त्यामुळे मी आपल्या ध्येयाकडे वाटचाल करीत होतो आणि खरे सांगू काऊला पटवण्याच्या ध्येयापेक्षा हे तसे सोपे वाटत होते हे खरे!

मग एका संध्याकाळची गोष्ट.

लायब्ररीत बसून अभ्यास करून घरी निघालेलो मी. रस्त्यात कॉलेज कट्टा लागला. कट्ट्यावर कावेरी दिसली. निळ्या ड्रेसमध्ये. तिच्याकडे पाहता पाहता लक्षातच नाही आले.. तिच्या बाजूस एक मुलगा होता..ते साहजिकच होते तसे..

म्हणजे ती असताना दुसरीकडे लक्ष न जाणे. आणि तो कोण असावा..? यस्स.. तुमचा तर्क खरा आहे.. चक्क मी बावळट समजायचो तो .. चंद्र्या!

आजवर मी कितीतरी धक्के पचवायची मनाची तयारी केली असेल. खास करून त्या परीक्षेत गटांगळ्या खाता खाता वाचल्यानंतर. पण हा जोरका धक्का, लागला ही जोरातच! दोघे बसलेले कट्ट्यावर, तेही हातात हात घालून! म्हणजे स्टोरी चांगलीच पुढे गेलेली. मी झटकन मागे वळून दुसरा रस्ता पकडला. मी सदैव जगाच्या कल्याणाच्या विचारात असताना या चंद्रूचे असे काही कल्याण होईल असा कधी मी विचार नव्हता केला.

आणि माझा बावळट टर्नड् स्मार्ट मित्र.. माझ्याच (एकतर्फी) मैत्रिणीला पटवून नि गटवून बसलाय.

शॉक जबरदस्त होता.

अभ्यासात मी इतका गुंग होतो की हे असे काही होतेय याचा मला पत्ता नसावा? माझ्या नजरेसमोर आले. मागे कावेरीला बघताना बावळटावतारात उघडे पडलेले चंद्रूचे तोंड.. आणि आता 'आ' वासायची पाळी माझी होती! कसे काय केले असेल याने, जे मी सोडून दिले होते अशक्य समजून?

मला ससा कासवाची गोष्ट आठवली.

मी ससा नव्हतो हे खरे. पण तो कासव होता हे मात्र खरे ..

बावळट वाटला तरी तसा नव्हता हे ही खरे.. आणि तो ही न लावलेली शर्यत जिंकला होता हेही खरेच! हे सारे मान्य करायलाच पाहिजे.

दोन दिवसांनी चंद्रू भेटला. नेहमीसारखाच.. स्मार्ट कपड्यांत.

त्याला बाजूला बसवत म्हणालो..

'कैसे जमा लिया यार तूने?"

"कशाबद्दल बोलतोयस?"

"जसे काही तुला माहितीच नाही.."

"तू कशाबद्दल बोलतोस ते नाही माहिती.." "कावेरी.."

"ओह..!"

तो चक्क लाजला.

इतक्या वर्षात त्याच्या गालावर खळ्या पडतात हे मला दिसले नसावे? की ह्या पण नवीनच उगवल्या? न्यू इंप्रूव्हड स्मार्ट चंद्रू विथ खळीज ऑन चिक्स?

"हां.. ते.. ती.. असेच.. जमायचे ते जमून जाते.."

"साल्या .. असे तसे काही नाही होत. मी एक टर्म तिच्यापायी मागे पडलो. पण तिच्याशी शब्दही नाही बोललो कधी.. नि तू?"

"सांगेन कधीतरी.."

तो 'कधीतरी' लवकरच आला..

जे ऐकले ते 'दिसते तसे नसते'चा पुरावा होता.. चंद्रू बावळट कधी नव्हताच.. जस्ट बावळ्या वेशात अंतरी नाना कळा घेऊन वावरत होता.

खरा बावळट तर मीच होतो!

म्हणाला,"मी फक्त एकच केले.. ढ चा ट केला!"

बाकीच्या विषयांत कसाही असो चंद्रू, गणित त्याचा पक्का विषय होता. काय चक्कर चालवले त्याने की तो ट्यूशन घ्यायला पोहोचला तो थेट कारखानीसांकडे! तेही चक्क रोज एखाद्या पन्नाशीतल्या माणसाचे सोंग घेऊन! हेही त्यानेच सांगितले.

म्हणजे मध्ये एकदा तो ट्यूशन घेतोय मॅथ्सची म्हणालेला ती ही? आणि त्याच पैशांतून हा स्मार्ट बनत चाललेला! कारखानीसांना पत्ता ही नसेल आपल्याच भावी जावयास मदत करतोय आपण अशी याचा! हुंडाबंदी झाली.. पण याला एक प्रकारचा हुंडाच म्हणावा का? एखाद्या सिनेमात शोभावी अशी कथा समोर घडली माझ्या नि मला कळले देखील नाही इतके दिवस?

आता कावेरीला त्याने आधीच जिंकले नि मग ट्यूशन घ्यायला गेला की आधी ट्यूशन मग किल्ले कावेरी सर केला हे काही त्याने सांगितले नाही. म्हणाला,"सिक्रेट आहे ते.."

असेल ते असो..

रिझल्ट समोर होताच.

पण आढेवेढे घेत सांगितले ते हे की त्याने फक्त 'बेटी बचाओ बेटी पढाओ' जरा बदलून घेतली घोषणा..

म्हणाला.. "माझ्या नवीन घोषणेत .. बेटी पढाओ.. बेटी पटाओ.. झाला की नाही ढ चा ट? मी फक्त थोडा बदल केला.. कारखानीसांकडे बेटीची ट्यूशन.."

सॉलिड निघाला हा चंद्रू.. ऐतिहासिक 'ध चा मा' नंतर बहुतेक पहिलाच वीर 'ढ चा ट' करणारा!

मी अजूनही आहे सडाफटिंग..

चंद्रूकडून शिकायला पाहिजे. ट्यूशन त्याची? पण तो माझी ट्यूशन घ्यायला मी थोडीच बेटी आहे?

खूप वर्षांपूर्वी असा कुठला सिनेमा आला होता .. ससा नि कासवाच्या कथेवर.. त्यातही कासव जिंकून गेला होता हीरॉइनला म्हणे! कुठला सिनेमा कोणास ठाऊक.. पण पाहिला पाहिजे. यू ट्यूबवर. कदाचित मला कुठला क्ल्यू मिळून जाईल!

बावळट चंद्रू आता मजेत आहे. आनंद आहे. कल्याणमस्तु..

अखेर काय सर्व सर्वत्र संतोष पावले म्हणजे झाले. अजून काय हवे? आणि स्वतःकडे मात्र सगळाच आनंद असला म्हणून काय झाले?

# ऑपरेशन चाळीतून सुटका!

खरे सांगायचे ना तर चाळ नावाच्या वाचाळ वस्ती बद्दल आजवर खूप काही लिहून झालेय. एखाद्या आवर्ती वाऱ्याप्रमाणे चाळीबद्दलच्या स्मरणरंजनास साहित्यात तोटा नाही! आपल्या लहानपणी शेजारच्या फुल्यांच्या नाहीतर गणफुल्यांच्या घरात तळलेल्या बोंबलावर कसा ताव मारला किंवा घारपुरेंच्या घरात पाणीपुरी कशी तोंडात कोंबली याचे एकदम नॉस्ट्याल्जिक वर्णन आम्हाला कुठेही मिळू शकेल!

स्मरणरंजन म्हटले म्हणजे त्या गोष्टीपासून दूर जाणे आले.. थोडक्यात एखाद्यास त्या चाळीतून दूर गेल्यानंतरच या चाळीबद्दल कंठ फुटतो! हे देखील योग्यच म्हणायचे! चाळीत राहणाऱ्यास बिल्डिंगमधल्या फ्लॅटची स्वप्ने पडावीत.. ते साकार करून परत त्या पोटात माया असलेल्या चाळीची आठवण यावी.. स्वाभाविकच आहे! नाहीतर खुद्द चाळकऱ्यानेच नसती लिहिली अशी चाळकथा? म्हणजे चाळीतल्या एकुलत्या नळावरील पाणी भरताना कुणी प्रभा आणि प्रभाकर कदाचित नैन लडा बैठे होंगे पण बहुतांश वर्णने एका खोलीतील घुसमटीची वा  नळावरच्या लायनींची नि उभे राहून भांडण्याचीच असायची. इथे लायनी मारणे नव्हे तर लावणे!  म्हणजे साध्या सरळ किंवा वेड्यावाकड्या रांगा लावून नळासमोर वा एकुलत्या एक बाथरूम समोर शांत चित्ताने साधना करणे!

तर मनू म्हणजे मंगेश.. ऊर्फ मन-गेश कळसकर.. देखील चाळकरीच! मंगेश खरा मंगू म्हणवायचा. पण नाही.. त्याचा मनू झाला. झाला म्हणण्यापेक्षा मी केला. कारण काही असो. पण केला. तो राहतो त्या सत्यभामा सदनाच्या म्हणजे भामाचाळीनामक तीन मजली चाळीत. म्हणजे मनू चाळकरीच (पण पूर्वाश्रमीचा!). तसे चाळीबद्दलच  लिहिण्यासारखे आहे खूप पण लोकांना असतो रस फक्त वर म्हटले ना तशा प्रभा नि प्रभाकरच्या कहाणीत! तशी काही गोष्ट नाही मन्याची आणि काल्पनिक म्हणून लिहावी काही आणि मन्याच्या सद्य बायकोच्या हाती पडावी.. नि त्यानंतर नसती आफत यावी.. आणि फट् म्हणता मनूहत्या व्हावी.. त्यापेक्षा आपले त्यापासून लिहिण्यातही दूर राहिलेले बरे.. नाही का?

तर मुद्दा हा की मनू चाळकरी. तिसऱ्या मजल्यावर.. सत्यभामा सदनात. माझ्या घराशेजारीच राहणारा. आम्ही सख्खे शेजारी.. दोघांनाही अगदी छप्पर फाडके दिलेले देवाने..  म्हणजे एकच छप्पर, तेही गळके, शेअर करणारे आम्ही! आमच्यावरचे छप्पर गळके म्हणून पहिल्या नि दुसऱ्या मजल्यावरच्यांचा हेवा वाटावा अशी स्थिती. बाहेरील उघड्या चौकात पडणारा विविधढंगी कचरा म्हणजे आमच्या चाळीतल्या विविधतेचा नमुना असे. उगाच कचऱ्याला कचरा म्हणून त्याचाच कचरा करायची वाईट सवय आहे आमच्या लोकांना. नळावरच्या लायनी.. बाथरूमबाहेरील प्रतीक्षा.. काय काय सांगावे?  पण ते एक असो. सांगायचा मुद्दा वेगळा आणि कथा काही दुसरीच आहे. कितीही कचराआख्यान मनोरंजक वाटो.. तो या कथेचा विषय नाही!

तर अशा या चाळीतील घरात एका उपवर मुलास काय भवितव्य असावे? म्हणजे कितीही आमची चाळ आमच्या आयुष्याचा हिस्सा असो.. आमच्या उपवराचा भाव मात्र सदा पडलेला! हे अर्थातच मनूबद्दल.

म्हणजे झाले असे..

मनू आमचा बीए, बीएड झाला. आणि कोण म्हणेल नोकऱ्या नाहीत असा चक्क शाळेत लागलाही! कुणी म्हणे वशिला असेल.. कुणी काही. पण हे झाले असे खरे. त्याचा त्रास मला झाला हे जाता जाता सांगतो.. म्हणजे तसा मनू शाळेत माझ्यापेक्षा किमान दहा नंबरांनी मागे असायचा. भूमितीतील कित्येक प्रमेये मीच शिकवलेली त्याला. इतिहासातल्या सनावळ्या पेपरात पण माझ्याच पेपरातून कॉपी करायचा बोर्डाच्या परीक्षेपर्यंत. पुढे मी बीएस्सीला गेलो.. अजून एमएस्सी पार नाही पडले माझे. आणि हा आताच नोकरीस ही लागला! माझ्या घरी माझ्या अजून सुरू असलेल्या शिक्षणावरून टोमणे खायला लागावेत नि माझ्याच ह्या मित्राची नोकरी कारण ठरावी ना? पण त्यात त्या बिचाऱ्याची चूक नव्हती. तर ते असो.. विषयांतराची तशी सवय आहे मला. कुठून कुठून गाडी परत ट्रॅकवर आणावी लागते! तर, मनू कमावता झाला आणि त्याच्या घरी लागले वेध ते त्याचे दोनाचे चार हात करण्याचे.

कॉलेजमध्ये त्याची एक मैत्रीण होती. छाया छत्रे. तिच्याशी मेतकूट जमेल की जमवता जमवता मेटाकुटीला येईल हा? मला शंका होती पण जमवले बेट्याने.

खरे सांगतो.. त्याची ती 'ती' छान होती. पण आमच्यापेक्षा चांगल्या घरात राहणारी होती. ती आमच्या या भामाचाळीत येईल..?

काही असो.

अजून तरी मनूच्या 'मनची बात' घरी फुटली नव्हती. म्हणजे त्याने फोडली नव्हती. तिला या घरात आणायचे किंवा ती या घरात येण्यास तयार होईल? नाहीच! म्हणून त्याआधी त्याने घराचा विषय फोडलेला घरी!

मनूचे बाबा म्हणजे अप्पा आपल्या चाळीचे महाअभिमानी. त्यांनी आपल्या  कष्टाच्या कमाईने घेतलेली ती खोली नंबर ३०३! काही वर्षांपूर्वी. तेव्हा तिसऱ्या किंवा चौथ्या मजल्यावर घर स्वस्त मिळे. आमच्या चाळीला तीनच मजले नाहीतर चौथ्यावर घेतले असते घर. गिरणीतल्या नोकरीत त्यांना परवडेल अशी हीच एक जागा होती. आणि त्यांच्या आयुष्यात कदाचित अभिमान वाटावा अशी एकच गोष्ट असावी ती. त्यांचा हट्ट मान्य करूनही 'आधी लग्न नव्या घराचे मग स्वतःचे' एवढी खूणगाठ मनाशी मांडून बसलेला मन्या. घरी नव्या घराचा विषय काढणे त्यांच्या नव्या सुनेचा विषय काढण्याहून कठीण! पण एके दिवशी बोलला असावा.

रात्री मी असा जिन्याच्या पायरीवर बसलेलो. रात्री चाळ शांत असे. मन्या आला तडतडत!

म्हटले, "काय छायेशी भांडण? स्वतःच्याच सावलीशी भांडू नये!"

छायाला सावली म्हणून मी हाक मारीत असे!

मंगेशने माझ्याकडे दुर्लक्ष केले नि म्हणाला मला, "अरे काल अप्पा आणि आई समोर बोललो.. नवीन जागा पाहूया म्हणून.. अप्पा म्हणाले, का? टोचतेय हे घर? ज्यात तू जन्मलास? स्वतः कमाव.. मग नवीन घर काय..अगदी बंगलाच घे! आणि ऱ्हा एकटा!"

अप्पांचा स्वभाव तसा तिरपागडा. एकदा बोलले की बोलले. त्यात बदल नाही. अगदी चाळीच्या कठड्यावरची रेघ!

मग एके दिवशी रात्री मनू आणि मी आमच्या जिन्याच्या पायऱ्यांवर बसून सुखदुःखाच्या गप्पा मारत होतो..

"तुला सांगू.. छायाला पटवणे अप्पांना पटवण्याहून सोपे.. पण ती या चाळीत कशी येईल.. टेन्शन यार!"

"अरे सोड.. काही न काही करू.. शेवटी आपण भामाचाळीतले! अडचणींवर मात हाच बाणा आपला!"

"हुं.."

"आठवते? आपल्याकडे खेळायला बॉल नव्हता तर आपण रबरबॅंडांचा बॉल बनवून खेळलेलो मॅच.. किंवा आपल्या गणपतीत आपण सगळ्या अडचणीवर मात करत केलेली नाटके.. एकदा तर मी तीन रोल केलेले कुणी नव्हते तर.. आणि तू डबल.. आणि.. ते आग्र्याहून सुटका.. आठवतेय..?"

"ते वेगळेय रे.. हे वेगळे."

"वेगळे कसले.. एकच! शेवटी काय अडचणीच आणि अडचणीवर मातच आणि काय?"

"हुं.."

"अडचणी मोठ्या तर आपली आयडिया मोठी हवी.. आणि.."

"आणि काय?"

"अरे.. मोठा घोडा झालायस तू सुद्धा.. लग्नाच्या बाता करतोयस.. गुडघ्याला बाशिंग बांधायला निघालास आणि.."

"हुं.. खरंय.. बघूया. करू काही"

"काहीतरीच?"

"काहीतरीच नाही.. काहीतरी!"

"वा! द्याटस द भामा स्पिरीट!"

*****

मन्याच्या घरी त्याच्या लग्नाची चर्चा जोरात असतानाच काही दिवसांतच मन्याच्या घरी विवाह प्रस्ताव आला! म्हणजे चक्क मुलगी सांगून आली. हे अप्पासाहेबांनीच सांगितले मला! मी बाल्कनीत उभा होतो. दुसऱ्या मजल्यावरच्या काळयांकडे एक कुणी गोरीगोमटी आलेली तिला न्याहाळत होतो. छान होती. काय असेल नाव हिचे? मी विचारात असतानाच पाठून अप्पांची थाप पडली!

"ऐकतोयस.. मंगेशाला स्थळ सांगून आलंय!"

नाईलाजाने त्या गोरीगोमटीवर नजर नाही असे दाखवत मी म्हणालो, "अरे वा! छानच! कोण आहे मुलगी?"

"आहे कुणी बीए झालीय म्हणे! पडबिद्री कुणीतरी"

"छान.. पडबिद्री का? जुळले तर उडवून टाका बार!"

"खरंय बाबा! जुळवून टाकायला हवे. मंगेशाकडे काय नाही.. कायमची नोकरी आणि मुंबईत स्वतःची जागा.. अजून काय हवे?"

"खरंय काका!" मी म्हणालो.

अप्पासाहेब तर आत निघून गेले.. तोवर ती गौरी पण निघून गेली. 'गौरी' हे मीच केलेले बारसे!

तीन एक दिवसांनी अप्पासाहेब कळसकरांच्या दरवाजावर कुणी अनाहूत येऊन उभे राहिले.. वयस्कर गृहस्थ पण केस भरपूर. बहुतेक पांढरे. अंगात जाकिट सदरा आणि पायजमा. दरवाजा ठोठावत म्हणाले,

"यावे का आत? मी अण्णा पडबिद्री!"

"अरे वा! वा! या अण्णासाहेब या!" अप्पासाहेब अंगात अंगरखा चढवत बोलले.

"मिळाली ना आमची बिल्डिंग?"

"हो.. फेमस अगदी.. सत्यभामा सदन म्हटले तर कळेना कुणाला.. भामाची चाळ म्हणे.. तर एकाने लगेच दाखवली जागा!"

अण्णा पडबिद्री खोलीच्या चारी बाजूस नजर फिरवत बोलले.

अप्पासाहेब तातडीने चाळीचा विषय बदलत म्हणाले,"पडबिद्री म्हणजे..कुणीकडचे?"

"आम्ही हिंगोलीचे.. ते गडहिंग्लजच्या बाजूला.."

"हो.. ठाऊक आहे. आमचे एक मास्तर रहायचे तिथे."

"अरे वा! म्हणजे तुमची शाळा तिकडची?"

"ते नाही हो.. मास्तर आमच्या गिरणीतले."

"ओ.. गिरणीतही असतात का मास्तर.."

"हो तर!"

"असणार.. सूतकताई शिकवत असतील.."

"बरे मंगेशराव नाही दिसत?"

"तो? येईल आताच. शाळेत गेलाय. नोकरी नवी आहे. पण पर्मनंट.."

"छान!"

"आमच्या मंगेशला ना अभ्यासाची गोडी खूप. मी म्हणायचे कशाला एवढा अभ्यास.. पण नाही.."

नवे पात्र पडद्यामागून बाहेर येत म्हणाले, ते म्हणजे मंगेशची आई कलावती.

"हो ना!"

अप्पासाहेबांनी अनुमोदन दिले.

"सांगते काय.. त्याचे एक एक मित्र अजून रखडतायत.. तो शेजारील देवू.. अजून शिक्षणही नाही पार पडले. पण माझा मंगेश मात्र नाही हो.. नोकरीदेखील मिळविली त्याने."

"मग आता छोकरीचा नंबर?" अण्णासाहेब म्हणाले खरे नि बोलता जीभ चावली त्यांनी.

इतक्यात मंगेश आलाच.

समोरच्या लोखंडी खुर्चीत बसत म्हणाला, "नमस्कार!"

मग बोलणी झाली इकडतिकडची. अण्णा पडबिद्री कांदेपोहे खाऊन जायला उठले.

"मग कधी करूया मुलगी बघण्याचा कार्यक्रम?" अप्पासाहेबांनी विचारले.

"बघूयात.. बाकी सारे ठीक हो पण आमची रश्मी कशी राहिल या चाळीत.. तरी पण पाहू. बरंय मंगेशराव.. निघतो.."

पडबिद्री तर गेले पण मन्याच्या घरी सुतळी बॉम्ब सोडून.

"पडबिद्र्या.. काळुंद्र्या.. चिचुंद्र्या.. आमची चाळ आहेच सुंदर. तू कोण लागून गेलायस राजा.. महालात राहतोस की घरात? की आहे राजवाडा? महाराज पड..बिद्री साहेब.. या अप्पा कळसकराचे घर असेल चाळीत.. भामाचाळीत.. पण कष्टाची कमाई आहे.. नको तुझी मुलगी.."

अप्पा कळसकरांनी अण्णांचा उद्धार केला.

मन्याने सारी हकीकत सांगितली रात्री. मुख्यत्वे अप्पासाहेबांच्या ज्वालामुखीचा उद्रेक कसा झाला ते!

पण हा ज्वालामुखी वारंवार जागृत होणार होता! मन्याच्याच सांगण्यानुसार निद्रिस्त तो कधी नव्हताच. मध्ये कुणी चाळीचा चुकूनही उद्धार केला तर उद्रेक व्हायचाच! आता यावेळी पडबिद्रींनी कारण पुरवले इतकेच.

तर पडबिद्री पाठोपाठ आले ते बार्शी मधले परमानंद पडसलगीकर आपल्या कन्येसाठी.. पन्नाशीतले गृहस्थ. विस्तीर्ण टक्कल. पायात कोल्हापुरी चपला. खांद्यावर झोळी अडकवून आले.

"नमस्कार! मी परमानंद पडसलगीकर! बार्शीहून आलोय." दरवाजासमोर उभे राहात म्हणाले.

अण्णासाहेबांना कोटी करण्याचा मोह आवरला नसावा. म्हणाले,"या! आपल्याला भेटून परम आनंद झाला! सापडली ना सहज जागा?"

"विचारत आलो चौघांना. सत्यभामा सदन कुठेय. तर एक जण म्हणाला, ती भामाची चाळ.. सत्यभामा सदन नाही काही. त्यानेच सोडले आणून. छान आहे.. चांगलीच प्रसिद्ध आहे वाटते चाळ?"

अप्पासाहेब खुशीत आले. म्हणाले,"प्रसिद्ध म्हणजे काय! कुणालाही विचारा. सर्वात जुनी आणि प्रसिद्ध. भामाचाळीचा गोविंदा प्रसिद्ध आहे. आमचा गणपती नवसाला पावतो अशी ख्याती आहे. आणि आमच्या चाळीतला नवरात्रोत्सव.."

अप्पासाहेब अजूनही गुणगान करत बसले असते पण तेवढ्यात कलावतीबाई म्हणाल्या,"बार्शीला माझ्या मावशीच्या नणंदेची जाऊ राहते. आणि माझ्या मामाच्या मुलीला तिकडच्या कुडचडकरांच्या घरी दिली आहे. तिकडे त्या कल्हईवाल्या मारूतीच्या बोळात वाडा आहे त्यांचा.. स्वतःची विहीर आहे."

यातून काही बोध होवो न होवो.. पण अप्पासाहेबांच्या भामा पुराणातून परमानंदांची सुटका झाली! आणि त्याचाच त्यांना परमानंद झाला!

"आम्ही बार्शीचे आता.. पण तसे तळकोकणातले. आमचे पणजोबा जाऊन तिकडे स्थायिक झाले आणि आम्ही बार्शीकर झालो. बॉर्न अँड ब्रॉटप ॲट बार्शी. आमची कृती पण त्याच तिथे.."

"कसली कृती?"

"कृती म्हणजे आमची लाडकी हो. तिचे नाव कृती. तर मंगेशराव भेटले असते तर.."

"तो ना.. अहो तो शाळेतून येईल आता!'

"शाळेतून?"

"म्हणजे शिक्षक आहे ना."

"छान! आमच्या कृतीने पण केला आहे, मॉंटेसरीचा कोर्स."

"अच्छा, म्हणजे मॉंटेसरी पर्यंत शिकलीय?"

"नाही म्हणजे शिकवण्याचा हो.."

"छान! एकदा मुलगी पहायचा पार पडू देत कार्यक्रम मग पुढे."

मंगेश तितक्यात आलाच..

गप्पा झाल्या. चहापान झाले. पडसलगीकर निघून गेले. त्यांच्यामागे अप्पासाहेबांनी त्यांची स्तुती केली..

"देवमाणूस अगदी. आपल्या मंगेशासाठी देवानेच पाठविला!"

अगदी कृतार्थ झाले ते! त्यांच्या भामाच्या चाळीचे कौतुक कुणी केले की त्यांना असाच परमानंद होई!

पुढे दोन दिवसांत परमानंदांचा फोन आला, 'मुलगा पसंत पडेलच. आमच्या कृतीची कृती आमच्या सांगण्याबाहेर नाही.'

अप्पासाहेब आनंदाने वेडावले. आता जमलेच ते लग्न अशा समजुतीत खूश झाले! मंगेश आणि कृतीच्या जोडीची डोळ्यांसमोर आकृती आणत बसले. मुलगी बघायला जायचे कधी यावर विचार झाला! उतावीळपणे त्यांनी

फोन लावला. पडसलगीकर म्हणाले पलिकडून, 'आम्हीच आलो असतो हो पण मुलीला चाळीत राहायची सवय नाही!'

यावर पुढे काय बोलणार अप्पासाहेब? फोन ठेवून त्यांनी त्या पडसलगीकर नामक देवमाणसाचे दानवात रूपांतर झाले. ज्वालामुखीचा उद्रेक व्हायचा तो झालाच!

पुढे अजूनही काही आले. पंढरपुरातून मुरलीधर मरतुकडे आले. चंद्रपुरातून जमदग्नी जमनाडे, सोलापुरातून धुरंधर धोत्रे आणि अमरावतीतून फणींद्रनाथ फेणे! कुणीही येवो, होणारी हकीकत काही फार वेगळी नव्हती. सर्वांचा शेवट शेवटी चाळीवर येऊन थांबे. अप्पासाहेबांना शेवटी दरवेळी नवनवीन पद्धतीने एकेकाचा उद्धार करावा लागे.

***

एका रात्री आमच्याच भामाचाळीच्या जिन्याच्या पायऱ्यांवर बसलो होतो. मन्या आला. पाठीत बुक्का हाणीत म्हणाला, "कुळ्या, वेल डन!"

कुळ्या म्हणजे मी! देवदत्त देवकुळे.

"तुझ्या वेशांतरास तोड नाही कुळ्या! अण्णासाहेब काय नि परमानंद.. शेवटचे धुरंधर तर एकदम सॉलिड!"

"अरे, नाहीतर आपल्या नाटकांचा फायदा तो काय?"

"खरंय. फक्त एकदा अप्पा बोलले, हे सगळे येताहेत ना तुला पहायला त्यांचा आवाज सारखाच का वाटतोय!"

"ओके.. म्हणजे पुढच्यावेळी आवाज पण  बदलू?"

"नो पुढची वेळ! अप्पांनी नवी जागा शोध म्हणून ग्रीन सिग्नल दिलाय!"

"काय सांगतोस काय? जरा डिटेल सांग की.."

"अरे.. झाले ते असे.. ते सारे वधूपिते आले.. तुला ठाऊकच आहे.."

"ठाऊकच कसले.. प्रथमपुरूषी एकदम!"

"तर त्या सगळयांनी.. म्हणजे तूच, डोके खाल्ले अप्पांचे त्या चाळीवरून आणि शेवटी उंटाच्या पाठीवरच्या शेवटच्या काडीसारखी स्थिती झाली."

"उंट आणि मुंबईत?"

"गप रे.. तर आई म्हणाली, माझ्या मंगेशाला मुलगी मिळणार नाही जोवर आपण या चाळीतून बाहेर पडत नाही! आधीच अप्पा कावलेले! त्यात हा घरचा अहेर! शेवटी अप्पा म्हणाले, नव्या पिढीला कसली किंमत नाही! शोधा हवे तसे घर! कर्ज काढा आणि घ्या. नि फेडत बसा आयुष्यभर!"

"वॉव! मस्त! म्हणजे माझे काम संपले म्हण की!"

"सध्या तरी. तुला बरी नावे सुचली ती.. परमानंद पडसलगीकर! जनार्दन जमनाडे.. धुरंधर धोत्रे!"

"थ्यांक्स टू युवर सावली!"

"म्हणजे?"

"छाया! छाया छत्रे! तिच्यावरून सुचली ती नावे. छ आणि छ.. तसा मी पण दे आणि दे.. देवदत्त देवकुळे.. आणि कुठूनकुठून आलो मी.. बार्शी काय.. कोल्हापूर काय! जवळून कुठून आलो असतो आणि अप्पासाहेब आले असते तिकडे तर.. मग बोंब.. मुलगी दाखव नाहीतर श्राद्ध कर म्हटले असते! पण गंमत

सांगू मी अजून नावे बनवून ठेवलीत.. म्हणजे ॲम रेडी विथ मोअर नेम्स! म्हाळसाकांत म्हात्रे.. तुकाराम तेलतुंबडे.. पण त्याआधीच एक्झिट माझी.."

"हुं.. आता गरज नाही.. आपले सध्याचे काम झाले बरे! पण ठेवून दे! अजून कुठेतरी पडतील उपयोगी. तुझा मेकपमॅन मात्र फार चांगलाय..चांगलाच!"

"तुला नाही ठाऊक तो कोण? जाऊ देत.."

"जाऊ कशाला देत.. सांग.."

"रवींद्र छत्रे.. छायाचा मोठा भाऊ.. स्टेजवरचा मेकपमॅन आहे तो प्रसिद्ध.."

"कोण? रवींद्र?"

"यस्स.."

"मला कसे नाही माहिती?"

"तुला का माहिती नाही हे मला कसे असणार माहिती? पण तुला छायाशी गुलूगुलू गप्पा मारताना हे सुचावे कसे की तिचा भाऊ करतो काय? पण आमचे तसे नाही ना.. मी भेटलो छायाला. म्हटले, बाई गं.."

" बाई काय.."

"बरे, ताई.. गं.. तर तिला म्हणालो..ताई, एकतर चाळीत रहायला तयार हो.. नाहीतर मदत कर!"

"तुला माहिती होते रवींद्रबद्दल?"

"ऑफकोर्स.. गांव का बच्चा बच्चा जानता है बाबू! पण काहीही म्हण छान झाली ना करमणूक?"

"करमणूक? इथे माझ्या आयुष्याचा प्रश्न आहे.. आणि तू म्हणतोस करमणूक?"

"हा! हा! एका नटासाठी नाटक हे करमणूकच असते राजा! नाटक असंच असतं राजा.. नाटक असंच असतं.."

"बस बस.. नाटकी! पण थ्यांक्स.. पण आता खरे काम सुरू होतेय! जागा शोधायचे!"

"हुं.. आणि तिथे सोंग घेऊन नाही चालणार.. नटाला देखील सारी सोंगे आणता येतील पण पैशाचे सोंग नाही आणता येणार!"

"खरंय.. एक टेन्शन संपले तर दुसरे सुरू.."

"फिकर नॉट! अडचणीवर मात.. आपले ध्येय अडचणीवर मात! तर काही न काही तर होईलच!"

"होईलच नाही.. करावेच लागेल!"

"करावेच लागेल नाहीतर करावे लागेलच .. पण ते तुला! गुडघेको बाशिंग तुमने बांधा है बाबू.."


"ते खरंच पण.. वधूसंशोधन तर झाले आधीच.."


"आता पुढील कामास लागावे मंगेशराव! मागे आग्र्याहून सुटका नाटकात मी शिवाजी होतो.. पण आता या चाळीतून सुटका नाटकात सपोर्टिंग रोल माझा.. तेव्हा आमचा या नाटकातील रोल संपला.. इथे हीरो तुम्ही.. लागा कामाला! करा सुरू आता ऑपरेशन गृहसंशोधन! आणि एक.. छान घर शोधल्यावर या भामाचाळीतल्या कुळयाला विसरू नकोस म्हणजे झाले!"




# डॉ. नितीन मोरे यांची ५४+२ प्रकाशित पुस्तके






डॉ. नितीन मोरे
२अंकी बालनाट्य



लाडोबा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास





डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



एका डॉक्टरची
कोविडकथा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे

# चक्रमादित्य भाग १ ते ५


























डॉ. नितीन मोरे
Version 2.0.2.0





HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी





डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!



डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे







राग दरबारी


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



आधुनिक कहाण्या












डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


सांगतो ऐका



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे





डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


Jackson!


सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!
(अर्थात कविता २ डझन)

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

## डॉ. नितीन मोरे यांचे हे पंचावन्नावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५५पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१४), मधू

शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३७), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (४), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (१०), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (३), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी

रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)